**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी.**:राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या शहराबरोबरच ग्रामीण भागातही दरोडे, घरफोड्यांचे प्रकार यात झालेली वाढ.
**मु.शी.**: राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या शहराबरोबरच ग्रामीण भागातही दरोडे, घरफोड्यांचे प्रकार यात झालेली वाढ यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री. मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री पाशा पटेल, अरविंद सावंत, श्रीकांत जोशी, ॲड.अनिल परब, श्री.प्रकाश शेंडगे वि.प.स. यांनी दिलेला प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.स.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"गेल्या काही महिन्यात राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडणे, राज्यातील मुंबई, पुणे, ठाणे सारख्या मोठया शहरांबरोबरच ग्रामीण भागातही दरोडे, घरफोडयांचे प्रकार सतत सुरु असणे, सोने-चांदीच्या दुकानावर मोठया प्रमाणात दरोडे पडणे, सोन्या-चांदीच्या दुकानाबरोबर फ्लॅट, बँका यांच्यावरही दरोडे पडणे, दरोडे आणि घरफोडयांच्या प्रकारात वित्तहानी बरोबरच जीवीतहानी होणे, घरफोडयातील आरोपी पकडण्यात पोलीसांना अपयश येणे, आरोपी म्हणून पकडण्यात आलेल्या व्यक्ती केवळ संशयीत म्हणून पकडले जाणे तर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले इकबाल कासकर, हसिना पारकर सारखे खतरनाक गुन्हेगार पोलीस आणि सरकारी वकील यांच्या गाफीलपणामुळे जामीनावर सुटणे, दिनांक 11 जुलै,2006 च्या बॉम्बस्फोटातील अतिशय खतरनाक असे 15 आरोपी अजूनपर्यंत न सापडणे, राज्यभर सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचे वाढलेले प्रमाण, गुन्हेगारी आटोक्यात आणण्यास शासनास आलेले अपयश व याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, सन्माननीय श्री.आर.आर.पाटील हे या राज्याचे गृहमंत्री झाल्यानंतर राज्यातील जनतेची अशी अपेक्षा होती की, दरवर्षी होणाऱ्या विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर चर्चा होऊ नये. परंतु एकही अधिवेशन असे पार पडले नाही की, ज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेवर चर्चा झालेली नाही कारण राज्यातील परिस्थितीमुळे अशी चर्चा उपस्थित करणे आम्हाला आवश्यक व गरजेचे झालेले आहे. मागील नागपूरच्या अधिवेशनामध्ये या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 10:00

श्री.पांडुरंग फुंडकर.........

विषयावर चर्चा झाली. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये देखील या विषयावर चर्चा झाली. असे वाटले होते की, पावसाळी अधिवेशनामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा विषय चर्चेला न घेता इतर विषयांना न्याय देता येईल. परंतु मागील 3-4 महिन्यात मुंबई परिसरात आणि ग्रामीण भागातही कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती फार बिघडलेली आहे. गेल्या काही महिन्यापासून सुरु झालेले दरोड्यांचे सत्र, लुटालुटीचे प्रकार आणि खूनांचे प्रकार पाहिले तर सर्वसामान्य जनतेला एकच प्रश्न पडतो तो म्हणजे या राज्यात गृहखाते अस्तित्वात आहे की नाही? राज्याच्या गृहमंत्र्यांचे याकडे लक्ष आहे की नाही? राज्यातील ठाणे, मुंबई, पुणे यासारख्या प्रमुख शहरात दरोडेखोरांनी अक्षरशः हैदोस घातला आहे. निरपराध माणसांचे मुडदे पाडले जात आहेत. जवाहिऱ्यांच्या दुकानांची लूट करणे, रेल्वेतून प्रवास करणाऱ्या महिला, बँकातील कर्मचारी, लहान-मोठे उद्योजक, श्रीमंत वस्त्यातील फ्लॅटचे मालक यांना जीव मुठीत धरुन दिवस कंठावे लागत आहेत अशी परिस्थिती मुंबई आणि परिसरात निर्माण झाली आहे. एका एका भागात 4-4 दरोडे एकाच दिवशी घातले जात आहेत. मुंबईसारख्या शहरात पोलिसांच्या नाकावर टिच्चून एकाच दिवशी 3-4 ठिकाणी दरोडे पडत आहेत. इतकेच नव्हे तर ग्रामीण भागामध्ये एकाच वस्तीमध्ये किंवा एकाच बाजारपेठेमध्ये अवघ्या अर्ध्यातासात 3-4 दुकाने भरदिवसा उघडपणे फोडली जातात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परंतु पोलीस मात्र दरोडेखोरांना अटक करु शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, गेल्या काही दिवसात ज्या घटना घडलेल्या आहेत त्या मी तारीखवार आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. दिनांक 11 जून, 2007 रोजी विरारपासून 5 कि.मी. अंतराव असणा-या नंदखाल गावात मार्शल ग्रॅबियल महिलेचा गळा आवळून खून करण्यात आला व घरातील ऐवज लुटण्यात आला. दिनांक 14 जून, 2007 रोजी ठाणे जिल्हयातील घोडबंदर रोडवरील ओवळा गावातील बांधकाम व्यावसायिक दीपक ठाकूर यांच्या घरावर पडलेल्या दरोडयात दोघांची हत्या तर पाच जणांना गंभीर जखमी करण्यात आले. दिनांक 17 जून, 2007 रोजी अंधेरी-पश्चिम येथील सरदार वल्लभाई पटेल नगराजवळील मॉडेल टाऊन वसाहतीतील माणिक प्रभू सोसायटीच्या एक व दोन क्रमांकाच्या फ्लॅटमध्ये किचनमधील ग्रील, गॅस कटरने कापून दहा जणांच्या टोळीने दागिने, रोख रक्कम आदी 5 ते 10 लाख रुपयांचा ऐवज लुटला. दिनांक 17 जून, 2007 रोजी चेंबूरच्या टिळकनगर भागात सुब्रमण्यम महादेवन या वृध्द दांपत्याकडून 1 लाख रुपयांचा ऐवज लुटण्यात आला. दिनांक 18 जून, 2007 रोजी गिरगावंमधील जे.एस.रोड परिसरातील आनंद भुवन इमारतीत राहणा-या वेदकर्म ज्वेलर्स या सराफाच्या दुकानावर दरोडा घालून 33 लाख रुपयांचे दागिने व 18 हजार रुपयांची रोकड लुटण्यात आली. दिनांक 18 जून, 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता माटुंगा येथील अरोरा चित्रपटगृहाजवळ असलेल्या सत्यसदन या इमारतीत राहणा-या महिलेचे हातपाय बांधून दोन लाख रुपयांची रोकड व दागिने लुटण्यात आले. याच दिवशी 11.15 वाजता भोईवाडा भागातील चित्रा चित्रपटगृहाजवळ असलेल्या गरुकृपा इलेक्ट्रिकल या दुकानावर दरोडा टाकून 5 लाख रुपयांचे मोबाईल चोरी करण्यात आले. दिनांक 20 जून, 2007 रोजी सशस्त्र दरोडेखोरांनी घाटकोपर भागातील पारस ज्वलर्स या दुकानातील सोन्या-चांदीचे दागिने लुटले. दिनांक 27 जून, 2007 रोजी वरळी आर.बी.मार्ग येथील ग्लोबल अपार्टमेंटमध्ये सुरेश ताराचंद जैन यांचे साजन ज्वेलर्स हे दुकान लुटण्यात आले व त्यातून 60 लाख रुपयांचे दागिने चोरण्यात आले. दिनांक 26 जून, 2007 रोजी वाशीतील सेक्टर -14 मधील चिराग ज्वेलर्सचे शटर तोडून अडीच किलो चांदीचे दागिने चोरण्यात आले. दिनांक 27 जून, 2007 रोजी दहिसरमध्ये भरदुपारी अवघ्या 20 मिनिटात दोन फ्लॅट फोडण्यात आले. दहिसर(पूर्व) येथील वेल्फेअर स्टोअर्सचे मालक श्री. मनीष दवे यांच्या पत्नी 12.20 वाजता मुलाला आणण्यासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

शाळेत गेल्या आणि 12.50 वाजता घरी परतल्या तोवर त्यांच्या घरातील दागदागिने व रोख रक्कम कपाटे फोडून चोरानी लंपास केली. अवघ्या 20 मिनीटात दीड लाख रुपयांची रक्कम लुटण्यात आली.

सभापती महोदय, आता अधिवेशन सुरु होता होता म्हणजे दिनांक 16 जुलै, 2007 रोजी घाटकोपर पश्चिम येथे साईनगरमधील दत्ता सिध्दी इमारतीच्या दुस-या मजल्यावर राहणा-या राजेंद्र कोठारी या ज्वेलरचे घर फोडून चोरटयांनी 3 लाख 90 हजार रुपयांचा ऐवज लुटला. राजेंद्र कोठारी हा आपल्या आजारी पत्नीला भेटण्यासाठी केडीया रुग्णलयात गेला आणि रात्री 8.00 च्या सुमारास परत आला तेव्हा हा प्रकार त्याच्या लक्षात आला. एका एका दिवशी तीन-तीन, चार-चार दरोडे घालण्यात आलेले आहेत. दरोडयांची हॅटट्रिक झाली तरीही पोलिसांना गुन्हेगार सापडलें नाहीत.

सभापती महोदय, हा विषय मुंबईचा असला तरी ग्रामीण भागात सुध्दा दरोडयाचे सत्र सुरुच आहे. मी या ठिकाणी माननीय गृहमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अकोला जिल्हयातील पाथूर येथे संध्याकाळी सहा साडेसहा वाजता 4-5 दरोडेखोर मार्केटमध्ये घुसले आणि त्यांनी सलग चार दुकानातील गल्ला लुटला. या दरोडेखोरांनी आपल्या हातात रिव्हाल्व्हर तसेच चॉपर घेतलेले होते. रिव्हाल्व्हर आणि चॉपरचा धाक दाखवून या दरोडेखोरांनी संध्याकाळी सहा साडेसहा वाजता 4 दुकाने लुटली. ही घटना घडली त्यापासून पाच मिनिटांच्या अंतरावर पोलीस स्टेशन आहे असे असतांनाही दरोडेखोरांनी भरमार्केटमधील चार दुकाने लुटली परंतु अजून पर्यंत हे दरोडेखोर पोलिसांना सापडलेले नाहीत.

सभापती महोदय, दरोडेखोरांनी गेल्या 2 महिन्यात टाकलेले दरोडे आणि केलेल्या हत्या यातील अमानुष क्रौर्य अंगावर शहारे आणणारे आहे. एका बाजूला सोने-चांदीच्या पेढयावरील दरोडे तर दुसरीकडे सुखवस्तू कुटुंबाना लक्ष करण्यात येत आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...............

दरोड्याच्या आड येणाऱ्यावर मग त्यामध्ये वृध्द असो, तरुण असो वा छोटी मुले असोत, त्यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यास दरोडेखोरांचे हात कचरत नाहीत. या सर्व परिस्थितीचा विचार केला असता एक गोष्ट लक्षात येते की, सध्याची वाढती महागाई व बेरोजगारी यामुळे रोजीरोटीस मुकलेले ग्रामीण आणि शहरातील तरुण 8-10 जणांचा गट करुन टोळ्या तयार करतात. प्रत्यक्ष दरोडा टाकण्यापूर्वी शहरात वावरतात. दरोडा घालण्यासाठी योग्य स्थळाचा बारकाईने शोध घेतात, त्या भागातील लोकांची वर्दळ,आजुबाजूच्या परिसर, घराची रचना याचा बारकाईने अभ्यास करतात आणि नंतर दरोडा टाकतात. त्यामुळे पोलिसांना दरोडेखोरांचा मागमूसही सापडत नाही अशी स्थिती आहे.

दिनांक 16 जुलै 2007 रोजी पोलिसांनी कानपूरला जाऊन दरोडेखोरांची एक टोळी पकडल्याचे टी.व्ही.वर दाखविण्यात आले. ही बातमी वर्तमानपत्रात सुध्दा आली होती. परंतु त्या टोळीतील गुन्हेगारांनी या दरोड्याशी आमचा काही संबंध नाही असे सांगितले. अधिवेशन सुरु असल्यामुळे गुन्हेगारांना पकडण्याचा प्रयत्न पोलिसांनी केलेला आहे असे यावरुन वाटते.

मुंबईत आणि राज्यात दरोडे पडण्याचे प्रकार लक्षात घेऊन माननीय गृहमंत्र्यांनी गस्ती पथक योजना तयार केलेली आहे. सुमारे 62 गस्ती पथके महत्वाच्या वर्दळीच्या ठिकाणी आणि काही भागातील रस्त्यांवर गस्ती घालतात. परंतु असे असूनही दरोड्यांची संख्या कमी झालेली नाही. या गस्ती पथकांचा काहीही उपयोग झालेला दिसत नाही. ग्रामीण आणि शहरी भागात दरोडे पडतच आहेत आणि दरोडेखोर सापडत नाहीत अशी स्थिती आहे.

दिनांक 22 जुलै 2007 रोजी मुलुंड येथील पाच रस्ता येथे दरोडेखोरांनी चार दरोडे घातले. अधिवेशन सुरु असताना ही घटना घडलेली आहे. दरोडेखोरांनी दुकानांची शटर्स उघडून दरोडे टाकले. अतुल इलेक्ट्रीक या दुकानाला मोठा फटका बसला. या दुकानातून जवळपास 4.5 लाखांचा ऐवज लुटण्यात आला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...............

सभापती महोदय, मागील महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने 66 कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष लाच घेताना रंगेहात पकडले. या कर्मचाऱ्यांमध्ये पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. महसूल विभागातील कर्मचाऱ्यांचा सुध्दा यामध्ये समावेश आहे. गेल्या वर्षी लाचलुचपत विभागाने 55 कर्मचाऱ्यांना लाच घेताना पकडले होते. परंतु मागील सहा महिन्यांत पोलीस आणि महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना लाच घेताना पकडलेल्यांची संख्या 66 आहे. यावरुन पोलीस आणि महसूल विभागामध्ये किती भ्रष्टाचार होतो हे आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, वसई तालुक्याचे उदाहरण घेतले तर वसई तालुक्यात वसई, नायगाव, नालासोपारा आणि विरार यांचा अंतर्भात असून तेथील लोकसंख्या 12 लाखांच्या आसपास आहे. परंतु त्यांच्या सुरक्षिततेसाठी फक्त 400 पोलिसांचे संख्याबळ आहे. याचा अर्थ तीन हजार व्यक्तीमागे एक पोलीस आहे. नेत्यांच्या बाबतीत मात्र एकेका नेत्यामागे एक ते पाच पोलीस असतात. 4 नगरपालिका आणि 60 ग्रामपंचायतीचा समावेश असलेल्या या वसई तालुक्यामध्ये गणवेषातील पोलीस दिसणे ही फार कठिण गोष्ट आहे. त्यामुळे तेथील लोक गुंडांचा सुळसुळाट झाला की स्वत:च सावध होतात व ग्राम सुरक्षा दले स्थापने करतात. वसई तालुक्यात पोलिसांची मदत मिळणे म्हणजे वाळवंटात पाणी मिळण्यासारखे आहे.

आज पोलिसांच्या विश्वासार्हतेबद्दल सर्वांच्या मनात संशय आहे. पूर्वी खाकी वर्दीतील पोलीस पाहिला की लोकांना त्याचा धाक वाटायचा. खाकी वर्दीतील पोलीस रस्त्याने चालू लागला तर लोक त्यास वाट करुन द्यायचे. पण आज त्याच्या नेमकी उलटी परिस्थिती आहे. खाकी वर्दीतील पोलीस पाहिल्यास लोकांना संताप येतो.

खरे म्हणजे सज्जन लोकांना पोलिसांचा आधार वाटावयास पाहिजे. परंतु आज नेमकी उलटी परिस्थिती आहे. सज्जन लोकांना पोलिसांचा आधार नाही. पोलीस दुर्जनांचे कर्दनकाळ बनत नाही. आज सज्जन लोक पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करायला जाण्यास सुध्दा घाबरतात. ग्रामीण भागातील गरीब शेतकऱ्यावर अन्याय झाल्यास पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करायला जावे की नाही अशी शंका त्याच्या मनात येते. पोलीस आपल्याकडे पैसे मागतील, अशी त्याला भीती वाटत असते.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..............

सभापती महोदय, आज मुंबई शहरात आणि राज्याच्या इतर भागात मोठ्या प्रमाणावर दरोडे पडत आहेत. परंतु दरोडेखोरांना पकडले जात नाही. दोन दिवसांपूर्वीच या विषयावर येथे लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. प्रश्न देखील टाकण्यात आला होता. माननीय गृहमंत्री उत्तरात मागील वर्षी किती दरोडे पडले आणि यावर्षी किती दरोडे पडले याची आकडेवारी सांगतात प्रत्यक्षात कृती कमी करतात.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 10:15

श्री.पांडुरंग फुंडकर...

मागील पाच वर्षामध्ये पडलेल्या दरोडयांच्या संख्येची आणि आपल्या काळात पडलेल्या दरोडयांच्या संख्येची आपण तुलना करता, परंतु अशी तुलना करुन चालणार नाही. याचे कारण असे की, आज मुंबई आणि परिसरामध्ये तसेच ग्रामीण भागामध्ये अशी स्थिती निर्माण झाली आहे की, राज्यामध्ये फार भयानक वातावरण असून राज्यातील जनता भयग्रस्त झालेली आहे. त्यांना असे वाटते की, दरोडेखोर कधी येतील आणि कधी लूट करुन जातील याचा भरोसा राहिलेला नाही, अशाप्रकारची स्थिती आज राज्यामध्ये निर्माण झालेली आहे. मला असे वाटते की, माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, आपण राज्याचे गृहमंत्री असताना राज्यामध्ये अशाप्रकारची स्थिती निर्माण होणे हे आम्हाला अपेक्षित नाही. आपले एकंदरीत व्यक्तिमत्व असे आहे की, या राज्यामध्ये आपण कर्तव्यदक्ष असल्याची ख्याती आहे. परंतु आपल्याच खात्यामध्ये असे प्रकार निर्माण होत असतील तर ग्रामीण भागातील जनतेच्या मनात एक प्रकारे संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. सभापती महोदय, अशाप्रकारे आज राज्यामध्ये दरोडयांची स्थिती आहे.

सभापती महोदय, गेल्या जून महिन्यांत प्रख्यात गुंड दाऊदचा भाऊ इकबाल कासकर व त्यांची बहिण हसीना यांची पुरेशा पुराव्याअभावी जामिनावर सुटका झाली. अगोदर अटक वारंट घेऊन पोलीस तिच्या निवासस्थानी गेले तेव्हा ती फरार झाली होती. लपाछपीचा खेळ खूप दिवस सुरु राहिला. पोलिसांना म्हणे ती सापडली नव्हती. लोक तिला मुंबईत रस्त्यावर पाहायचे पण पोलिसांना ती दिसत नव्हती आणि यथावकाश ती न्यायालयात हजर झाली आणि पोलिसांच्या नाकावर टिच्चून तिने जामीन मिळविला. पोलीस खात्याला अभिमान वाटावा, अशी ही गोष्ट नाही. सभापती महोदय, मी यापुढील इकबालचा प्रकार सांगतो. वादग्रस्त सारा सहारा प्रकरणात प्रमुख आरोपी असलेला इकबाल कासकर पोलिसांच्या हाती लागला होता, पण त्याच्याही विरुध्द पोलिसांनी पुरेसा पुरावा उपलब्ध न केल्याने न्यायालयाकडून त्यालाही अभय मिळाले. इकबाल कासकर आणि हसीना पारकर ही दोन्ही कुख्यात गुंड दाऊदची भावंडे आहेत. मुंबई बॉम्बस्फोटानंतर दाऊद अदृश्य झाला होता. त्यावेळी त्याची ही दोन भावंडेच दाऊदचे सर्व व्यवहार पाहत होते. दुबईत राहून मुंबईतील व्यवहार पाहता येत नाही पण मुंबईत गेल्यावर, मुंबईतील तुरुंगातूनही सर्व काळेधंदे मुक्तपणे करता येतील या आत्मविश्वासापोटीच इकबाल मुंबईतील पोलिसांच्या स्वाधीन झाला होता आणि तुरुंगातून सर्व सूत्रे हालवित होता. परंतु

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

"त्याच्याविरुध्द आमच्याकडे भक्कम पुरावे आहेत, तो आमच्या हातातून निसटू शकणार नाही" असे माननीय उप मुख्यमंत्री व वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणत असताना, प्रत्यक्षात काय झाले ? ते आपण बघतोच आहोत. त्याची आज सुटका झालेली आहे. पोलिसांच्या चुका आणि तपासातील उणिवा इकबाल आणि त्यांच्या साथीदारांच्या सुटकेसाठी कारणीभूत ठरल्या, असे म्हणण्याऐवजी इकबालला आणि हसीनाला वाचविण्यासाठी जाणीवपूर्वक त्या उणिवा ठेवल्या गेल्या, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. मुंबई पोलिसांचे आणि त्यातही आयुक्तांपर्यंतच्या अधिकाऱ्यांचे गुन्हेगारी जगताशी संबंध आहेत, हे अनेकदा सिध्द झाले आहे. हे काही लपलेले नाही. त्यामुळे आज राज्यातील जनतेचा आपल्या पोलिसांवरील व माननीय गृहमंत्री म्हणून आपल्यावरील भरोसा उठत चालला आहे. राज्यातील जनजीवन सुरक्षित राहील की नाही याबाबत राज्यातील जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे. खरे म्हणजे पोलीस खात्याच्या भरवशावर सर्वसामान्य जनतेचे जीवन सुरक्षित राहील अशी अपेक्षा करणे हाच वेडेपणा आहे. सभापती महोदय, राजकारणात जसे एकाच पक्षाचे विविध गट असतात तसे आज पोलीस दलातच गट आहेत. एक अधिकारी गुन्हेगाराला पकडण्यासाठी पुढे सरसावला तर दुसरा गुन्हेगाराला सावध करण्यासाठी पुढे सरसावतो. अलिकडे एकदा टी.व्ही. चॅनलवरील चर्चेत भाग घेताना माजी सरन्यायाधीश श्री.खरे यांनी एक आकडेवारी सादर केली होती. त्यात त्यांनी असे सांगितले होते की, 7-8 वर्षापूर्वी आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण 80 टक्के होते

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

सभापती महोदय, सात-आठ वर्षांचा काळ काही फार मोठा नाही. आरोपींना शिक्षा मिळण्याचे प्रमाण 80 टक्के होते ते आता बावीस टक्क्यांवर आले आहे, यापुढील काळात हे प्रमाण दोन टक्क्यांवर आले तर आश्चर्य वाटणार नाही, असे माजी सरन्यायाधीश, श्री.खरे यांनी म्हटले आहे. मुळात मुंबईसारख्या महाराष्ट्राच्या राजधानीत सारा-सहारासारखे प्रकरण कसे घडते व ते कसे दडपले जाते, हे पाहण्यासारखे आहे. सदरची जागा प्रथम केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाची होती, शाळेसाठी हा भूखंड आरक्षित करण्यात आला होता, हा भूखंड बळकावून त्या ठिकाणी सारा-सहारासारखा भव्य मॉल उभा राहिला. त्या ठिकाणच्या स्थानिक रहिवाश्यांना धमकावून पिटाळून लावण्यात आले आणि जबरदस्तीने, दहशतीने जागा ताब्यात घेण्यात आली, परंतु पोलीस काहीही करु शकले नाहीत. मुंबईच्या पोलीस आयुक्तांचे कार्यालय हाकेच्या अंतरावर आहे, परंतु या मॉलचे बांधकाम होईपर्यन्त कुणीही काही करु शकले नाही. मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांनी त्या जागेच्या बेकायदेशीर वापरास परवानगी दिली, पाणी पुरवठयाची लाईन मंजूर केली, बीईएसटीने देखील त्यांना सुरळितपणे वीज जोडणी दिली. सन 2003 मध्ये एका महिलेने आपणास जागेचा ताबा सोडण्यासाठी धमकावले जात आहे, अशी तक्रार केली. त्यावेळी मात्र हे बिंग बाहेर आले. सन 2003 मध्ये हे सर्व बाहेर आल्यानंतर सन 2007 पर्यन्त चार वर्ष मुंबई पोलिसांना मुख्य आरोपीविरुध्द पुरेसे पुरावे गोळा करता आले नाहीत. इकबाल कासकरच्या दूरध्वनीवरील संभाषणाच्या ध्वनीफिती न्यायालयात पुरावे म्हणून उपयोगी ठरल्या नाहीत. त्यामुळे इकबालची सुटका झाली आणि पोलिसांच्या अकार्यक्षमतेची आणि अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली गेली. दिनांक 11 जुलै 2006 च्या रेल्वे बॉम्बस्फोटांला आता एक वर्ष झाले पण या एक वर्षाच्या कालावधीत ना खटला उभा राहिला ना मुख्य आरोपी पकडले गेले. मन सुन्न करणा-या त्या भयंकर आठवणी, बॉम्बस्फोटांची झळ सोसलेल्यांच्या मनात ताज्या आहेत. स्फोटात जबाबदार असणारे देशद्रोही आणि पाकिस्तानी अतिरेकी यांना फासावर लटकवा असा आक्रोश ते करीत आहेत. परंतु या स्फोटातील मुख्य सुत्रधार अजूनही फरार आहे. मी दिनांक 4 डिसेंबर, 2006 रोजी नागपूर अधिवेशनात यासंबंधीचा प्रश्न विचारला होता. त्याच्या उत्तरात माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी हे मान्य केले होते की, या बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी पाकिस्तान, नेपाळ, सौदी

..2.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

अरेबिया आदी देशात पळून गेलेले आहेत. माझ्याकडे त्या सर्व आरोपींची नांवे आताही आहेत, परंतु, वेळ खर्च होऊ नये म्हणून मी ती वाचून दाखविणार नाही. आरोपी परदेशात गेल्यामुळे पकडू शकलो नाही, असे वक्तव्य त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी केले आहे.

सभापती महोदय, आझम चिमा या अतिरेक्याने मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील मिशनसाठी 7 पाकिस्तानींना तोयबाच्या कॅम्पमध्ये अतिरेकी प्रशिक्षण दिले होते. या अतिरेक्यांनी 3 वेगवेगळया मार्गांनी तीन गटात प्रवेश केला व सिमी संघटनेच्या तरुणांना हाताशी धरुन रेल्वेत स्फोट घडविले. आझम चिमा, रिझवान यांच्याविरुध्द इंटरपोलने रेड कॉर्नर नोटीस जारी केली आहे. परंतु, तरीही त्यांचा माग काढणे कठीण आहे असे खुद्द ए.टी.एस.चे प्रमुख श्री.के.पी.रघुवंशी यांनीच सांगितले आहे. याचा अर्थ हे गुन्हेगार आणखी काही वर्षे तरी सापडणार नाहीत. आरोपींचा शोध सुरु आहे हेच उत्तर आपल्याला महिनोनमहिने ऐकावे लागणार आहे. बॉम्बस्फोटामधील आरोपी सापडले नाहीत आणि आरोपींनी त्यावेळी आणलेली स्फोटके कुठे गेली याची देखील संपूर्ण माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही.

सभापती महोदय, आपण ठाणे जिल्यातील आहात. ठाणे जिल्हयामध्ये कॉसमॉस स्टोन क्वारी या खनिज उत्पादकाने त्याला दिलेल्या क्षेत्रापेक्षा अतिरिक्त क्षेत्रात स्फोटकांचा वापर केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे. राज्यात इतरत्र देखील अशाच प्रकारचा या स्फोटकांचा वापर होत आहे. अतिरेक्यांनी आणलेल्या स्फोटकांना पाय फुटून ती स्फोटके खनिज उत्पादकांपर्यन्त कशावरुन पोहोचली नसावीत ? शासनाने या बाबीची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, गत नागपूर अधिवेशनात दिनांक 14 डिसेंबर 2006 रोजी कायदा व सुव्यवस्थेवरील चर्चेच्या वेळी मी भुसावळ नगरपरिषदेतील चौधरी बंधूचे एक प्रकरण उपस्थित केले होते. मी या प्रकरणाच्या तपशिलात जाणार नाही. भुसावळ नगरपरिषदेतील नगरसेवक श्री.संतोष चौधरी व त्यांचे बंधू श्री.अनिल चौधरी यांनी संपूर्ण भुसावळमध्ये जो धुमाकूळ घातला होता त्याचे अनेक किस्से मी त्यावेळी सांगितले होते. या दोघा भावांवर 50-50 गुन्हे आहेत त्यांच्यावर कोणकोणती कलमे लावलेली आहेत त्याचे सविस्तर वर्णन मी केले होते. ज्या श्री.अनिल चौधरी व श्री.संतोष चौधरींवर एवढे गुन्हे आहेत त्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे असे तेथील पातोंड

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

नावाचा पोलीस अधिकारी स्वत:च पोलीस अधिक्षकांना लेखी कळवितो म्हणून मी त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी केली होती. पातोंडवर कारवाई करण्याचे सोडा, या शासनाने त्याच्यावर कारवाई करण्याऐवजी त्याला जळगावसारख्या अतिशय मोक्याच्या जागी बदली दिली आणि त्याला पदोन्नती दिली. असे कृत्य करणा-या या पोलीस अधिका-याला जळगावबाहेर हलविले गेले नाही तर त्याला पदोन्नती दिली गेली. अशी या खात्याची ख्याती आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदय आपण येथे एक सांगता आणि आपले अधिकारी दुसरेच काही करतात. आपल्या आदेशाचे कुठेही पालन होत नाही, अशी स्थिती आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .........

माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी त्यावेळी असे सांगितले होते की, "मी आपल्याला सांगू इच्छितो की, या घटनेमध्ये न्यायालयीन चौकशी करण्यासारखे असले तरी सध्या आपण वरिष्ठ पोलीस अधिका-याकडून, आय.जी.कडून चौकशी करीत आहोत. तीन महिन्यांमध्ये त्याचा अहवाल आयानंतर त्यानुसार आणखी चौकशी करण्याची आवश्यकता भासली तर तीही केली जाईल. परंतु पुन्हा असे प्रकार भुसावळमध्ये घडू नयेत म्हणून त्या गोष्टी केल्या जातील." सन्माननीय सदस्य श्री.गुरुमुख जागवानी सभगृहामध्ये उपस्थित नाहीत. भुसावळमध्ये नेमके काय घडले याबात ते आपल्याला माहिती देऊ शकतील. श्री.पातोंड नावाच्या पोलीस अधिका-याची अद्याप जवळगाव जिल्हयाबाहेर बदली करण्यात आलेली नाही, हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, काही दिवसांपूर्वी राज्याच्या गृहमंत्र्यांनी डान्सबारवर बंदी आणून खूप प्रसिध्दी मिळविली. परंतु आता त्यांच्या त्या अमाप लोकप्रियता मिळवून देण्याच्या घोषणेचे काय झ ाले हे आपण पाहतोच आहोत. पावसाळी अधिवेशन सुरु होण्याच्या दोन दिवस आधी मध्य मुंबईतील 3 बारवर पोलिसांनी धाडी टाकून 62 बारबालांना अटक केली. डान्सबार बंदीला न जुमानता ऑर्केस्ट्राच्या नावाखाली धांगडधिंगा चालतो. रात्री 12.00 ते 1.00 वाजेपर्यंत बेधुंद अवस्थेत सर्व काही सुरु असते. दादरमधील बे-वॉच या प्रसिध्द बार मध्ये 35 बारबालांना, भायखळा भागातील प्रिया बारमध्ये 11 बारबालांना तर ताडदेव मधील ग्रीन पार्क हॉटेलमधून 11 बारबालांना रात्री 12.00 वाजता पोलिसांनी ताब्यात घेतले. ऑर्केस्ट्राच्या नावाखाली या बारमधून कसा धांगडधिंगा घातला जातो त्याचे व्हिडीयो चित्रण मी या ठिकाणी आपल्याला दाखवू शकतो. माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी डान्स बारवर बंदी आणली. परंतु त्या बारमध्ये रात्री कशा पद्धतीने धांगडधिंगा चालतो याची व्हिडीओ सीडी माझ्याकडे आले. सभापती महोदय ती सीडी मी आपल्यामार्फत माननीय गृहमंत्र्यांना देणार आहे. परवा ज्या बे-वॉच बारमध्ये पोलिसांनी धाड टाकून 35 बारबालांना अटक केली तेथील किळसवाण्या दृश्यांची ती सीडी आहे. ज्या दिवशी या तीन बारवर पोलिसांनी धाडी घातल्या त्यापैकी दोन बारचे लायसन्स दुस-याच दिवशी 90 दिवसांसाठी रद्द करण्यात आले, याबद्दल मी माननीय गृहमंत्र्यांना धन्यवाद देतो. पण यापैकी बे-वॉच हा बार दादर सारख्या मोक्याच्या व महत्वाच्या ठिकाणी आहे त्याचे मात्र लायसन 4-5

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......... 10:25

श्री.पांडुरंग फुंडकर .........

दिवसानंतर रद्द केले गेले. हा बार म्हणजे एक स्वप्ननगरी आहे. येथे बटन दाबून बरीचशी कामे होतात. या बारबाबत वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आली होती. चित्रपटामध्ये ज्याप्रमाणे बटन दाबून भिंती बदलविल्या जातात त्याप्रमाणे हा बार आहे, असे वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते. 14-15 वर्षाच्या मुलींना या ठिकाणी नाचण्यासाठी आणले जाते. ज्या वेळी या बारबाबत तक्रारी केल्या गेल्या त्यावेळी फक्त जुजबी स्वरुपाची कारवाई करण्यात आली. 14-15 वर्षाच्या मुलींचा वापर केल्यानंतर पिटा अंतर्गत (प्रिव्हेंशन ऑफ इममॉरल ट्रॅफिक ॲक्ट) त्या बार मालकावर का कारवाई केली नाही ? हे माननीय गृहमंत्र्यांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगावे. त्या बार मालकाला संरक्षण देणारे सूत्रधार कोण आहेत ? माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे संत गाडगेबाबांचे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे भक्त आहेत. गृह विभाग तुमच्याकडे आहे. तुमच्या खात्यामध्ये असे प्रकार चालतात. अशी प्रकरणे जर तुमच्या पर्यंत न येता खालच्या खाली दडपली जात असतील तर या सर्व प्रकरणांची चौकशी करण्याची गरज आहे. आपण मुंबईतील बार बंद केले. परंतु आपण जर पनवेल, तुर्भे या भागातील रस्त्याने गेलो तर त्या ठिकाणच्या प्रत्येक बारमध्ये अशा प्रकारचे प्रकार सुरु आहेत. त्या ठिकाणी फक्त नाचगाणेच नाही तर वेश्या व्यवसाय सुध्दा चालतो, अशा प्रकारच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत.

सभापती महोदय, डान्सबार बंदीप्रमाणे लोकप्रियता मिळविण्याचा दुसरा एक निर्णय माननीय गृहमंत्र्यांनी घेतला होता व तो म्हणजे गुटखा बंदी. या बंदीचे काय झाले हे बघायचे असेल तर दूर जाण्याची आवश्यकता नाही. विधानभवनाच्या आजुबाजूला असलेल्या पान ठेल्याकडे जरी आपण गेलो तरी तेथे मॅग्नेशियम कार्बोनेट वापरुन तयार केलेल्या गुटख्यांची पाकीटे आपल्याला मिळतील. अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा 1954 व अन्न भेसळ प्रतिबंधक नियम 1955 मधील नियम 62 मधील तरतुदीनुसार मॅग्नेशियम कार्बोनेट हा पदार्थ कोणत्याही अन्न पदार्थात वापरण्याची परवानगी नसते.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाडुरंग फुंडकर .....

परंतु या मॅग्नेशियम कार्बोनेटचा उपयोग गुटख्यामध्ये सर्रास केला जात आहे. गुटखा विकणाऱ्यांना आपण पकडता, त्यांच्यावर कारवाई करता परंतु या गुटख्याची निर्मिती करणारे जे कोण आहेत, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते यांना मी जाणीव करुन देतो की, या प्रस्तावावर अजूनही अनेक सदस्यांना बोलावयाचे आहे व वेळ कमी आहे. माननीय मंत्री महोदय 11.30 वाजता त्यांच्या उत्तराच्या भाषणाला सुरुवात करतील. त्यापूर्वी ज्यांना बोलायचे त्यांनी थोडक्यात बोलावे. कारण दुपारी 12.00 नंतर या प्रस्तावावर खालच्या सभागृहात चर्चा होणार आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझे भाषण 5-7 मिनिटात संपविणार आहे. मॅग्नेशियम कार्बोनेट हा घटक आरोग्याला अतिशय घातक आहे परंतु तो वापरणाऱ्या उत्पादकावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. विक्रेत्यावर कारवाई केली जाते परंतु याचे उत्पादन करणारा कोण आहे ? कोठे आहे ? याची किती विक्री झालेली आहे याचा कोणताही तपशील शासनाकडे नाही. अन्न, औषध व प्रशासन अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने सर्व विनासायास सुरु आहे. आपल्या कर्तृत्व व कार्यक्षमतेला हे न शोभणारे आहे. सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन जर सुरक्षित नसेल तर इतर सोयी करुन त्याचा काही उपयोग नाही. मॉल संस्कृतीची काही गरज नाही. उंच उंच टॉवरऐवजी सर्वसामान्य माणसाला जगण्याची शाश्वती द्या. दरोडे पडणार नाहीत, दरोडेखोरांमध्ये दहशत निर्माण होईल माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे नाव घेतले तर दरोडेखोर थरथर कापले पाहिजेत अशा प्रकारची कारवाई महाराष्ट्रात करण्याची गरज आहे. एका बाजूला राज्यात दरोडे, खून, लुटालूट, मारामाऱ्या सुरु आहेत आणि दुसरीकडे बॉम्बस्फोटाचे आरोपी सुटत आहेत. काही आरोपी सापडत नाहीत. बॉम्बस्फोटात जखमी झालेल्यांना आजपर्यंत मदत मिळालेली नाही. तसेच आपण 11 हजार पोलिसांची पदे भरण्याची घोषणा केली होती, ही पदे लवकर भरण्यात यावीत. ग्रामीण भागातील पोलीस ठाण्यातील पोलिसांची संख्या बाबा आझमच्या जमान्यातील आहे. तालुक्यातील लोकसंख्या किती आहे त्याचा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ KGS/

श्री.पांडुरंग फुंडकर .....

रिव्हयू घेण्याची गरज आहे. तेथील लोकसंख्या विचारात घेता किती पोलिसांची आवश्यकता आहे ? पोलीस मॅन्युअलमध्ये काहीतरी बदल करुन ही पदे लवकरात लवकर भरण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. पोलीस खाते आधुनिक तंत्रज्ञानाने तयार झाले पाहिजे. ग्रामीण भागातील पोलिसांच्या गाडया पाहिल्या तर आपल्याला काही बाबी दिसून येईल. माझ्या मागे कधी पोलिसांची गाडी नसायची परंतु विरोधी पक्ष नेता झाल्यापासून मी कधी ग्रामीण भागात दौऱ्यावर गेलो तर पोलिसांची गाडी असते. डी.व्ही.कार पुढे चालते आणि पोलिसांची गाडी 20-22 किलोमीटर मागे राहते. त्या गाडीचा काही उपयोग नसल्याने ती गाडी देऊ नका. आम्हाला त्या गाडीची गरज नाही कारण आम्हाला कोणी मारत नाही. त्यात गाडीच्या ड्रायव्हरचा काही दोष नाही, त्या बिचाऱ्या ड्रायव्हरला मी विचारले तर तो म्हणतो की, ही गाडी पळतच नाही. कशाला हया गाडया देता ? अशाने दरोडेखोर पकडले जाणार आहेत का ? मी माननीय गृहमंत्र्यांना सूचना करतो की, हे सर्व बदलण्याची आवश्यकता आहे. यासाठी आवश्यकता असल्यास तर बजेट वाढविण्यात यावे. गृहखात्याच्या बजेटला आम्ही कधी विरोध करीत नाही. पोलिसांना कार्यक्षम करा व त्यांना चांगल्या प्रकारची वाहने द्या. पोलिस खाते आधुनिक आपण बनवा. फक्त पोलिसांवर टीका करणाऱ्यापैकी मी नाही. आपणही अनेकवेळा पोलिसांच्या अवस्थेबद्दल आम्हाला सांगत असता. पोलीसही शेवटी माणसे आहेत. त्यांच्याकडे आपणही माणुसकीने पाहिले पाहिजे, अशी आमची अपेक्षा आहे. आता तुमच्या खात्यामध्ये काय चालले आहे ? पोलीस खात्याबाबत मध्यंतरी एक बातमी येऊन गेली, माझ्या हातामध्ये दैनिक सामनाचा अंक आहे. त्यामध्ये एक बातमी प्रसिध्द झाली असून त्याचे हेडींग "एक हजार पोलीस हवालदारांचा रोज अपमान" "आज साहेब उद्या शिपाई, औट घटकेचे फौजदार" असे आहे. या बातमीमध्ये लिहिले आहे की, "महाराष्ट्र सरकारने जादूचे प्रयोग सुरु केलेले आहेत का ? असा सवाल करीत जळगावचे पोलीस हवालदार भेटायला आले, त्याबरोबर त्याचे कुटुंबही होते.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 10:35

श्री. फुंडकर ....

माझ्या बाबांवर जादूचे प्रयोग होतात. त्यामुळे शाळेतील मुले आम्हाला चिडवतात. गृहमंत्रीकाकांना सांगा, हे जादूचे प्रयोग बंद करा. सभापती महोदय, हे या वर्तमानपत्रात आलेले आहे आणि एका पोलीस कर्मचाऱ्याच्या मुलाचा निरोप मी या सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला देत आहे. याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता मला समजले की, महाराष्ट्राच्या पोलीस दलात सध्या किमान हजार पोलीस तरी असे आहेत की, ते कधी हवालदार होतात तर कधी फौजदार होतात. हा चमत्कार ज्यांच्या राजवटीत घडत आहे ते गृहमंत्री पोलीस दलात नवे पर्व सुरू करण्याची भाषा नेहमी करतात. त्यांनी या चमत्काराने चक्रावलेल्या पोलिसांची समस्या आधी दूर केली पाहिजे. हे सर्व प्रकरण काय आहे व कोणी निर्माण केले ते तपासले तेव्हा सामान्य पोलिसांचा मान व प्रतिष्ठेची जराही फिकीर नसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या डोक्यातून हे सर्व निर्माण झाले व पुढे चालत राहिले असे लक्षात आले. सभापती महोदय, पोलीस हवालदारांना पोलीस उपनिरीक्षक पदाची बढती मिळावी यासाठी राज्याच्या गृह विभागामार्फत एचसीपीटीसी या नावाखाली 2002 मध्ये परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल 200 मध्येच लागला. या परीक्षेत राज्यातील 2260 पोलीस उमेदवार पास झाले. त्यापैकी 1350 उमेदवारांना फेब्रुवारी 2004 मध्ये नियुक्ती देण्यात आली. या नियुक्त्यांचा घोळही कसा घातला ते आपण पहा. फौजदार पदाची परीक्षा पास होऊनही या सर्व पोलिसांना थेट फौजदार म्हणून बढती देण्यासाठी 'का कू' सुरू झाले. याच पोटदुखीतून काही बड्या अधिकाऱ्यांनी डोके चालविले व परीक्षा पास झालेल्या पोलिसांना 'लीव्ह ॲण्ड लायसेन्स' पद्धतीने फक्त 11-11 महिन्यांच्या नियुक्त्या देण्यात आल्या. 11 महिन्यांची औट घटकेची फौजदारकी संपताच या सगळ्यांची फौजदाराची वर्दी उतरवायची आणि पुन्हा एक दिवसासाठी हवालदार किंवा जमादाराची ड्यूटी करून 'कुणी आम्हाला पुन्हा फौजदार करील का हो ? अशी आळवणी करीत गृहखात्याच्या दारात उभे रहायचे. असा प्रकार सुरू झाला. सभापती महोदय, मी फार काही सांगणार नाही. पण एक सांगतो की, या पोलिसांना मधाचे बोट लावून असेही सांगण्यात आले की, जे पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा पास झाले आहेत त्यांना आपापल्या स्तरांवर तशा नियुक्त्या देण्याचे अधिकार त्या त्या विभागाच्या पोलीस महानिरीक्षकांना व पोलीस आयुक्तांना देण्यात आले. आवश्यकतेनुसार या शिपायांना 90-90 दिवसांच्या नियुक्त्या देऊन फौजदार करावे असे आदेश देण्यात आले. पोलीस महासंचालकांनी या नियुक्त्या 11-11

...... एच 2 ...

श्री. फुंडकर ...

महिन्यांसाठी करण्याचे सुचविले होते. नंतर त्या 90 दिवसांवर खाली घसरल्या. 90 दिवस झ ाल्यावर त्याने पुन्हा खालच्या पदावर काम करायचे व जागा रिकामी झाली की, फौजदार व्हायचे. या सर्व पोलिसांनी या काळात दोन दोन पदांचे गणवेष शिवले व ते अंगावर अधून मधून चढवत राहिले. हे सर्व पोलीस समाजात आणि पोलीस दलात देखील आता चेष्टेचा विषय बनले आहेत. या प्रकाराने या सर्व पोलिसांची प्रचंड मानहानी झालेली आहे. सभापती महोदय, याचे एक उदाहरण मी आपल्याला सांगतो. हा अपमान असह्य झाल्यामुळे नागपूरच्या श्री.हरिदास गोपाळे या पोलीस उपनिरीक्षकाने विष पिवून आत्महत्या केली आणि त्याचे सारे कुटुंब आज उघड्यावर आले आहे. कशासाठी हा खेळ आपण चालविला आहे ? त्यांना खरोखरी आपल्याला प्रमोशन द्यायचे असेल तर आपण सरळ प्रमोशन द्या अन्यथा देऊ नका. पण 90 दिवसांसाठी प्रमोशन आपण कशासाठी देता आहात ? त्यातून आपण काय साधता आहात ? उलट या प्रकाराने पोलिसांचे मनोबल खच्ची होत आहे. एकदा का अशा प्रकारे मनोबल खच्ची झाल्याने हे पोलीस काम करू इच्छित नाहीत व अशा प्रकारे एक विचित्र परिस्थिती या राज्यामध्ये निर्माण झाली आहे. सभापती महोदय, मी या निमित्ताने माननीय उपमुख्य मंत्र्यांना विनंती करणार आहे की, महाराष्ट्रातील पोलीस हा गुन्हेगारांचा कर्दनकाळ आणि सज्जनांचा आधार झाला पाहिजे. हे आपण करून दाखविले तर ... आपण आपण या राज्यात गाडगेमहाराज अभियान राबविले आणि आता तंटामुक्त गावाची घोषणा केली आहे. ही आपली घोषणा जरूर लोकप्रिय होईल. परंतु त्यापूर्वी दोन गोष्टी करण्याची गरज आहे. एक म्हणजे सज्जनाला आधार आणि दुर्जनांचा कर्दनकाळ अशी प्रतिमा आपल्या पोलीस दलाची व्हायला पाहिजे त्या दृष्टीने आपण काम करावे एवढी विनंती करून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उपसभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता ही चर्चा सुरू होऊन 40 मिनिटे झालेली आहेत. अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे. तरी सर्व सदस्यांनी आपले भाषण मुद्देसूद करून कमी वेळात आटोपते घ्यावे. मी आपल्याला हेही सांगू इच्छितो की, या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय 11.30 वाजता सुरूवात करतील. तेव्हा 11.30 पर्यंत सर्व सदस्यांनी आपली भाषणे पूर्ण करून मला सहकार्य करावे.

...... एच 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 10:35

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एकूण किती सदस्य बोलावयाचे आहेत ? त्यांची संख्या समजली तर आम्हालाही अंदाज येईल.

**उपसभापती** : या चर्चेत भाग घेण्यासाठी माझ्याकडे एकंदर 15 सदस्यांची नावे आलेली आहेत. ही संख्या आणि असलेला वेळ लक्षात घेता सगळ्यांना भाषणासाठी कमी वेळ मिळणार आहे पण त्याला माझा इलाज नाही. कालच आपण ठरविले की, सकाळी 10 ते 12 वाजेपर्यंत ही चर्चा घ्यावी आणि त्याप्रमाणे आपण ही चर्चा आज घेतली आहे. तेव्हा आता सर्वांनी त्या दृष्टीने सहकार्य करावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... आय 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा विषय फार महत्वाचा आहे. तेव्हा आम्हाला बोलण्याची संधी मिळाली पाहिजे.

**उपसभापती** : आपण आदल्या दिवशी जे बोलता त्याच्या उलट दुसऱ्या दिवशी बोलता. काल आपण सर्वांनी ही चर्चा सकाळी 10 ते 12 वाजेपर्यंत संपवू असे ठरविले आहे. याबाबतीत काल सभागृहाने निर्णय घेतलेला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, प्रत्येक माननीय सदस्यांना बोलण्याकरिता किती मिनिटांचा अवधी मिळणार आहे?

**उपसभापती** : प्रत्येक माननीय सदस्यांना पाच मिनिटांचा अवधी मिळेल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंगराव फुंडकर यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्थेचे चित्र अतिशय विदारक आहे. आज सकाळी वर्तमानपत्र उघडल्यानंतर त्यामध्ये चोऱ्या, दरोडे, बलात्काराचे गुन्हे याशिवाय दुसरी कोणतीही बातमी नसते. मी आज सकाळी वर्तमानपत्र उघडल्यानंतर अशाप्रकारची आज कोणतीही बातमी नसेल असे वाटले होते. परंतु आज एका व्यापाऱ्याकडील 60 लाखाचे हिरे लुटून नेल्याची बातमी छापून आली आहे. त्यामुळे अशाप्रकारचा गुन्हा घडलेला नाही असा एकही दिवस उजाडत नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. रामनाथ मोते)**

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी राज्यामध्ये आजपर्यंत पडलेल्या दरोडयांची यादी सभागृहामध्ये वाचून दाखविली. परंतु आज दरोडे आणि चोऱ्यांच्या गुन्हयांचा तपास करण्याबाबत पोलिसांची मानसिकता बदलली आहे. मी गेली कित्येक वर्षे पोलिसांना जवळून पहात आलो आहे. पोलीस स्टेशनला नेहमी जाणारा मी एक कार्यकर्ता आहे. त्या पोलीस स्टेशनमध्ये बसलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या पाठीमागे एक फलक लावण्यात आलेला असतो. त्यामध्ये आजपर्यंत घडलेल्या गुन्हयांची नोंद केलेली असते. त्या यादीमध्ये आतापर्यंत बलात्कार, चोऱ्या व दरोडयाचे प्रकार किती झाले याची आकडेवारी लिहिलेली असते. तसेच, या गुन्हयांपैकी किती गुन्हयांचा तपास लावण्यात आला? किती प्रकरणांमध्ये माल हस्तगत करण्यात आला याची माहिती दिलेली असते. परंतु चोऱ्या, दरोडे, लूटमार व घरफोडयांचे दहा प्रकार घडले असतील तर त्या गुन्हयांचा तपास शून्य असतो. तो एखाद-दुसऱ्या तपासापलिकडे गेलेला नसतो. आणि म्हणून पोलिसांची मानसिकता तपासून बघण्याचा आपण प्रयत्न केला तर लक्षात येते की, कोणत्याही परिस्थितीमध्ये चोऱ्या, घरफोडयांच्या गुन्हयांमधील आरोपींना शोधावयाचे नाही असा पोलिसांचा अगोदरच पक्का निर्णय झालेला असतो. याचे कारण असे की, हा आरोपी कधी ना कधी तरी दुसऱ्या एखाद्या केसमध्ये पकडला जाईल. ज्यावेळी तो पकडला जाईल त्यावेळी मागील चो-यांच्या घटनांमध्ये त्याने चोरलेला माल ताब्यात घ्यावयाचा किंवा त्याची तपासणी करावयाची. चोरीच्या प्रकरणाबाबत जर एखादा माणूस पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करावयास गेला तर पोलिसांकडून सांगितले जाते की, तुम्ही

DGS/

ॲड. अनिल परब...

तक्रार कशासाठी करता? तक्रार करुन काहीही उपयोग होणार नाही. तक्रार केली तरी तुम्हाला तुमचा गेलेला माल पुन्हा मिळेल याची गॅरंटी नाही. पोलीस स्टेशनला आलेल्या तक्रारदारांना सांगितले जाते की, पुढील वेळी एखाद्या आरोपीची चोरी पकडली जाईल त्यावेळी त्यामध्ये तुमचा माल मिळाला तर बघा, नसेल तर तुम्ही दुसरा माल घेऊन जा आणि तेवढे पैसे आम्हाला द्या. हे मी मला आलेल्या अनुभवातून बोलत आहे. एकदा माझ्या बहिणीची सोन्याची चेन खेचण्यात आली. त्यावेळी मी पोलीस स्टेशनला तक्रार करण्याकरिता गेलो असता मला तुम्ही तक्रार कशाकरिता करता? आरोपी पकडला गेला तर त्याच्याकडे असलेली तुमची चेन तुम्हाला मिळेल, जर तुमची चेन त्यामध्ये नसेल तर तुम्हाला दुसरी चेन देऊन टाकू. या आरोपींना पकडण्यात आल्यानंतर त्यांना कोर्टामध्ये उभे केले जाते. त्यावेळी पहिल्या रिमांड नंतर दुसरा रिमांड विचारला जातो. त्यावेळी आरोपीच्या बाबतीत "नो रिकव्हरी" असे म्हटल्यानंतर त्याला जामीन दिला जातो. तेव्हा या चोरीच्या गुन्हयांमध्ये तपास करावयाचा नाही अशाप्रकारची पोलिसांची मानसिकता झालेली आहे. त्याचबरोबर ज्यावेळी एखादा आरोपी पकडला जाईल त्यावेळी पोलिसांमार्फत त्याच्याकडील माल जप्त केला जातो तो चोरीचा माल घेण्यासाठी काही लोक सतत पोलिसांच्या संपर्कात असतात. गेल्या कित्येक वर्षापासून त्यांचा पोलिसांशी संबंध आहे.

माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे चोऱ्या, दरोडे टाकण्याच्या बाबतीत आरोपींचे मनोधैर्य वाढलें आहे.पूर्वी चोऱ्या, दरोडे यांच्या प्रकरणामध्ये पोलिसांवर कधीही गोळीबार झाला नव्हता, पोलिसांना मारले नव्हते. किंवा एखाद्या व्यक्तिच्या घरामध्ये दरोडा टाकीत असतांना त्या घरातील लहान मुलांची कधीही क्रूर हत्या झाली नव्हती. परंतु आतापर्यंत दरोडा व घरफोडीच्या प्रत्येक प्रकरणामध्ये घरावर दरोडा टाकल्यानंतर घरामधील लोकांना जीवंत मारले जाते. अशाप्रकारची आरोपींची मानसिकता निर्माण झाली आहे. त्यांच्यावर शासनाचा, गृह विभागाचा, पोलिसांचा जो वचक होता तो पूर्णपणे निघून गेला आहे. आज आपल्या पोलिसांना कुणीही घाबरत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे... 10:45

ॲड. अनिल परब (पुढे सुरू...

मी पूर्वी पाहिलेले आहे की, कितीही काळ्या काळजाचा आरोपी असला तरी पोलिसांवर तो कधी हात टाकण्याची हिंमत करत नव्हता. कारण ज्या दिवशी एखाद्या पोलिसावर हात टाकला तर त्या दिवशी संपूर्ण पोलीस दल एकवटत असे. मी पोलिसांवर फायरींग केलेल्या केसेस पाहिलेल्या आहेत, पोलिसांवर चाकू हल्ला केलेल्या आरोपीला चार दिवसात उचलून आणून त्याच्या पायाच्या नसा कापलेल्या, त्यांना मारून टाकलेले मी पाहिलेले आहे. अशा कित्येक केसेस मी आपल्याला सांगू शकतो. आतापर्यन्त पोलिसांनी एकजूट दाखविलेली होती. यापूर्वी कोणताही आरोपी पालिसांवर हात टाकण्यास धजावत नव्हता, हिम्मत करत नव्हता.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते.)

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, मी आता माझ्या भाषणाला सुरुवात केलेली आहे. आता पोलिसांचे मनोधैर्य खचत गेलेले आहे याचे कारण पोलिसांची मानसिकता दोन गटांमध्ये विभागली गेलेली आहे. पोलीस दोन गटांमध्ये विभागले गेलेले आहेत. एक म्हणजे मुजोर पोलिसांची मानसिकता झालेली आहे, ते कोणालाच घाबरत नाहीत. त्यांच्यावर या शासनाचा वचकच नाही. सन्माननीय मंत्री आर.आर.आबा आपण नेहमी सांगता की, माझ्याकडे प्रमोशन मागण्यासाठी किंवा की पोस्टींग मागायला येणाऱ्या पोलिसांना मी सोडणार नाही. पण ते आपल्याकडे पोस्टींग मागण्यासाठी येतीलच कशाला ? त्यांना सगळे दलाल माहीत आहेत. पोलीस स्टेशनचे रेट कार्ड ठरलेले आहे. त्या पोलीस स्टेशनमध्ये बदली करून घ्यावयाची असेल तर त्यासाठी किती लाख रुपये द्यायला पाहिजे,याचे रेट कार्ड बाजारामध्ये आजही उपलब्ध आहे. आपण बाहेर जाऊन कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला विचारले तर ते सांगतील. मी नेहमी पोलीस अधिकाऱ्यांबरोबर बोलत असतो, त्यामुळे मी हे सांगत आहे. पोलीस स्टेशनमध्ये दोन गट पडलेले आहेत. एक मुजोर पोलिसांचा गट आहे, ते कोणालाच जुमानत नाहीत. आज त्यांची बदली केली तर ते बदलीच्या ठिकाणी कधीच रूजू होत नाहीत. ते आजारी पडल्याबाबतचा रिपोर्ट करतात आणि मंत्रालयाच्या दरबारामध्ये आपली बदली करून घेण्यासाठी खेटे घालतात. दुसऱ्या बाजूला पोलिसांची मानसिकता अशी झालेली आहे की, काही पोलीस अधिकारी पेसे कमावत आहेत, पैसे कमवून बसलेले आहेत, त्यांचे 20-20, 25-25 फ्लॅटस् आहेत आणि काही पोलीस अधिकाऱ्यांची अशी परिस्थिती आहे की, रात्री झोपले तर घराचे वरचे छप्पर कधी कोसळेल, मी उद्या कामावर

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब (पुढे सुरू......

जाऊ शकेन की नाही ? अशा परिस्थितीत पोलीस अधिकारी रहात आहेत. आज मुंबईच्या पोलीस दलामध्ये पोलीसच पोलिसांचे दुष्मन झालेले आहेत. एक पोलीस अधिकारी दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याविरूध्द सुपारी देऊन संपविण्याचा प्रयत्न करत आहेत. काही दिवसापूर्वी आपले मुंबईचे आयुक्त तुरुंगामध्ये गेलेले होते, डीसीपी तुरुंगामध्ये गेलेले होते, अतिरिक्त पोलीस आयुक्त तुरुंगामध्ये गेलेले होते त्यांना न्यायालयाने निर्दोष सोडलेले आहे. त्यांच्या आयुष्यातील काळा कालावधी गेला, तो कोण भरून देणार आहे ? म्हणून आता पोलीस अधिकारी म्हणतात की, एवढा मोठया पोलीस अधिकाऱ्यांची ही परिस्थिती आहे, तर मी कशाला अधिकचे काम करू ? असे म्हणून दिवस भरण्याचे आणि दिवस ढकलण्याचे काम चाललेले आहे. पूर्वी गुन्हे शोधण्यासाठी खबऱ्याचे नेटवर्क अधिकाऱ्यांकडे पाहिलेले आहे. गुन्हा झाल्यानंतर त्या पोलीस स्टेशनचा सिनियर अधिकारी खालच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेऊन सांगत असे की, सगळ्या खबऱ्यांना गुन्हा शोण्यासाठी कामाला लावा. संध्याकाळपर्यन्त कोणत्या माणसांनी गुन्हा केला, हे मला कळले पाहिजे. यासाठी या खबऱ्यांना काही निधी दिला जात असे, पैसे दिले जात असत. परंतु या खबऱ्यांमध्ये काही क्रिमिनल खबरेही असतात. गुन्हेगारांकडूनच अशाप्रकारची माहिती मिळत असते, परंतु आज फोन टॅपींगच्या प्रकरणामुळे गुन्हेगारांचे फोननंबर त्या पोलीस अधिकाऱ्यांकडे मिळाल्यामुळे चांगल्या अधिकाऱ्यांनाही सस्पेंड व्हावे लागलेले आहे. मग कोण कशाला या भानगडीमध्ये पडेल ? कोण कशाला हे बालंट स्वत:वर ओढवून घेईल ? म्हणून पोलिसांवर शसनाचा जो वरदहस्त असायला पाहिजे, पोलिसांना शासनाचा पाठिंबा असायला पाहिजे, तो पाठिंबा गेल्या काही दिवसामध्ये नाहीसा झाल्यामुळे हे आज सर्व प्रकार घडत आहेत. त्यामुळे या गुन्ह्यांची उकल होत नाही. जे मुजोर अधिकारी आहेत ते कोणालाच घाबरत नाहीत. माननीय मंत्री महोदय आपण सांगता की, वृत्तपत्रांकडे आता कोणते विषय नसल्यामुळे दरोड्यांच्या बातम्यांना प्रसिध्दी मिळते. कदाचित आपले तसे म्हणणे असेल. परंतु ज्या पध्दतीने आपले खालचे पोलीस अधिकारी वागत आहेत, त्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बाबतीमध्ये मी दोन-चार किस्से सांगितले तर पोलीस दलामध्ये असे काही आहे, यावर मंत्री महोदयांचा विश्वास बसणार नाही. आज रात्रीचे गुन्हे हे दिवसाच्या गुन्ह्यांपेक्षा जास्त वाढत चाललेले आहेत. याचे कारण आपले पोलीस रात्री शुध्दीवरच नसतात. याबाबत काय परिस्थिती असते, हे आपण पोलीस स्टेशनला जाऊन पहा.

3....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ॲड. अनिल परब (पुढे सुरू......

डान्सबार बंद करण्यास  प्रायोरिटी दिलेली आहे. शासनाची प्रायोरिटी ही लोकांच्या सुरक्षिततेसाठी असली पाहिजे. डान्सबारसंबंधी आपण चांगला निर्णय घेतला. बे वाच बारवर धाड टाकण्यात आली त्यामध्ये 35 बारबाल्यांना अटक करण्यात आले. मुंबईतील किती डान्स बार आज चालू आहेत, हे मी दाखवू शकतो. त्याचबरोबर आपल्याला त्यांची पध्दतही सांगू शकतो.  आज बे वॉच बारमध्ये 35 बारबाला सापडल्या, याचे कारण असे की, दुसऱ्या डिव्हीजनच्या अधिकाऱ्यांनी त्या बे वॉच बारवर धाड टाकली. तेच त्या ठिकाणी त्याच डिव्हीजनचे पोलीस अधिकारी गेले असते तर कधीच त्या ठिकाणी बारबाला मिळाल्या नसत्या.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब...

तुमचा डीसीपी जेव्हा रात्री राऊंडला निघतो. तुमचा सक्षम अधिकारी जेव्हा राऊंडला निघतो त्याच्या पाठीमागे हॉटेलवाल्याची टॅक्सी असते. आणि या हॉटेलवाल्याच्या टॅक्सीमधून तुमचा अधिकारी कोठे निघालेला आहे हे अगोदरच सर्व डान्सबारवाल्यांना कळते. तुमचा अधिकारी पोहोचण्याच्या अगोदर ते डान्सबार बंद झालेले असतात. मुंबईतील कित्येक डान्सबार असे आहेत की, ते पुढून बंद आहेत आणि मागून चालू आहेत. हे तुमच्या पोलिसांना माहीत नाही काय ? मुंबईमध्ये आपण अतिशय चांगली घोषणा केली. तुमच्या हातून अतिशय चांगले काम झाले. एक पिढी उद्ध्वस्त होण्यापासून आपण वाचविण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांची प्रोयोरिटी रात्री 11.00 नंतर डान्सबार ही आहे. खरे म्हणजे लोकांची सुरक्षितता ही प्रायोरिटी असावयास पाहिजे. रात्री 11.00 नंतर तुमचे बरेचशे पोलीस अधिकारी डान्सबारमध्ये बसलेले असतात. एकतर डान्सबार चालू असेल तर पैसे मिळतात आणि डान्सबार बंद असेल तर तुमची शाबासकी मिळते. डान्सबारमधून ऑर्केस्ट्राच्या नावाखाली धांगडधिंगा चालू आहे. त्या ठिकाणाहून पोलीस अधिकारी बाहेर येतात. रात्री 3.00 ते सकाळी 5.30 या दरम्यानच्या काळामध्ये चोऱ्या, दरोडे घातले जातात. परंतु त्यावेळी तुमचे पोलीस अधिकारी किती सक्षम असतात, किती शुध्दीत असतात ? मला असे वाटते की, हे पोलीस शुध्दीत नसण्याचे कारण शासन शुध्दीत नाही. शासनाचा त्यांच्यावर वचक नाही. एखाद्या अधिकाऱ्याला जाब विचारण्याची शासनाची ताकद नाही. जे अधिकारी तुम्ही सस्पेंड करता त्यामध्ये लाचलुचपत खात्याच्या अंतर्गत आतापर्यंत एवढ्या केसेस दाखल झाल्या आहेत त्यामध्ये किती अधिकारी पोचले. चांगल्याचांगल्या अधिकाऱ्यांची नावे घेतली तर वर्तमानपत्रातून त्यांना प्रसिध्दी मिळते. वर्तमानपत्रात त्यांच्यावर पंधरा पंधरा दिवस मालिका छापून येतात. परंतु एकही आरोप सिध्द होऊ शकत नाही. गुन्हेगारांना अटक करुन 90 दिवसात चार्जशीट दाखल केली जात नाही. त्यामुळे गुन्हेगार मोकाट सुटले जातात. वकिलांचे पॅनल मजबूत नाही. वकील उभे राहून शासनाची बाजू मांडू शकत नाहीत, पोलिसांची बाजू मांडू शकत नाहीत. अफरोज सारख जबरदस्त आरोपी जो मिडियाने रंगविला त्याच्या बाबतीत 90 दिवसात चार्जशीट दाखल केली नाही म्हणून तो सुटला. कित्येक प्रसंग दररोज आम्ही बघतो की, पोलिसांच्या लापरवाहीमुळे,

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

ॲड. अनिल परब ....

पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे गुन्हेगारांवरचा पोलिसांचा जो वचक होता तो राहिलेला नाही. माझे बरेचसे नातेवाईक पोलीस दलामध्ये कामाला होते. मुंबई पोलिसांचा जो वचक होता त्यामध्ये एखादा कॉन्स्टेबल जरी असला तरी त्यांचा रुबाब मी बघितलेला आहे. एखाद्या सिनियरचा रुबाब बघितलेला आहे. पूर्वी आम्हाला डीसीपी दिसत नसत. पूर्वी आम्हाला ॲडिशनल सी.पी. दिसत नसत. डीसीपी येत आहेत असे म्हटल्यानंतर पोलीस स्टेशनला जी जरब असावयाची, त्या विभागातील सर्व गुंड गायब होऊन जावयाचे. आज डीसीपी, एसीपी किंवा आणखी आपले कोणते अधिकारी आल्यानंतर असे काही दिसत नाही. पूर्वी आपल्या पोलीस अधिकाऱ्यांना गुन्हेगाराबरोबर दारु पिताना बघितले नव्हते. आता युनिफॉर्ममध्ये त्यांना दारु पिताना बघतो. त्यावेळी आम्हाला असे वाटते की, हाच काय गृह विभागाचा वचक ? मी बऱ्याचदा पोलीस दलातील अधिकाऱ्यांशी बोलत असतो, त्यांच्याकडून माहिती घेत असतो. वेगवेगळ्या प्रकारे संबंध प्रस्थापित करुन त्यांना विचारत असतो आणि या गोष्टीचा अभ्यास करीत असतो. त्यावेळी एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, पोलिसांवर कोणताही वचक नाही. पोलीस मोकाट सुटले आहेत. गुन्हेगार मोकाट सुटले आहेत. त्यामुळे या सर्व गोष्टींवर कंट्रोल आणण्याची गरज आहे. आणि आबा, ही जरब तुम्हीच निर्माण करु शकता. परंतु ती निर्माण करण्यासाठी शासनाची मानसिकता अतिशय मजबूत असली पाहिजे. आज जे मोठे गुन्हेगार पकडले जातात त्यांच्या बाबतीतील एक एक किस्से सांगितले तर आज मुंबईमध्ये जे खतरनाक आरोपी पकडले जातात, जे पोलिसांच्या लिस्टवर आहेत त्यांच्या बाबतीत एका बाजूला सांगितले जाते की, मानवी हक्क आयोग आम्हाला एन्काऊंटर करु देण्याचा प्रयत्न करीत नाही. परंतु मानवी हक्क आयोगाकडे आपला जो वकील पोलिसांची बाजू मांडण्यासाठी उभा राहतो त्याची पात्रता आधी तपासून बघा. तो पोलिसांची बाजू किती मजबुतीने मांडतो, तो पोलिसांसाठी किती जोरदारपणे लढतो, किती जोरदारपणे तो भांडतो, तुमच्या एन्काऊंटरचे समर्थन तो किती मजबूतपणे करतो हे बघण्याची गरज आहे. मानवी हक्क आयोगासमोर गुन्हेगारांचे मोठमोठे वकील येतात. त्या ठिकाणी कोणी लेचापेचा वकील पाठविला तर ते तुम्हाला फाडून खाणारच. परंतु शासनातर्फे चांगले वकील देणे अतिशय गरजेचे आहे. आता माननीय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

ॲड. अनिल परब .....

विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, बॉम्बस्फोटातील आरोपी सुटत आहेत. अतिरेक्यांचे मॅन्युअल आहे की, मुंबई खिळखिळी करा. एकदा मुंबई खिळखिळी झाली की, हा देश खिळखिळा होईल. मुंबईवर बॉम्बस्फोटाचे सततचे सावट असते. आज आपण सांगा की, 1993 च्या बॉम्बस्फोटामध्ये पकडलेले जेवढे आरोपी आहेत त्यातील खरे सूत्रधार किती पकडले गेले आहेत ? त्यातील खरा सूत्रधार कोण आहे ? याच्यातील फायनान्सर कोण आहे ? या बॉम्बस्फोटातील जे छोटे मोठे आरोपी आहेत ते पकडले गेले. आज ज्या 100 लोकांना शिक्षा झालेली आहे त्या 100 लोकांमध्ये मध्ये कमीतकमी 95 लोक हे त्या कटाशी पूर्णपणे सहमत नसेलेले, त्या कटाशी लागेबांधे नसलेले, ज्यांना फक्त लँडींग चे काम दिले, बॉम्ब ठेवण्याचे काम दिले असे लोक आहेत. त्याच्यातील खरे सूत्रधार, देशाच्या विरोधात काम करणारे लोक आतापर्यंत पकडले गेले नाही. म्हणून या पोलिसांची मानसिकता आणि मनोबल उंचावण्याची गरज आहे.

यांनतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 10:55

(ॲड. अनिल परब...

एका बाजूला मुजोर लोक तर दुसऱ्या बाजूला हतबल पोलीस आहेत. या हतबल पोलिसांमध्ये मी तुम्हाला कित्येक अधि-यांची नावे देईन. पूर्वी एखाद्या अधिका-याकडे केस गेली की आरोपी घाबरायचा. जो अधिकारी असायचा तो चार्जशीट लिहिण्यामध्ये किवा कागदावर आरोप पत्र तयार करण्यामध्ये माहीर असायचा. आरोपीला माहीत असायचे की, याच्याकडे जर माझी केस गेली, हा जर माझ्या केसचा इन्व्हेस्टिगशन ऑफिस असला, त्याच्याकडे जर इन्व्हिस्टिगेशन गेले तर माझे काही खरे नाही. हा अधिकारी मला शंभर टक्के पोहोचवणार अशी त्या अधिका-याची गुन्हेगारांमध्ये जरब होती. ती जरब आता पोलीस दलामध्ये राहिलेली नाही. म्हणून पोलिसांची मानसिकता, त्यांचे मानसिक बल फक्त तुमच्या मार्फतच वाढविले जाऊ शकते. आज पोलिसांच्या घरांची अतिश दयनीय अशी परिास्थिती आहे. चोरीच्याबाबतीत मी एक किस्सा सांगितला तर आपण हैराण व्हाल. मुंबईचे माजी महापौर मिलिंद वैद्य यांना झेड कॅटेगरीची सेक्युरिटी होती. पोलीस त्यांच्या घराच्या बाहेर झोपायचे, घराच्या बाजूला त्यांची गाडी असायची. पोलीस झोपलेले असताना त्यांची गाडी एकदा नाही तर दोनदा चोरीला गेली. मुंबईच्या महापौरांची गाडी बाजूला पोलीस झोपलेले असताना चोरीला जाते....(अडथळा) ठीक आहे. आपले म्हणणे बरोबर आहे. संरक्षण त्यांना होते...अशा पध्दतीने जर चो-या व्हायला लागल्या. याबाबतीत आपले असे मार्मिक उत्तर आहे की, त्यांना संरक्षण होते, गाडयांना नव्हते. आता गाडयांसाठी देखील झेड सेक्युरिटी मागावी लागेल. गाडयांसाठी सरंक्षण मागण्याची आपल्याकडे तरतूद असेल तर त्या तरतुदीचे पालन करु. पोलिसांच्या देखील गाड्या नेल्या जातात. याबाबतीत मी माझा स्वत:चा अनुभव सांगितला. मुंबईच्या बाबतीत आपणाला अतिशय दक्ष राहाणे गरजेचे आहे. कारण ब-याचशा गोष्टी पोलिसांच्या चुकांमुळे किंवा पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे किंवा पोलिसांच्या उदासीनतेमुळे होतात. मुंबईचे पोलीस केपेबल नाहीत या म्हणण्यावर कोणी विश्वासच ठेवू शकत नाही. गुन्हा कोणी केला हे मुंबईच्या पोलिसांना माहीत नसणे हे केवळ अशक्य आहे. गुन्हा कोणी केला हे प्रत्येकाला माहीत असते परंतु शोधायचा की नाही एवढेच प्रश्न चिन्ह आज त्याच्या समोर उभे आहे. कारण गुन्हा शोधला तर तो का शोधला आणि नाही शोधला तर का नाही शोधला ? सराफांच्या पेढ्या ह्या राजरोस लुटल्या जात आहेत. पूर्वी हिरे बाजारामध्ये कधी लुटालूट होत नव्हती. आजही हिरे

..2..

(ॲड. अनिल परब...

बाजाराचा वचक आहे .तेथे हिरे कोणी लुटत नाही असा काल पर्यन्त माझा समज होता. त्याबाबतीत हिरे बाजाराचा प्रचंड मोठा हप्ता पोलिसांना जातो, अशी बातमी आली होती. हिरे लुटण्याची हिंमत कोणी करीत नव्हते. कारण हिरे लुटताना कोणी पकडला तर पोलीस त्याच्या पायाच्या नसा कापत होते, नालबंदी करीत होते, त्याला टायरमध्ये घालून चार चार दिवस मारत होते. हिरे व्यापा-यांच्या हिरे संरक्षणाचे गुपित काय आहे हे सोन्या-चांदीच्या दागिन्यांच्या व्यापा-यांना माहीत नसावे. काल 5 लाखाचे हिरे चोरीला गेले. कदाचित हा चोर नवखा असावा. कदाचित त्याला माहीत नसावे की त्याच्या पायाच्या नसा कापल्या गेल्यानंतर चार-पाच दिवसांनी त्याला माहीत होईल की आपण चुकीच्या ठिकाणी हात घातला. सोन्या-चांदीच्या दुकानामधील चो-यांच्या बाबतीत वेगवेगळे उपाय आपण सांगता. आज परराज्यातून टोळया येत आहेत. आज सेक्युरिटीज एजन्सीजचे पीक निर्माण झालेले आहे. सेक्युरिटी एजन्सीमध्ये काम करणारे लोक कोण आहेत ? त्यांना कोणते ट्रेनिंग आहे ?त्यांची कुठे नोंद आहे काय ? परप्रांतीय येतात, लुटतात आणि जातात आणि त्यामध्ये हे लोकच इन्व्हाल्व्ह आहेत. माहिती देणारे इन्फॉर्मरर कोणी नाहीत. माझी नेहमी एकच भूमिका राहिलेली आहे की, परराज्यातून माणूस येतो, तो चोरी करतो किंवा गुन्हा करतो त्यावेळी जोपर्यन्त त्याला आपल्या राज्यातील लोकांची साथ मिळत नाही तो पर्यन्त तो गुन्हा करु शकत नाही. मी मागच्या बॉम्बस्फोटाच्या भाषणाच्या वेळी बोललो होतो की, समजा उद्या पाकिस्तान किंवा बांगला देशातून कोणी माणूस आला आणि त्याला याठिकाणी जो कोणी मदत करील त्याला जर जबर शासन झाले तर पुन्हा अशा प्रकारे येणाची कोणाची हिंमत होणार नाही. प्रत्येक वेळी आम्हाला असे उत्तर दिले जाते की, यापुढे अशीच जरब बसवू की, कोणीही अशा प्रकारचा गुन्हा करण्याची हिंमत करणार नाही. परंतु आपण ज्या दिवशी असे स्टेटमेंट करता त्यादिवशी संध्याकाळी गुन्हा धडलाच पाहिजे असा एक अलिखित नियम महाराष्ट्र शासनाच्या बाबतीत झालेला आहे. माननीय उपमुख्ययमंत्र्यांनी घोषणा केली की ताबडतोब त्यांना प्रत्युत्तर दिले जाते. पूर्वीच्या पोलीस कमिशनरांना सलामी दिली जायची. हल्लीचा कमिशनर आला की त्याला पहिली गुन्ह्याची सलामी दिली जाते. कमलाकर जामसांडेकर ज्या दिवशी...

..3..

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी 20 मिनिटे भाषण केलेले आहे. अजूनही अनेक सन्माननीय सदस्यांना या विषयावर बोलायचे आहे. 11.30 वाजता माननीय उपमुख्यमंत्र्यांचे उत्तराचे भाषण सुरु होणार आहे.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मी पाच मिनिटांमध्ये माझे भाषण संपवितो.

...नंतर कु. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड अनिल परब.....

सभापती महोदय, या ठिकाणी मी जे बोलत आहे ते जर मुद्दयाला सोडून असेल तर आपण मला खाली बसण्यास सांगावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब आपण मुद्दयाला सोडून बोलत आहात असे माझे म्हणणे नाही परंतु इतर सन्माननीय सदस्यांना देखील आपले मत या ठिकाणी व्यक्त करावयाचे असल्याकारणाने आपण आपले भाषण आता अर्ध्या मिनिटामध्ये संपवा.

ॲड.अनिल परब : ज्या दिवशी मुंबईचे पोलीस कमिशनर रुजू झाले त्या दिवशी श्री.कमलाकर जामसांडेकर यांचा खून झाला व या बातमीची सलामी मिळाली. यासंदर्भात सभागृहामध्ये प्रश्न मांडल्यानंतर या प्रकरणातील आरोपी पकडले जातील असे आश्वासन मिळाले आणि सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे आरोपी पकडले गेले, परंतु जे आरोपी पकडले गेले त्यांचा या प्रकरणामध्ये कितपत संबंध आहे, याबाबत मी साशंक आहे. सदर आरोपींचा या प्रकरणाशी संबंध आहे, असे पटवून देण्यासाठी जी कारणे दिलेली आहेत, ती कारणे आजही माझ्या मनाला पटत नाही. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील साहेब आपल्याप्रमाणेच मीही एक राजकीय कार्यकर्ता आहे व आता राजकीय क्षेत्रामध्ये एक पदाधिकारी म्हणून काम पाहत आहे. या नात्याने मला आपल्याला एक गोष्ट सांगावयाची आहे की, आज पोलिसांची प्रायोरिटीच बदलली आहे. आजकाल राजकीय कार्यकर्ता जर एखाद्या आंदोलनामध्ये सापडला तर त्याची फिंगर प्रिंट्स घेतली जातात. यासंदर्भातील दोन तीन किस्स्यांपैकी एक किस्सा मी आता या ठिकाणी सांगणार आहे आणि त्यासंदर्भात माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आपला मला आपला या ठिकाणी खुलासा हवा आहे. आपण देखील राजकीय पक्षामध्ये काम करुन येथपर्यंत आलेला आहात. राजकीय पक्षामधील कार्यकर्ते जर आंदोलकांमध्ये पकडले गेले तर त्याच्याकडे फिंगर प्रिंट्स मागितली जातात. परवा सायलेन्स झोनचा भंग झाला तर त्याच्याविरुध्द केस दाखल केली गेली आणि या केसची कारवाई करीत असतांना संबंधित पोलिसांनी आमच्याकडे फिंगर प्रिंट्स मागितल्या होत्या. कोणत्या गुन्हयामध्ये आरोपीच्या फिंगर प्रिंट्स घेतल्या जातात ? आणि जर राजकीय कार्यकर्ता म्हणून काम करणारा जर एखाद्या आंदोलनामध्ये सापडला आणि त्याच्याकडे पोलिसांनी अशाच प्रकारे फिंगर प्रिंट्स मागितल्या तर या सभागृहामध्ये आलेला प्रत्येक माणूस हा एक आंदोलकच आहे, असे जर आमच्या प्रत्येकाकडे फिंगर प्रिंट्स मागितले तर हे

M - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड अनिल परब.....

पोलीस आमच्या हातामध्ये गुन्हेगाराच्या हातात ज्याप्रमाणे पाटया देऊन वरात काढतात त्याप्रमाणे आमच्याही हातात गुन्हेगारासारख्या पाटया देतील. पूर्वी पोलीस गुन्हेगारांच्या हातामध्ये पाटया देऊन वरात काढीत असत.,असे जर झाले तर या आंदोलनामधून आम्हा सर्वांना बाहेर पडायला लागेल. जर एखादा गुन्हेगार पकडला गेला तर त्याला पोलीस तात्काळ 110 व 107 ची नोटीस देतात पण तो आरोपी तात्काळ जामीनावर सोडला जातो अशा प्रकारच्या माझ्याकडे अनेक बातम्या आहेत त्यापैकी एक अशी  बातमी माझ्याकडे आली होती की, जामीनावर सुटलेल्या आरोपींपैकी एकूण 20,000 आरोपी फरार झालेले आहेत. आम्हीही मुंबईचेच नागरीक आहोत,आम्ही मुंबई सोडून कधीही कुठेही जात नाही.  सायलेन्स झोनच्या बाबतीमध्ये एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला एक न्याय आणि फिल्मस्टारच्या मुलांना वेगळा न्याय असे का ? फिल्मस्टारच्या मुलांच्या वराती निघतात,मिरवणूका निघतात तसेच फिल्मस्टार किंवा त्यांच्या मुलांचा समावेश असलेल्या कमर्शियल नवरात्र सोहळयांना पोलिसांचे प्रोटेक्शन मिळते मग तेच प्रोटेक्शन आंदोलनामध्ये काम करणा-या राजकीय कार्यकर्त्यांना का मिळत नाही ? यासंदर्भात पोलिसांनी आपली प्रायोरिटी बदलली पाहिजे. पोलिसांनी जनतेच्या सुरक्षितता ही प्रायोरिटी पकडली पाहिजे.  जनतेला त्यांच्या सुरक्षिततेची हमी दिली पाहिजे.  एम.पी.डी.ए.,टाडा अशाछोटया केसेस मी तुम्हाला उदाहरणादाखल दाखवू शकतो आपण मला अर्धा तास वेळ द्या. पोलीस स्टेशनमध्ये कोटा सिस्टम असते, त्याप्रमाणे पोटा,टाडा,तडीपार अशा ठराविक केसेस झाल्याच पाहिजेत, असे सर्व अधिका-यांना सांगितले गेले मी पोलीस स्टेशनमधून तडीपारच्या केसची प्रोसिजर समजून घेतली आणि मला सगळया अधिका-यांनी सांगितले की, तडीपारीच्या केसेस कोणत्याही परिस्थितीत कँसल होणार नाही मग उपरोक्त केसमधील गुन्हेगार मुलगा मला म्हणाला साहेब तुम्ही का प्रयत्न करताहात ? मी प्रयत्न करु का ?आणि तो मुलगा पंधरा दिवसांनी माझ्याकडे येऊन मला सांगतो की,  मी डी.सी.पी.ला 50,000 रुपये दिले आणि माझ्यावरील सगळया केसेस कँसल झाल्या. आम्ही एखाद्या पोलीस स्टेशनला एखाद्या निर्दोष माणसाबद्दल सांगावयाला जातो की, हा माणूस त्यामध्ये गुन्हेगार नाही त्याला स्थान नाही  पण फक्त पैसे दिल्यानंतर गुन्हे तात्काळ कँसल होतात हे सत्य आहे, अशा प्रकारच्या अनेक केसेस मी आपल्यासमोर एक नाही तर डझनवार मांडू शकतो.  या चर्चेच्या निमित्ताने माझी आपणास एक अतिशय कळकळीची विनंती

M - 3



JPK/ KGS                    प्रथम श्री.शिगम एम......                    11:00

आहे की, मुंबई पोलिसांचा वचक लक्षात ठेवून त्यांची तुलना स्कॉटलंड यार्ड पोलिसांशी केली जात होती. हा दर्जा पुन्हा निर्माण करण्यची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने मानसिकता तयार करुन पोलिसांचे मनोबल वाढविले तर कायदा व सुव्यवस्था मजबूत होईल व गुन्हयांचे प्रमाण कमी होईल, याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा. अशी अपेक्षा व्यक्त करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सन्माननीय सभापती महोदय, गृह खात्याच्या चर्चेच्या संदर्भात येथे माझे काही विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आदरणीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील या खात्याचे मंत्री झाल्यानंतर या खात्याला मानवी चेहरा देण्याचा प्रयत्न सातत्याने ते करीत आहेत. गृह खाते हे अत्यंत महत्वाचे खाते आहे. पूर्वी या देशात फक्त दोन खाती होती ती म्हणजे महसूल खाते आणि गृह खाते,सहकार,ग्रामीण विकास,नगरविकास ही नंतर आली. ज्या राज्यात कायदा व सुव्यवस्था पहिल्या क्रमांकावर असते, तेच राज्य प्रथम क्रमांकावर असते. मी आपल्याला या ठिकाणी एक माहिती देणार आहे. मी काही फार वेळ या ठिकाणी भाषण करणार नाही. " Be popular with action, do not be popular with inaction " यासंदर्भामध्ये जर कोणी ॲक्टीव्ह नसून इनॅक्टीव्ह असेल तर त्याच्या पाठीमागचे कारण शोधणे हे अत्यंत महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब आपण अनेक उदाहरणे या ठिकाणी दिली परंतु आपल्याला वेळ कमी पडला. आपण येथे पोलिसांचे तसेच जनतेचीही सुखदु:खे सांगितली. " सत्रक्षणाय खलनिग्रहणाय " हे जे पोलिसांचे "ब्रीदवाक्य" आहे ते त्यांनी लक्षात ठेवणे आणि ते खरे करण्याच्या संदर्भात आपल्याला पोलिसांना त्या पध्दतीचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे.

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ 11:05

श्री. अरुण गुजराथी .....

पोलीस हा जनतेचा मित्र आहे असे वाटले पाहिजे. पोलीस खात्यात भ्रष्टाचार नाही असे कोणी म्हणू शकणार नाही. परंतु हा भ्रष्टाचार कमी करण्याच्या संदर्भात उपाययोजना करणे देखील अत्यंत महत्वाचे आहे. पोलिसांची अनेक दु:खे आहेत. आज पोलिसांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात फार कमी आहे. ग्रामीण भागात 1000 माणसांच्या मागे अर्धा पोलीस अशी अवस्था आहे. अर्धा पोलीस 1000 माणसांच्या ठिकाणी कशा पध्दतीने शांतता आणि कायदा व सुव्यवस्था राखणार याचा विचार करण्याची गरज आहे. पोलिसांची 11000 पदे भरली जाणार असल्याची घोषणा माननीय उपमुख्यमंत्र्यांनी केल्याचे आम्ही वर्तमानपत्रात वाचले आहे. प्रत्यक्षात भरती झाली किंवा नाही हे मला माहीत नाही. पूरक मागण्यांमध्ये यासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. पोलिसांची भरती करण्याच्या संदर्भात लोकसंख्येच्या मानाने पोलिसांची संख्या वाढविली पाहिजे. पोलिसांची संख्या वाढवा, न्यायालयांची संख्या वाढवा, तुरुंगांची संख्या वाढवा अशा पध्दतीच्या मागण्या समाजाचा स्तर काय आहे हे दर्शविते आणि ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे. अशा पध्दतीची मागणी येते म्हणजे समाज कुठे चालला आहे याचा देखील विचार करणे अत्यंत गरजेचे आहे. माननीय उपमुख्यमंत्री धुळयाला एका कार्यक्रमासाठी आले होते. विनोबा भावे आणि सानेगुरुजी जयंती निमित्ताने एक कार्यक्रम आयोजित केला होता. अनेक विचारवंत त्याठिकाणी उपस्थित होते. यावेळी जे चर्चासत्र आयोजित केले होते त्या चर्चासत्रात बऱ्याच वक्त्यांचे असे म्हणणे पडले की जेलमध्ये बंदीजन नको तर वंदीजन तयार व्हावयाला पाहिजेत. तुरुंगातील गुन्हेगार, गुन्हेगार म्हणून न राहता पुनश्च माणूस म्हणून बाहेर पडला पाहिजे. यासंदर्भात अधिकाऱ्यांना प्रशिक्षण, पोलिसांना प्रशिक्षण, गुन्हेगारांना प्रशिक्षण दिले तर मला वाटते की आजची जी परिस्थिती आहे त्यामध्ये नक्कीच सुधारणा होईल.

सभापती महोदय, पुणे शहराची लोकसंख्या वाढलेली आहे. गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. त्याप्रमाणात पोलिसांची संख्या वाढलेली नाही. लोकसंख्येचा निकष लावून पोलिसांची भरती केली पाहिजे. आज बीपीओ उद्योगाची वाढ झालेली आहे त्याचप्रमाणे सॉफ्टवेअर कंपन्या वाढलेल्या आहेत. त्यामुळे पुण्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण देखील वाढते आहे. त्यामानाने पोलिसांची संख्या फार अपुरी आहे. याचा देखील शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. शांतता निर्माण करणे देखील पोलिसांचे महत्वाचे काम आहे. मध्यंतरीच्या काळात मोहल्ला समित्या नेमल्या.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

या समिती सध्या किती ॲक्टीव्ह आहेत हे मला माहीत नाही. महानगरपालिकेच्या प्रभाग समित्या नगरविकास विभागाने निर्माण केलेल्या आहेत. या प्रभाग समित्यांच्या बैठकांना पोलीस अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ज्यावेळी प्रभाग समित्यांच्या बैठका होतात त्यावेळी पोलीस अधिकारी हजर राहिला तर नगरसेवकांनी तक्रारी केल्यावर त्यांना त्या भागाची माहिती असल्यामुळे तात्काळ कारवाई होऊ शकते. अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी होतात . यापध्दतीने देखील समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लोकांच्यामध्ये विश्वास निर्माण करणे देखील अत्यंत गरजेचे आहे. भिवंडी आणि कल्याण येथे हजरत पैगंबराची मिरवणूक काढण्यास शासनाने परवानगी दिल्याबद्दल मी यानिमित्ताने माननीय उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करु इच्छितो. मुस्लीम समाजामध्ये एक विश्वास निर्माण करण्याचे काम शासनाने केले असल्यामुळे उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करणे मी उचित समजतो.

सभापती महोदय, रेल्वेमध्ये सुध्दा मोठया प्रमाणावर गुन्हेगारी वाढली आहे. रेल्वे पोलीस आणि बाहेरचे पोलीस यांच्या कार्यपध्दतीमध्ये काही फरक असेल परंतु लोकांना त्याचे देणे-घेणे नाही. रेल्वे पोलिसांची संख्या देखील वाढली पाहिजे. मागील वर्षभरापूर्वी रेल्वेमध्ये जी घटना घडली त्यासंदर्भात काळजी घेतली पाहिजे. मुंबई हे केवळ राज्यातील आणि देशातीलच नव्हे तर जगातील एक महत्वाचे शहर आहे. मुंबई शहरामध्ये जर कायदा आणि सुव्यवस्था चांगल्या पध्दतीने आहे असे चित्र निर्माण झाले राज्यात , देशात आणि जगात निर्माण झाले तर औद्योगिक गुंतवणुकीसाठी त्याचा चांगला परिणाम होईल. बेरोजगारी देखील वाढत आहे आणि जर आर्थिक सुबत्ता नसेल तर गुन्हेगारी वाढते ही वस्तुस्थिती आहे.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी..........

आजच्या "सामना" या वृत्तपत्रात काही आकडेवारी प्रसिध्द झालेली आहे ती मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. त्यात म्हटले आहे की, लंडन आणि न्यूयॉर्क या शहरांपेक्षा मुंबई शहर जास्त सुरक्षित आहे. लंडनपेक्षा मुंबई शहर सुरक्षित असेल तर त्याबद्दल अभिनंदन करतो. परंतु पूर्वीपेक्षा आणखी जास्त सुरक्षित कसे होईल याचा विचार झाला पाहिजे. लंडनमध्ये मे, 2007 पर्यंत 155 खून झाले, न्यूयॉर्कमध्ये 232 खून झाले आणि मुंबईत फक्त 111 खून झाले. बलात्काराचे प्रकार लंडनमध्ये 176, न्यूयॉर्कमध्ये 666 आणि मुंबईत 89 घडले. शहरांच्या संदर्भात विचार केला तर मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगळुरु आणि कोलकाता यापैकी दिल्लीपेक्षा मुंबई सुरक्षित आहे ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. दिल्लीमध्ये 369 खून झाले, मुंबईमध्ये 272 खून झाले. खुनाचे प्रयत्न दिल्लीमध्ये 387, आणि मुंबईमध्ये 136 झाले. कोलकाताची आकडेवारी पाहिली तर ती फार कमी आहे. कोलकाता शहरामध्ये फक्त 43 खून झाले आणि खुनाचे प्रयत्न 73 इतके कमी झ ाले. कोलकाता शहरामध्ये इतकी शांतता निर्माण होते तर मुंबईमध्ये त्यापेक्षा जास्त शांतता निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून, आपण जी सुरक्षितता म्हणतो ती निर्माण करण्याचा प्रयत्न आपल्या माध्यमातून व्हावा.

सभापती महोदय, 5-6 महत्वाचे मुद्दे मला या संदर्भात सूचित करावयाचे होते ते मी केलेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, गृहमंत्र्यांची गाडी पुढे जाते आणि मागची सुरक्षा रक्षकांची गाडी 20 कि.मी.मागे राहते. माननीय गृहमंत्र्यांनी सुरक्षा रक्षकांची गाडी पुढे ठेवावी आणि त्यांची गाडी मागे ठेवावी. वेग कमी असला तरी सुरक्षितता राहिल.

सभापती महोदय, पोलिसांकडे सुसज्ज हत्यारे असली पाहिजेत. पोलिसांना पाहिल्यानंतर समोरच्या माणसाला भीती वाटली पाहिजे. आपल्याकडे आहे त्यापेक्षा सरकारने पोलिसांना जास्त दिले आहे असे वाटले पाहिजे. पोलिसांना ऊन्हामध्ये ऊन खावे लागते, थंडीमध्ये थंडी खावी लागते, तहान लागली तर तहान प्यावी लागते, भूक लागली तर भूक खावी लागते. ज्या मुंबई पोलिसांची आपण स्कॉटलंड यार्डशी तुलना करतो, पुनश्च एकदा हे वैभव आपल्या नेतृत्वाखाली प्राप्त करुन देण्याच्या संदर्भात, पोलीस खात्यातील भ्रष्टाचार कमी करण्याच्या संदर्भात, पोलिसांमध्ये शिस्त वाढविण्याच्या संदर्भात, पोलिसांमध्ये एकात्मता वाढविण्याच्या संदर्भातील काम

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी........

करावे. समाज पोलिसांसोबत राहिल, समाज आणि पोलीस एकमेकांना पूरक आहेत असे चित्र निर्माण करण्याच्या संदर्भातील 7-8 मुद्दे मी याठिकाणी मांडले आहेत. माननीय सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये राज्यातील कायदा व सुवस्थेच्या प्रश्नासंबंधी मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, खूप उदाहरणे असली तरी सगळया उदाहरणांच्या तपशीलामध्ये मी जाणार नाही. पहिला मुद्दा म्हणून मला कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील चर्चेद्वारे मला लक्ष वेधावयाचे आहे. माध्यमांकडून गुन्हेगारांचे उदात्तीकरण मोठया प्रमाणात केले जात आहे. गुन्हेगारांच्या उदात्तीकरणाची उदाहरणे पाहिली तर गेल्या काही महिन्यात प्रत्येक वाहिनीवर दाऊद, हसीना पारकर, मोनिका बेदी यांच्यावरील कार्यक्रम अर्ध्या अर्ध्या तासाचे दाखविले जातात. दाऊदची महफिल कुठे आहे, कोणकोणता नट गेला, कोणता नट गेला नाही हे सांगितले गेले. याचा अर्थ बहुतके गुन्हेगारांनी या वाहिनीमध्ये पीआरओ नेमले आहेत का अशी शंका निर्माण होते. म्हणून या संदर्भात व्यवस्थित एकदा श्वेतपत्रिका जाहीर करावी. या गुन्हेगारांची पाळेमुळे खणून काढण्याचा प्रयत्न व्हावा. पोलिसांमध्ये खूप सुधारणा झाली पाहिजे. एका बाजूला पोलीस अकार्यक्षम असून दुसऱ्या बाजूला गुन्हेगारांची हुशारी हा जो संदेश माध्यमांकडून दिला जातो, त्यामुळे सामान्य नागरिकांच्या मनामध्ये वैफल्याची भावना निर्माण झाली आहे. याचा परिणाम म्हणून लोकांनी कायदा हातात घेऊन दरोडेखोरांना मारुन टाकण्याच्या घटना घडल्या आहेत. नागपूर येथे अक्कू यादव प्रकरण घडले. पुण्यामध्ये नारायणगाव येथे पोलिसांनी स्वत: जाऊन सहभाग घेतला. दरोडेखोर समजून एकाला मारुन टाकण्यात आले. याचे महत्वाचे कारण म्हणजे माध्यमांकडून उदात्तीकरण होत आहे, याचा पुनर्विचार झाला पाहिजे. पोलीस अधिकारी स्वत:हून चॅनेलवर मुलाखती देतात. काहींना प्रसिध्दीची हौस असते. राजकारणात प्रसिध्दी महत्वाची असते. परंतु पोलीसच डायरेक्ट महत्वाच्या बातम्या लिक करतात का? दुसरा मुद्दा म्हणजे पुण्यामध्ये असुरक्षितता जास्त आहे. तसे संपूर्ण महाराष्ट्राबद्दल मला सुचवावेसे वाटते की,.................

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

डॉ. नीलम गो-हे .....

गेल्या अनेक महिन्यांपासून महिला धोरणाच्या संदर्भात चर्चा होत आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये क्राईम रजिस्टर ठेवले जात असते. महिला जेव्हा तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये जातात तेव्हा तो अदखलपात्र गुन्हा जरी असला तरी त्या ठिकाणी तक्रार नोंद वही असली पाहिजे. जर महिलांची छेडछाड झाली म्हणून, किरकोळ कारणावरुन निघून गेली असली तरी अशा कारणावरुन त्याचा पाठपुरावा एसीपी स्थरावरुन झाला पाहिजे असे मला सूचवावेसे वाटते. दखलपात्र गुन्हयांचे अदखलपात्र गुन्हा होण्याच्या आधीच कारवाई केली जाऊ शकेल. दुसरे असे की, मुंबई मध्ये "प्रेरणा" ही संस्था लहान मुलांचा जो अनैतीक व्यापार चालतो, किंवा बाल वेश्या व्यवसायामध्ये ढकलण्याचा जो प्रयत्न केला जातो त्यांसदर्भात प्रेरणा या संस्थेने मुंबईच्या उच्च न्यायालयामध्ये दिनांक 18.4.2007 रोजी एक पिटीशन दाखल केले होते व त्याचा निकालही लागलेला आहे. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश माननीय रंजना देसाई यांनी यासंदर्भात पोलीस विभागाला 50 सूचना केलेल्या आहेत. 2003 सालचा 1964 नंबरचा हे पिटीशन आहे. यासंदर्भात माझ्या जवळ प्रत आहे ती मी माननीय गृहमंत्र्यांना सादर करते. यामध्ये म्हटले आहे की, आयटीपीए 13 (बी) नुसार प्रत्येक जिल्हयात स्पेशल पोलीस ऑफिसर नेमण्याच्या संदर्भात त्यांनी 50 सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या निकालपत्राची अंमलबजावणी झाली पाहिजे असे मला या ठिकाणी सूचवावेसे वाटते. काल दहशतवादाच्या संदर्भात एक मुद्दा चर्चेला आला होता त्यामध्ये पुण्यातील आय.टी. क्षेत्र हे सुध्दा दहशतवादाच्या विळख्यामध्ये जोडले जात आहे असे चित्र परत परत येत आहे. म्हणून यासंदर्भात माझी अशी सूचना आहे की, सिंहगड परिसर, पिंपरी-चिंचवड, लोणी-काळभोर या ठिकाणी पोलीस स्टेशनची वाढ करण्यात यावी अशी मागणी केली जात आहे परंतु ही मागणी अद्याप पावेतो प्रलंबित आहे. या ठिकाणच्या पोलीस स्टेशनच्या संदर्भात निर्णय झालेला नाही. लोणी-काळभोर परिसराची हद्द नदीच्या पलिकडे जाऊन चंदन नगर, वडगा येथ पर्यंत पोहचलेली आहे. या ठिकाणी दरोडे पडले तर विलंब लागत असतो. हद्दीची वाद मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. कोठल्याही हद्दीतील, कोठल्याही पोलीस स्टेशनमध्ये व्यक्ती तक्रार घेऊन गेली तर हद्दीचा वाद करता कामा नये याबद्दलच्या सक्त सूचना सर्व पोलिसांना, खास करुन रेल्वे

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे .....

पोलिसांना दिल्या गेल्या पाहिजेत. रेल्वेमध्ये, लोकलमध्ये महिलांची जी छेडछाड होते त्यांसदर्भात शासनाने वारंवार घोषणा केलेल्या आहेत परंतु त्याची अंमलबजावणी आपण काय करीत आहात याची माहिती आम्हाला कळाली पाहिजे. आज पुण्यामधील लक्ष्मीरोड वरील आष्टीकर सराफांच्या दुकानावर दरोडा पडलेला आहे. महिलांच्या गळयातील सोन-साखळया पळवणे हे रोजचेच झालेले आहे तसेच वाहनातून पाठलाग करणे हा प्रकार आता वाढत चालला आहे. मुंबईमध्ये अशा प्रकारची अनेक प्रकार घडलेले आहेत. त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा जो बोजवारा उडालेला आहे त्यासाठी आपण तंटामुक्त गाव तसेच मोहल्ला समित्यांचा उल्लेख करीत आहात परंतु खरा प्रश्न असा आहे की, पोलीस दलामध्ये ज्या चांगल्या व्यक्ती आहेत त्यांचे आपण कशा रितीने नितीधैर्य वाढविणार हे पाहिले पाहिजे. गुन्हेगारी, भ्रष्टाचारी अशा प्रकारच्या ज्या व्यक्ती आहेत त्यांना संरक्षण देणारे जे लोक आहेत त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. सभापती महोदय, मुंबई पोलीस आयुक्त पदी आपण मराठी अधिका-याची नियुक्ती केलेली आहे त्यामुळे ही चांगली बाब आपण केलेली आहे. चांगली कामे करणारी व्यक्ती मोठया पदापर्यंत जातो परंतु पोलीस महासंचालक , मुंबई पोलीस आयुक्त या पदावर मराठी व्यक्ती पोहचली पाहिजे अशी पेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

जय भीम, जय महाराष्ट्र.

-----------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : आदरणी विरोधी पक्ष नेते माननीय भाऊसाहेब फुंडकर यांनी नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी मुंबईची तसेच जगातील गुन्हेगारीची तुलना केलेली आहे. तसेच त्यांनी सामना या वर्तमानपत्राच्या संदर्भात उदाहरण दिलेले आहे परंतु सामना या वर्तमानपत्रात, "वर्षभराच्या गुन्हयांचा तिमाहीत रेकॉर्ड ब्रेक" अशी बातमी आलेली आहे. त्यामुळे जगाची आणि महाराष्ट्रातील गुन्हयांची तुलना न केलेली बरी. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. परब साहेबांनी सांगितले आहे की, गृहमंत्र्यांना कदाचित हे माहिती नसेल परंतु मला असे म्हणावयाचे आहे की, गृहमंत्री सुध्दा आपल्या सारखेच कार्यकर्ते आहेत, त्यांची राहणी साधी आहे, मी त्यांचे गाव, शिवार, घर बघितलेले आहे. माननीय गृहमंत्री जसे बोलतात त्यावरुन या माणसाच्या हातून नक्कीच काही विशेष घडेल अशी लोकांची भावना आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

परंतु तसे काही होत नाही. मागील अधिवेशनामध्ये माननीय गृहमंत्र्यांनी विधानसभेमध्ये घोषणा केली होती की, "ज्या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये देशी दारु मिळेल तेथील पोलीस स्टेशनमधील पोलीस इन्स्पेक्टर, पोलीस हवालदार यांना सस्पेंड न करता पूर्ण पोलीस स्टेशनच सस्पेंड करण्यात येईल." परंतु या घोषणेनुसार कारवाई झाली नाही. सभापती महोदय, दिनांक 13.7.2007 रोजीच्या दैनिक "एकमत"मध्ये एक बातमी होती,"निलंबा तालुक्यातील कोराळीवाडीत दीड लाखाची दारु जप्त करण्यात आली." माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या बातमीची दखल घ्यावी अशी मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, माझ्या मतदारसंघात माझा पेट्रोलपंप आहे. त्या पेट्रोलपंपावर दरोडा पडून जवळपास 80 हजार रुपयांचा ऐवज दरोडेखोरांनी पळविला. या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करुनही अद्यापर्यंत दरोडेखोरांचा तपास लागलेला नाही. मी शेतकरी संघटनेमध्ये काम करीत असताना एस.पी. मला भेटायला यायचे. आता मी आमदार झालो तरी मला भेटायला येत नाहीत. मी पोलीस स्टेशनला दहा-बारा वेळा फोन करुन सुध्दा त्याची दखल घेण्यात आलेली नाही की त्याबाबत मला कोणी भेटायला आहे नाही. माझ्या पेट्रोल पंपावर शुध्द पेट्रोल मिळते, पोलिसांच्या गाड्या सुध्दा पेट्रोल भरण्यासाठी येतात. या घटनेस दीड महिना झालेला आहे. अद्यापर्यंत याची चौकशी झालेली नाही की कोणाला अटक झालेली नाही.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वीची घटना सांगतो. माझ्या कार्यकर्त्यांचा मला फोन आला. त्याने मला सांगितले की, काही गुंड मला मारहाण करीत आहेत. मी पोलीस स्टेशनला जात आहे, आपण पोलीस स्टेशनला फोन करुन पोलिसांना सहाय्य करण्यास सांगावे. मी पोलीस स्टेशनला फोन करुन सांगितले की, माझा एक कार्यकर्ता 11 कि.मी.अंतरावरुन तक्रार करण्यास येत आहे. त्याला काही गुंड मारहाण करीत आहेत. तेव्हा त्यास संरक्षण द्यावे. परंतु पोलिसांची त्याची दखल घेतली नाही. तो कार्यकर्ता मामाच्या गावाला जाऊन बसला आहे. आमदारांनी फोन करुनही पोलीस दखल घेत नसतील तर सर्वसामान्य लोकांचे काय हाल होत असतील याची कल्पनाच न केलेली बरी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

सभापती महोदय, दिनांक 16 जुलै रोजी रेणापूर फाटा येथे ट्रक आणि काळी-पिवळी गाडीची टक्कर होऊन त्यामध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला. अशी घटना घडूनही आजमितीस काळी-पिवळी गाडीचा मागील दरवाजा बंद होत नाही. ड्रायव्हरने पोलिसांना दोनशे रुपये दिल्यास सर्व सुरळीतपणे चालू राहते.

सभापती महोदय, दिनांक 21 जुलै रोजीच्या दैनिक "सकाळ "मध्ये एक बातमी होती "नऊ मटकाबहाद्दरांना कळंबा आणि उमरगामध्ये अटक". उमरगा तालुक्यामध्ये पोलिसांनी एक हजार 320 रुपये आणि मटक्याचे साहित्य पकडले. याचा अर्थ मटका सुरु आहे, दारुचा धंदा सुरु आहे, दरोडयांचा सुळसुळात सुरु आहे. परंतु याची पोलिसांकडून कोणतीही दखल घेतली जात नाही. पुढच्या अधिवेशनात माझ्या घरावर दरोडेखोरांनी दरोडा घातला आणि मला मारहाण केली अशी देखील बातमी येईल आणि अशी परिस्थिती समोरच्या बाकावरील सदस्यांवरही येऊ शकते. तेव्हा पोलिसांनी वेळीच पावले उचलून दरोडखोरांना पकडून त्यांच्यावर कडक कारवाई केली पाहिजे आणि यापुढे कोणीही दरोडे टाकणार नाही अशी भीती निर्माण केली पाहिजे. एका मोठ्या वर्तमानपत्रात बातमी होती की, " कुठे गेला पोलिसांचा दरारा". तेव्हा पोलिसांनी पूर्वीचा दरारा निर्माण केला पाहिजे. या निमित्ताने मी शेर सांगतो.

" बाप पर पूत, पिता पे घोडा,
बहुत नही तो थोडा थोडा."

सभापती महोदय, कुटुंब प्रमुखाची कुटुंबावर छाया राहते. मी माननीय उपमंत्र्यांना विचारु इच्छितो की, तुमची छाया कुठे गेली ? दोष तुमच्यामध्ये आहे की तुमच्या यंत्रणेमध्ये आहे हे तपासण्याची गरज आहे. गेल्या पाच-सहा वर्षात महाराष्ट्रातील जनतेचा आपल्याबद्दल असलेला आदर हळूहळू कमी होऊ लागला आहे. तसेच पोलिसांनी मुस्लीम समाजाबद्दलची वर्तणूक सुधारली पाहिजे. केंद्रीय कृषी मंत्री देशाच्या क्रिकेटची काळजी सोडून त्यांना गृहमंत्र्यांना सूचना देण्यासाठी मुंबईला यावे लागले.

यानंतर श्री.पुरी........

अशुद्धीत प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

ते आपल्या पक्षाला मतदान करीत आहेत, ते आपल्याला खुर्चीवर बसवत आहेत, ते आज काँग्रेस पक्षापासून सरकले आहेत. त्यांची आपल्याला बऱ्यापैकी मदत मिळत आहे. परंतु आज त्या मुस्लीम समाजातील लोकांचे काय म्हणणे आहे ? आपले मुस्लीम समाजातील नेतेच सांगत आहेत की, मुस्लीम समाजाबद्दल पोलिसांची वर्तणूक अन्यायकारक आहे. राष्ट्रवादीच्या अनेक मुस्लीम नेत्यांनी अशाप्रकारची भावना व्यक्त केलेली आहे. आपल्याच पेपरमध्ये, आपल्याच नेत्यांनी आपल्याबद्दल अशी भावना व्यक्त केलेली आहे. माननीय आबा साहेब, खरेच, आपला करिश्मा संपत चालला आहे का ? हे तपासून पाहण्याची वेळ आज आलेली आहे. सभापती महोदय, आपल्याच जिल्हयातील मुरबाडहून मला एक फोन आला. की, तेथील पोलीस स्टेशनचे पीएसआय हे मुस्लीम समाजावर अन्याय करीत आहेत. यासंबंधी त्यांनी त्यांच्याविरुध्द मोर्चाही काढला होता. सभापती महोदय, भिवंडीमध्ये माझ्या गावातील जवळपास 25-30 घरे आहेत. गावामध्ये शेती परवडत नाही म्हणून ते येथे येऊन राहत आहेत. मागे ज्यावेळी त्याठिकाणी पोलीस स्टेशनसंबंधीचा दंगा झाला त्यावेळी माझ्या गावातील त्या पोरांनी मला सांगितले की, आम्ही याठिकाणी कमावून खात आहोत, परंतु आम्हाला याठिकाणचे पोलीस कामावरही जाऊ देत नाहीत आणि याठिकाणी राहूही देत नाहीत. माझा याठिकाणी प्रश्न आहे की, त्यांचा यामध्ये काय दोष आहे ? करतय कोण आणि भोगतय कोण ? सभापती महोदय, आमच्याकडील अहमदपूर तालुक्यातील कुमठा येथे कब्रस्तानची जमीन आहे. परंतु त्याठिकाणी आपले पोलीस अडथळा निर्माण करीत आहेत. आम्हाला पुरायला तरी सुरक्षित राहू द्या, मेल्यानंतर आम्हाला निवांत झोपायला तरी आमची जागा सुरक्षित राहू द्या. त्याठिकाणचे पोलीस स्टेशनचे लोक आम्हाला सहकार्य करीत नाहीत. त्यामुळे याबाबतीत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. गेल्यावर्षी माननीय गृहमंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये उत्तर देताना सांगितले होते की, आम्ही अख्ख्ये पोलीस स्टेशन सस्पेंड करु. परंतु ते केले का ? तसेच, नाशिकच्या मार्केट कमिटीचा ज्यावेळी प्रश्न येथे चर्चेला आला होता, त्यावेळी आपणच सांगितले होते की, शेतक-यांवर अन्याय होत असेल तर कोणी कितीही मोठा असला तरी त्यांस आपण सोडणार नाही. तसेच गेल्यावर्षी तुरीच्या मापात पाप केल्यासंबंधीचा प्रश्न मी येथे उपस्थित केला होता, त्यासंबंधी मी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

माननीय गृहमंत्र्यांना निवेदनही दिले होते. परंतु त्यासंबंधी अजूनपर्यंत काहीही झालेले नाही. माननीय गृहमंत्री महोदय, आपण फक्त नुसते बोलता, प्रत्यक्षात करत काहीच नाहीत, असे आपल्या कृतीवरुन सिध्द होऊ देऊ नका. त्यामुळे याबाबतीत आपण प्रत्यक्षात आपल्या तोंडून खुलासा करावा नाही तर दुर्दैवाने मला पुढच्या वेळी येथे एकाच हाताने किंवा एकाच पायाने येण्याची वेळ येईल ती आपण येऊ देऊ नका, अशी माझी विनंती आहे. माननीय गृहमंत्री महोदय, आपल्यात कणखरपणा आहे, तो आपण सदस्यांकरिता दाखवावा, अशी माझी विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव चर्चेला आणला आहे, त्यावर माझ ो विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गेल्या पाच वर्षामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी पहिल्यांच येथे चर्चा उपस्थित होत असून हा विषय अतिशय महत्वाचा आहे. परंतु या विषयी बोलण्यासाठी वेळ कमी असल्यामुळे मी माझे फक्त 5-6 मुद्दे येथे मांडणार आहे. माझा पहिला मुद्दा अंतर्गत सुरक्षेचा असून कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये शासनाने फरक करण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते. कारण, सन 1993 मध्ये मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाला, तो पाकिस्तानने जाणीवपूर्वक केलेला हा हल्ला होता, हे कोणीही नाकारु शकत नाही. यामध्ये त्यांनी या देशातील माफिया यंत्रणेला वापरले. तो दिवस असा होता की, माफियाचे परिवर्तन आंतरराष्ट्रीय दहशतवाद टोळयामध्ये झाले,

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत........

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, इक्बाल कासकर, हसिना पारकर सुटले. हे का होते, याच्या मुळाशी आपण जाणार की नाही ? कारण कायद्याच्या चाकोरीमध्ये या लोकांना शिक्षा होऊ शकत नाही, हा अंतर्गत सुरक्षिततेचा प्रश्न आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते असे म्हणाले की, दाऊद हा गुंड आहे. नाही तो आंतरराष्ट्रीय दहशतवादी, संघटित गुन्हेगारी करणारा, मल्टिनॅशनल कॉर्पोरेट आहे. त्याचे हेडक्वार्टर कराची येथे आहे आणि रिजनल हेडक्वार्टर्स मुंबई, काठमांडू, थायलंड, मलेशिया या ठिकाणी आहेत. एवढे मोठे सामर्थ्य असणारा हा दहशतवादी आहे व त्याचा मुख्य धंदा हा गर्दचा आहे. अफगाणिस्तानमधून हे गर्द पाकिस्तान, हिंदुस्थान या ठिकाणी जाते आणि यामधून थोडे थोडके नाही तर एक लाख कोटी रुपये मिळतात. या देशात गर्द स्मगलिंगच्या माध्यमातून येते. यासंदर्भात तुम्ही काय करणार आहात, तुमच्याकडे ते सामर्थ्य आहे का, ती ताकद आहे का, राजकीय इच्छाशक्ती आहे का ? तुम्ही त्याविरुध्द काही केले तर या पदावर तुम्ही किती काळ टिकाल, याबद्दल शंका आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अशा प्रकारची मागणी कुणीही केलेली नाही.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, प्रश्न मागणीचा नाही. सामर्थ्यवान असलेल्या संघटित गुन्हेगाराला आव्हान दिले तर माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या पाठीशी कोण उभे राहणार, हा प्रश्न आहे. हा फार मोठा प्रश्न आहे, छोटा नाही. याबाबतची अनेक उदाहरणे मी देऊ शकतो, पण वेळ कमी असल्यामुळे देऊ शकत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला सन्माननीय सदस्य, कर्नल सुधीर सावंत यांना एवढेच सांगावयाचे आहे की, अफजल गुरुला फाशी दिली गेली नाही, त्याबद्दल त्यांनी थोडे बोलावे. हा तुमचा विषय नाही, पण तुम्ही त्या विषयाला संरक्षण देत आहात, तुम्ही म्हणजे तुमचा पक्ष संरक्षण देतो आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांकडून मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झाले. गेल्या वर्षी बॉम्बस्फोट झाला, पुढेही होऊ शकतो. यासाठी आपण काय करणार आहात ? पोलीस संघटना, तुमचे कायदे हे या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सामर्थ्यशाली आहेत की नाहीत, हा प्रश्न आहे. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत.........

यासंदर्भात या सदनातील सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करण्यात यावी आणि या प्रत्येक पैलुच्या मुळाशी जाऊन कायदा व सुव्यवस्था आहे काय, आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीचा प्रश्न आहे काय, याबाबतची चौकशी करावी. सन 1993 मध्ये ज्यावेळी बॉम्बस्फोट झाले त्यावेळी आम्ही 150 खासदारांच्या स्वाक्षरीने अशी मागणी केली होती की, हा सर्व तपास सी.बी.आय.कडे द्यावा. त्यावेळी हा तपास सी.बी.आय.कडे देण्यात आला, त्यावेळी राज्य सरकारने विरोध केला होता, पण अशा प्रकरणांमध्ये विरोध होऊ नये. आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांना पकडण्यासाठी राज्यातील पोलीस दल, इंटेलिजन्स ब्युरो सक्षम नाही, त्यांच्यामध्ये हे सामर्थ्य नाही. नागपूर येथे जे दहशतवादी पकडले गेले ते देखील केंद्रीय इंटेलिजन्स ब्युरोने पकडले आहेत. त्यामुळे यासंबंधीच्या ज्या आंतरराष्ट्रीय संघटना आहेत, टास्क फोर्स आहेत त्यांची मदत घेतली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा मुद्दा हा आहे की, पोलीस हयुमिलिटी. पोलीस आयुक्त, श्री.आर.अे.शर्मा, प्रदीप सावंत असे अनेक अधिकारी आहेत की ज्यांना दोन-तीन वर्षांसाठी तुरुंगात खितपत पडावे लागले. सन्माननीय सदस्य, ॲड.अनिल परब यांना हा मुद्दा मांडला आहे. अशा अधिका-यांना कोणते संरक्षण आहे ? जे पोलीस अधिकारी दहशतवाद्यांशी लढतात, तेच चोर ठरतात.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा कायद्याचा प्रश्न आहे. कायद्यामध्ये ज्या काही तरतुदी करावयाच्या आहेत त्या करणे आवश्यक आहे. त्यासाठी मानवी हक्क संघटना विरोध करतात, त्यांना हे विचारले पाहिजे की, नागरिकांचे हक्क कुठे गेले ? दरोडेखोर घरांमध्ये घुसत आहेत. एकूणच सामाजिक, आर्थिक व्यवस्था कोलमडली आहे. त्यामुळे कायद्यात आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे. पब्लिक प्रॉसिक्युटर आणि पोलीस यांचे जवळचे नाते असले पाहिजे, त्यांच्या सल्ल्याने गुन्हेगारांना अटक केली पाहिजे व पुढील कार्यवाही पोलिसांनी केली पाहिजे. अशा पद्धतीने कायद्यामध्ये आमुलाग्र परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ...........

सभापती महोदय, तिसरी गोष्ट अशी की, इंटेलिजन्सचे पूर्णपणे रिऑर्गनायझेशन झाले पाहिजे. शासन इंटेलिजन्सला ताकद देणार आहे की नाही ? पोलीस संघटनेचे रिऑर्गनायझेशन करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये पोलीस कमिशन निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आजचे आधुनिक क्राईम फार मोठे आहे. माननीय गृहमंत्री महोदयांनी काल सभागृहामध्ये असे सांगितले होते की, खरे क्रिमीनल व्हाईट कॉलर आहेत. मला असे वाटते की, यासाठी कायदा करण्याची आवशकता आहे. तसेच आर्थिक गुन्हेगारी विरुद्ध काम करणारी यंत्रणा महाराष्ट्रामध्ये आणली पाहिजे, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी फक्त मुद्दे मांडणार आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य करावा यासाठी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मंत्रालयामध्ये पत्र व्यवहार केला. त्यांनी माननीय गृहमंत्र्यांना सुध्दा पत्र दिले होते. तत्कालीन मुख्य सचिव श्री.शंकरन साहेबांच्या नावाची इंग्रजीतील पाटी त्यांनी बदलली. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.दिवार रावते यांना अटक झाली. आज त्यांची कोर्टामध्ये कसे असल्यामुळे ते सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. शासनाने अशी केस ठेवावी, याचे मला आश्चर्य वाटते. महाराष्ट्रातील मुख्य सचिवांच्या नावाची पाटी त्यांनी मराठीतून लावली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला, ही गोष्ट आपल्या राज्याला भूषणावह नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यावरील केस शासनाने मागे घ्यावी, अशा प्रकारची मी मागणी करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी अतिशय जोरकसपणे भाषण करतांना पोलिसांचा वचक राहिलेला नाही, असा मुद्दा मांडला होता. मी एकच उदाहरण देतो. भिवंडीची पोलीस चौकी आपण उभारु शकला नाहीत, यातून असे दिसते की गृह विभागाचा वचक राहिलेला नाही. जेथे आपण अशा पद्धतीने वागतो, तेथेच आपण मार खातो हे लक्षात घेऊन बाकीच्यांचा मुजोरपणा वाढतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी पोलीस खात्यातील भ्रष्टाचाराबाबत सांगितले. माझी माननीय गृह मंत्र्यांना विनंती आहे की, भंगार चोरीचा आपण शोध घ्यावा. भंगार चोरीचे एक मोठे रॅकेट आहे आणि ते रॅकेट कोठपर्यंत हप्ते पोहचविते, हे आपल्याला कळेल. भंगार चोरीचा तपास करण्यासाठी तुम्हाला आणखी एका ॲन्टी करप्शन ब्युरोला बोलवावे लागेल तेव्हा भंगार चोरीचा शोध लागेल, असे मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, मध्यंतरी वाहनांच्या चो-यांच्या संदर्भातील विषय आला होता. किती वाहने पकडण्यात आली, या विषयावर चर्चा झाली. त्यावेळी मला बोलू दिले नाही. आपल्याला मी एक माहिती सांगतो. आमच्या कार्यालयातील एक कर्मचारी त्याच्या नातेवाईकांना सोडून येत असतांना

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ...........

चोरटयांनी त्याची गाडी थांबून त्याला मारहाण केली आणि त्याला नाशिक घाटामध्ये सोडून दिले. त्यानंतर दुस-या तिस-या दिवशी त्या चोरांनी ती गाडी चोरीसाठी वापरली. वाहनांच्या चोरी संदर्भात आपण लक्ष घातले तर चोरीच्या गाडया चो-या करण्यासाठी आणि दरोडो टाकण्यासाठी मोठया प्रमाणात वापरल्या जातात, असे आपल्या असे लक्षात येईल.

सभापती महोदय, मी काल सभागृहामध्ये पोलिसांच्या गणवेशाबद्दल बोललो. त्यावेळी आपण सभगृहामध्ये उपस्थित नव्हतात.शासनाने पोलिसांच्या गणवेशासाठी पूरक मागण्यांमध्ये तरतूद केली. पोलीस शिपायांना 365 दिवसासाठी एक पँट आणि एक शर्ट दिला जातो. एका वर्षासाठी जर त्यांना एक पँट आणि एक शर्ट दिला तर त्यांनी ते कपडे धुवायचे कधी ? माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब तुमच्या काळामध्ये या गोष्टी घडू नयेत, असे आम्हाला वाटते. पोलिस शिपायांच्या गणवेशासाठी फार मोठा खर्च येईल, असे मला वाटत नाही. त्यांना किमान दोन ड्रेस द्यावेत, अशी माझी विनंती आहे. त्यांच्या बुटांची तर अतिशय घाणेरडी अवस्था आहे. त्यांना त्यांच्या मापाचे बुटाचे जोड मिळत नाहीत. जो जोड मिळेल तो घेण्यासाठी अधिकारी त्यांना सक्ती करतात. पोलिसांच्या निवासाबद्दल मी 31 मे रोजी माननीय गृहमंत्र्यांना एक पत्र दिलेले आहे. प्रतिक्षा नगरमध्ये पोलिसांसाठी घरे बांधून तयार आहेत. ती घरे पोलिसांना कधी दिली जाणार आहेत, याबाबत माननीय गृह मंत्र्यांनी माहिती द्यावी.

सभापती महोदय, मुंबईमध्ये अनेक ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, यासाठी तपास करणारी समिती नेमून प्रायव्हेट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, गृहनिर्माण सोसायटी पासून सगळीकडे जेथे खाजगी सुरक्षा रक्षक नेमलेले आहेत तेथे हे सुरक्षा रक्षक कोठून आले, केव्हा आले, त्यांच्याकडे हत्यारे कशी आलीत ? याची माननीय गृह मंत्र्यांनी माहिती घ्यावी.

सभापती महोदय, रेल्वे बॉम्बस्फोटातील लोकांचे आजही पुनर्वसन झालेले नाही. बॉम्बस्फोट झाल्यानंतर शासनाने 16 पथकांची नेमणूक केली. त्या पथकांचे काय झाले. त्या पथकातील अधिकारी आज काय करीत आहेत, याबाबत सभागृहाला माहिती मिळावी, अशी मी विनंती करतो.

..4...



GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ....... 11:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .........

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री निवडणुकीच्या वेळी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये गेले होते. तेथे माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहर औद्योगिक शहर राहिलेले नाही, या शहराचे नाव आता गुंडगिरी नगर असे करावे लागेल. माझ्याकडे याचे दाखले आहेत. पुण्यातील भ्रष्टाचारासंदर्भात परवा वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आली होती. पुण्यामध्ये भ्रष्टाचाराच्या एकूण 1133 तक्रारी देण्यात आल्या. त्यातील 837 तक्रारींच्या फाईल बंद करण्यात आल्या. या फाईल बंद करण्याचे कारण काय ? या तक्रारी कोणाविरुध्द होत्या ? पुण्यामध्ये आणि पिंपरी-चिंचवडमध्ये जी गुंडगिरी वाढलेली आहे, त्यासंदर्भात शासनाला एक श्वेतपत्रिका काढावी लागेल इतकी वाईट परिस्थिती पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये आहे.

यानंतर श्री.गागरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

सभापती महोदय संपूर्ण महाराष्ट्रात गुंडगिरी करुन वाळू उचलण्याकरिता रॅकेट तयार झालेले आहे. वाळू उचलणे हा बिनभांडवली धंदा आहे. वाळू उचलण्याच्या प्रकरणावरुन मध्यतंरी श्री.मोहोळ यांचा पुण्यामध्ये खून झाला. हे खूनी कोण आहेत ? या खुनींना राजकीय संरक्षण आहे. यामुळे नवीन गुन्हेगारीचे रॅकेट गावागावात तयार झालेले आहे. माननीय उपमुख्यमंत्री व गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे एका सक्षम पोलीस अधिकाऱ्यांबद्दल ठाण्यामध्ये बोलले होते की, तुम्ही इंजिनियरींगचे शिक्षण घेतलेले असले तरी तुम्हाला सार्वजनिक बांधकाम विभागात टाकणार नाही, तुम्ही दरोडेखोरांना पकडल्यामुळे तुम्हाला पोलीस दलामध्येच ठेऊ. श्री.जावेद शेख नावाचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांबद्दल त्यांनी हे उद्‌गार काढले आहेत. या प्रकरणामध्ये लाखोची लूट करणाऱ्या सुर्या शिंदे व विक्रम पवार यांच्या टोळीतील तीन दरोडेखोरांना देवापुढे रेडयाचा बळी देण्यासाठी जेरबंद करतात तसे पकडले आहे परंतु ठाणे क्राईम ब्रँचच्या या अधिकाऱ्यांवर भलतीच आफत आलेली आहे. दरोडेखोरांचा माग काढत उस्मानाबादपर्यंत गेलेल्या श्री.जावेद शेख यांच्या पोलीस पथकाने परवानगी का घेतली नाही ? हा गुन्हा त्यांनी केलेला आहे. दरोडेखोरांना पकडले तेव्हा शिवानंद साहेब होते, त्यांनी श्री.जावेद शेख यांची पाठ थोपटली. शिवानंद साहेब गेल्यानंतर पांडे साहेब आले व त्यांनी पाहिले की, श्री.जावेद शेख हे परवानगीशिवाय उस्मानाबादला गेले म्हणून त्यांनी कारवाई सुरु असून त्यांच्यासारख्या सक्षम अधिकाऱ्याना नोटीस दिलेली आहे. असे झाले तर पोलीस अधिकारी कसे काम करतील ? याबाबत आपण लक्ष घालावे.

सभापती महोदय, मंत्रालयातील सातव्या मजल्यावर नमाज पडले जातात, मस्जीद बांधली जाते हे योग्य नाही. याबाबत खुलासा करावा.

सभापती महोदय, सिंधुदुर्गची नवीन ओळख अंमली पदार्थाचे केंद्र म्हणून झालेली आहे. एका मोठया नेत्याने तेथे प्रचंड जमीन घेतली आहे. वर्तमानपत्रात याबाबत बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. याबाबतही खुलासा करावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा सौंदर्याने नटलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो परंतु येथे अंमली पदार्थाची लागवड व वापर होत आहे. तिलारी खोऱ्यातील अतिदुर्गम भागात ज्या ठिकाणी अफू, गांजाची लागवड केली जाते, ती जागा महाराष्ट्रातील बडया





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MAP/

श्री.परशुराम उपरकर .....

नेत्याच्या मालकीची आहे. या प्रकरणात एक अपघातग्रस्त गाडी पकडण्यात आलेली आहे. त्यामध्ये 20 लाखाचा गांजा पकडण्यात आला. त्यावेळी हेरॉईन व गांजा सप्लाय करणारे काही लोक पकडले गेले व तस्करांनी प्रयोगशाळेला मॅनेज करुन पाच लाखाचे हेरॉईन केवळ पीठ असल्याचे दाखविले आहे. याबाबत विशेष उल्लेख मागील अधिवेशनात मी मांडला होता. त्याची दखल घेतली नाही. सभापती महोदय, सिधुदुर्ग जिल्हयामध्ये सागरी पोलीस स्टेशन सुरु केलेली आहेत. परंतु सागरी मार्गाने अनेक ठिकाणी स्फोटके येण्याचीही शक्यता आहे, अशा ठिकाणी सागरी पोलीस नियुक्त करण्यात यावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन आहे. आज व उद्या आषाढी एकादशी आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील लोकांचे श्रध्दास्थान असलेली पंढरपूरची वारी आहे. आज वाखरी, जिल्हा सोलापूर येथे पालखी थांबली असून या पालखीचा अंतिम टप्पा पंढरपूर हा आहे. विधानपरिषदेच्या सभागृहामध्ये अंधश्रध्दा निर्मुलन विधेयक विचार खंडश: विचार व संमल करण्याकरीता घेण्यात आलेले आहे. त्यामध्ये मठमंदिराच्या संदर्भात जो काही शब्दप्रयोग टाकण्यात आलेला आहे. त्यामुळे हिंदु समाजबांधवांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. हिंदु देव-देवतांचे अवमुल्यंन या कायद्याच्या माध्यमातून करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या संत परंपरेला खीळ घालण्याचा प्रयत्न या कायद्याच्या माध्यमातून करण्यात येत आहे. वारकरी बांधवांनी या कायद्याला विरोध दर्शविला आहे. हा कायदा मागे घेण्यात यावा या मागणीसाठी पालख्या थांबवून त्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केले आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. फुंडकर .....

त्या ठिकाणी सर्व दिंडी प्रमुखांची एक बैठक सुरू आहे. या साऱ्या दिंड्या पंढरपूरमध्ये पोहोचतील की नाही अशी शंका आहे. म्हणून त्यांनी हे विधेयक मागे घेण्याची विनंती शासनाला केली आहे. याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? शासनाची याबाबतची भूमिका आज स्पष्ट झाली नाही तर कदाचित वर्षानुवर्षे, शेकडो वर्षांची परंपरा जी चालत आलेली आहे, संत तुकाराम, संत इ ाानेश्वरांच्या पालख्या घेऊन येणाऱ्या या दिंड्या पंढरपुरामध्ये जाण्याची जी परंपरा आहे ती खंडित होण्याची शक्यता आहे. तेथे आज सर्व वारकऱ्यांच्या दिंड्या ठिय्या देऊन बसल्या आहेत म्हणून शासनाने या बाबतीतील आपले धोरण येथे स्पष्ट केले पाहिजे. अन्यथा उद्या आषाढी एकादशीचा दिवस आहे आणि त्या महत्त्वाच्या दिवशी पंढरपुरामध्ये या सर्व दिंड्या पोहोचू शकणार नाही. म्हणून शासनाने याबाबतीतील आपली भूमिका तातडीने स्पष्ट करावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला देखील एका महत्त्वाच्या मुद्याकडे शासनाचे, माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधावयाचे आहे त्यासाठी आपण मला केवळ एक मिनिटाचा अवधी द्यावा. माननीय उपमुख्यमंत्र्यांना माहिती देण्यासाठी म्हणून मी सांगू इच्छितो की, नवपाडा, वांद्रे पूर्व या ठिकाणी जुनी चाळीसारखी घरे मोडून त्या ठिकाणी अनधिकृतपणे तळमजला + चार मजले अशा आरसीसी इमारती उभ्या करण्यात आल्या आहेत. या विषयावर पालिका आयुक्त आणि नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्या बरोबर झालेल्या बैठकीमध्ये चर्चा करूनही परिणामकारक उपाययोजना केली गेली नाही. पोलीस संरक्षण मिळत नाही या कारणामुळे कारवाई थांबली असून इमारतींचे बांधकाम मात्र सातत्याने सुरू आहे. बांधकाम करणाऱ्या स्थानिक व बाहेरील व्यक्ती या बॉम्ब स्फोटातील आरडीएक्स घेऊन येणाऱ्या एमके बिल्डर्सच्या साथीदार आहेत. एमके बिल्डरची हत्या त्यांच्याच गुंडांनी केली. मात्र हे साथीदार दाऊदच्या पैशाच्या बळावर अनधिकृत बांधकामे उभी करीत आहेत आणि त्याला महानगरपालिकेचे अधिकारी व पोलीस ठाणे जबाबदार आहेत. महानगरपालिकेचे अधिकारी तो विभाग अत्यंत संवेदनशील असल्याने कारवाई करण्यास कचरतात. यात कायदा व सुव्यवस्थेचे कोठले लक्षण आहे ? कायदा व सुव्यवस्थेच्या

...... व्ही 2 ....

कोणत्या व्याख्येत हे बसते ? सभापती महोदय, या बाबतीत महापालिका आयुक्तांना दिलेल्या पत्रावर माननीय उपमुख्यमंत्र्यांचे रिमार्क्स आहेत, त्यावर त्यांची सही देखील आहे. असे असताना आपले आदेश, उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री म्हणून आपले आदेश देखील हे अधिकारी जुमानत नाहीत. पोलीस खाते महापालिका कर्मचाऱ्यांना अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी पोलीस संरक्षण देत नाहीत. हे बरोबर नाही. या निमित्ताने मी आपल्याला विनंती करतो की, आपण या सर्व प्रकाराची चौकशी करावी. या संदर्भात सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्याबरोबर एक बैठक देखील झाली होती. त्यामध्ये महापालिका आयुक्त आणि अन्य अधिकारी उपस्थित होते. त्यांनी तेथे स्पष्टपणे सांगितले की, आम्हाला त्या भागामध्ये जाण्यास भीती वाटते. पोलीस संरक्षण असल्याशिवाय तेथे आम्हाला जाता येणार नाही. तेथें सिमीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत. ते कार्यकर्ते निरनिराळ्या पोलीस स्टेशन्सला येतात. त्यांच्यावर निरनिराळ्या प्रकारच्या कारवाया करतात, त्यांना त्रास देतात. तरी कृपया त्याकडे आपण, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष द्यावे एवढेच मी सांगतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील (उपमुख्य मंत्री) : सभापती महोदय, राज्यात पडलेल्या दरोड्यांच्या संदर्भात, राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संबंधात विरोधी पक्षनेत्यांनी आज या सदनामध्ये त्यांच्या अधिकाराचा वापर करून चर्चा उपस्थित केलेली आहे. कोणत्याही अधिवेशनामध्ये गृह खात्यासारख्या महत्त्वपूर्ण खात्यावर चर्चा झाली नाही तर विरोधकांना देखील माध्यमांना तोंड द्यावे लागेल, विरोधकांवर देखील चर्चा होऊ शकेल ही भीती असते. सभापती महोदय, मी एक फरक अनुभवला आहे आणि तो असा की, शक्य तो अधिवेशनाच्या पहिल्या दोन तीन दिवसांमध्ये गृह खात्यावर चर्चा झाली पाहिजे अशी आग्रही भूमिका नेहमीच नेमकी घेतली जाते. परंतु या वेळेस मात्र पुढील आठवड्यात ही चर्चा घेतली तरी चालू शकेल अशी भूमिका दोन्ही सदनांमध्ये घेतली गेली. कारण मनातून त्यांना हे माहीत आहे की, एक तर माझ्यावर त्यांचे प्रेम असेल किंवा एखाद्या भागाचा मुद्दा बाजूला ठेवून कायदा आणि सुव्यवस्थेविषयी चर्चा केली पाहिजे अशी स्थिती राज्यात नसावी. आता नेमके यातील काय खरे आहे ते माननीय विरोधी पक्षनेत्यांनाच माहिती. मी त्या खोलामध्ये जाऊ इच्छित नाही. सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये अनेक कायदे करीत असतो. कायदाने पोलीस यंत्रणेला आणि न्याय व्यवस्थेला ताकद मिळावी हा त्यामागे हेतू असतो. एखादा कायदा केला की, त्या संबंधातील गुन्हा घडणार नाही वा घडू नये अशी स्थिती आजवर कोठेही जगाच्या पाठीवर तयार होऊ शकलेली नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे .... डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

एखाद्या व्यक्तीने खून केला तर त्याला 302 कलम लागते आणि फाशीची किंवा जनमठेपेची शिक्षा होऊ शकते. याबाबत आपण कडक कायदा केला म्हणून जगातील सर्व खून थांबवू शकलो नाही. कुणी चोरी करतांना सापडला, आणि त्याला शिक्षा करण्याकरिता कायदेशीर तरतूद केली म्हणून जगातील चोऱ्या थांबल्या नाहीत. ही केवळ आजची स्थिती नाही तर जगामध्ये ज्या राजवटया अतिशय चांगल्या गणल्या गेल्या त्या राजवटींच्या काळात देखील खून घडत नव्हते अशी स्थिती नाही. चांगल्या वाईटाचा संघर्ष समाज व्यवस्थेमध्ये नेहमी होत आला आहे. चांगल्याचे समर्थन चांगल्या प्रवृत्तीने केले आहे. परंतु प्रत्येक राजवटीमध्ये वाईटाच्या विरुध्द चांगल्या प्रवृत्तीला लढावे लागले आहे हे कधीही विसरता येणार नाही. आज आपण या राज्यातील एकंदर कायदा व सुव्यवस्थेची स्थिती पाहिल्यानंतर नाराजीची गोळी खाऊन किंवा विरोध करुन आपल्याला त्याचे उत्तर सापडत नाही. आज देशातील अन्य शहरांच्या तुलनेत आपली मुंबई अधिक सुरक्षित आहे, महाराष्ट्र अधिक सुरक्षित आहे. अन्य देशांच्या तुलनेत आपला भारत अधिक सुरक्षित आहे. सभापती महोदय, ही सुरक्षितता पोलिसांमुळे आली आहे असा मी दावा करु इच्छित नाही. भारतीय मन आणि भारतीय माणूस गुन्हेगारी प्रवृत्तीचा नाही. त्यामध्ये समाधान मानणारा, नैतिकतेवर जगणारा, चांगली शिकवण घडलेला, शिक्षणामध्ये कमी असला तरी, आर्थिकदृष्टया गरीब असलातरी चांगले संस्कार झालेला भारतीय माणूस हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसल्यामुळे आज कोणत्याही देशापेक्षा आपल्या देशातील गुन्हेगारी कमी आहे. आणि देशातील कोणत्याही राज्यापेक्षा आपल्याकडील गुन्हेगारी कमी आहे. यामध्ये पोलिसांचा थोडाफार हातभार असेल, परंतु चांगले संस्कार हे त्याचे प्रमुख कारण आहे. अलिकडच्या काळात परिस्थिती थोडी थोडी बिघडत चालली आहे असा भीतीचा सूर अनेकांनी लावला. ज्यांनी समाजावर चांगले संस्कार करावयाचे आहेत, त्यांनी संस्कार करण्याचे काम सोडून दिले.आणि राजकारणासारख्या नको त्या क्षेत्रामध्ये संस्कार करावयास यायला लागले आहेत. सभापती महोदय, कदाचित हा राजकारणातील चांगूलपणा वाटू शकेल. परंतु संस्कार घडविण्याचे काम मागे पडले म्हणून गुन्हे वाढतांना दिसत असतील. आज अनेकांनी भीती व नाराजी व्यक्त केली, पोलिसांचा वचक राहिला नाही असे सांगितले. मी लहान असतांना गावात कधी तरी येणाऱ्या पोलीसाबद्दल मला भीती वाटावयाची. मी आमदार झाल्यानंतर पोलीस हा अन्य शासकीय नोकरांसारखा नोकर मला वाटायला लागला. मी मंत्री झाल्यानंतर पोलीस हा सेवक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. आर. आर. पाटील...

वाटायला लागला. पोलीस हा पोलीसच आहे, परंतु आज मी मोठा होत गेलो. तो पोलीस आज वेगळा दिसायला लागला, त्याची जरब कमी व्हावयास लागली. हे सुदृढ समाज व्यवस्थेचे लक्षण नाही. आज समाज व्यवस्थेमध्ये पोलिसांबद्दल भीती वाटता कामा नये. आपण लोकशाही पॅटर्न स्वीकारला असल्यामुळे पोलीस हा जनतेचा सेवक, मित्र असला पाहिजे. कर्दनकाळाच्या भूमिकेमध्ये पोलीस कधीही दिसता कामा नये.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गुन्हेगारांना पोलीस हा कर्दनकाळ वाटला पाहिजे असे मी माझ्या भाषणामध्ये म्हटले आहे.

श्री. आर. आर. पाटील : आपण आपले वाक्य आठवून बघावे. पूर्वी गावामध्ये पोलीस आला तर गावामध्ये त्याचा वचक असायचा. आज पोलिसांनी गुन्हेगारांना पकडले तरी त्यांना पोलीस हा कर्दनकाळ कां वाटत नाही? या देशातील सामान्य नागरिकाला घटनेने मालक बनविले. कितीही मोठा अधिकारी व पुढारी हा जनतेचा सेवक असतो. आणि लोकशाहीमध्ये जनता ही मालक असते या भूमिकेतून वावरावयास पाहिजे. परंतु आज दुर्दैवाने काही ठिकाणी नेते हे सेवक नव्हे तर मालक म्हणून वावरत आहेत आणि लोक उदासीन होत आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरु.....

ही समाजव्यवस्था कोठे तरी बदलली जाणे आवश्यक आहे. मालकाच्या भूमिकेत जाऊन लोक वावरायला सुरुवात करतील त्यावेळी या यंत्रणा त्याच्या सोयीसाठी त्याच्या सेवेसाठी आहेत, असा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण होईल, त्यावेळी खऱ्याअर्थाने लोकशाही आली, असा निष्कर्ष निघू शकेल.

सभापती महोदय, दोन-तीन प्रश्न या ठिकाणी सातत्याने उपस्थित केले गेले की, दरोडे खूप वाढलेले आहेत. मी हे आकडेवारीसह सिध्द करतो की, रस्त्यावरील, रेल्वेतील दरोडे कमी झ ालेले आहेत. त्याचबरोबर ही गोष्ट खरी आहे की, काही प्रमाणात दरोड्यांमध्ये वाढ झालेली आहे. 1990 सालापासून, नव्हे तर त्याच्याही अगोदरपासून दरवर्षी महाराष्ट्रामध्ये सरासरी 3 हजार खून होत आलेले आहेत. दर वर्षी 650 दरोडे राज्यामध्ये पडलेले नाहीत, असे एकाही वर्षी घडलेले नाही. एकही दरोडा,खून झालेला नाही असा आम्ही दावा केलेला नाही. रामराज्य आलेले आहे,असा आमचा दावा नाही. ज्यांनी रामराज्याच्या घोषणा करत सत्ता मिळविली, त्यांच्या रामराज्यामध्ये या गोष्टी घडतच होत्या. सभापती महोदय, समाजव्यवस्थेमध्ये निर्माण झालेल्या दोषांचे उत्तर आपण जर पोलिसांकडून मागणार असू तर जगातीली कोणतीही पोलीस यंत्रणा या सगळया दोषाचे उत्तर देण्यास समर्थ नाही, असे माझे मत आहे. एका बाजूने राज्यामध्ये बेकारी वाढत असेल, लोकसंख्या वाढत असेल, गरीबी वाढत असेल. या सगळ्या गोष्टी वाढत असताना केवळ पोलिसांच्या जीवावर ही गुन्हेगारी थांबली पाहिजे, असे स्वप्न आपण पहाणार असू तर रोग रेड्याला आणि औषध पखाल्याला असा त्याचा अर्थ होईल. समाजामध्ये जे तात्कालिक दोष निर्माण होतात, त्याच्या प्रतिक्रिया उमटत असतात. त्याचे परिणाम गुन्हेगारीच्या स्वरुपामध्ये पुढे येत असतात. सभापती महोदय, मूळ रोगावर इलाज करण्याची आवश्यकता आहे. आज मला एक गोष्ट कबूल केली पाहिजे की, काही ठराविक लोक दरोड्यासारख्या बाबीमध्ये अधिक गती घेताना दिसतात. ते मोठ्या प्रमाणात सापडतात. याबाबतचे सगळे सर्व्हेक्षण केले तर विकास करत असताना कोठेतरी आपल्या सगळयांचेच दुर्लक्ष होते. काही वेळा नक्षलवाद वाढतो. पण त्या वाढीचे कारणही असते. येथून पाठविलेले पैसे त्या दुर्गम भागामध्ये पोहोचत नाहीत, ते पैसे यंत्रणा मधेच खातात. यामुळे गरीब माणसे अधिक गरीब राहातात. आहे या सिस्टीमध्ये आपले काहीही भले होत नाही. नक्षलवाद परवडला म्हणून स्थानिक लोक काही वेळा नक्षलवादी भूमिकेला पाठिंबा देतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे सुरू.....

त्यावेळी आपण अपेक्षा व्यक्त करतो की, पोलिसांनी नक्षलवाद रोखला पाहिजे. त्यांना निशस्त्र करून पोलिसांबरोबर लढले पाहिजे, हे जितके खरे आहे, तितके डेव्हलपमेंटपासून त्याला पूर्णपणे बाजूला करून किमान जीवन जगण्याइतपत उपलब्धी त्यांना दिली गेली नाही, किमान शिक्षण त्याला उपलब्ध नाही, मानवी जीवन त्यांना प्राप्त होत नाही. हे दोष दूर न करता, प्रतिबंधात्मक उपाय न करता, केवळ बंदुकीच्या जोरावर अशा चळवळी कधी थांबलेल्या नाहीत. अशा चळवळी थांबवायच्या असतील तर दोन बाजूंनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. एक म्हणजे प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, नक्षलवादी चळवळीमध्ये जे जातात, त्यांच्या मनामध्ये आपल्या सिस्टीमबद्दल विश्वास निर्माण करणे, या सिस्टीममध्ये आपला विकास होऊ शकतो, आपल्यावर अन्याय होत नाही, याची जाणीव त्यांना करून देणे आणि दुसऱ्या बाजूने शस्त्राने धाक दाखविणे. सभापती महोदय, धाकाच्या जोरावर पूर्णपणे गुन्हेगारी कधी संपलेली नाही. आज दरोड्यांचे प्रमाण पाहिले तर काही वर्ग, काही समाज घटक आजही असे आहेत की, ते महाराष्ट्रातील कोणतेही गाव, आपल्या गावात येऊ देत नाहीत. गावात कोणी गेले तर मारून पिटाळून लावले जाते. त्यांची नावे मतदार यादीमध्ये नाहीत. 60 वर्षे होऊन देखील त्यांना मत देण्याचा हक्क प्राप्त झालेला नाही, रेशन कार्डस् नाहीत, त्यांचे दारिद्र्य रेषेचे सर्व्हेक्षण झालेले नाही, त्यांना शिक्षण नाही, उत्पन्नाची साधने नाहीत. जे गुन्हेगार आहेत, त्यांना गेन्हेगार बनविण्यामध्ये सिस्टीम देखील काही प्रमाणात दोषी आढळून येते. हे दोष दूर करत, त्याच्यावर वचक बसविण्याचे काम करण्याची आवश्यकता असते आणि नेमके तेच काम आज आम्ही राज्यामध्ये सुरु केलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर साहेब आपण सांगितलेली गोष्ट खरी आहे आणि मी सांगितलेली गोष्टही खरी आहे. आपण म्हणता की,दरोड्यांची संख्या वाढली,परंतु ती वाढलेली नाही. जर प्रॉपर्टी केलेली पाहिली तर त्यामध्ये कोठेही वाढ झालेली नाही. पण डिटेक्शन पाहिले तर आपली यंत्रणा चांगले काम करते ते चांगले म्हणण्याची दानत आपण ठेवू.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

देशभरामध्ये जे दरोडे पडलेले आहेत त्यामध्ये सर्वाधिक...

**उपसभापती** : मंत्रिमहोदय, आपल्याला उत्तरासाठी आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री. आर. आर. पाटील : मला आणखी 10 मिनिटे लागतील.

**उपसभापती** : ठीक आहे. या प्रस्तावावरील चर्चा 12.15 पर्यंत चालेल. त्यानंतर मला एक दोन मिनिटे बोलावयाचे आहे. तेवढी सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. आर. आर. पाटील : 78 टक्के दरोड्यांचे डिटेक्शन म्हणजे आज देशातील कोणत्याही पोलिसांपेक्षा अत्यंत चांगल्या पध्दतीने डिटेक्शन करुन दाखविण्यामध्ये आपल्या पोलिसांनी यश मिळविले आहे. अनेकवेळा उल्लेख केला गेला की, पोकळ आरोपी, गुन्हेगार आणि संशयीत आरोपी पकडले जातात. याबाबतीत असे घडलेले नाही. 40 टक्के प्रॉपर्टी रिकव्हर केलेली आहे. 22 दरोडे घालण्याच्या तयारीत असताना त्या आरोपींना पकडले. त्यातील काही दरोडे टाकल्यापासून दीड तासाच्या आत आरोपींना रंगेहात पकडलेले आहे तर काही दरोडेखोरांचा सलग 225 किलोमीटर पाठलाग करत आपल्या पोलिसांनी त्यांना पकडलेले आहे. दरोडा पडत असताना धाडसाने बँकेमध्ये पुढे गेलेले आमचे श्री. आव्हाड शहीद झाले परंतु ते दरोडेखोरांपुढे हटले नव्हते. गोळ्या लागल्यानंतर सुध्दा त्या दरोडेखोरांना धरुन ठेवण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. काही माणसे रात्रंदिवस काम करीत आहेत. सगळ्यांना एकाच मापाने तोलने ही गोष्ट मी योग्य मानत नाही. जे दरोडे अजूनही डिटेक्ट झालेले नाहीत त्यासाठी 61 पथके आणि 1700 पोलीस तैनात केलेले आहेत. माझी निश्चितपणे खात्री आहे की, महाराष्ट्र सुरक्षित होता आणि सुरक्षित आहे. या देशातील अनेक राज्यांपेक्षा हे राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी या राज्याचे पोलीस दल रात्रीचा दिवस करील. मला आज एका गोष्टीचे समाधान आहे की, पोलिसांवर टीका करीत असताना आज पोलिसांच्या गैरसोयींबद्दल सुध्दा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्यांच्यासाठी चांगली घरे नाहीत. मुंबईमध्ये घर देणे हे सगळ्यात अवघड काम आहे. परंतु याबाबतीत काही उपक्रम सुरु केले आहेत. त्यामध्ये लवकरच यश येईल. काही गोष्टी जरुर केलेल्या आहेत की, ज्या या देशातील कोणत्याही राज्याने केलेल्या नाहीत. आज आमच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MAP

श्री. आर. आर. पाटील .....

कॉन्स्टेबलला मिळणारा पगार देशात सर्वाधिक आहे. 3500 रुपये ही वेतनश्रेणी या देशातील कोणत्याही पोलीस दलामध्ये नाही. पोलिसांसाठी केवळ घोषणाच केलेल्या नाहीत तर देशात सर्वाधिक पगार या ठिकाणी आहे. पगारामध्ये फार फरक नसला तरी त्यातल्या त्यात चांगला पगार देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. एकेकाळी कोणी व्ही.आय.पी. आजारी असेल तर मोठ्या दवाखान्यामध्ये पोलीस बंदोबस्तासाठी जावयाचे. आज महाराष्ट्रातील पोलीस कोणत्याही चांगल्या दवाखान्यामध्ये पोलीस आरोग्य योजनेमार्फत जाऊ शकतात आणि चांगली ट्रिटमेंट घेऊ शकतात. आज पोलिसांना आणि त्यांच्या कुटुंबियांना चांगली आरोग्य सेवा देण्याचा उपक्रम अभिनव पध्दतीने सुरु केला आहे. त्यांच्या घरांचा प्रश्न सोडविणार आहोत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी उपस्थित केलेला मुद्दा खरा आहे की, कामाचा खूप मोठा ताण घेऊन पोलिसांना काम करावे लागते. त्यांना रोज 14 तास ड्युटी करावी लागते. 3-3 महिने रजा मिळत नाही. परंतु 55 हजार पोलीस टप्प्याटप्प्याने वाढविण्याचे राज्य सरकारने ठरविले आहे. याचे कारण असे की, आपल्याकडे प्रशिक्षणाची सोय नाही. गेल्या वर्षी 11 हजार पोलीस कर्मचाऱ्यांची भरती केली. त्यांचे प्रशिक्षण झाल्यावर महिनाभरात ती मुले बाहेर येतील आणि पोलीस दलाला उपलब्ध होतील. बजेटमध्ये तरतूद केलेली आहे. पावसाळा संपल्याबरोबर आणखी 11 हजार पोलीस कर्मचारी भरणार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी मुद्दा उपस्थित केला की, आज महाराष्ट्रातील शहरे खऱ्या अर्थाने सूजत आहेत, वाढत आहेत. तेथील लोकसंख्या फुगत आहे, परंतु त्याप्रमाणात पोलीस वाढलेले नाहीत. त्यामुळे आपण सांगितले ते खरे आहे की, दर हजार लोकसंख्येमागे अर्धा पोलीसही येत नाही. आपल्या राज्यामध्ये पोलीस कमी आहेत हे पाहात असताना जगामध्ये वेगवेगळ्या देशांमध्ये पोलिसांचे प्रमाण काय आहे हे तपासले तर दर हजार लोकसंख्येमागे जर्मनीमध्ये 2.9 इतके पोलीस उपलब्ध आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये 2.09 इतके पोलीस उपलब्ध आहेत. फ्रान्समध्ये 2.4 इतके पोलीस उपलब्ध आहेत, यु.के.मध्ये 2.4 इतके पोलीस उपलब्ध आहेत. जपानमध्ये 1.8 इतके पोलीस उपलब्ध आहेत आणि आपल्या देशामध्ये 0.80 इतके पोलीस उपलब्ध आहेत.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 12:05

(श्री. आर.आर.पाटील...)

जगातील अन्य देशांच्या तुलनेत पोलिसांची संख्या आपल्याकडे कमी आहे. देशाचे आणि आपले राज्याचे अव्हरेज सारखेच आहे. आपण आपल्या संरक्षणावर जेवढा खर्च करायला पाहिजे तेवढा तो आपण करीत नाही. संरक्षण हा आपण विकासाचा मुद्दा मानत नाही. परंतु या वर्षापासून आपण सुरुवात केलेली आहे. सुरक्षिततेच्या वातावरणामध्ये विकास होऊ शकतो. कायदा आणि सुव्यवस्था नसेल तर विकास होणार नाही. त्यामुळे संरक्षण खर्च हा आपण डेव्हलपमेंट खर्च म्हणून मानन्याची भूमिका तत्वता स्वीकारलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, जुनी इन्स्ट्रुमेंटस् घेऊन पोलिसांना वावरावे लागते. पोलिसांच्या गाड्या 20-20 कि.मी. पाठिमागे रहातात. हा प्रश्न मला देखील पडला होता. मी हायवेवर गाडी थांबवून, गाडी वेगाने का पळत नाही, ती मागे का राहाते म्हणून विचारले. मुंबई-पुणे हा जो नवा एक्सप्रेस हायवे केलेला आहे त्याची वेग मर्यादा 80 कि.मी. आहे. या पेक्षा अधिक गतीने गाडी पळविली आणि व्ही.आय.पी.च्या लाल दिवाच्या पाठिमागे पोलिसांची गाडी असली, ती अधिक वेगाने पळविली आणि चेकींग झाले तर डी.जी. कडून त्यांना नोटीस दिली जाते. म्हणून आमची गाडी जुनी होती की तुमची गाडी अधिक पळते याबाबत मी पक्की माहिती घेईन. आता पोलिसांना नव्या गाड्या दिलेल्या आहेत. 915 कोटीचा आधुनिकीकरणाचा प्लॅन केन्द्र सरकारने मंजूर केला होता. त्यातील जवळ जवळ 800 कोटी आपण खर्च केलेले आहेत. त्या संदर्भातील फरक आपल्याला दिसत असेल. आधुनिक उपकरणे पोलिसांना प्राप्त व्हायला लागली आहेत. आज डी.व्ही. कार सुध्दा पोलिसांमार्फत मेण्टेन केल्या जातात आणि मागे पळणारी गाडी ही देखील पोलिसांची गाडी असते. एक गाडी पळते आणि दुसरी गाडी का पळत नाही याचा शोध आम्ही जरुर घेऊ. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांसाठी केवळ औपचारिकता म्हणून बंदोबस्त ठेवावा लागतो. त्यांनी कधी कोणाचे वाईट केलेले नसल्यामुळे त्यांना धोका नाही. परंतु ज्यांना आपण संरक्षण देतो ते देत असताना माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की,...(अडथळा)... सभापती महोदय, आधुनिकीकरणाचे काम आम्ही गतीने करु. आज काही गोष्टींच्या बाबतीत सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. महाराष्ट्रामध्ये रस्त्यावरुन बेदरकारपणे गाड्या चालविल्यामुळे 11 हजार माणसे रस्त्यावर मेलेली आहेत. 25 हजार माणसे गंभीर जखमी झालेली आहेत. 25 हजार माणसे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...

रस्त्यावर जखमी होत असतील आणि 11 हजार माणसे रस्त्यावर मरत असतील तर काही उपयायोजना करण्याची गरज होती म्हणून आम्ही मुंबईमध्ये सतत 8 दिवस कॅम्पेन हाती घेतली. रात्री 11.00 ते 1.00 वाजेपर्यन्त दारु पिऊन गाडी चालविणा-यांना पकडण्यास सुरुवात केली आणि दारु पिऊन गाडी चालविणा-या अशा 1975 लोकांना पकडले....

श्री. दिवाकर रावते : माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, रात्री 2.00 वाजेपर्यनत बार चालविण्यास परवानगी दिली जाते. मग रात्री 2.00 वाजता दारु पिऊनच लोक गाडी चालविणार. हे बार आधी बंद करा.

श्री. आर.आर.पाटील : आपल्या राज्यामध्ये आपण दारुबंदी केलेली नाही. गावठी दारु बंद केलेली आहे. काही ठिकाणी ती पूर्णपणे बंद झालेली आहे असा माझा दावा नाही. दारु प्यायला परवानगी दिलेली आहे परंतु दारु पिऊन गाडी चालवण्यास परवानगी नाही. दारु पिऊन गाडी चालवू नये म्हणून आम्ही हार्श अशा प्रकारची कॅम्पेन घेतली. सन्माननीय सदस्यांनी रल्वेमध्ये महिलांची छेडछाड केली जाते अशी तक्रार केली. याबाबतीत पोलिसांनी 169 लोकांना शोधून त्यांना अटक केलेली आहे. ही मोहीम पुढच्या काळामध्ये सुरु राहील. भगिनी सुरक्षित प्रवास करु शकतील, त्यांना रोड-रोमियोकडून कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, रोडर-रोमिओंचा पूर्णपणे बंदोबस्त केला जाईल. कुठे एखादा बार चालू राहातो. पोलिसांना अनेक कामे आहेत.

...नंतर कु.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.........

तरी संगनमताने बार चालविण्याच्या संदर्भात आपण आतापर्यंत अनेक पोलिसांवर कारवाई केलेली आहे. एखाद्या वेळेस एखादा पोलीस अधिकारी बाकीची डयूटी करीत असतांना त्याच्या नकळतपणाने किंवा पोलिसांना माहिती नसतांना जर बार चालू असतील तर आपण बारवर कडक कारवाई केलेली आहे, पोलीस कर्मचा-यावर कारवाई केलेली नाही ज्या बारची नावे येथे घेतली गेलेली आहेत, त्यांच्यावर पिटा ॲक्ट खाली सगळे गुन्हे नोंदे केले गेलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : माजी विधानपरिषद सदस्य श्री.प्रमोद नवलकर जर येंथे असते तर त्यांनी यापेक्षाही जास्त बारचे पत्ते सांगितले असते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आजकाल लोकही डायरेक्ट सांगतात, मेसेज पाठवितात त्यामुळे कोणी लोकल पोलीस स्टेशनने परवानगी दिली तर बार चालू राहील, अशी परिस्थिती किमान मुंबईमध्ये नाही. पनवेल भागामध्ये बार वाढले ही तक्रार आहे मी त्या ठिकाणी तपास करुन बघीन. माझ्याकडे वेगळी माहिती आलेली आहे, ती अशी आहे की, आजकाल ऑर्केस्ट्रॉच्या नावाखाली लायसन्स काही ठिकाणी घेतले जातात, त्याच्या नावाखाली बार चालविले जातात, तेथे पोलीस कारवाई करीत आहेत आणि यासंदर्भात यापुढच्या काळामध्ये कठोर भूमिका राज्यामध्ये स्वीकारल्या जातील. दरवर्षी गुन्हयांमध्ये जर 10 टक्के वाढ झाली तर ती नॉर्मल मानली जाते आज कुठलाही गुन्हा त्याप्रमाणात नसल्यामुळे एक ॲबनॉर्मल सिच्युएशन तयार झालेली असा निष्कर्ष करणे, हे चूकीचे आहे. पोलीस आपल्या परीने काम करीत आहेत.

श्री.दिवाकर रावते : भिवंडीचे पोलीस स्टेशन कधी बांधणार आहात ?

**उपसभापती** : चर्चेची वेळ संपत आलेली आहे आपण आणखी प्रश्न विचारु नका.

श्री.आर.आर.पाटील : होय, आपल्या सगळया प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मी तयार आहे. हसिना पारकर,इकबाल कासकर या दोन्ही केसेसच्या संदर्भात आम्ही विधी तज्ज्ञांची मते घेत आहोत व या बाबतीत अपिल करता येईल का ? हे तपासून पाहत आहोत. अशा शेकडो केसेस आहेत की ज्यामध्ये खालच्या कोर्टामध्ये लोक निर्दोष सुटले तरी वरच्या कोर्टामध्ये संबंधित केस आल्यानंतर त्या केसच्या संदर्भात संबंधित गुन्हेगारांची बेल रद्द झाली व आरोपींना शिक्षा झाल्या. कायदेशीर लढाई अंतिम करेपर्यंत कुठे एखाद्या ठिकाणी बेल मिळाली तर पोलीस दलालाही आरोपीच्या पिंज-यामध्ये उभे करणे योग्य नाही. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांचे एक मॅन्यूअल आहे की,

श्री.आर.आर.पाटील.........

पोलीसांना डिमॉरलाईज्ड केले पाहिजे,त्यांच्यावर टिकाटिप्पणी करुन त्यांना व्हिट कोर्ट केसेसमध्ये गुंतविले पाहिजे, अशाप्रकारे ही यंत्रणा दुबळी केली पाहिजे आणि यांच्याबरोबर काम करीत असतांना आपण सगळयांनी मिळून बरोबर वेगळया भूमिकेत वावरायला पाहिजे अशाप्रकारे गुन्हेगारांचे मनसुबे उधळून लावण्यासाठी पोलिसांचे मनोबल वाढविण्याची आवश्यकता आहे. कुठेतरी एखाद्या ठिकाणी कोणीतरी एखादा माणूस चूकतो पण म्हणून काही सगळेच गुन्हेगार असतात असे नाही. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब आपले भाषण मी काळजीपूर्वक ऐकले हवेमध्ये तलवार चालवावी पुढे नेम न धरता टार्गेट निश्चित न करता मोकळेपणाने आपण तलवार चालविलीत तुमच्याकडे असतील ती माहिती आमच्याकडे द्या. गुन्हेगारांवरील पोलिसांचा वचक कमी झालेला नाही आणि आम्ही होऊ देणार नाही जे कोणी गुन्हेगार पोलीसांमध्ये वावरत असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करुन निश्चितपणाने अशा लोकांना शिक्षा दिली जाईल. आपल्या भागामध्ये पडलेले दरोडे,दारुचे गुत्ते,यासंदर्भामध्ये मी आठ दिवसांमध्ये स्वत: अहवाल तयार करुन त्यासंदर्भात दोषी लोकांवर कारवाई करण्याबाबत आदेश देईल. आपल्या पेट्रोल पंपाच्या दरोडया संदर्भामध्ये सुध्दा लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. अध्यक्ष महोदय, पंढरपूरला जाणा-या पालख्या वारक-यांनी थांबविलेल्या आहेत. कारण त्यांची मागणी आहे की, अंधश्रध्दा निमुर्लन विधेयक सभागृहामध्ये पारित होऊ नये, खरेतर वारक-यांनी वारक-यांच्याच भूमिकेत असले पाहिजे, त्यांनी आंदोलकांच्या भूमिकेमध्ये येऊ नये, असे माझे कळकळीचे आव्हान आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेब आपल्या मार्फत मी वारक-यांना आश्वासन देतो की, यासंदर्भामध्ये कोणाच्याही श्रध्दा दुखावण्याची भूमिका ना खालच्या सदनाने,या सदनाने ना आता ना या पूर्वी कधी घेतलेली नाही आणि ना भविष्यामध्ये कधी घेऊ पण जादूटोणा वगैरे म्हणजे यासंदर्भामध्ये अंधश्रध्दा निर्मुलन समितीशी चर्चा करुन ज्या भूमिका आपण घेतल्या त्या भूमिका आपण चर्चेने......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एक गोष्ट मला या ठिकाणी सांागावयाची आहे की, उद्या आषाढी एकादशीचा दिवस आहे आणि लाखो वारकरी जे आहेत, त्यांच्या दिंडया त्या ठिकाणी थांबलेल्या आहेत आणि आता जर आपण अंधश्रध्देचे विधेयक मागे घेत असल्याची घोषणा केली तर...... अडथळा....यामधून त्या लाखो वारक-यांना मला एक संदेश द्यावयाचा आहे

AA - 3





श्री.पांडुरंग फुंडकर.......

की.....अडथळा

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय,मला आताच एक अशी माहिती मिळाली की.....अडथळा......ऐकून तरी घ्या.....अडथळा......

श्री.दिवाकर रावते : माननीय उप मुख्यमंत्री महोदय, आपल्या उत्तरात आता असे म्हणाले की, वारक-यांनी वारक-यांचे बघावे बाकीच्या याच्यात पडू नये हे शब्द आक्षेपार्ह आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ठीक आहे हे रेकॉर्डवरुन काढून टाका परंतु मी "वारक-यांनी वारक-यांच्याच भूमिकेत राहावे, आंदोलकांच्या भूमिकेत शिरु नये "असे मी म्हणालो होतो.

अडथळा........

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, वारकऱ्यांनी आंदोलकांच्या भूमिकेमध्ये येऊ नये असे मी बोललो होतो. सभापती महोदय, मला आता मिळालेली माहिती अशी आहे की, सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री यांचा मला फोन आला होता. मी त्यांच्याबरोबर चर्चा करीत आहे. वारकरी आणि सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांची चर्चा झालेली आहे. दुपारी 1.00 वाजता सगळ्या पालख्या मार्गस्थ होणार आहेत. चर्चेतून त्यांच्यामध्ये तडजोड झालेली आहे. त्यामुळे सरकारने याठिकाणी आश्वासन देण्यापूर्वी त्यांची चर्चा काय झाली याची माहिती घ्यावी लागेल. वारकऱ्यांबाबत मी जे बोललो त्यात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना काही आक्षेपार्ह वाटत असेल तर मी ते शब्द मागे घेण्यास तयार आहे.

**उपसभापती** : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट निवेदनात म्हटले की, वारकऱ्यांनी वारकऱ्यांच्या भूमिकेत रहावे, आंदोलकांची भूमिका घेऊ नये, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांमार्फत मी वारक-यांना आवाहन करतो असे त्यांनी म्हटले, यामध्ये आक्षेपार्ह असे काहीही नव्हते.

मला या चर्चेच्या अनुषंगाने एकच गोष्ट सभागृहाच्या परवानगीने माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणावयाची आहे. कायदा व सुव्यवस्थेशी निगडित असलेला प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी उपस्थित केला होता. श्री.जावेद शेख हे पोलीस अधिकारी उस्मानाबाद येथे गेले. तेथे त्यांनी दरोडेखोरांना पकडले. याबद्दल ठाण्याच्या पोलीस आयुक्तांनी त्यांची पाठ थोपटली. त्याच जावेद शेख यांना आयुक्तांच्या हाताखाली काम करणारे अतिरिक्त पोलीस आयुक्त कारणे दाखवा नोटीस देऊ शकतात का? नोटीस दिली असेल तर अशा प्रकारे पोलिसांचे नितीधैर्य खच्ची करण्याचे काम स्वत:च्याच खात्यातील वरिष्ठांकडून करण्यात येणे हा गंभीर प्रकार आहे. याबाबत निश्चितपणे या अधिकाऱ्याना स्पष्ट समज द्यावी. अन्यथा यापुढे कोणताही कार्यक्षम अधिकारी अशा प्रकारचे धाडस करायला धजावणार नाही. एकदा आयुक्तांनी पाठ थोपटली, अभिनंदन केले याचा अर्थ संपूर्ण पोलीस आयुक्तालयाने अभिनंदन केले असा होतो. ज्याप्रमाणे राजकारणात गटबाजी चालते, गुन्हेगारांमध्ये टोळ्या असतात त्याप्रमाणे पोलीस दलामध्ये अनेक गट पडले आहेत ही वस्तुस्थिती आहे. ज्यांनी गेली 30 वर्षे पोलीस दलाची निरपेक्षपणे सेवा केली त्या पोलीस महासंचालक, डी.जी.ना देखील शेवटी टार्गेट करण्यात आले. त्या संदर्भातील अहवाल आपल्याकडे येईलच. परंतु 30 वर्षे मी राजकारणात आहे. चांगले काम करणाऱ्या पोलीस दलातील अधिकाऱ्यांचे नितीधैर्य खच्ची करण्याचे, त्यांची अप्रतिष्ठा करण्याचे काम केले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...........

जाऊ नये. आपण कर्तव्यदक्ष आणि कार्यक्षम उपमुख्यमंत्री आहात. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन असे कृत्य करणाऱ्या अधिकाऱ्यावर सक्त कारवाई करावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात काय कारवाई केली, कोणत्या बाबीसाठी झाली याची संपूर्ण माहिती घेतली जाईल. जर चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्याला डिमॉरलाईज करण्याचा प्रयत्न केला असेल तर चौकशी करुन निश्चित काय घडले याची माहिती घेऊन या घटनेमध्ये कारवाई केली जाईल. फिंगर प्रिंटच्या संदर्भात मी स्वत: माहिती घेईन. राजकीय कार्यकर्त्यांना बेड्या घालू नयेत असे परिपत्रक आहे. फिंगर प्रिंटच्या संदर्भात तपासून घेतले जाईल. पूर्णपणे माहिती घेतली जाईल. मी सन्माननीय सदस्यांना लेखी पत्राद्वारे कळवितो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रालयातील सातव्या मजल्यावर जे बांधकाम झ ााले त्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. तेथे मशीद आहे की शासनाचे कार्यालय आहे?

श्री.आर.आर.पाटील : आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : मी राईट ऑफ रिप्लायसाठी उभा राहिलेलो नाही. परंतु 1000 पोलिसांची परीक्षा घेऊन त्यांना पदोन्नती देण्यात आली. आज त्या पोलिसांना 90 दिवस फौजदार म्हणून आणि नंतर एक दिवस हवालदार म्हणून जबाबदारी दिली जाते. हा प्रकार कधी बंद होणार हे सांगण्यात आले नाही. या 1000 पोलिसांच्या बढतीसंबंधी निर्णय केव्हा होईल?

श्री.मधुकर सरपोतदार : या पुरवणी मागण्यांमध्ये ही बाब नमूद केलेली आहे. मंत्रालयातील सातव्या मजल्यावर बांधकाम केले आहे त्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याचा खुलासा केला जाणार आहे की नाही? मला माहिती नाही असे म्हणणे बरोबर नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल यासंदर्भात जेव्हा चर्चा झाली होती तेव्हा मी सभागृहात उपस्थित नव्हतो. कालच्या चर्चेच्या संदर्भातील माहिती माझ्याकडे नव्हती परंतु यासंदर्भातील सर्व माहिती घेऊन आपल्याला सांगण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी 1 हजार कर्मचा-यांच्या भरतीच्या संदर्भात माहिती विचारलेली आहे त्यासंदर्भात मी सभागृहास सांगू इच्छितो की, पी.एस.आय.ची भरती ही एम.पी.एस.सी. मार्फत केली जात असते तसेच डॉक्टरांची भरती सुध्दा एम.पी.एस.सी. मार्फत होत असते. डॉक्टरांची भरती करणे आवश्यक असेल तर अशा वेळी लोकल प्रोसेसमधून तात्पुरत्या स्वरुपात डॉक्टरांच्या नेमणूका केल्या जात असतात. तसेच सनमाननीय सदस्यांनी पी.एस.आय. भरतीच्या संदर्भात जी विचारणा केलेली आहे त्यासंदर्भात निश्चितपणे माहिती घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायदा आणि सुव्यवस्थेच्या चर्चेवर ग्रामीण भागात कास्तक-यावर कशा प्रकारचे अन्याय होत आहेत यासंदर्भात मला या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा होता परंतु मला कोर्टात जावे लागल्यामुळे मी या चर्चेत भाग घेऊ शकलो नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाने प्रस्तावावर विचार केलेला आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक सथगित होऊन सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक 12.21 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**( स्थगित ठेवण्यात आलेला तारांकित प्रश्न क्रमांक 29285 )**

**सभापती** : आता दिनांक 18 जुलै 2007 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. 29285 घेण्यात येईल.

**गोरेगांव चित्र नगरीत झालेला गैरव्यवहार**

*** 29285 श्री. श्रीकांत जोशी , श्री. नितीन गडकरी , श्री. मधुकर चव्हाण : दिनांक 13 डिसेंबर, 2006 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौदाव्या यादीतील प्रश्न क्रमांक 18532 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गोरेगांव (मुंबई) येथील चित्रनगरीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत माजी व्यवस्थापकीय संचालकांवर शिक्षा बजावण्यासंबंधी अंतीम निर्णयासाठी केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(2) असल्यास,उक्त प्रश्नी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय झाला नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

(4) श्री.गोविंद स्वरुप यांच्यावर अजामीनपात्र गुन्हा केव्हा दाखल करण्यात आला व त्यांना प्रत्यक्ष अटक केव्हा करण्यात आली,

(5) या प्रकरणाच्या चौकशीचे कामी विलंब झाला आहे, हे खरे आहे काय, असल्यास त्यास कोण जबाबदारी आहे व त्यांचे विरुध्द कोणती कारवाई करण्याचे शासनाने ठरविले आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व सांस्कृतिक खात्याचे सचिव यांनी महामंडळाच्या आर्थिक व्यवहारात गैरव्यवहार केल्याची तक्रार ऑक्टोबर,2002 मध्ये प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय विभाग तसेच महामंडळ स्तरावर प्राथमिक चौकशीकरता समित्या नियुक्त करण्यात आल्या होत्या. सदर समित्यांच्या शिफारशींच्या अनुषंगाने, प्रशासकीय स्तरावर अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम,1969 अनुसार विभागीय चौकशी व आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भारतीय दंड संहिता व लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली.

(3) मार्च,2004 मध्ये "हम एक हे" संबंधातील गैरव्यवहाराबाबतचे प्रकरण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे सुपूर्द करण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29285......

(4) गुन्हा नोंदणी क्र.45/2004 अन्वये दिनांक 21 जुलै,2004 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांना दिनांक 8.2.2007 रोजी अटक करण्यात आली.
(5) प्रस्तूत प्रकरणी चौकशीच्या कामी विलंब झालेला नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आम्ही छोटी छोटी आंदोलने करतो त्यावेळी आम्हाला अटक केली जाते. मग आम्हाला जामीन घ्यावा लागतो. शिक्षक छोटी मोठी बांधकामे करतात अशा शिक्षकांना वेगवेगळ्या कारणासाठी अटक झालेली आहे. यामध्ये सहा शिक्षकांनी आत्महत्या केलेली आहे. आय.ए.एस.अधिकारी फर्स्ट ग्रेड सिटीझनशीप आहेत आणि खासदार, आमदार हे सेकंड ग्रेडचे आहेत असा घटनेमध्ये उल्लेख आहे काय ? श्री.गोविंद स्वरुप, संचालक व सांस्कृतिक कार्य यांनी 78 कोटींचा भ्रष्टाचार केल्याबाबत त्यांच्यावर 2004 मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. या गुन्ह्याची फाईल मुख्य सचिवांकडे नऊ महिने पडून होती असे आम्हाला उत्तर मिळाले होते. मुख्य सचिवांकडे नऊ महिने फाईल होती म्हणजे त्यांची सुध्दा भ्रष्टाचारास साथ आहे असा अर्थ होतो. श्री.गोविंद स्वरुप यांच्यावर 2004 मध्ये गुन्हा दाखल झाला आणि 2007 पर्यंत त्यांना अटक होत नाही. या कालावधीत ते दोन वर्षे सचिव म्हणून काम करतात हे कोडे मला सुटलेले नाही. आय.ए.एस. अधिकाऱ्याना अटक करण्याची कायद्यामध्ये प्रोव्हीजन आहे काय ? असेल तर त्यांना अटक करण्यास इतका उशीर का झाला ? ज्यांनी अटक करण्यास उशीर केला त्यामध्ये मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव व गृह मंत्र्यांचे सचिव यांना जबाबदार धरुन त्यांची सहआरोपी म्हणून चौकशी करणार काय ? तीन कॉन्ट्रक्टपैकी मुद्रा व्हीसलिंग ॲग्रीमेंटमध्ये पैसे रिकव्हर होण्याची शक्यता आहे. श्री.गोविंद स्वरुप यांनी 78 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्याला शासन पाठिशी घालत आहे असे दिसते. तेव्हा 78 कोटी रुपये वसूल करण्याबाबत शासन कोणती पाऊले उचलणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन 2004 मध्ये गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणाची व्याप्ती खूप मोठी आहे. पाच राज्यांमध्ये एकाच वेळी "हम एक है" हा कार्यक्रम झाला होता. या प्रकरणात जवळपास 119 लोकांची साक्ष घेण्यात आलेली आहे, तर जवळपास 100 च्या फाईल्स आहेत. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता सखोल चौकशी करणे आवश्यक होते.

यानंतर श्री.पुरी....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29285.....

श्री.राजेश टोपे....

त्यामुळे ॲण्टी करप्शन ब्यूरोला ज्यावेळी सरकारने चौकशीची परवानगी दिली, त्यानंतर गुन्हा दाखल करुन डिटेल चौकशी करण्यात आली. त्यानंतर श्री.गोविंद स्वरुप हे 5 महिने इंट्रोगेशनसाठी तपास अधिकाऱ्यांकडे चकरा मारत होते. यामध्ये जेवढे 115 लोक गुंतले होते, त्या सगळयांची जबानी आणि क्रॉस एक्झामीनेशन झाली.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.36 वाजता 10 मिनिटांसाठी स्थगित झाली. )

----------

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी : माननीय सभापती)**

**सभागृहात कॅबिनेट दर्जाचे मंत्री उपस्थित नसल्याबाबत**

**सभापती** : सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे लागणे, हे योग्य नाही. सत्तारुढ पक्षाची याबाबतीतील जबाबदारी आहे, ती त्यांनी योग्य पद्धतीने पाळणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सन्माननीय वित्त मंत्र्यांना मी सांगेन की, त्यांनी याबाबतची गांभीर्याने नोंद घ्यावी आणि सभागृहात दिलगीरी व्यक्त करावी.

श्री.जयंत पाटील (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी दिलगीरी व्यक्त करतो आणि पुन्हा असे होणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल.

--------------

..2............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**ता.प्र.क्र.29285 पुढे सुरु**..............</u>

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी यांनी जो प्रश्न विचारला आहे तो अतिशय महत्वाचा आहे. या प्रकरणी सन 2004 साली गुन्हा दाखल झाला होता. मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची व्याप्ती फार मोठी आहे. "हम एक है" हा कार्यक्रम पाच राज्यातील, पाच मोठया शहरांमध्ये आयोजित करण्यात आला होता. अनेकांची साक्ष घेणे, कागदपत्रे तपासणे, हा महत्वाचा भाग त्यामध्ये होता. ज्यावेळी गुन्हा दाखल झाला त्यावेळी कुठलीही कागदपत्रे उपलब्ध नव्हती. कागदपत्रे घेण्यासाठी झडती घेण्यात आली होती, छापे सुध्दा टाकण्यात आले होते. सगळी चौकशी पूर्ण करुन 'Permission to prosecute' साठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. शासन स्तरावर नऊ महिन्यांचा उशिर झाला, हे मान्य आहे. ' Permission to prosecute' शासनाकडून देण्यात येते. या प्रकरणी पेंरेंट डिपार्टमेंट हे सांस्कृतिक कार्य विभाग आहे. त्या विभागाकडून अभिप्राय घेऊन गृह विभाग, सामान्य प्रशासन विभाग, विधी व न्याय विभाग अशा चार विभागांकडून अभिप्राय घेणे आवश्यक असते, अन्यथा, एखादे प्रकरण 'नल ॲण्ड वाईड' होऊ शकते. या सर्व कार्यवाहीसाठी नऊ महिन्यांचा उशिर झाला. तथापि, या प्रकरणी शासनाने 'Permission to prosecute' ग्रॅंट केले व त्या अनुषंगानेच संबंधितांना अटक झाली आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे, यामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचा विषय नाही. मी मुद्दाम सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, ज्यावेळी सेवानिवृत्त अधिकारी, श्री.चौधरी यांच्यामार्फत विभागीय चौकशी झाली त्यावेळी त्यांनी या चौकशीमध्ये संबंधितांना दोषमुक्त केले होते. शासनाचा उद्देश यामध्ये अतिशय स्वच्छ होता. तो असा की, विभागीय चौकशीतून दोषमुक्त झालेले असतांना सुध्दा हे अभिप्राय असहमत करुन संबंधितांना सजा देण्याचे काम शासनाच्या वतीने करण्यात आले आहे. तशा पद्धतीचे रिकमंडेशन केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहे. श्री.गोविंद स्वरुप प्रकरणी कोणत्याही पद्धतीचा हलगर्जीपणा शासनाकडून झालेला नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. यामध्ये शासनाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान श्री.गोविंद स्वरुप यांनी केलेले आहे. आता मंत्री महोदयांनी

..3..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/ 12:45

**ता.प्र.क्र.29285**

श्री.पांडुरंग फुंडकर...........

सांगितले की, नऊ महिन्यांचा उशिर झाला, तो फाईल या विभागातून त्या विभागात फिरण्यासाठी झाला. पावणे तीन वर्षानंतर गुन्हा नोंदविण्यात आला व त्यानंतर संबंधितांना अटक झाली. म्हणजे पावणे तीन वर्षे का लागली ?

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ............ 12:50

ता.प्र.क्र.29285 ........

श्री.पांडुरंग फुंडकर .....

त्यांनी असा गुन्हा केला की, नवीन ॲक्टर मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी फिल्मसिटीमध्ये डायरेक्टर श्री.सुभाष घई यांच्या कोलॅब्रेशनने प्रोजेक्ट उभा होणार होता. 15 टक्के महाराष्ट्र शासन आणि 85 टक्के मुद्रा एंटरटेनमेंट असे शेअरींग झालेले आहे. 15 टक्क्यामध्ये 3 कोटी रुपये किंमतीच्या जमिनीचे ॲग्रीमेंट झालेले आहे. असे असतांना 20 एकर जमीन फिल्मसिटीला देण्यात आली. 32 कोटी रुपयांची जमीन 15 टक्क्याच्या माध्यमातून फिल्मसिटीला देण्यात आल्याचे ॲग्रीमेंटमध्ये नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात जे ॲग्रीमेंट झालेले आहे ते ॲग्रीमेंट महाराष्ट्र शासन बदलणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. जॉईंट व्हेंचरमध्ये मुद्रा एंटरटेनमेंट आणि फिल्मसिटी अशा प्रकारचे शेअरींग झाले होते. हा एकूण 20 कोटी रुपयांचा प्रकल्प होता. 15 टक्के राज्य शासन आणि 85 टक्के मुद्रा एंटरटेनमेंट असे शेअरींग जॉईंट व्हेंचर मध्ये होते. 20 कोटीच्या या प्रकल्पामध्ये 15 टक्के शेअरिंग जमिनीच्या स्वरुपात असावे, असे अभिप्रेत होते. परंतु जवळ जवळ 32 कोटी रुपयांची 20 एकर जमीन या जॉईंट व्हेंचरमध्ये 3 कोटी रुपयांची दाखविण्यात आली आहे. त्यामुळे हा निश्चितच गंभीर विषय आहे, यादृष्टीकोनातून कोणत्याही परिस्थितीत जॉईंट व्हेंचरच्या माध्यमातून जे ॲग्रीमेंट झालेले आहे ते रद्द करणे आवश्यक आहे आणि नवीन स्वरुपाचे भाडेतत्वाचे ॲग्रीमेंट करणे आवश्यक आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्या. मी स्वत: असे सांगत आहे की, हे प्रकरण गंभीर आहे. ॲग्रीमेंट रद्द करण्याची आवश्यकता आहे. परंतु यामध्ये पी.आय.एल. झालेले आहे. श्री.अब्दूल अहमद नावाच्या व्यक्तिीने पी.आय.एल. दाखल केलेले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जॉईंट व्हेंचर रद्द झाले पाहिजे, अशी शासनाची भूमिका राहील. सभापती महोदय, 20 एकर जमिनीवरील 4 एकर जमिनीमध्ये ट्रेनिंग इन्स्टीटयुशनचे बांधकाम झालेले आहे. उर्वरित 16 एकर जमीन मोकळी आहे. ही जमीन शासनाकडून ट्रान्सफर झालेली नाही. हा

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर ............ 12:50

ता.प्र.क्र.29285 ........

श्री.राजेश टोपे ..........

शासनाचा विषय आहे. Mr. Chairman, Sir, in the interest of the State and in the interest of public money, कोणत्याही परिस्थितीत जॉईंट व्हेंचर रद्द करुन, ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून त्यांनी जी 4 एकर जमीन उपयोगात आणलेली आहे ती जमीन भाडेतत्वाने देता येईल काय, यासंदर्भात शासनाकडून पावले उचलली जातील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, "या प्रकरणाच्या चौकशीचे कामी विलंब झाला आहे, हे खरे आहे काय, असल्यास त्यास कोण जबाबदार आहे व त्यांचे विरुध्द कोणती कारवाई करण्याचे शासनाने ठरविले आहे ?" असा लेखी प्रश्न विचारण्यात आला होता. या प्रश्नाला शासनाने असे उत्तर दिलेले आहे की, "प्रस्तूत प्रकरणी चौकशीच्या कामी विलंब झालेला नाही." सभापती महोदय, हे प्रकरण सन 2002 पासून सुरु आहे. आता 2007 साल सुरु आहे. सभापती महोदय, चौथ्या क्रमांकाच्या प्रश्नाला शासनाने असे लेखी उत्तर दिलेले आहे की, " गुन्हा नोंदणी क्र.45/2004 अन्वये दिनांक 21 जुलै, 2004 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांना दिनांक 06.02.2007 रोजी अटक करण्यात आली." म्हणजे या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात अटक करण्यात आलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, फक्त 9 महिन्यांचा विलंब झालेला आहे. सभापती महोदय, ही सभागृहाची दिशाभूल आहे. सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना सत्य उत्तर द्यावे, अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा असते. सभागृहाची दिशाभूल होऊ नये अशी आमची अपेक्षा आहे. माननीय मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29285

श्री.मधुकर सरपोतदार ......

माननीय मंत्री महोदय सदनाची दिशाभूल करीत आहेत. मंत्री महोदयांनी सांगावे की, कोणत्या आय.पी.सी. सेक्शनखाली गुन्हे दाखल केलेले आहेत ? जुलै 2004 मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे व 2007 साली अटक होत आहे. कोणत्याही गुन्हेगाराला अशा प्रकारची सवलत पोलीस का देतात ? त्यांना अटक करण्यासाठी 2007 साल का उजाडले ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी यापूर्वी दिलेल्या उत्तरात सांगितले आहे. permission to prosecute साठी ही फाईल चीफ सेक्रेटरी व अधिकाऱ्यांकडे नऊ महिने होती. गुन्हा दाखल करुन अटक करेपर्यंत दोन ते अडीच वर्षे ही फाईल त्यांच्याकडे राहिली असेल. श्री.स्वरुप आय.ए.एस. ऑफिसर असल्यामुळे दोन पध्दतीने चौकशी चालू आहे. आय.ए.एस. अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची परवानगी डिपार्टमेंट ऑफ पर्सनल अँड ट्रेनिंग हया केंद्र सरकारच्या अखत्यारितील डिपार्टमेंटकडून घ्यावी लागते. विभागीय चौकशीचा निष्कर्ष शासनाने काढला आहे. त्यांना मंजूर झालेल्या पेंशनपैकी 1/3 पेंशन मिळणार आहे. याबाबतचा निर्णय केंद्रसरकारकडे मान्यतेसाठी पाठविलेला आहे. प्रशासकीय दृष्टीकोनातून केलेल्या चौकशीबाबत मी सांगितले आहे. तसेच अँटी करप्शन ब्युरोनेही त्यांची चौकशी केली आहे. त्यामध्ये आय.पी.सी. खाली 409, 420,120 ब ही कलमे लावण्यात आली आहेत. याचा अर्थ Criminal breach of trust असा होतो. सभापती महोदय, 1988 च्या Prevention of corruption act नुसार 13(1) (C), 13(1) D आणि 13 (2) ही कलमे लावण्यात आलेली आहे. हा criminal misconduct चा विषय आहे. त्यामुळे या तरतूदीप्रमाणे 7 वर्षे imprisonment चे कलम लावलेले आहे. अशा प्रकारे Prevention of corruption act व आय.पी.सी. अशा दोन्ही कायद्याखाली गंभीर स्वरुपाची कलमे लावलेली आहेत. प्रशासकीय चौकशीचा नियम क्र.8 असून त्यानुसार गंभीर शिक्षा प्रस्तावित केली जाऊ शकते. सदरील प्रकरण आता केंद्र सरकारकडे पाठविले आहे. स्मरणपत्रही दिलेले आहे. परंतु केंद्र शासनाचा निर्णय अजून आलेला नाही. या अधिकाऱ्यांची नेमणूक यु.पी.एस.सी. मार्फत केली जाते. त्यामुळे त्यांची समंती घेणेही आवश्यक आहे. याबाबत महाराष्ट्र शासनाकडून केंद्र शासनाकडे सतत पाठपुरावा केला जाईल. शक्य

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29285

श्री.राजेश टोपे .....

झाल्यास सचिवांना विशेषरित्या पाठवून शासनाकडून लवकर मान्यता मिळण्यासाठी प्रयत्न केले जातील व कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय चौकशी पूर्ण करण्यात येईल. यामध्ये केंद्र सरकारच्या Anti corruption Act ची कलमे लावून या प्रकरणाबाबत विशेष न्यायालयाकडून लवकर निर्णय लागण्यासाठी योग्य तो पाठपुरावा करण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याबाबत मूळ प्रश्न मी मांडलेला आहे. शासन श्री.स्वरुप यांना वाचविण्याचा कसा प्रयत्न केला आहे ? हे मी सांगू इच्छितो. याबाबत मी आपणास काही प्रश्न विचारत आहे. आक्टोबर 2002 मध्ये अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रशासकीय विभाग तसेच महामंडळ स्तरावर प्राथमिक चौकशीकरिता समित्या नियुक्त केल्या आहेत. श्री.गोविंद स्वरुप यांची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त केलेली आहे, त्या समितीचा अहवाल त्यांच्याकडेच पाठवून त्यांचे काय मत आहे, हे जाणून घेण्यासाठी घेण्यात आले. समजा माझ्या संबंधी काही चौकशी चालू असेल व खालच्या लोकांकडून चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर तो माझ्याकडेच पाठविणे योग्य आहे का ? सदर समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावर अखिल भारतीय सेवा नियम 1969 अन्वये विभागीय चौकशी व आर्थिक गैरव्यवहाराच्या अनुषंगाने लाललुचपत प्रतिबंधक विभागाकडून भारतीय दंड संहिता व लाललुचपत प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई सुरु करण्यात आली. ही कारवाई केव्हा सुरु करण्यात आली ? सी.आय.डी. चौकशी करणार का ? हा प्रश्न तीन वेळेस विचारला आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 12:55

श्री. मधुकर चव्हाण (पुढे चालू...) ता.प्र.क्र.29285 ...

त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, या तीन खात्यांकडून चौकशी करून आल्यानंतर ज्या मुख्य सचिवांनी याबाबत दिरंगाई केली, ते आता निवृत्त झाले असले तरी तेही या गुन्ह्यामध्ये सहभागी आहेत म्हणून त्यांना यात सहआरोपी करून आपण घेणार आहात का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये प्रशासकीय दृष्टीकोनातून, खास करून मुख्य सचिवांकडून दिरंगाई झाली आहे असे जे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे, सन्माननीय सदस्य श्री.जोशी यांचेही तेच म्हणणे होते., त्याबाबतीत मी आपल्याला सांगितलेच आहे की, चार विभागांमधील कन्सल्टेशनचा जेव्हा विषय असतो तेव्हा त्यात काही कालावधी हा जातो. जेव्हा विभागीय चौकशी करतो त्यात विभागीय चौकशी करण्यात देखील चार विभागामध्ये फाईल कंसल्टेशनसाठी फिरते आणि मग निर्णय घेतला जातो. ए.सी.बी.ची चौकशी झाली त्यात देखील परमिशन टू प्रॉसिक्यूट यासाठीसुद्ध फाईल विचारार्थ फिरते. यामध्ये सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे जी डिपार्टमेंटल एन्क्वायरी झाली त्यात श्री.गोविंद स्वरूप यांना दोषमुक्त ठरविले गेले पण त्याच्याशी देखील शासन असहमत झाले आणि तो शासनाचा निर्णय देखील श्री.गोविंद स्वरूप यांना कळवावा लागतो की, आम्ही डिपार्टमेंटल एन्क्वायरीच्या निर्णयाशी असहमत आहोत. सभापती महोदय, यामध्ये शेवटी अंतिमत: एकच गोष्ट पाहण्याची आवश्यकता आहे की, शासनाची यात भूमिका काय आहे ? अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांचा बाबतीत शासनाची भूमिका काय आहे हे यामध्ये पाहणे मला वाटते अधिक महत्त्वाचे आहे. त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा केसमध्ये संबंधितावर कारवाई करण्याचीच शासनाची भूमिका आहे आणि त्याप्रमाणे प्रशासकीय बाबतीत देखील आज जे त्यांचे पेन्शन आहे ते त्यांना वन थर्ड मिळावे यासाठी हे प्रकरण आपण केंद्र सरकारकडे पाठविले आहे. आता या प्रकरणामध्ये विलंब केल्याबद्दल अन्य अधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याबाबत जे आपण विचारले आहे त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, चार-चार विभागांकडे कन्सल्टेशनसाठी म्हणून जेव्हा फाईल फिरत असते त्यात मुख्य सचिवांसह मुख्यमंत्र्यांची देखील सही लागते. असे असल्याने नऊ-नऊ महिने दिरंगाई होणे हे होऊ शकते. अर्थातच यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याची शासनाची भूमिका नाही हेही मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे, ही बाब आपण लक्षात घ्यावी. सभापती महोदय, यामध्ये मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, दोषी व्यक्तीला सजा मिळालीच पाहिजे ही भूमिका नेहमीच शासनाची राहिली आहे आणि यापुढेही राहणार आहे. ......आयआय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29285 ...

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, अत्यंत चुकीची माहिती रेकॉर्डवर आणली जात आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये हे मला येथे सांगितले पाहिजे. आर्थिक गुन्हे प्रकटीकरण शाखेने या संबंधात आपल्याला कळविले होते की, ही एसीबीची केस आहे ती त्यांच्याकडे दाखल करावी. त्यावर मुख्य सचिवांनी 9 महिने उशीरा लावला आहे, याबाबत आम्ही विचारले होते. त्यामुळे यामध्ये चार विभागाशी कन्सल्टेशन करण्याची गरज नव्हती. म्हणूनच तत्कालीन मुख्य सचिवांना यामध्ये आपण सहआरोपी करणार आहात काय ? एसीबी ने 2004 पासून 2007 पर्यंत श्री.गोविंद स्वरूपांना अटक केली नाही याचे समर्थन आपण करीत असाल तर तसे आपण स्पष्टपणे सांगावे. आणि समर्थन करीत नसाल तर एसीबीच्या सर्व अधिकाऱ्यांनादेखील यात सहआरोपी आपण करणार का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी येथे मघापासून सातत्याने सांगतो आहे की, एसीबी कडून चौकशी करण्याच्या अगोदर आर्थिक गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून जेव्हा या प्रकरणी चौकशी झाली त्यात त्यांनी सांगितले की, या प्रकरणाची एसीबीकडून सविस्तर चौकशी करावी. त्यावेळी त्यात देखील गृहविभाग, जीएडी, एलएडी, सांस्कृतिक विभाग, मुख्य सचिव, मुख्यमंत्री यांच्याकडे ती फाईल सल्ल्यासाठी फिरत होती आणि त्यासाठी 9-9 महिने लागणे स्वाभाविक आहे. म्हणजेच 4-5 विभागांकडे फाईल सल्ल्यासाठी जात असताना इतका विलंब होऊ शकतो. अर्थात तसा तो व्हायलाच पाहिजे असे नाही. पण तेवढा काळ त्यासाठी लागू शकतो इतकेच मला सांगावयाचे आहे. हे सांगून कोणाची बाजू घेण्याचा प्रश्न नाही. मी एवढेच सांगतो की, याबाबतीत अशा प्रकारे भ्रष्ट अधिकाऱ्यावर जे काही नियमात असेल त्याप्रमाणे सजा झाली पाहिजे हीच भूमिका शासनाची आहे. तरीही यामध्ये मुख्य सचिव आणि अन्य अधिकाऱ्यांना सहआरोपी केले जावे असे सदस्यांचे म्हणणे असेल तर ...

( यानंतर श्री. सरफरे .... जेजे 1 ...

s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29285...

श्री.राजेश टोपे...

माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणून त्या संदर्भात एखादी मंत्री स्तरावर समिती गठीत करुन ही गोष्ट तपासली पाहिजे. यामध्ये कुणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही. या ठिकाणी मुख्य सचिवांना सह आरोपी करण्याविषयी मागणी करण्यात आली आहे, त्या मागणीला "हो" म्हणून उत्तर देणे उचित होणार नाही. माननीय मुख्यमंत्री हे राज्याचे प्रमुख आहेत, त्यांच्या निदर्शनास ही गोष्ट आणून देण्यात येईल. त्यांच्या माध्यमातून चौकशी समिती गठीत करुन चौकशीमध्ये जर कुणी दोषी आढळले तर गरज पडल्यास त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

(अडथळा)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य घोषणा देतात)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जवाहर नेहरू नागरी अभियानातून पूर्ण करावयाची**

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची पाणी योजना**

**(१) * २९२७७ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची १५० दशलक्ष लिटरची पाणी योजना खाजगी करणातून ( बीओटी ) न करता जवाहरलाल नेहरू नागरी अभियानातून करण्याचे आदेश दि.१९ मे, २००७ वा त्यासुमारास मा. उपमुख्यमंत्री यांनी पालिकेचे आयुक्त आणि उच्च पदस्थ अधिकारी यांना दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवाहर लाल नेहरू नागरी अभियानातून योजना पूर्ण करण्याबाबत पालिकेने कोणती कारवाई केली आहे त्याचा तपशील काय आहे ,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) अशाप्रकारच्या सूचना एका बैठकी दरम्यान संबंधितांना दिल्या होत्या.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून यासंदर्भात अद्याप प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, जवाहर नेहरु नागरी अभियानातून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ही योजना पूर्ण करावयाची आहे. त्याकरिता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचना महानगरपालिकेने ग्राह्य धरल्या आहेत हे खरे आहे काय?

(अडथळा)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्ये "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ही पाणी पुरवठा योजना बी.ओ.टी. तत्वावर करण्यास मंजूरी देण्यात यावी अशाप्रकारचा ठराव केला होता. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी या योजनेकरिता जवाहर नेहरु नागरी अभियानातून पैसे उपलब्ध करुन देण्यात यावेत अशा सूचना दिल्या होत्या. या प्रश्नासंबंधी महानगरपालिकेने निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे महानगरपालिकेने ही पाणी पुरवठा योजना बी.ओ.टी. तत्वावर विकसित करावयाची की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. प्र.क्र. २९२७७...**

श्री. राजेश टोपे...

जवाहर नेहरु नागरी अभियानामधून विकसित करावयाची याबाबतचा निर्णय घेऊन त्यांनी नगर विकास विभागाला कळविले पाहिजे. तेव्हा त्यांनी कळविल्यानंतर त्यांच्या सूचनेप्रमाणे निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

----

(अडथळा)

तारांकित प्रश्न क्रमांक ३१९८८ : माननीय सदस्य अनुपस्थित.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वर्धा नगर परिषदेची इमारत बी. ओ. टी. तत्वावर बांधण्यास दिलेली स्थगिती**

**(३) * २९३८० श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे : दिनांक २२ मार्च, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक २१ मार्च, २००७ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक २४५३५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा नगर परिषदेची ऐतीहासिक इमारत पाडून बी.ओ.टी. तत्वावर व्यापारी संकुल बांधणे यासाठी इमारत पाडणे, कंत्राटदाराशी ॲग्रीमेंट करणे इत्यादी बाबतच्या अनियमिततेची चोकशी करून जिल्हाधिकारी वर्धा यांनी शासनाला पाठविलेल्या चौकशी अहवालावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, चौकशी अहवालावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१), (२) व (३) वर्धा नगर परिषद प्रशासकीय इमारत व व्यापारी संकुल बांधण्याचा बी.ओ.टी. तत्वावर द्यावयाच्या प्रकल्पाबाबतचा ठराव नगरपरिषदेच्या नवीन सभेसमोर ठेवून त्याच्या निर्णयासह प्रस्ताव पाठविण्याबाबत एप्रिल, २००७ मध्ये जिल्हाधिकरी, वर्धा व मुख्याधिकारी, वर्धा यांना कळविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त होताच उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मी माझा पहिला प्रश्न यापूर्वी दिनांक २१.३.२००७ रोजी विचारला होता...

(अडथळा)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्ये "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

**सभापती :** अशा परिस्थितीत काम करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाचे कामकाज दुपारी १ वाजून ८ मिनिटांनी, १० मिनिटे स्थगित करण्यात आले.)

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 29285 च्या संबंधात मी राज्य मंत्री महोदयांना सूचना करेन की, सदनामध्ये या प्रश्नाच्या अनुषंगाने फार गांभीर्याने चर्चा झालेली आहे. आपण सूचित केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या नजरेला ही बाब आणून देऊन मंत्रीमंडळाच्या सदस्यांची समिती नियुक्त करावी. त्या समितीचे जे निष्कर्ष येतील ते या ठिकाणी आपण पटलावर ठेवावे.

श्री.राजेश टोपे : होय.

---

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 29380 ( चर्चा पुढे सुरु )**

**सभापती** : सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यापूर्वी मी सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे यांचा प्रश्न क्रमांक 29380 पुकारलेला होता. त्या प्रश्नावरील चर्चा आता पुढे सुरु होईल. सन्माननीय सदस्यांनी उपप्रश्न विचारावा.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा हे की, मी 21 मार्च, 2007 ला जो प्रश्न विचारलेला होता त्यामध्ये नगरपरिषदेची इमारत जी अकारण, अनियमितपणे, नियमबाह्य पध्दतीने उद्ध्वस्त केली यासंदर्भात त्यावेळी जी कार्यवाही झाली त्या कार्यवाहीची चौकशी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी करावी असे म्हटले होते त्यासंदर्भात उत्तर आलेले नाही. तो अहवाल यांच्याकडे प्राप्त झालेला आहे. ती अनियमितता ज्यांनी केलेली आहे मग त्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी असतील, प्रेंसिडेंट असतील किंवा इतर जे घटक असतील, याबाबत उच्चस्तरीय चौकशी तातडीने पूर्ण केली पाहिजे. आता शासनाने असे म्हटले आहे की, नगरपरिषदेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. नगरपरिषदेमध्ये नवीन सभा आली आहे त्यांना नवीन ठराव करुन मागितलेला आहे. बी.ओ.टी. तत्वावर ही इमारत पूर्ण झाली पाहिजे. ही इमारत पडली असल्यामुळे आज वर्धा शहरात चार ठिकाणी हे कार्यालय भरते आणि नागरिकांची अतिशय गैरसोय होत आहे. म्हणून माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नगरपरिषदेकडून आता जो ठराव प्राप्त झालेला आहे त्या ठरावाच्या अनुषंगाने आता जी इमारत बी.ओ.टी तत्वावर बांधावयाची आहे त्या इमारतीच्या कामाच्या संदर्भात शासनाने काय नियोजन केलेले आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्यांदा याबाबत उच्चस्तरीय चौकशी व्हावी असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी जी संपूर्ण चौकशी केली त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. यामध्ये अनेक नगरसेवकांचे असे म्हणणे होते की, त्या ठिकाणी बी.ओ.टी तत्वावर कशा पध्दतीने हे केले जाणार आहे हे आम्हाला माहीत नाही. म्हणून यासंदर्भाने जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण चौकशी केली. त्यांचे हिअरींग घेतले आणि त्या अनुषंगाने ज्या काही अनियमितता होत्या, ज्यामध्ये नगरपालिकेची एखादी जमीन 30 वर्षाच्या भाडेतत्वावर द्यावयाची असेल तर त्यामध्ये शासनाची पूर्व परवानगी लागते ती परवानगी न घेता त्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29380.... श्री. राजेश टोपे ....

ठिकाणी काम करण्याचा प्रयत्न होता. त्यामुळे चौकशीच्या रिपोर्टच्या अनुषंगाने या सगळ्या गोष्टी दुरुस्त कराव्यात अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांकडून या चौकशीच्या माध्यमातून देण्यात आलेल्या आहेत आणि त्या अनुषंगाने नगरपालिकेने बी.ओ.टी. तत्वावरचा नवीन ठराव घेतलेला आहे. तशा पध्दतीचा अहवाल अजून आमच्याकडे प्राप्त झालेला नाही परंतु नगरपालिकेचा ठराव झालेला आहे अशी माहिती मला प्राप्त झालेली आहे. त्यामुळे हा जो ठराव झालेला आहे तो जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून, सेक्शन 92 खाली 30 वर्षाची लीज देण्याच्या दृष्टीकोनातून शासनाला जो अधिकार आहे, त्यासंदर्भाने जेव्हा शासनाकडे अहवाल येईल त्यावेळी बीओटीच्या तत्वाचा पूर्ण अभ्यास करुन गुणवत्तेवर विचार करण्यात येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही 132 वर्षे जुनी चांगली दुमजली इमारत होती. आपण स्टे दिला तरी त्यांनी ती इमारत पाडून टाकली. ती इमारत पाडून टाकल्यामुळे उध्वस्त झ ाली. आता त्या गावामध्ये नगरपालिकेची कार्यालये तीन चार ठिकाणी भरतात. लोकांना त्रास होतो. ही अतिशय संकोच वाटण्यासारखी गोष्ट आहे. लोक त्या गोष्टीचा तिरस्कार करतात. काही कार्यालये पाण्याच्या टाकीखाली भरतात. हे सर्व करीत असताना शासनाने ठामपणे सभागृहाला सांगावे. आता बी.ओ.टी. शिवाय गत्यंतर राहिलेले नाही. नगरपालिकेने आपल्याकडे ठराव करुन पाठविलेला आहे. हे काम किती दिवसांमध्ये पूर्ण होईल असे आदेश आपण त्यांना द्याल ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या ठिकाणी ठराव झालेला आहे. एक महिन्यांच्या आत हा ठराव जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालासह शासनाकडे प्राप्त करुन घेतला जाईल आणि त्यामध्ये पूर्ण निर्णय दिला जाईल. त्या ठिकाणी बी.ओ.टी. तत्वावर शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि त्या ठिकाणच्या नगरपालिकेचे कार्यालय सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाकडून गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

**कागदांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने वह्यांच्या किंमतीत झालेली वाढ**

**(४) * ३०५२८ मेजर सुधीर सावंत , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. धनाजी साठे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. यशवंतराव गडाख , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कागदांच्या किंमतीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने वह्यांच्या किंमतीत ७ ते १० टक्के वाढ झाली असल्याची बाब दिनांक ६ जून, २००७ वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस वह्यांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) वह्यांच्या उत्पादनावरील व्हॅट कर आकारणी रद्द केल्यास वह्यांच्या किंमती ७ टक्क्यांनी उतरतील अशी माहिती वह्या उत्पादक कंपन्यानी दिली आहे, हे देखील खरे आहे काय,

(४) असल्यास, वह्यांवरील वहॅट कर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) वह्यांचे कागदाचे किंमतीत एप्रिल, २००७ पासून फारशी वाढ झालेली नाही.

कच्च्या मालाचे वाढीव किंमतीमुळे वह्यांच्या किंमतीत ७-१० टक्के वाढ झाल्याची बाब शासनाचे निदर्शनास आलेली नाही.

(२) कागदाचे किंमतीमध्ये फारशी वाढ न झाल्यामुळे वह्यांचे किंमतीमध्ये फारशी वाढ होण्याचे कारण नाही.

(३) वह्यांना तसेच त्यासाठी लागणाऱ्या कागदावर ४ टक्के दराने कर आकारणी होते. करमाफीमुळे फक्त वर्धीत मुल्यावरील ४ टक्केचे प्रमाणांत किंमतीवर परिणाम संभवतो. मात्र राष्ट्रीय सहमतीनुसार वह्यांवर ४ टक्के दराने कर आकारणी होत असल्यामुळे करमाफी प्रदान करण्याचा शासनाचा इरादा नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता. प्र. क्र. 30528.....

श्री. मधुकर चव्हाण : वह्यांचे भाव गेल्या वर्षापेक्षा या वर्षी खूप वाढलेले आहेत. वह्या घेणे गोरगरिबांना परवडत नाही. प्रश्न भाग दोनला असे उत्तर दिलेले आहे की, कागदाच्या किंमतीमध्ये फारशी वाढ न झाल्यामुळे वह्यांच्या किंमतीमध्ये फारशी वाढ होण्याचे कारण नाही. हा तुमचा आशावाद झाला. आपण भाव वाढलेले आहेत की नाहीत याबाबतची वस्तुस्थिती सांगितली नाही. तेव्हा वह्यांच्या किंमती वाढलेल्या आहेत की नाहीत ? सर्व वह्या उत्पादकांनी असे म्हटलेले आहे की, महाराष्ट्र शासन हा कर रद्द करु शकते. तर महाराष्ट्र शासन हे पुस्तके फुकट देते वह्या फुकट देत नाही. प्रश्न भाग 3च्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, राष्ट्रीय सहमतीनुसार वह्यांवर 4 टक्के दराने कर आकारणी होते. हा कर घेतलाच पाहिजे असा कायदा नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यापक हितासाठी, वह्यांच्या किंमती कमी करण्यासाठी हा 4 टक्के कर आपण कमी करणार आहात काय ?

डॉ. सुनील देशमुख : ज्या प्रकारच्या वह्या मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात त्यामध्ये नोटबूक वनलाईन, नोटबूक वनलाईलन-इ, इ-3, इ-4, कॉलेज नोटबूक, इनर लॉगबूक इएल-4, बीग नोट बुक असे प्रकार आहेत. यामधील पृष्ठसंख्या 92, 180, 188 अशी आहे. आपण 2005, 2006 आणि 2007 या वर्षामधील वह्यांच्या किंमतीची आपण तुलना केली तर आपल्या लक्षात येईल की, नोटबूक वनलाईन ज्याला आपण इ-3 म्हणतो त्या वहीत 92 पृष्ठे असतात. अशा 10 वह्यांच्या संचाची किंमत 2005 मध्ये 80 रु. होती. 2006मध्ये ती 82 रु. झाली आणि 2007मध्ये ती 84 रु. झाली. म्हणजे 1980 सालापासून 1982 सालापर्यन्त किंमतीमध्ये जी वाढ झाली होती ती 2.50 टक्के एवढी होती आणि 2005 पासून 2007 पर्यन्त किंमतीमध्ये जी वाढ झाली ती 2.44 टक्के इतकी झाली. सगळे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात ज्या वह्या वापरतात असा वह्यांचा दुसरा प्रकार म्हणजे नोटबूक वनलाईन इ-4 हा आहे. या वहीत 188 पृष्ठे असतात. 2005मध्ये 10 वह्यांच्या संचाची किंमत 128 रु. होती, ही किंमत 2006 मध्ये 132 रु. झाली आणि 2007 मध्ये ती किंमत 134 रु. इतकी झाली. ही वाढ 3.12 टक्के आणि 1.51 टक्के एवढी झाली. कॉलेज विद्यार्थी जी नोटबूक वापरतात त्या वह्यांची पृष्ठे 180 असतात. 2005मध्ये अशा प्रकारच्या 10 वह्यांच्या संचाची

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किंमत 244 रु. होती, ही किंमत 2006मध्ये 255 रु. झाली आणि 2007मध्ये ती किंमत 264 रु. झ ाली. इनर लॉगबूक, इनर नोटबूक या प्रकारच्या वह्यांची सरासरी किंमत 2005च्या तुलनेत 2006मध्ये 2.80 टक्क्यांनी वाढली आणि 2006च्या तुलनेत 2007मध्ये ही किंमत 3 टक्क्यांनी वाढली. सन्माननीय सदयांनी सांगितले की, किंमतीमध्ये भरपूर वाढ झालेली आहे हे वस्तुस्थितीला धरुन नाही.

श्री. संजय केळकर : हा लार्जर इण्टरेस्टचा भाग आहे. गरीब मुले मोठया प्रमाणावर आहेत. हा शिक्षणाचा विषय आहे. हा 4 टक्के व्हॅट कमी करण्यासाठी शासन पॉझिटिव्हली प्रयत्नशील राहाणार आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : राष्ट्रीय स्तरावरील राज्यांच्या अर्थ मंत्र्यांच्या शक्ती प्रदान समितीने म्हणजे एम्पॉवर्ड कमिटीच्या सहमतीने हिंदुस्थानामध्ये 4 टक्के व्हॅट आकारण्यात आलेला आहे. हाच व्हॅट महाराष्ट्रात लागतो. मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या राज्यामध्ये कमी किंमतीला वह्या मिळतात आणि आपल्या राज्यामध्ये त्या जास्त किंमतीला मिळतात अशी वस्तुस्थिती नाही. मी वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, व्हॅट लागण्यापूर्वी म्हणजे 31.3.2005 पर्यन्त वह्यांवर 4 टक्के सेल्स टॅक्स होता. त्यानंतर सरचार्ज आणि उलाढाल कर हा 5.40 टक्के होता. त्याच बरोबर कागद खरेदी किंमतीवर 3 टक्के कर होता. म्हणजे जवळ जवळ 7 टक्के सेल्स टॅक्स कर महाराष्ट्रामध्ये होता. हा कर आपण 7 टक्क्यावरुन 4 टक्क्यावर आणलेला आहे. हिन्दुस्थानामध्ये सर्व राज्यात 4 टक्के कर असेल तर तो कर आपल्यासाठी योग्य आहे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गिरणी कामगार नोकऱ्या मिळण्यास अपात्र असल्याबाबत**

**(५) * २९४२२ श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , श्री. यशवंतराव गडाख , श्री.सय्यद जामा :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणी कामगार नोकऱ्या मिळण्यास अपात्र असल्याचे राज्यशासनाने दिनांक २५ एप्रिल, २००७ रोजी वा त्यासुमारास न्यायालयास सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिणामी बंद पडलेल्या गिरण्यामधील कामगारांना राज्यशासन जाणीवपूर्वक नोकरीपासून डावलत आहे असा आरोप कामगार संघटनांनी केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, असे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे कारण काय आहे,
(४) गिरणी कामगारांना वा त्यांच्या वारसांना गिरण्यांच्या जागी निर्माण होणाऱ्या उद्योगांमध्ये नोकरी देण्याबाबत शासन आग्रही भूमिका घेईल काय,
(५) असल्यास, त्याबाबतचे धोरण वा योजना शासन जाहीर करील काय ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१), (२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील नियम ५८ (७) (बी) व (सी) नुसार मिल मालकाने, मिल स्थलांतरित केली वा डायव्हर्सिफाईड इंडस्ट्री स्थापन केली तर त्यामध्ये १ जानेवारी, २००० रोजी कामावर असलेल्या व आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या कामगारांना किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला प्राधान्याने नोकरी देण्याची व संबंधित व्यक्तींना ट्रेनिंग देण्याची तरतुद आहे. गिरणी कामगार कर्मचारी व कल्याणकारी संघ यांनी याबाबत दाखल केलेल्या याचिका क्र.१३४/२००६ मध्ये शासनाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे की, पॅकेज स्किम ऑफ इंन्सेटिव्ह, १९८८ नुसार मिलच्या जमिनीवर होत असलेला विकास / पुनर्विकास हा डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजच्या व्याख्येत बसत नाही. तथापि नियम २५ (७)(सी) नुसार गिरणी कामगारांना प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने इंडिया युनायटेड मिल नं.१ मध्ये ट्रेनिंग सेंटर व तोपर्यंत मिटकॉन कन्सल्टन्सी सर्व्हीस लिमिटेड यांच्यामार्फत ट्रेनिंग कोर्सेस देण्याबाबतची कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे.

श्री. गोविंदराव आदिक : मुंबईतील गिरणी कामगारांच्या उद्ध्वस्त संसाराची कहाणी या सदनामध्ये अनेक वेळा चर्चेला आलेली आहे. या प्रश्नाकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे यामध्ये काही वाद नाही. आता ज्या पध्दतीने प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे त्यावरुन देखील या प्रश्नाकडे पाहाण्याचा शासनाचा दृष्टीकोन किती उदासीन आहे हेच कळते.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ SBT प्रथम श्री.शिगम एम. ........ 13:30

श्री.गोविंदराव आदिक....... ता.प्र.क्र.29422.........

यासंदर्भामध्ये जे प्रश्न विचारलेले आहेत, त्याला नीट उत्तरे येथे मिळालेली नाहीत. यासंदर्भामध्ये कोर्टामध्ये जे प्रतिज्ञापत्र राज्य शासनाच्या वतीने सादर केले गेलेले आहे,त्यामध्ये हे कामगार नोकरी मिळविण्यासाठी अपात्र आहेत, असे सरकारने म्हटलेले आहे, किंबहूना म्हटले आहे की नाही याबद्दल पण होय किंवा नाही असे कोणतेही उत्तर यामध्ये दिलेले नाही,उत्तराच्या शेवटी असे म्हटले की प्रतिज्ञापत्र सादर केलेले होते. या कामगारांना अपात्र ठरविण्याचे कोणते निकष लावले ? कोणत्या कायद्यामध्ये असे निकष आहेत की, ज्या कायद्यामुळे कामगार नोकरीमधून निघून गेल्यानंतर पुनर्वसनासाठी अपात्र ठरतात,असा कोणता कायदा आहे, असा कोणताही कायदा अस्तित्वात नाही परंतु जे धोरण शासनाचे या बाबतीमध्ये आहे त्या धोरणाप्रमाणे पुनर्वसनाला प्राधान्य देण्यात आलेले आहे. राज्याच्या एका मुख्यमंत्र्यांनी नाही तर अनेक माननीय मुख्यमंत्र्यांनी,उप मुख्यमंत्र्यांनी,मंत्र्यांनी,पक्षाच्या प्रमुखांनी देखील यासंदर्भात जाहीर भूमिका अनेक वेळेला मांडलेली होती, ती अशी की, मुंबईतील गिरणी कामगारांना आम्ही विस्थापित होऊ देणार नाही, त्यांचे पुर्नवसन आम्ही समाधानकाररित्या करु प्रत्यक्षात मात्र कोणीही त्यांचे पुर्नवसन तयार करण्यासाठी तयार नाही तसेच, ज्या गिरणींच्या जमिनीवरती गिरणी कामगारांचे पुर्नवसन न होता त्या जमिनी आपण सोडून द्यावयाला निघालेला आहात. अशा प्रकारे गिरणी कामगारांच्या पुर्नवसनाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होणार असेल तर या कामगारांना न्याय मिळणे शक्य नाही. राज्यशासन या सर्व पार्श्वभूमीवर गिरणी कामगारांचे पुर्नवसन करण्यासाठी व त्यांना न्याय देण्यासाठी नवे धोरण स्वीकारणार आहे का ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी जे चार प्रश्न विचारण्यात आले होते, ते सर्व माहिती स्वरुपाने विचारण्यात आलेले आहे. सभापती महोदय, यासंदर्भामध्ये खालच्या सभागृहामध्ये सांगितले की, यासंदर्भामध्ये सुप्रिम कोर्टपर्यंत जाऊन सन 1991चा नियम 58 बदलून सन 2000 चा जो नियम 58 करण्यात आलेला आहे, त्यामध्ये जे नियम 58 चे कलम 7 ब आणि क आहे तो या गिरणी कामगारांच्या नोक-यांच्या संदर्भात आहे. एखाद्या ठिकाणी टेक्साटाईल मिल असेल आणि ती त्यांनी दुसरीकडे शिफ्ट केली किंवा त्याच ठिकाणी डायव्हर्सिफाईड इंडस्ट्री सुरु केली तर त्या ठिकाणी ते नोकरीला पात्र राहतील अशा पध्दतीचा यामध्ये उल्लेख आहे.

NN इ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ SBT प्रथम श्री.शिगम एम. ........ 13:30

श्री.राजेश टोपे...... ता.प्र.क्र. 29422........

डायव्हर्सिफाईड इंडस्ट्री कोणाला म्हणावे, याची उद्योग खात्यातर्फे व्याख्या व्याख्या तयार केली गेलेली आहे आणि यासंबंधीचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. यासंदर्भात कोर्टामध्ये केस चालू आहे व काल ही केस कोर्टासमोर आली होती व त्याच्या सुनावणीकरिता 31 ऑगस्ट,2007 ही पुढील तारीख देण्यात आलेली आहे. या दाव्यासाठी शासनाच्या वतीने ॲफिडेव्हिट मध्ये अस्तित्वात असलेल्या नियमांतर्गत डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीची व्याख्या स्पष्ट केली गेलेली आहे. गिरणी कामगाराबाबतचे शासनाचे धोरण एवढयापुरतेच मर्यादित राहणार नाही तर या प्रकरणी जो कोर्टाचा निर्णय होईल तो देखील शासनाला मान्य राहील. नियम 58 ब आणि 58 क नुसार ज्यांनी इंडस्ट्रीचे डायव्हर्सिफिकेशन केले आहे. कमर्शियल इंडस्ट्री किंवा इतर इंडस्ट्रीचा बदल केला आहे,त्यामधील कागारांना त्याच ठिकाणी नोकरी मिळण्याची शाश्वती नसते. या दृष्टीकोनातूनही शासन विचार करीत आहे व त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेणार आहे.

यानंतर श्री.कानडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29422 पुढे सुरु...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सगळे अनाडी आहोत हे आम्ही मान्य करतो. शिफ्टींग आणि डायव्हर्सिफाईड यामधील अर्थ आम्हांला अजिबात कळत नाही. To deviate from the main purpose is diversification. आपण आता सांगितले की, ही मिल इकडून तिकडे गेली याचा अर्थ that is shifting कापड गिरण्यांनी दुसरीकडे शिफ्ट होऊन कापड गिरणी काढली तर कापड गिरणीतील कामगार बेकार झाला. कापड गिरणी गेली येथे मॉल आले. एका धंद्यातून दुसऱ्या धंद्यात परिवर्तित झाले तर त्याला Diversifiction of Business असे म्हणतात. एक मिल दुसरीकडे गेली असती तर that is shifting of the Industry. माझा प्रश्न असा आहे की, गिरण्यांच्या जागेवर जे मॉल आलेले आहेत त्याठिकाणी ते Diversifiction of business मध्ये येतात. कायद्याने लोकांना जर तुम्ही नागडे-उघडे करणार असाल तर कायदा कशासाठी आहे? बंद पडलेल्या गिरण्यांतील कामगारांना शासन नोकऱ्या मिळवून देणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी माझ्या पहिल्या उत्तरात स्पष्ट सांगितले आहे. मूळ जे पाच प्रश्न विचारले होते त्यातील पहिले चार प्रश्न हे माहिती स्वरुपातील होते. आजचा अस्तित्वात असलेला नियम काय आहे तो मी सांगितला. त्याचप्रमाणे डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजची जी व्याख्या ॲफेडेव्हीटमध्ये करुन दिलेली आहे आणि जी उद्योग विभागाने केलेली आहे ती मी वाचून दाखवितो. माननीय श्री. रावते साहेबांच्या प्रश्नाला मी सकारात्मक उत्तर देणार आहे. व्याख्या अशी आहे की "An existing unit, which creates an additional fixed capital investment for additional production manufacturing facilities for manufacturing of different products at the same location." सभापती महोदय, यामध्ये एकच गोष्ट आहे की, आज आहे त्याच जागेवर त्याच प्रॉडक्शनऐवजी इतर प्रॉडक्शन जर चालू असेल म्हणजे कापडाऐवजी प्लॅस्टीक किंवा कागदाचे प्रॉडक्शन म्हणजे ॲडीशन कॅपीटल इन्स्व्हेस्टकरुन मॅन्युफॅक्चरींग उद्योग चालू असेल तर अशा पध्दतीने डायव्हर्सिफाईड केले तर नोकरी देणे बंधनकारक राहील. काही गिरणी मालक जे सर्व्हीस इंडस्ट्री टाकतात त्याठिकाणी नोकरी मिळण्याची शाश्वती राहत नाही त्याठिकाणी शासनाकडून निश्चितप्रकारे विचार चालू आहे. त्यामुळे डीसी रुलमधील कलम 58 च्या (ब)आणि(क) खाली (ड) हे कलम टाकण्यात येईल आणि हे

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेशे टोपे...

ता.प्र.क्र. 29422

(ड) कलम कसे असेल ते मी याठिकाणी सांगू इच्छितो. कलम (ड) म्हणजे "Notwithstanding anything contained above, if and when a Cotton Textile Mill is taken up for development, redevelopment for any Industrial, Commercial purpose the Mill Owner or the Developer or the occupier of the premises shall on priority provide employment to the workers or at least one member of the family of the worker in the employment of the Mill on the 1st Jan.2000 possessed the requisite qualification or the skill of the job." सभापती महोदय, याचा अर्थ कलम (ड) टाकले तर कमर्शिअलमध्ये काही डायव्हर्सिफाईड केले तरी सुध्दा त्यांना नोकरी देणे बंधनकारक राहणार आहे आणि अशा पध्दतीची तरतूद कायद्यामध्ये करण्यासाठी शासनाकडून पावले उचलली जात आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कायदा शासन बदलणार आहे आणि नवीन कायदा आणणार आहे. परंतु तोपर्यंत मॉलमधील सर्व नोकऱ्या परप्रातियांनी भरलेल्या आहेत त्याबाबत शासन काय करणार आहे ? तो कायदा त्याठिकाणी भूतलक्षी प्रभावाने लागू करणार काय ?

नंतर श्री. भोगले

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29422.............

श्री.राजेश टोपे : खऱ्या अर्थाने अशा प्रकरणामध्ये शासनाची भूमिका मी या सभागृहामध्ये मांडली. सगळ्यांनाच नोकऱ्या मिळाव्यात हा दृष्टीकोन ठेवून शासन यामध्ये काही बदल करु इच्छिते. सध्या कोर्टात केस चालू असून कोर्टाचा निकाल सुध्दा अभिप्रेत आहे. परंतु शासनाची इच्छा, भूमिका आणि धोरण काय असेल हे मी स्पष्ट केले. पुढील महिन्यात केसचा अंतिम निकाल येण्याची अपेक्षा असून या प्रकरणी शासन पॉझिटिव्ह असणार आहे. कोर्टाच्या अंतिम निकालाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही केली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये शासनातर्फे जे सांगितले आहे त्यामध्ये विसंगती आहे. शासनाने म्हटले आहे की, नियम 58(7) (बी) व (सी) नुसार मिल मालकाने मिल स्थलांतरित केली वा डायव्हर्सिफाईड इंडस्ट्री स्थापन केली तर त्यामध्ये 1 जानेवारी, 2000 रोजी कामावर असलेल्या व आवश्यक शैक्षणिक पात्रता असलेल्या कामगारांना किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीला प्राधान्याने नोकरी देण्याची व संबंधित व्यक्तींना ट्रेनिंग देण्याची तरतूद आहे. खरे म्हणजे कमर्शियल ॲक्टिव्हीटी सुरु केली तर त्यांना नोकरी दिली पाहिजे हे शासनाला अभिप्रेत आहे. या गिरण्यांमध्ये 2.5 लाख कामगार होते, ते शासनाच्या या दळभद्री निर्णयामुळे आज उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे या कामगारांमध्ये प्रचंड असंतोष आहे. आजही त्यांचा संघर्ष सुरु आहे. अशा वेळी शासनाने नियम 58 (7) मध्ये सुधारणा करताना (डी) पोटकलमाचा समावेश का केला नाही? डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीची व्याख्या ही उद्योग विभागाने केली, ती व्याख्या योग्य आहे का हे तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. Diversified Industry on the same place हा प्रश्न महत्वाचा आहे. त्याठिकाणी आज मॉल्स उभे ठाकले आहेत. त्या मॉल्समध्ये जे प्रॉडक्ट्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत ते अन्य ठिकाणाहून उत्पादित करुन तेथे विक्रीसाठी पाठविले जातात. या व्यापक दृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. शासन संकुचित दृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पाहते. गिरणी कामगार आणि त्यांचे कुटुंबिय आज देशोधडीला लागले आहेत. ज्याप्रमाणे नियम 58(7) मध्ये पोटकलम (बी) व (सी) अंतर्भूत करण्यात आले त्याचवेळी पोटकलम (डी) का अंतर्भूत करण्यात आले नाही? या (डी) पोटकलमाचा फायदा घेऊन जे उद्योग त्याठिकाणी उभे करुन त्या उद्योगांमध्ये परप्रांतातील कामगार आणण्याचा प्रयत्न केला जातो त्याला पायबंद घालणार आहात का?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MAP/ 13:40

ता.प्र.क्र.29422...........

श्री.राजेश टोपे : याठिकाणी सांगण्यात आले की, शासन कामगारांना उद्‌ध्वस्त करावयास निघाले आहे. या संदर्भात माझा मुद्दा एवढाच आहे, नियम 58 मध्ये शासनाने बदल केल्यामुळे आज ज्या काही उपलब्धी झाल्या त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. 900 कोटी रुपयांची एकूण देय रक्कम होती ती रक्कम दिलेली आहे. कामगारांना घरे देण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला आहे. सध्या आहे त्याच ठिकाणी कामगारांना घरे दिली जातील हा निर्णय कालच विधानसभेत सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केला आहे. त्यामुळे कामगारांबाबतचे धोरण जाणीवपूर्वक केलेले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

शेवटी एखादा निर्णय घेत असतांना त्यामध्ये जर काही त्रुटी असतील तर त्या लक्षात आल्यानंतर त्यामध्ये आपण बदल करीत असतो व त्यादृष्टीने बदल करण्याचा शासन विचार करीत आहे. डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीज स्थापन केल्यानंतर पूर्वी तेथील कामावर असलेल्या कामागारांना नोकरी देण्यात येते. परंतु कमर्शिअल इंडस्ट्रीज स्थापन केली तर तेथे कामगारांना नोकरी मिळत नसे म्हणून तेथे सुध्दा कामगार किंवा कामगारांच्या मुलांना नोकरी मिळावी म्हणून त्यासंदर्भात तरतूद करण्याबाबत शाससन विचार करीत आहे.

**सभापती** : खरे म्हणजे प्रश्नोत्तराचा तास दीड वाजताच संपलेला होता परंतु प्रश्नोत्तराचा तास 1.45 वाजेपर्यंत वाढविण्यात आलेला आहे. कॅबिनेटमंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले होते व त्यानंतर 10 मिनिटे सभागृहाचा वेळ वाया गेलेला होता. त्यामुळे वाया गेलेला सर्व वेळ प्रश्नात्तराला देण्यात आलेला आहे तसेच प्रश्नोत्तराला अजून 5 मिनिटे वेळ मी वाढूवून दिलेला आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य गोविंद आदीक यांनी प्रश्न विचारल्यानंतर पुढील कामकाज घेण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजची व्याख्या आता माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेली आहे. त्यामध्ये मॉल आणि सर्व्हीस इंडस्ट्रजचा समोवश नाही. परंतु तुम्ही यासंदर्भात प्रतिज्ञा पत्र सादर केलेले आहे काय? या प्रतिज्ञापत्रात कामगारांना नोक-या मिळणार नाहीत अशा पध्दतीने आपण प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे काय? शासन या धोरणात काही बदल करणार आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. गोविंदाव आदीक यांनी विचारला होता. सन 2000 सालच्या आकडेवारीनुसार मुंबईतील 47 गिरण्या बंद पडलेल्या असून त्यामुळे 60 हजार कामगार उध्वस्त झालेले आहेत. पात्र असलेले कामगार किंवा त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तिला नोकरी देण्याच्या संदर्भात आपण काही प्रयत्न केलेला आहे का? उत्तरात असे म्हटले आहे की, 1988 नुासर मिलच्या जमिनीवर होत असलेला विकास/पुनर्विकास हा डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजच्या व्याख्येत बसत नाही. म्हणजे या व्याख्येत मॉल आणि सर्व्हीस इंडस्ट्रीजचा समावेश होणार नाही. प्रश्न असा येतो की, जर कामगार वयामुळे पात्र ठरत नसतील तर त्यांची मुले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

अपात्र कशी काय ठरु शकतात, या मुलांना अपात्र कोणी ठरवले? किती गिरणी कामगारांची मुले सुशिक्षित बेकार आहेत, किती मुले एस.एस.सी. झालेली आहेत, किती मुले पदवीधर झालेली आहेत याची माहिती शासनाकडे आहे काय? तसेच किती गिरण्या डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजच्या व्याख्येत बसत नाहीत? दुसरी गोष्ट अशी की, आता आपण जो बदल सुचवित आहात त्यामध्ये जर वेळ लागला तर या इंडस्ट्रीजमध्ये नोकरीसाठी जागाच शिल्लक राहणार नाही त्या भरुन जातील त्यामुळे अशा परिस्थिती या कामगारांच्या मुलांना नोकरी कोठे देणार? याबाबत आपण काही विचार केलेला आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजच्या धोरणात बदल करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे. मुले अपात्र किंवा त्यांना नोकरी लागू नये अशा पध्दतीने अफेडवीट केलेले नाही. वस्तुस्थिती आहे ती त्या प्रतिज्ञा पत्रात दिलेली आहे. तसेच नियम 58 अंतर्गत जी तरतूद आम्ही करणार आहोत त्यासंबंधीचे (डी) क्लॉजचा समावेश करणार आहोत त्यासंबंधीची माहिती येथे मी दिलेली आहे.सध्याच्या डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीजच्या व्याख्येत कमर्शिअल विकास व मेन्यूफेक्चर हे बसत नाहीत हे सुध्दा व्याख्येतयाव म्हणून नवीन तरतूद अपेक्षित आहे. म्हणून नियम 58 मध्ये बदल करण्याचा धाडसी निर्णय नगर विकास विभागाने घेतला आहे. हा बदलकरण्याचा धाडसी निर्णय नगर विकास विभागने घेतला आहे. बदल पुढे केला जाईल. या नवीन तरतुदीचा अनेक लोकांना नोकरी मिळण्यास उपयोग होईल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29422..........

श्री.राजेश टोपे.............

कामगारांच्या मुलांची पात्रता असावी अशी अट घालण्यात आलेली आहे त्याचप्रमाणे त्यांना ट्रेनिंग देण्यात यावे याचा देखील अंतर्भाव आहे. म्हणून लालबाग विभागात बेस्ट ऑफ ट्रेनिंग इन्स्टीटयूट ट्रेनिंग स्कूल काढण्यात येत आहे. त्यामुळे कामगारांची मुले चांगली ट्रेन्ड होतील. सभापती महोदय, बंद पडलेल्या गिरण्या डेड ॲसेट होत्या. कामगारांची देणी द्यावयाची होती, त्यांना घरे उपलब्ध करुन द्यायची होती, त्यांच्या मुलांना नोकऱ्या द्यावयाच्या होत्या त्या अनुषंगाने नियम 58 आणलेला आहे. गिरणी कामगारांना सर्वप्रकारे मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे. किती कामगारांच्या मुलांना नोकऱ्या लागल्या याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, या प्रश्नाचे महत्व लक्षात घेऊन या प्रश्नासाठी आपण जास्त वेळ दिला त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. कामगारांच्या वतीने आपले आभार मानतो. राज्यमंत्र्यांनी देखील अतिशय चांगल्या रितीने सभागृहाचे समाधान करण्याचा चांगला प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यांच्या हातात काही नाही याची मला माहिती आहे. मुंबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न ज्वलंत बनला आहे. या गिरण्यांतून जवळपास अडीज लाख गिरणी कामगारांच्या कुटुंबांचे पालन-पोषण होत होते. एकूण 65 गिरण्यांपैकी फक्त 11 गिरण्या राहिलेल्या आहेत. त्यापैकी नऊ गिरण्या एन.टी.सी.च्या आहेत तर दोन गिरण्या खाजगी मालकीच्या आहेत. काही खाजगी मालकांनी त्यांच्या गिरण्यांची जागा विकून, त्याचे पैसे घेऊन ते परागंदा झालेले आहेत. आता फक्त एन.टी.सी.च्या गिरण्या राहिलेल्या आहेत. उत्तरात स्थलांतरीत आणि डायव्हर्सिफाईड असा उल्लेख करण्यात आलेला आहे. यामध्ये आणखी एक प्रकार आहे त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणून मघाशी सांगितले होते की, शासनास धोरणामध्ये काही बदल करायचा आहे काय ? काही गिरणी मालकांनी त्यांच्या गिरण्या स्थलांतरीत केल्या. माझ्या माहितीप्रमाणे फक्त दोन गिरणी मालकांनी त्यांच्या गिरण्या स्थलांतरीत केल्या आहेत. जास्त

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29422..........

श्री.गोविंदराव आदिक........

प्रमाणात गिरण्या स्थलांतरित झालेल्या नाहीत. याठिकाणी डायव्हर्सिफाईडचा मुद्दा विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून उपस्थित करण्यात आला. ही गोष्ट खरी आहे की, काही ठिकाणी मॉल्स उभे झालेले आहेत तर काही ठिकाणी दुसरे उद्योग सुरु झालेले आहेत. या बाबी डायव्हर्सिफाईडच्या व्याख्येत येणाऱ्या नाहीत. सभापती महोदय, कामगारांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी शासनाची आहे. आपण रुल 58 केला किंवा त्यामध्ये कलमे घातली तरी त्यामुळे कामगारांचे प्रश्न सुटणार नाहीत. कामगारांचे पुनर्वसन करणे ही शासनाची बांधिलकी आहे आणि शासन ती टाळू शकत नाही. स्थलांतरीत आणि डायव्हर्सिफाईड मुद्यांपेक्षा ज्या गिरणी मालकांनी जमिनी विकून, गिरण्यातील लोखंड विकून, त्यातून मिळालेल्या पैशातून दुसऱ्या राज्यात धंदा सुरु केलेला आहे. त्याठिकाणी मुंबईतील गिरणी कामगार जाऊ शकत नाहीत. शेवटी कामगारांच्या पुनर्वसनाचा प्रश्न महत्वाचा आहे. कामगारांचे खऱ्या अर्थाने पुनर्वसन व्हावे यासाठी एक योजना आखण्यात आली होती. ती योजना मी माननीय राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणतो. कामगारांच्या मुलांना प्रशिक्षण देऊन, आर्थिक सहाय्य देऊन, त्यांच्या स्वत:च्या को-ऑपरेटीव्ह संस्था काढून, त्यांना गिरण्यांच्या मशिनरी देऊन, ग्रामीण भागात, अविकसित भागात इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन त्यांना उभे करावे अशी ती योजना होती. तेव्हा या योजनेचा शासन विचार करणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29422....

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सुचविलेल्या बदलाच्या अनुषंगाने यातील बरेचसे विषय सुटण्याच्या दृष्टीकोनातून निश्चित प्रकारे मार्ग उपलब्ध होईल, असा माझा विश्वास आहे. कारण, कमर्शिअल इंडस्ट्रीज् जी विकसित होईल तसेच जे ॲक्यूपायअर असतील त्यांनाही हे बंधनकारक राहणार आहे की, तेथील कामगार किंवा त्यांच्या मुलांना नोकरी द्यावी. डायव्हर्सिफाईड इंडस्ट्री स्थापन केली किंवा कमर्शिअल इंडस्ट्री स्थापन केली तरी त्यांना या दोन्ही परिस्थितीमध्ये नोकरी देणे बंधनकारक राहील. याठिकाणी आता सन्माननीय सदस्यांनी जी पुनर्वसनाची सूचना केली, त्यासंबंधी जरुर विचार केला जाईल

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी.</u>**

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. नियम 289 च्या माध्यमातून मी या सभागृहामध्ये पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ओलिताखालील जमिनी सेझ्‌ ासाठी घेऊ नयेत, अशाप्रकारची मागणी केली होती. त्या चर्चेच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे आश्वासन दिले होते व त्यांनी त्या आश्वासनाची पूर्तता केलेली असून सेझमधून तेथील 22 गावे वगळण्यात येतील, असे जे माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी आश्वासन दिले, त्याबद्दल मी राज्य शासनाचे पेण व रायगड येथील शेतक-यांच्या वतीने आभार मानतो. याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांनी आश्वासनाची पूर्तता केली असल्यामुळे रायगड जिल्हयातील विशेषतः पेण तालुक्यातील शेतकरी आनंदित झालेले आहेत. त्यांच्या वतीने मी राज्य शासनास धन्यवाद देतो व त्यांचे अभिनंदन करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रायगड येथील सेझ प्रकल्पातील प्रत्यक्षात अंतर्भाव केलेल्या 45 गावांपैकी पेण तालुक्यातील 22 गावे वेगळयाचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. सभापती महोदय, हेटवणे गावातील शेतकऱ्यांनी सेझच्या विरोधात उपोषण सुरु केले आहे. तेथील शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण होण्यासंबंधी याठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यांच्या काही मागण्या सरकारने मान्य केल्या, परंतु काही मागण्या अजूनही प्रलंबित आहेत. उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांना इस्पितळात दाखल करावे लागले, तरीही त्यांचे आंदोलन हटले नाही. अजून त्यांच्या पाचपैकी चार मागण्या प्रलंबित असून त्यांनी त्यांचा आग्रह सोडलेला नाही. त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. बेकायदेशीर व खोटया जमीन विक्रीस आळा घालावा, आतापर्यंत झालेल्या साठेकरारांची माहिती उघड करावी, प्रदुषित पाणी शेतीत घुसून शेतीचे जे नुकसान झाले त्याची तपासणी व नुकसान भरपाई द्यावी, सेझ कायदा रद्द करावा व ताबडतोब सक्तीचे भू-संपादन थांबवावे व भू-संपादन कायदा कलम 6 चे नोटिफिकेशन मागे घ्यावे अशा या चार इतर मागण्या मान्य न झाल्याने त्यांचे आंदोलन चालूच राहणार आहे. या अधिवेशन काळात या उर्वरित चार मागण्यांच्या बाबतीत लोकांना न्याय मिळवून द्यावा, अशी मी यानिमित्ताने शासनास विनंती करीत आहे.

-----

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आज मी सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी देणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, दिनांक 16.7.2007 रोजी कोयना धरण व्यवस्थापन विभागाने कोळकेवाडी धरणातून मोठया प्रमाणात पाणी सोडले. ते इतक्या मोठया प्रमाणात पाणी सोडले की, गेल्या 35 वर्षामध्ये अशाप्रकारचे पाणी कधीच सोडण्यात आले नव्हते. सुदैवाने त्यावेळी कोकणामध्ये पाऊस चालू नव्हता. तरीदेखील एवढया मोठया प्रमाणात पाणी सोडल्यामुळे शेतकऱ्यांच्या वाडया, स्मशान शेड, नदी आणि कॅनॉलच्या बाजूची शेती वाहून गेली. त्यामध्ये काही शेतकऱ्यांची बागायती जमीनही पूर्णपणे वाहून गेलेली आहे. ही पहाटेची वेळ होती, अन्यथा फारमोठा अनर्थ व जीवित हानी झाली असती. कोयना धरण व्यवस्थापनाच्या अधिकाऱ्यांनी फार मोठया प्रमाणात कोळकेवाडी व पोफळे या दोन्ही गावाच्या बाजूने पाणी सोडल्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. त्यामुळे याची शासनाने दखल घेऊन तेथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी व संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मी याठिकाणी औचित्याच्या मुद्दाद्वारे विनंती करीत आहे.

-----

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य, ॲड.अनिल परब यांनी दोन औचित्याच्या मुद्यासंबंधीच्या सूचना दिल्या आहेत. मला वाटते की सन्माननीय सदस्यांनी यापैकी कोणताही एक औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, दोन्ही औचित्याचे मुद्दे अतिशय महत्वाचे आहेत. अतिशय थोडया वेळात मी ते मांडतो. कृपया, मला दोन्ही मुद्दे मांडण्याची परवानगी द्यावी.

**सभापती** : ठीक आहे, अतिशय थोडया वेळात आपण दोन्ही मुद्दे मांडावेत.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माझा पहिला औचित्याचा मुद्दा असा आहे की, जे शासकीय कर्मचारी महाविद्यालयांमध्ये वेगवेगळया वेतनश्रेणींमध्ये काम करीत आहेत त्यापैकी काही कर्मचा-यांचे सेवानिवृत्तीचे वय 58 वर्षे आहे तर काहींचे 60 वर्षे आहे. बाजुबाजूला बसून काम करणा-या कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीच्या वयामध्ये मात्र तफावत आहे. या औचित्याच्या मुद्याव्दारा माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, निवृत्तीच्या वयामधील ही तफावत दूर करावी व या सर्व कर्मचा-यांना न्याय द्यावा.

सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा 'वैश्य वाणी' या जातीच्या दाखल्यामध्ये निर्माण झालेल्या गोंधळाबाबतचा आहे. काल ज्यावेळी जात पडताळणी दाखल्याबाबतचे विधेयक चर्चेला आले होते त्यावेळी या मुद्याचा उल्लेख करण्यात आला होता.

सभापती महोदय, 'वैश्य वाणी' ही जात ज्यावेळी राजपत्रात घेतली गेली त्यापूर्वी पासून 'वैश्य वाणी' असे दोन वेगवेगळे शब्द न घालता सर्व कागदपत्रांमध्ये 'वाणी' ही जात लिहिली जात होती. आज गॅझेटमध्ये 'वैश्य वाणी' असा शब्दप्रयोग आल्यामुळे जे उमेदवार निवडून आले आहेत त्यांचे दाखले जात पडताळणी समितीने अवैध ठरविले, त्यांना अपात्र ठरविण्यात आले व त्यांच्यावर अन्याय झाला आहे. नातेसंबंधामध्ये हे सिद्ध झाले आहे की, हा त्याच घरामध्ये जन्माला आला आहे, त्याची जात वैश्य वाणी' आहे. त्यांच्या मुलांना जात पडताळणी समितीकडून दाखला मिळाला आहे, त्याच्या जातीचा दाखला वैध ठरविला आहे. दुस-या इतर नातेवाईकांना देखील असाच दाखला मिळाला आहे. परंतु, केवळ या उमेदवारांच्या कागदपत्रांमध्ये पूर्वीपासून 'वाणी' असा उल्लेख असल्यामुळे व 'वैश्य' या शब्दाचा अभाव असल्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. वेगवेगळया पुराव्यांच्या आधारे हे सिद्ध झाले आहे की, 'वाणी' आणि 'वैश्य वाणी' ही जात एकच आहे. अशा निवडून आलेल्या नगरसेवकांवर, लोकप्रतिनिधींवर अपात्रतेची टांगती तलवार

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब..........

आहे. आपल्यामार्फत या औचित्याच्या मुद्याव्दारा शासनाला मी विनंती करतो की, याबाबतीत शासनाने योग्य तो खुलासा करुन ही जात एकच असल्यामुळे या उमेदवारांना पात्र घोषित करावे.

सभापती महोदय, आपण मला दोन अतिशय महत्वाचे औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, भिवंडी येथील बार असोसिएशनने गेल्या पाच दिवसांपासून न्यायालयाचे कामकाज पूर्णपणे बंद पाडले आहे. भिवंडीची वाढती लोकसंख्या, वाढते दावे आणि लवकरात लवकर दाव्यांचा निकाल लागावा यासाठी अतिरिक्त जिल्हा न्यायालय व सत्र न्यायालय निर्माण व्हावे, अशा प्रकारची त्यांची मागणी आहे. यासंदर्भात न्यायालयाची मागणी करणारा प्रस्ताव राज्य शासनाकडे सन 1988 मध्ये पाठविण्यात आला होता व तो मान्यही झाला आहे. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने सुध्दा अतिरिक्त न्यायालय स्थापन करण्यास मंजूरी दिली आहे. तथापि, याबाबतची कार्यवाही अद्याप शासनाकडून न झाल्यामुळे भिवंडी येथे बार असोसिएशनने न्यायालयाच्या कामामध्ये अडथळा निर्माण केला आहे. त्यांनी वारंवार मागणी करुन देखील शासनाने त्यांच्या मागणीकडे लक्ष न दिल्यामुळे गेल्या पाच दिवसांपासून न्यायालयाचे काम बंद आहे व सर्वसामान्य माणसांना त्याचा त्रास होत आहे. ही मागणी पूर्ण करण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने लक्ष द्यावे, भिवंडी येथील न्यायालयाचे कामकाज त्वरित सुरु व्हावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारा आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, राज्यसभा आणि विधानपरिषद ही सभागृहे लोकशाहीची महत्वाची अंग मानली जातात. गेल्यावर्षी विधान परिषदेच्या काही सन्माननीय सदस्यांचा ज्यावेळी निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यावेळी अशी चर्चा झाली होती की, राज्यसभेच्या खासदारांची निवड विधानसभेतून होते. या कार्यपद्धतीमध्ये गेल्या काही वर्षात सुधारणा करण्यात आली. ज्यावेळी राज्यसभेच्या खासदारांसाठी आमदारांचे मतदान होते त्यावेळी त्या त्या पक्षाच्या 'व्हीप'ना कळवून नंतर ते मतदान केले जाते, जेणेकरुन, पक्षप्रणाली मजबूत होऊ शकते आणि यामधील गैरप्रकारांना आळा बसू शकतो. या औचित्याच्या मुद्याव्दारा आपल्यामार्फत मी सदनाला एक विनंती करणार आहे. आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ..........

सभापती महोदय, त्यासाठी कायद्यामध्ये बदल करुन हे मतदान खुल्या पद्धतीने करण्यासाठी विधानपरिषदेमार्फत आणि शासनामार्फत पावले उचलण्यात यावीत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर तसेच, सर्व पक्षीय ज्येष्ठ सदस्य सभागृहामध्ये उपस्थित आहेत. विधानपरिषदेने त्याबद्दल दखल घेऊन विधानसभा आणि विधानपरिषदेमार्फत केंद्रशासनाकडे पाठपुरावा करुन या कायद्यामध्ये बदल करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीते.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रातील समुद्राच्या किनारपट्टीवर हजारो वर्षापासून मच्छिमारांची वस्ती आहे. परंतु त्यांच्या घराखालची जमीन त्यांच्या मालकीची नाही. ज्यावेळी तेथे एखादा प्रकल्प येतो त्यावेळी त्यांना विस्थापित केले जाते. परंतु त्यांना मोबदला मिळत नाही. या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाला अशी विनंती करतो की, मच्छिमारांचा मच्छीमारी करण्याचा जो पारंपारिक हक्क आहे तो कायदेशीर करण्यात यावा, त्याला कायद्याचे स्वरुप देण्यात यावे. म्हणजे ज्यावेळी मच्छीमार विस्थापित होतील त्यावेळी त्यांना मोबदला मिळेल. शेतक-यांना विस्थापित झाल्यानंतर जमिनीचा मोबदला मिळतो. परंतु मच्छिमारांना विस्थापित केल्यानंतर मोबदला मिळत नाही. मच्छिमारांना विस्थापित केल्यानंतर त्यांना मोबदला मिळण्याच्या दृष्टीने कायद्यामध्ये बदल करण्यात यावा, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, आपल्यामाध्यमातून मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे एका गंभीर विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो. गेल्या काही महिन्यांपासून सरकारी आणि खाजगी हॉस्पिटलमधील डॉक्टरांवर निरनिराळया प्रकारचे हल्ले होत आहेत. डॉक्टरांच्या तोंडाला काळे फासले जाते. कायदा हातामध्ये घेण्याचा प्रकार मागच्या काही महिन्यांपासून सुरु आहे. काही दिवसापूर्वी ठाण्यामध्ये असा प्रकार घडला होता. राजरोसपणे असे प्रकार घडत आहेत. कदाचित काही वेळा डॉक्टरांकडून हलगर्जीपणा होत असेल किंवा एखादी घटना घडल्यामुळे असे प्रकार

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .........

होत असतील. परंतु नंतर असे निदर्शनास येते की, रुग्णाचा मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झ ाालेला नसतो. हॉस्पिटलमधील सामानाची मोडतोड केली जाते, डॉक्टरांना व कर्मचा-यांना धक्काबुक्की केली जाते. अशा प्रकारच्या घटना घडत असल्यामुळे हॉस्पिटलमध्ये काम करणारे डॉक्टर, कर्मचारी प्रचंड दबावाखाली काम करीत आहेत. त्यांच्यावर मानसिक दबाव आहे. अशा प्रकारच्या घटनांमुळे हॉस्पिटलमधील पेशंटला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, कायदा हातात घेतला जाणार नाही आणि डॉक्टर सुध्दा त्यांची सेवा देण्याचे काम योग्य प्रकारे करु शकतील यासंदर्भात शासनाने ठोस कार्यवाही करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, अनुसूचित जाति और अन्य पिछड़ी जातियों के कामगार अपनी मांग के संदर्भ में आंदोलन कर रहे हैं. मेरा शासन से प्रश्न है कि अगर सोशल कॉन्सेप्ट के आधार पर अनुसूचित जाति की मान्यता होती है तो फिर धर्म के आधार पर भेदभाव क्यों है ? ये मुसलमान हैं, इसलिए कई जातियों को अनुसूचित जाति में नहीं लिया जाता है. उदाहरण के तौर पर मुसलिम मेहतर, खाटिक, महार और गारोडी इत्यादि जातियों को अनुसूचित जाति की सहूलियतें नहीं मिलती हैं. इनको अनुसूचित जाति की सहूलियतें मिलनी चाहिए. ये लोग आज आजाद मैदान पर धरना आंदोलन कर रहे हैं. इस प्रश्न को हल करने के लिए माननीय मुख्यमंत्री को बैठक बुलानी चाहिए. मैं इस बात का फॉलो-अप करते करते थक गई हूॅं. गरीब और पिछड़े हुए समाज के प्रश्नों की तरफ शासन कब ध्यान देगा ? इस औचित्य के मुद्दे के द्वारा मैं शासन से पूछना चाहती हूॅं कि मुसलिम समाज सामाजिक, आर्थिक और राजकीय दृष्टि से अनुसूचित जाति और अनुसूचित जमाति से भी अधिक पिछड़ा हुआ है, इस बात का जिक्र सच्चर कमेटी की रिपोर्ट में हुआ है. इस पर शासन को अमल करना चाहिए, यह बात मैं इस औचित्य के मुद्दे के द्वारा कहना चाहती हूॅं.

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय सदस्यांनी जे औचित्याचे मुद्दे मांडले आहेत, त्याबाबत मी विधानमंडळ सचिवालयाला सांगू इच्छितो की, त्यांनी संपूर्ण मुद्यांचा परामर्श घेऊन संबंधित कार्यवृत्त मंत्रालयीन विभागाला पाठवावे. विभागाने याबाबतची योग्य ती कार्यवाही तातडीने करुन त्याची माहिती संबंधित सदस्यांना कळवावी. तसेच या अनुषंगाने जी उत्तरे येतील त्याची प्रत विधानमंडळ सचिवालयाकडे पाठवावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मागील वर्षाच्या पुरवणी मागण्यामध्ये 12 कोटी रुपयांचे सरबत खरेदीबाबत तरतूद केली होती. हा उल्लेख महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने केला होता. या रकमेची तरतूद आदिवासी विकास विभागानेही केली होती त्याप्रमाणे 12 कोटी रुपयांचे सिरप खरेदी करण्यासाठी प्रस्ताव होता. सरबतला मी सिरप म्हणणार आहे. त्यावेळी माननीय उपसभापतींनी शासनाला निवेदन करण्यास सांगितले होते. मंत्री महोदयांनी यावर निवेदन देखील केले होते. सभापती महोदय, या सर्व व्यवहारात कोठेही पारदर्शकता नाही. कुपोषित बालकांसाठी औषधे खरेदी करण्यात आली होती, यामध्ये सिरपच्या जागी काही प्रमाणात माल्ट खरेदी करण्यात आले आहे. कुपोषित बालकांसाठी माल्ट अनावश्यक आहे, असे माझे मत आहे. एकूण 13 कोटी 99 लाखाची खरेदी महिला व बालकल्याण विभागाकडून करण्यात आली आहे. कुपोषित बालकांच्या नावाने अनावश्यक औषधे खरेदी केली जात असतील तर ते चुकीचे असून प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्यासारखे आहे. याची आपल्यामार्फत शहानिशा व्हावी व या व्यवहारातील पारदर्शकता सभागृहाला ज्ञात व्हावी, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय सदस्यांनी सभागृहात मांडलेल्या औचित्याचे मुद्दयावर माननीय मंत्री महोदयांनी कार्यवाही करावी. केलेली कार्यवाही संबंधित सदस्यांना कळविण्यात यावी व उत्तराची प्रत या सचिवालयाकडे पाठवावी.

मी एक घोषणा करतो की, महाराष्ट्र विधान परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधान परिषदेच्या तारांकित प्रश्नाच्या दुहेरी बॅलेट पध्दतीबाबत तसेच विधान परिषद प्रश्नांच्या एकूणच सर्वदान कार्यपध्दतीबाबत विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांची सोमवार दिनांक 30 जुलै, 2007 रोजी दुपारी 3.30 वाजता मध्यवर्ती सभागृह (चौथा मजला) विधान भवन, मुंबई येथे बैठक आयोजित केलेली आहे. सदर बैठकीबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना दिनांक 23 जुलै, 2007 रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. कृपया आपण सर्वांनी या बैठकीला उपस्थित राहावे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 14:15

<u>**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**</u>

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादितचा सन 2004-05 चा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2004-05 चे वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

<u>**पंचायती राज समितीचा अकरावा व बारावा अहवाल सभागृहास सादर करणे.**</u>

श्री. दिवाकर रावते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा 2007-08 चा अकरावा व बारावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : पंचायती राज समितीचा अकरावा व बारावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

<u>**पुरवणी मागण्यांबाबत अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.**</u>

श्री. राणा जगजितसिंह पाटील (राजशिष्टाचार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "मंत्रिमंडळ सदस्यांचा दिनांक 9 नोव्हेंबर 2004 रोजी आझाद मैदान, मुंबई येथे आयोजित केलेल्या शपथविधी समारंभाप्रसंगी प्रत्यक्ष झालेल्या रूपये 33.43 लक्ष इतक्या खर्चाची पुरवणी मागणी- या विषयावर दिनांक 23 मार्च 2007 रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

<u>**अधिक माहिती**</u>

( प्रेस : कृपया सोबतची अधिक माहिती येथे छापावी. )

...... डब्ल्यूडब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, पांडुरंग फुंडकर, अरविंद सावंत यांनी "शासनाने राज्यातील आदिवासी कोळी समाजाला सन 1999 पासून मागासवर्गीय जातीचे दाखले देण्याचे बंद करणे या संबंधात अनुसूचित जमाती संबंधात काढलेला जी.आर. रद्द करावा व 1995 साली काढलेल्या जी.आर.ची व्याप्ती 2007 पर्यंत वाढविण्याची होत असलेली मागणी. महादेव कोळी व तत्सम कोळी समाजावर होत असलेला अन्याय, कोळी समाजातील जातीच्या दाखल्याबाबत शासनाकडून होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "चंद्रपूर जिल्ह्यातील अल्ट्रा टेक व आवरपूर सिमेंट कंपन्यांमध्ये नागपूर येथील थर्मल पॉवर स्टेशनमधून फुकट राख घेऊन ती सिमेंटमध्ये 25 ते 30 टक्के मिसळत असणे., राख किती मिसळली आहे याची नोंद नसल्याने प्रमाणाबाहेर राख मिसळून धोकादायक सिमेंट वितरित होणे., या कंपन्यांनी उत्पादित केलेल्या सिमेंटची तपासणी करण्याची आवश्यकता." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर आणि जगदीश गुप्ता यांनी "बुलढाणा शहरा नजिक भादोला ते भोरखेड मार्गावर असलेल्या शेतातील खोल हौदात सात नवजात अर्भकांचे मृतदेह दिनांक 23.7.2007 रोजी आढळणे., सदर मृतदेह गर्भपात केंद्रातील असून त्यामुळे परिसरात उडालेली खळबळ." या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, श्रीकांत जोशी, गुरूमुख जगवाणी, केशवराव मानकर, रामनाथ मोते, संजय केळकर, प्रकाशअण्णा शेंडगे यांनी "यवतमाळ येथील भाजपाचे उमेदवार श्री.प्रशांत गणेशप्रसाद दुबे हे नगरपरिषदेच्या निवडणुकीत प्रचंड मतांनी निवडून येणे., मात्र त्यांची

...... डब्ल्यूडब्ल्यू 3 ...



KBS/ KGS/ MAP/ श्री. गागरे नंतर --- 14:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

दिनांक 3.6.2007 रोजी भरदिवसा निर्घृण हत्या होणे., सदर हत्येमागील प्रमुख आरोपी श्री. प्रवीण दिवटे हे काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडून येणे., श्री. प्रशांत दुबे यांच्या हत्येचा तपास अयोग्य रीतीने होत असल्याने सदर चौकशी सीआयडी तर्फे व्हावी अशी जनमानसात होत असलेली मागणी." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, प्रा. शरद पाटील यांनी "वर्तक नगर, जिल्हा ठाणे येथील म्हाडाच्या इमारती धोकादायक झाल्याने त्यात राहणाऱ्या सुमारे 25 हजार रहिवाशांच्या डोक्यावर मृत्यूची टांगती तलवार असल्याने त्यांना तेथून त्वरित बाहेर काढून त्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री अरविंद सावंत, डॉ. दीपक सावंत, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब यांनी "चंद्रपूर जिल्ह्यात जून महिन्या अखेरीस सुमारे 1106 बालके कुपाषित असल्याची माहिती दिनांक 24.7.2007 रोजी उघडकीस येणे., कुपोषणाच्या दृष्टीने शासनाने राबविलेले कार्यक्रम या जिल्ह्यापर्यंत पोहोचत नसणेबाबत." या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... एक्सएक्स 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती...**

सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दि.23.6.2007 रोजी वा सुमारास पुणे शहरातील लक्ष्मी रस्त्यावरील आष्टेकर ज्वेलर्सवर भरदिवसा पडलेला दरोडा". या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर यांनी "दिनांक 5.3.2007 रोजी शशिकांत शितोळे, राहणार सांगवी गाव (पिंपरी चिंचवड) यांच्यावर झालेल्या भीषण हल्ल्यानंतर सभागृहात उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नावर उपमुख्यमंत्री यांनी सभागृहाला दितलेल्या आश्वासनानुसार सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्याचे आदेश देऊनही पोलिसांकडून अद्यापही कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल यांनी "मराठवाडयात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून शेतातील उभी पिक जळून जाणे, कपाशी व बागायती पिकांचे नुकसान होणे, पिण्याच्या पाण्याची टंचाई होणे इत्यादी बाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत असल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबईतील गिरणी कामगारांना त्यांची कायदेशीर देणी न मिळणे

**मु.शी.**:मुंबईतील गिरणी कामगारांना त्यांची कायदेशीर देणी न मिळणे याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी "मुंबईतील गिरणी कामगारांना त्यांची कायदेशीर देणी न मिळणे"या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 60 गिरण्यांमध्ये 2 लाख 50 हजार कामगार कामावर आहेत. यामध्ये 7 सरकारी व दोन खाजगी गिरण्या चालू असून त्यामध्ये फक्त 8 हजार कामगार काम करीत आहेत. दिनांक 23.3.2001 रोजी मुंबई विकास नियमावली 1991 मध्ये कलम 58 (6) ब आणि क यामध्ये दुरुस्ती करुन सुधारीत नियमावली तयार करण्यात आली. त्यामध्ये जे घडले आहे त्यामुळे मिल मालकांच्या बाजूने निर्णय झाला. तो कां झाला याच्या खोलात मी जात नाही. परंतु या निर्णयानुसार गिरणी कामगारांना न्याय देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. डी. व्हि. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. आजपर्यंत 21 हजार गिरणी कामगारांना त्यांची कायदेशीर देणी अजून मिळाली नाहीत. ती केव्हां मिळणार आहेत? महाराष्ट्र सरकारला या गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्यामध्ये इंटरेस्ट नाही असे कारण देऊन माननीय श्री. चव्हाण साहेबांनी आपला राजीनामा दिला ही गोष्ट खरी आहे काय? 21 हजार गिरणी कामगारांची देणी केव्हां देणार? 375 कामगारांना अकाली मृत्यू आला. तसेच, एकूण 55 हजार कामगार आहेत त्यांना आपण घरे देणार आहात काय? मागील वेळी या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली होती. त्यावेळी हे कामगार आपल्या गावी रत्नागिरीमध्ये असोत किंवा बाहेर कुठेही असोत त्या सर्व कामगारांचा मुंबईमध्ये रहाण्याचा अधिकार आहे असे सांगण्यात आले होते. तेव्हा या 55 हजार गिरणी कामगारांना आपण घरे देणार काय? आपण त्यापैकी 10 हजार कामगारांना घरे देऊ असे म्हटले होते. हे आम्हाला मान्य नाही. कोर्टामध्ये पी.आय.एल. दाखल करुन इंटेरीम करण्यात आले होते. त्यावेळी कोर्टाने आपणास त्या कामगारांना घरे देणार काय असे विचारले होते. त्याप्रमाणे आपण घरे देणार काय?

सभापती महोदय तिसरा प्रश्न असा की, फक्त 3 हजार कामगारांना बी.पी.एल. कार्ड वाटण्यात आले. आता बी.पी.एल. कार्ड वाटण्यात येत नाहीत. ही योजना रद्द झाली असल्याचे आपले अधिकारी सांगत आहेत. तेव्हा या सर्व कामगारांना बी.पी.एल. कार्ड देण्याबाबत आपण काय कारवाई करणार आहात? त्याचप्रमाणे बाकीच्या केंद्र सरकारकडे पाठविलेल्या योजनांचा आपण फॉलोअप कसा केला आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या कामगारांचे अनेक प्रश्न असून ते मार्गी लावण्यात यावेत असे त्यांचे म्हणणे होते. त्या अनुषंगाने काय करता येईल या संदर्भात विचार करण्याकरिता मी माझ्या दालनामध्ये गिरणी कामगार संघाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर प्रधान सचिव आणि अतिरिक्त मुख्य सचिवांबरोबर बैठक घेऊन त्यांचे प्रश्न सोडविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. या ठिकाणी माननीय सदस्यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये कामगारांची उर्वरित देय रक्कम केव्हा देणार? असा विचारला आहे. ज्या काही गिरण्यांना त्यांचा विकास करण्यासाठी काही अटींवर परवानगी दिली जाते. त्यामध्ये महत्वाची अट अशी आहे की, त्या गिरणी व्यवस्थापनाने तेथील कामगारांची देयके दिलेली आहेत की नाही याची खात्री करुन घेतली जाते. व त्यानंतर त्यांनी विकास करण्यासाठी मागितलेली परवानगी दिली जाते. परंतु त्याविरुध्द काही लोक कोर्टामध्ये गेले. त्यामुळे हे प्रकरण सद्या न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे गिरण्यांच्या विकासाच्या दृष्टीने तो विषय पुढे येत नाही. शासनाने 58 हजार गिरणी कामगारांसाठी जो नियम केला आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे... 14:25

श्री.राजेश टोपे (पुढे सुरू...

त्यानुसार कामगारांची देणी दिल्याशिवाय संबंधित गिरणी मालकांना विकास करता येणार नाही, तशी विकासाला त्यांना परवानगी दिली जाणार नाही. त्यानंतर 55 हजार कामगारांना घरे देण्याबाबतचा प्रश्न सन्माननीय श्री.गडकरी साहेबांनी उपस्थित केला. मी मागेही सांगितले होते की, या संदर्भाने नवीननवीन शासनाने गोष्टी केलेल्या आहेत. नियम 58 च्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित केले गेले, त्याप्रमाणे काही सुधारणा केलेल्या आहेत. नियमाच्या तरतुदीच्या अनुषंगाने म्हाडाला जमीन मिळणार आहे, त्यासाठी 4 एफएसआय देण्याचा निर्णय अलीकडे घेण्यात आलेला आहे. उद्देश एकच आहे की, म्हाडाला मिळणाऱ्या जमिनीपैकी 50 टक्के जमीनीवर कामगारांच्या घरांसाठी बांधकाम व्हावे आणि उर्वरित जमीन पब्लिक हाऊसिंगसाठी ठेवावी. त्याचबरोबर नियम 37 खली आपल्याला त्या ठिकाणी ट्रान्झीट कॅम्प बांधावयाचा आहे. 1.33 एफएसआय हा त्या ठिकाणच्या घरांसाठी वापरला जाणार आहे. यामध्ये जास्तीत जास्त घरे उपलब्ध व्हावीत असा उद्देश आहे. साधरणत: 15 ते 20 हजार कामगारांना घरे उपलब्ध होऊ शकतील. जे स्वेच्छा निवृत्ती घेतलेले कामगार आहेत, त्यांची देणी देण्याचा विषय आहे. या संबंधाने अनेक गोष्टींची तरतूद करण्यात आलेली आहे. शेवटी कामगारांच्या दृष्टीने सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे आवश्यक आहे. नोकऱ्यांचा प्रश्न निर्माण झालेला आहे, त्याचबरोबर भविष्य निर्वाह निधीच्यादृष्टीने सवलती, बी.पी.एल.ची सवलत मिळावी, असे अनेक प्रश्न आहेत. मी सभागृहाला माहिती म्हणून सांगू इच्छितो की, कामगारांच्या संबंधाने नव्याने सर्व्हेक्षण केले जाईल. ज्या कायद्याप्रमाणे सवलती आहेत त्या संदर्भात निश्चित कार्यवाही केली जाईल. कामगारांच्या विमा योजनेच्याबाबतीत प्रश्न उपस्थित केला. या संदर्भाने काही कायद्यामध्ये बदल करावे लागणर आहेत. केंद्र सरकारच्या कायद्यामध्ये बदल करावा लागणार आहे. तसे कामगार विभागाला लिहिलेले आहे. या अनुषंगाने जे काही बदल करावयाचे आहेत त्याबाबत शासनाकडून केंद्रसरकारकडे तशा शिफारशी केल्या जातील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. मी 55 हजार कामगारांना घरे देण्याबाबतची मागणी केलेली आहे. या कामगारांची आपल्याकडे यादी उपलब्ध आहे. असे असताना पुन्हा कशाला पुन्हा नव्याने याबाबतचा सर्व्हेक्षण करता ? मिल बंद झाल्यानंतर कामगारांच्या नावांची यादी उपलब्ध आहे. त्या कामगारांना बी.पी.एल.खाली धान्यामध्ये सवलत

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे सुरू.....

देण्याची बाब आहे तसेच कामगारांना नोकऱ्या देण्याचा प्रश्न आहे. यासाठी कामगार आणि त्यांच्या परिवारांच्या नावांची यादी आहे आपल्याकडे आहे. त्यांना बीपीएलच्या सवलती द्याव्यात, या संबंधातील कार्यवाही केली जाईल काय ? त्याचबरोबर मागच्यावेळेला कामगारांसाठी 10 हजार घरे बांधणार असे सांगितले होते, आता 15 हजार घरे बांधणार असल्याचे सांगण्यात आले. एवढ्याच लोकांना घरे देऊन चालणारनाही तर त्या ठिकाणच्या सगळया कामगारांना घरे देण्याची व्यवस्था झ ााली पाहिजे. या ठिकाणी मुळामध्ये मालकाचे हित न पहाता कामगारांना न्याय दिला पाहिजे. मालक करोडो रुपयाची संपत्ती यातून निर्माण करणार आहे. तेव्हा त्या ठिकाणी कामगारांना घरे मिळाली पाहिजेत, अशी भूमिका शासन घेणार आहे काय ? त्याचबरोबर माझ्या माहितीप्रमाणे न्यायमूर्ती श्री.चव्हाण साहेबांनी राजीनामा दिलेला आहे. महाराष्ट्र शासनाला कामगारांच्या पुनर्वसनामध्ये इंटरेस्ट नाही, असा आरोप करून त्यांनी राजीनामा दिलेला आहे, हे खरे आहे काय ? या संबंधाने खुलासा करावा.

श्री.राजेश टोपे : श्री.चव्हाण साहेबांनी राजीनामा दिला होता परंतु तो स्वीकारला नाही. त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानंतर मॉनिटरींग समितीच्या दोन बैठकाही झालेल्या आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : त्यांनी राजीनामा दिला होता काय ?

श्री. राजेश टोपे : त्यांनी राजीनामा दिला होता इथपर्यंत गोष्ट खरी आहे.

श्री. नितीन गडकरी : त्यांनी असे म्हटले आहे की, राज्य सरकार सहकार्य करीत नाही, कामगारांच्या पुनर्वसनामध्ये राज्य सरकार इंट्रेस्टेड नाही हे खरे आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्यांनी राजीनामा दिला होता परंतु तो राजीनामा स्वीकारलेला नाही. त्यांची पुनर्नियुक्ती करुन त्यांनी परत काम सुरु केलेले आहे आणि दोन बैठका झालेल्या आहेत.

श्री. नितीन गडकरी : त्यांनी राजीनामा पत्रात काय म्हटले होते ते माननीय मंत्रिमहोदय का सांगत नाहीत ? यामध्ये काय सिक्रेट आहे. हे सरकार कसे वागत आहे याचे हे इंडिकेशन आहे. मी असा प्रश्न विचारला की, श्री. चव्हाण साहेबांनी राजीनामा दिला काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले. त्यांची पुनर्नियुक्ती झाली. त्यांनी आपल्या राजीनामा पत्रात महाराष्ट्र सरकार कामगारांच्या पुनर्वसनामध्ये इंट्रेस्टेड नाही असा आरोप केला होता काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये कामगारांच्या वतीने कोर्टामध्ये रिटपिटीशन दाखल केलेले असून मॉनिटरींग कमिटीकडून योग्य काम होत नसल्याचा उल्लेख त्यांनी केला होता. त्यानंतर त्यांना बोलवून ज्या पध्दतीने मॉनिटरींग कमिटीने काम करणे अपेक्षित आहे किंवा त्यांना शासनाकडून जे सहकार्य देणे अपेक्षित आहे याबाबत त्यांना सांगितले. बैठकीनंतर त्यांनी राजीनामा परत घेतला. त्यांची पुनर्नियुक्ती झाली आणि त्यांचे कामकाज सुरु झाले आहे. बी.पी.एल. च्या संदर्भात अन्न व नागरी पुरवठा विभागाला 20.7.2007 ला सूचना करण्यात आलेली आहे आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने अशा पध्दतीच्या बी.पी.एल.च्या कार्डचे वाटप हे जे लोक असतील त्यांना करण्यात येणार आहे. हे ताबडतोबीने करण्यात येणार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्या कामगारांची उपासमार होत आहे. त्यांची नोकरी गेली. त्यांची अवस्था फार वाईट आहे. माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत की आम्ही प्रयत्न करीत आहोत, सूचना देत आहोत. बी.पी.एल.चे पिवळे कार्ड देण्यामध्ये काय अडचण आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, बी.पी.एल.च्या अनुषंगाने त्यांना कार्ड देण्याचे काम येत्या सात दिवसात पूर्ण केले जाईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**उपसभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 2 घेण्यात येईल.

( अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, त्यांच्या घरांचा महत्वाचा प्रश्न आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, घरांच्या संदर्भात मी उत्तर दिलेले आहे.

**उपसभापती** : हा विषय वेगवेगळ्या वेळी सभागृहात आलेला आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या सर्वांना घरे देणे शक्य नाही असे उत्तर मी दिलेले आहे.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : राज्यातील आदिवासी विभागातील निकषपात्र तुकड्यांना अनुदान न मिळणे.

**मु. शी.** : राज्यातील आदिवासी विभागातील निकषपात्र तुकड्यांना अनुदान न मिळणे याबाबत श्री. व्ही. यू. डायगव्हाणे व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी "राज्यातील आदिवासी विभागातील निकषपात्र तुकड्यांना अनुदान न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आदिवासी विभागातील शाळा आणि तुकड्यांच्या संदर्भातील हा प्रश्न सातत्याने सभागृहात येत आहे. 30 जून, 2006 च्या एकाच शासन निर्णयान्वये बिगर आदिवासी क्षेत्रातील आणि आदिवासी क्षेत्रातील शाळा अनुदानावर आल्या. बिगर आदिवासी क्षेत्रातील 439 शाळांना एक वर्षापासून हे अनुदान मंजूर झाले आणि वितरित झाले. त्या ठिकाणी पगार सुरु आहे. परंतु आदिवासी विभागातील शाळांना मात्र अजूनही अनुदान प्राप्त झालेले नाही. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 654.98 लक्ष रुपये इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्याची विनंती आदिवासी विकास विभागाला केली होती परंतु आदिवासी विभागाने नियतव्यय उपलब्ध करुन दिले नसल्यामुळे अनुदान मंजूर करता येणे शक्य झाले नाही. म्हणजे आदिवासींवर शासनाचा राग का आहे ? सुदैवाने माननीय मंत्रिमहोदय आदिवासी आहेत. परंतु दोन्ही माननीय मंत्रिमहोदय एकत्र बसून निर्णय घेत नाहीत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, त्यांना आपण एक वर्षापासून वंचित ठेवले आहे. 8-15 दिवसात किंवा एक महिन्यात यासंदर्भात आदिवासींना रिलीफ द्यावा. या सर्व शाळा आणि आदिवासींच्या तुकड्यांना हे अनुदान देणार काय ? दुसरा प्रश्न असा की, 1170 तुकड्यांच्या संदर्भात नियतव्यय उपलब्ध न झाल्यामुळे अनुदान मंजूर केलेले नाही. यासंदर्भातील निर्णय एक दोन महिन्यात घेणार काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, कालच ज्या पुरवणी मागणी सादर केल्या त्यामध्ये सर्वात जास्त म्हणजे जवळपास 800 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या शिक्षण खात्याच्या होत्या. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ज्या 51 शाळा आहेत त्या अनुदानाच्या टप्प्यात आलेल्या आहेत हे निश्चितपणे खरे आहे. आताच संबंधित माननीय मंत्रिमहोदयांशी बोलताना त्यांनी एकच माहिती मागितली की, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील या शाळांना आपण अनुदान उपलब्ध करुन देऊ, नियतव्यय उपलब्ध करुन देऊ, फक्त त्या ठिकाणी 50 टक्के आदिवासी मुले आहेत काय हे जाणून घेणे गरजेचे आहे. मी स्वत: लक्ष देऊन, आमचा स्वतंत्र अधिकारी पाठवून या शाळांममध्ये हा निकष पूर्ण होत असेल तर निश्चितपणे नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी 50 टक्केची नवीनच बाब सांगितलेली आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:35

प्रा. वसंत पुरके : ज्यावेळी ट्रायबल ॲडव्हायझरी कमिटीने निर्णय घेतला...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे: तुम्ही जी.आर.काढून या शाळा अनुदानाला पात्र ठरविल्या किंवा नाही याचे उत्तर द्यावे. त्या जर अनुदानाला पात्र ठरविल्या असतील तर मग आता तो प्रश्न कोठून आला ? अनुदान वितरित करण्याचाच भाग राहिलेला आहे. आता तुम्हाला पुन्हा चौकशी करावयाची आहे काय ? यापूर्वी 30 जून 2006ला निर्णय झाला त्यामध्ये या शाळा निकषपात्र ठरतात. आता असे सांगितले जाते की, त्या ठिकाणी आदिवासी 50 टक्के आहेत की नाहीत हे तपासून पाहू. आता मागे जाणे बरोबर नाही. तेव्हा एक महिन्याच्या आत निर्णय घेतो असे मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. 1170 तुकड्यांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी तुम्ही दोन-तीन महिने घ्या..

प्रा. वसंत पुरके : 1170 तुकड्यांच्या संदर्भात सभागृहाच्या माहितीसाठी हे सांगणे आवश्यक आहे की, आता पर्यन्त जवळ जवळ 3878 शाळा अशा आहेत की ज्यांना आपण अनुदानाच्या टप्प्यामध्ये आणून अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. दुसरी बाब अशी आहे की, जवळ जवळ 10332 तुकड्यांना अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. 37-38 कोटीचा प्रश्न आहे. या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळा अनुदानाच्या टप्प्यामध्ये आल्या. परंतु ट्रायबल ॲडव्हायझरी कमिटीने तेव्हाच निर्णय घेतला होता की, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांना देखील अनुदान उपलब्ध करुन द्यावे. ही आदिवासी विकास विभागाची जमेची बाब आहे. ट्रायबल ॲडव्हायझरी कमिटीने सुध्दा हा निर्णय घेतलेला होता. परंतु, तेथील संचालक हा आदिवासी असावा आणि 50 टक्के आदिवासी मुले असावीत ह्या दोनच अटी होत्या. या अटी नुसार लवकरात लवकर तपासणी करुन अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

श्री. वसंतराव खोटरे : राज्यामध्ये विनाअनुदान तत्वावर असलेल्या निकषपात्र शाळांची संख्या फार कमी आहे. अशा शाळांची यादी एक महिन्यामध्ये जाहीर करण्यात येईल काय ?

प्रा. वसंत पुरके : या संदर्भात कधीही नकारात्मक भूमिका घेतलेली नाही. ज्या शाळा पात्र ठरलेल्या आहेत त्यांची यादी निश्चितच जाहीर केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : मी मुद्दाम आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, सभागृहामध्ये प्रश्न विचारण्याचा हेतू हा असतो की, शासना तर्फे माननीय मंत्री महोदय उत्तर देत असतात. 30 जून 2006 ला तुम्ही बिगर आदिवासी शाळांना अनुदान दिले. आता आदिवासी क्षेत्रातील शाळांसाठी शासन निर्णय काढला, त्या निकषपात्र आहेत असे सांगितले. आता माननीय मंत्री महोदय असे उत्तर देत आहेत की, ..ते नाही म्हणतात, अजून त्यांनी दिले नाही.., हे बरोबर नाही. मंत्री महोदय शासनाच्या वतीने उत्तर देत आहेत. त्यांना उत्तर देणे शक्य होत नसेल तर त्यांनी माननीय सभापतींकडे हा विषय ट्रान्स्फर करावा. ही शासनामध्ये न बसणारी गोष्ट आहे. निवेदनामध्ये असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे की, आदिवासी विकास विभागाने या शाळांना नियतव्यय उपलब्ध करुन दिला नसल्याने अनुदान मंजूर करता येणे शक्य झालेले नाही. इथपर्यन्त मी समजू शकतो. सभागृहामध्ये येताना तुमचे जे कोणी आहेत त्यांच्याशी बोलून, शासनाच्या वतीने तुम्ही इथे आले पाहिजे. पण इथे आपण तेच कौतुक सांगत आहात. शासन निर्णय काढला, त्या शाळा निकषपात्र म्हणून जाहीर केले. अनुदानाची रक्कम देखील नमूद केलेली आहे. फक्त अनुदान देण्याचे राहून गेले कारण यांचे एकमेकांशी बोलण्याचे राहून गेले.... म्हणून माझे ठाम म्हणणे असे आहे की, ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, नेमके काय बोलायचे राहून गेले हे सन्माननीय सदस्यांनी स्पष्ट करावे. कारण त्यामुळे गैरसमज निर्माण होता कामा नये. मी शासन म्हणून उत्तर देत आहे. आदिवासी विकास विभागाने अतिशय साकल्याने विचार केलेला आहे की, जे आदिवासी लाभार्थी आहेत त्यानाच हा लाभ मिळाला पाहिजे. म्हणून बिगर आदिवासी क्षेत्रातील ज्या शाळा आहेत त्या शाळांमध्ये 50 टक्के आदिवासी विद्यार्थी आहेत की नाहीत हे तपासून घेणे गरजेचे आहे त्या शिवाय नियतव्यय उपलब्ध होणार नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : आपण शासन निर्णय काढून त्या शाळांना निकषपात्र ठरविलेले आहे. शासन क्रमांक दिलेला आहे. आता हे अनुदान एक महिन्यामध्ये देण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

..3..



MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 14:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : मी अतिशय जबाबदारीने सांगतो की, आदिवासी विकास विभागाने, ट्रायबल ॲडव्हायझरी कमिटीने आणि सगळयाच आदिवासी आमदारांनी भूमिका घेतलेली आहे की, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कोणाच्याही शाळा असल्या तरी त्या शाळांना अनुदान दिले पाहिजे. परंतु जी. आर. काढल्यानंतरही एखाद्या शाळेमध्ये जर 50 टक्के आदिवासी मुले नसतील तर नियतव्यय उपलब्ध होणार नाही.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख वारंवार सांगत आहेत की, ज्या निकषपात्र शाळांना सदर अनुदान देणे आहे किंवा अनुज्ञेय आहे तर शासन त्यांना ते का देत नाही ? निवेदनाच्या उत्तरात देखील तसे लिहिलेले आहे. आदिवासी विभागाने तो निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे, आणि आदिवासी विभागाने निधी उपलब्ध करुन दिलेला नाही व तो शिक्षण विभागाला मिळालेला नाही हे सत्य आहे. शिक्षण विभाग सदर निधी आदिवासी विभागाकडून प्राप्त करुन घेऊन तो नियमामध्ये बसणा-या शाळांना किती दिवसांमध्ये देणार आहे ?

अडथळा

प्रा.वसंत पुरके : नियमाप्रमाणे निकषात बसणा-या शाळांना लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री.नितीन गडकरी : सदर निधी किती दिवसांमध्ये उपलब्ध करुन दिला जाईल ?

अडथळा

प्रा.वसंत पुरके : आदिवासी विभागाने शिक्षण विभागाला निधी उपलब्ध करुन दिल्यावर निकषात बसणा-या शाळांना लवकरात लवकर दिला जाईल. आदिवासी भागातील शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या जर 50 टक्के असेल तरच तो निधी त्यांना उपलब्ध करुन दिला जातो. याप्रमाणे ज्या शाळा नियमात बसत असतील, त्या शाळांनाच हा निधी उपलब्ध करुन दिला जाईल आणि ज्या शाळा या निकषात बसत नसतील त्यांना हा निधी उपलब्ध होणार नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्या शाळा निकषात बसतात त्या शाळांना तो निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन द्यावा आणि ज्या शाळा निकषात बसत नाहीत त्यांना हा निधी उपलब्ध करुन देऊ नका. अशा प्रकारे माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तरे मिळणार असतील तर या सभागृहामध्ये प्रश्न कशासाठी उपस्थित करावयाचे ?

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदय,सन्माननीय सदस्यांचा प्रश्न अतिशय स्पेसिफिक आहे की, ज्या संस्था निकषात बसत आहेत, त्यांना जी काही देय रक्कम आहे ती कधीपर्यंत देणार आहात ?

3B इ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांच्या या प्रश्नाला मी असे उत्तर दिले होते की, आदिवासी विकास विभाग हा निधी शिक्षण विभागाला ज्यावेळी उपलब्ध करुन देईल त्यावेळी आमच्या विभागाकडून निकषात बसणा-या शाळांना तो उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री.नितीन गडकरी : परंतु ते अनुदान आदिवासी विकास विभागाकडून आलेच नाही तर ?

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : यापैकी काही निकषपात्र शाळांमध्ये 50 टक्के आदिवासींची विद्यार्थीसंख्या आदिवासी नसेल तर त्यांना ते अनुदान मिळेल का ?

प्रा.वसंत पुरके : नाही, ज्या निकषपात्र शाळांमध्ये 50 टक्के आदिवासींची विद्यार्थीसंख्या नसेल त्या शाळांना हे अनुदान मिळणार नाही.

(गोंधळ)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, काही निकषपात्र शाळांमध्ये 50 टक्के आदिवासी विद्यार्थ्यांची अट पूर्ण होत नसेल तर त्यांना अनुदान देण्यात येणार नाही का ? सभापती महोदय हा प्रश्न आपण राखून ठेवावा.

(गोधंळ)

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उठून बोलण्याचा प्रयत्न करतात. )

प्रा.बी.टी.देशमुख : निकषपात्र शाळांना निधी देण्याच्या संदर्भात आदिवासी विभागातील उप सचिव.किंवा इतर कोणी जे अधिकारी असतील ते काय सांगतात हे सांगण्यासाठी मिनिस्टर येथे येतात का ?

श्री.नितीन गडकरी : ज्या शाळांचे निकष पूर्ण होत नसतील किंवा ज्या शाळा 50 टक्के आदिवासी विद्यार्थीसंख्येची अट पूर्ण करीत नाहीत, त्यांना तुम्ही निधी देऊ नका ज्या शाळा निकषामध्ये बसतात त्यांना तुम्ही जी.आर.काढून देखील पैसे का देत नाहीत ?

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना इतक्या बेजबाबदार पणे सभागृहात उत्तर देता येणार नाही म्हणून माझा पॉईंटेड प्रश्न आहे की,ज्या अधिका-यांनी इमानेइतबारे जी.आर.काढला नाही त्यांना तुम्ही सस्पेंड करा, पण ज्या शाळा निकषपात्र आहेत त्यांना लवकरात लवकर देय असलेले अनुदान देणार काय ?

प्रा.वसंत पुरके : ठीक आहे. येत्या अधिवेशनाच्या अगोदर निकषपात्र शाळांना त्यांना देय असलेला निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

3B - 3



JPK/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम एम. .......... 14:40

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, जे बिगर आदिवासी आहेत त्यांच्याकरिता अनुदानाच्या संदर्भात वर्षा दिड वर्षाअगोदर जी.आर.काढलेला आहे, परंतु जे खरोखर आदिवासी विभागातील आहेत त्यांच्यावर मात्र अन्याय होत आहे आणि त्यांच्या अनुदानाच्या संदर्भात लवकर निर्णय घेतला जात नाही,हे बरोबर नाही.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, आदिवासी विभागातील शाळांवर आणि तेथील विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून आदिवासी विभागाने साकल्याने विचार करुन हा निर्णय घेतलेला आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उठून बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आदिवासी विभागाने साकल्याने विचार करुन हा निर्णय घेतलेला आहे पण या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर करा आणि त्याचे श्रेयही तुम्हीच घ्या. सभापती महोदय, हे निवेदन राखून ठेवा आणि यासंदर्भात उत्तर देण्यासाठी माननीय आदिवासी विकास मंत्र्यांना बोलवा आणि माननीय शिक्षणमंत्री आणि आदिवासी विकास मंत्र्यांना संयुक्त उत्तर देऊ द्या.

**उपसभापती** : यासंदर्भात मी आता आदिवासी विकास मंत्र्यांना बोलावून घेतो,तोपर्यंत पुढचे निवेदन घेण्यात येईल.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 14:45

**पृ.शी.**: नागपूर येथील मिहान प्रकल्प एमएडीसीमार्फत विकसित करण्याबाबत.

**मु.शी.**: नागपूर येथील मिहान प्रकल्प एमएडीसीमार्फत विकसित करण्यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे,सागर मेघे, मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे,सागर मेघे,मधुकर चव्हाण यांनी नागपूर येथील मिहान प्रकल्प एमएडीसीमार्फत विकसित करणे याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, याविषयावर मी सरकारचे अभिनंदन करतो. हा प्रकल्प झाला पाहिजे अशीच आमची भूमिका आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात बैठक घेतली होती. त्या बैठकीला सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते. शेतकऱ्यांना जमिनीचा वाढीव मोबदला देण्याचे तत्वत: शासनाने मान्य केलेले आहे आणि तो कसा देता येईल याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. एक महिन्यात शासन याबाबतीत निर्णय घेणार आहे. हा प्रकल्प झाला पाहिजे. शेतकऱ्यांची 1 लाख रुपयांची जमीन 66 लाख रुपयाला विकली जात आहे. या शेतकऱ्यांचे पुनर्वसन होण्याच्या बाबतीत सुध्दा शासनाने सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचे मान्य केलेले आहे आणि शेतकऱ्यांचे पुनर्वसन मान्य केलेले आहे. पुन्हा एकदा शासनाचे अभिनंदन करतो. माझे उत्तरामुळे समाधान झाले असल्यामुळे मी या सूचनेवर उपप्रश्न प्रश्न विचारु इच्छित नाही.

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ KGS/ MAP/ 14:45

**पृ.शी.**: निवृत्त मुख्याध्यापक (माध्य)जि.प.भंडारा यांना
देय रक्कम मिळण्याबाबत.

**मु.शी.**: निवृत्त मुख्याध्यापक (माध्य),जि.प.भंडारा यांना
देय रक्कम मिळण्याबाबत सर्वश्री व्हि.यु.डायगव्हाणे,
प्रा.बी.टी.देशमुख,श्री.व्ही.डी.खोटरे,वि.प.स.यांनी दिलेली
नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके (शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्हि.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.डी.खोटरे यांनी निवृत्त शिक्षणाधिकारी(माध्य), जि.प.भंडारा यांना देय रक्कम मिळणे याविषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**निवेदनानंतर**

श्री. व्हि.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, कोर्टाच्या आदेशानंतर शिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व सामान जप्त करण्यात आले. शिक्षणाधिकारी पळून गेले. टयूबलाईट,फर्निचर,पंखे सर्व सामान जप्त केले. लोकायुक्तांनी या केसमध्ये निर्णय दिल्यानंतर मुख्याध्यापकांना थकबाकी देण्यासंबंधी सुप्रीम कोर्टाने पण निर्णय दिल्यावर झोपलेले अधिकारी जागे झाले आणि 6 लाख रुपयांची थकबाकी दिली. कोर्टाने आदेश दिल्यावर सामान जप्त केल्यावर 3 लाख रुपये दिले. उर्वरित 3 लाख रुपये 8 दिवसांच्या आत देण्याचे मान्य केले आहे. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, शिक्षणाधिकारी यांनी निवृत्त होण्यापूर्वी म्हणजे 30 जून,2007 पूर्वी आपल्याला पाहिजे तसे जे निर्णय घेतले त्याची तपासणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करुन याप्रकरणाची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ? कारण यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे अशी आमची माहिती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मुळामध्ये मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्याचे अधिकार संस्थेचे आहेत. संस्थेच्या चुकीमुळे हे झालेले आहे. संबंधित संस्थेने मुख्याध्यापकाचा पगार दिला पाहिजे. शासनाची तशी जबाबदारी नाही. तरी सुध्दा संस्थेने योग्य ती कार्यवाही केली नसेल तर संस्थेवर कारवाई करण्याची जबाबदारी सरकारची आहे. मुख्याध्यापकाला 3 लाख रुपये दिलेले आहेत. उर्वरित 3 लाख रुपये देण्यासाठी 3 महिन्यांचा कालावधी मागितलेला आहे. या कालावधीत जर पैसे दिले नाहीत तर संस्थेची मान्यता काढून घेतली जाईल. संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी निवृत्त होण्यापूर्वी जे निर्णय घेतले त्याची तपासणी केली जाईल आणि चौकशी करुन याबाबतचा निर्णय दिला जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यावर शिक्षणाधिकारी यांच्या कार्यालयातील सर्व सामान जप्त करण्यात आले. शिक्षणाधिकारी पळून गेले. मंत्रीमहोदय म्हणाले की सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाशी शासनाचा काही संबंध नाही. संस्था जर देणे होती तर संस्थेचे सामान सुप्रीम कोर्टाने का जप्त केले नाही ? शिक्षणाधिकारी कार्यालयातील फर्निचर कसे जप्त केले ?

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ KGS/ 14:50

निवेदन क्रमांक-4............ श्री.नितीन गडकरी........

त्यांनी संस्थेची मालमत्ता का जप्त केली नाही? यामध्ये शासनाचा संबंध आहे. शासनाने वेळीच निर्णय न घेतल्यामुळे सुप्रीम कोर्टाने शासनावर कारवाई केली. त्यामुळे शासनाचा याच्याशी संबंध आहे. मंत्रीमहोदय म्हणतात की, शासनाचा संबंध नाही. हे म्हणणे योग्य नाही. शासन या प्रकरणी अपील करु शकत नाही. ही परिस्थिती ज्यांच्यामुळे ओढवली, ज्यांनी शासनाची नामुष्की केली त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात?

प्रा.वसंत पुरके : या संदर्भात ज्या शिक्षणाधिकाऱ्यांनी सतर्कता बाळगली नसेल तर त्याची निश्चित चौकशी केली जाईल आणि कारवाई केली जाईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3D.2

पृ.शी. : डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठासाठी ज्यांची जमीन संपादित केली अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तिंना नोकरीत प्राधान्य देणे.

मु.शी. : डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठासाठी ज्यांची जमीन संपादित केली अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तिना नोकरीत प्राधान्य देणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (कृषि राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठासाठी ज्यांची जमीन संपादित केली अशा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकरीत प्राधान्य देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या कृषि विद्यापीठाची स्थापना 1969 साली झाली. कृषि विद्यापीठ स्थापन करताना 3232 हेक्टर जमीन 15 गावातील 942 शेतकऱ्यांची संपादित करण्यात आली होती. या कृषि विद्यापीठात ज्या जागा रिक्त होतील त्यापैकी 5 टक्के जागा प्रकल्पग्रस्तांच्या माध्यमातून भरावयाच्या होत्या. त्या जागा अद्यापही भरल्या गेल्या नाहीत. हा प्रश्न उपस्थित करण्याचे कारण एकच होते ते म्हणजे आठ दिवसांपूर्वी कृषि विद्यापीठाच्या एका शहाण्या अधिकाऱ्याने 21 व्या शतकात सुशिक्षित बेरोजगारांना नांगराला जुंपल्याचे फोटो मी यापूर्वीही सभागृहात सादर केले होते. हा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचा प्रश्न आहे. माननीय मंत्री श्री.रणजित कांबळे हे माझे भाष्य ऐकून हसत आहेत.

श्री.रणजित कांबळे : ते नांगरुन राहिलेले नाहीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : तुम्ही कधी शेतात गेला होतात का? माझ्याकडे फोटो उपलब्ध आहेत. सभापती महोदय, मंत्रीमहोदय म्हणतात की नांगरुन राहिलेले नाही. मंत्रीमहोदयांनी गंमत चालविली आहे. प्रकल्पग्रस्तांना 30-30 वर्षे होऊनही नोकरी दिली जात नाही. त्यांना बैलासारखे नांगराला जुंपले गेले आणि याठिकाणी गंमत केली जाते. सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की, "मानवचलित उखरी औजाराचा वापर हे प्रात्यक्षिक क्षेत्र असल्यामुळे करण्यात आला. कारण या क्षेत्रावरील कापूस पिकाची रोपे उगवणीपासून फक्त 15-20 दिवसाच्या कालावधीची होती. शिवाय त्यामध्येच नांगी भरलेली होती. त्यामुळे बैल वापरले असते तर झाडांचे नुकसान होऊन संख्या कमी झाली असती. हे काम रोजंदारी मजूर तसेच संशोधन विद्यार्थी स्वइच्छेने वर्षानुवर्षे करीत आहेत. अशा प्रकारचे काम शेतकरी सुध्दा आपल्या कुटुंबातील सदस्यांकडून करीत असतात. पुरुष अथवा स्त्री मार्फत सायकलच्या आधारावरील तण काढण्याचे यंत्र आज शेतीमध्ये लोकप्रिय आहे." हा कोण शहाणा अधिकारी आहे त्याच्या शेतात असे करीत असतील. शेतातील पीक बैलांमुळे खराब होऊ नये म्हणून माणसे जुंपली जातात. आम्हीही शेतकरी आहोत. अशा प्रकारचे निवेदन देऊन सभागृहाची दिशाभूल केली जात आहे त्यामुळे हे निवेदन राखून ठेवावे आणि सुधारित निवेदन करण्याचे निदेश द्यावेत. प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना नांगराला का जुंपले? विधानसभेतील सन्माननीय सदस्य श्री.गोवर्धन शर्मा या मुलांना ज्यावेळी नांगराला जुंपले त्यावेळी कृषि विद्यापीठात प्रत्यक्ष गेले होते. त्यांना तेथील संचालकांनी माहिती दिली की, बैल मिळाले नाहीत म्हणून या मुलांना नांगराला जुंपले. कृषि विद्यापीठात दिलेले उत्तर

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि निवेदनामध्ये दिलेली माहिती यामध्ये विसंगती आहे. हे निवेदन सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. त्यामुळे सुधारित निवेदन सोमवारी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे. शासनाने सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार जी.आर.काढला आणि जेवढ्या रिक्त जागा असतील त्याच्या 5 टक्के जागा प्रकल्पग्रस्तांमधून सर्वोच्च प्राधान्यक्रम देऊन भरण्याचे आदेश जारी केले होते.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

आणि तो सर्व शासकीय कर्मचा-यांना लागू आहे. या कृषी विद्यापीठासाठी अनेक शेतक-यांनी आपल्या जमिनी दिलेल्या आहेत परंतु कृषी विद्यापीठात पदे भरतांना प्रकल्पग्रस्तांसाठी सर्वोच्च प्राधान्यक्रम किमान 5 टक्के आहे असे शासनाचे सर्व साधारण आदेश आहेत व ते सर्व शासकीय कर्मचा-यांना लागू आहेत. परंतु ज्या योजनेसाठी प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी घेण्यात आल्या त्या योजनेमध्ये पदे भरतांना प्रकल्पग्रस्तांना फक्त किमान 5 टक्के सर्वोच्च प्राथम्यक्रम देणे अपेक्षित नाही. त्यामुळे आपल्या विद्यापीठात पदे भरतांना मागासवर्गांची आरक्षीत पदे भरल्यानंतर उर्वरित जास्तीत जास्त पदे प्रकल्पग्रस्त व्यक्तीमधून भरली जातील असे जी.आर.मध्ये म्हटलेले आहे.

सभापती महोदय, गेल्या 30 वर्षात पंजाबराव कृषी विद्यापीठाला 900 शेतक-यांनी आपल्या जमिनी दिलेल्या आहेत परंतु गेल्या 30 वर्षात या ठिकाणी 900 जागा सुध्दा भरण्यात आलेल्या नाहीत. आतापर्यंत या विद्यापीठात 375 जागा भरण्यात आलेल्या आहेत परंतु या ठिकाणी 421 जागा भरण्यात आलेल्या आहेत अशी माहिती दिलेली आहे. या कृषीविद्यापीठात 421 जागा भरण्यात आलेल्या आहेत अशी चुकीची माहिती या ठिकाणी देण्यात आलेली आहे. या विषयाच्या संदर्भात जी यादी सादर करण्यात आलेली आहे ती फॉल्टी आहे. या ठिकाणी ज्या जागा भरण्यात आलेल्या आहेत त्यांची नावे डबल डबल दाखविण्यात आलेली आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, दिलेली यादी लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावी. या ठिकाणी अधिका-याला वाचविण्याचा प्रयत्न केला जात असेल तर ते योग्य होणार नाही. ज्या अधिका-याने चुकीचे उत्तर दिलेले आहे त्याच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे हे निवेदन राखून ठेवण्यात यावे अशी माझी माननीय सभापती महोदयांना विनंती आहे. एका बाजूला आपण बेरोजगार मुलांना नोक-या देत नाहीत, नोक-या देण्याच्या वेळी झीरो बजेट लावले जाते वर्षानुवर्षे मुलांना नोक-या दिल्या जात नाहीत असे असतांना ज्या शेतक-यांनी या कृषी विद्यपीठासाठी जमिनी दिलेल्या आहेत त्यांना नोकरी न देता त्यांच्याकडून जनावरासारखे काम करुन घेता हे काही योग्य नाही. या ठिकाणच्या सुशिक्षीत तरुणांकडून बैलासारखे काम करुन घेतले जाते ते योग्य नाही तसेच ज्या अधिका-यांनी चुकीची माहिती दिली त्या अधिका-यावर कारवाई झाली पाहिजे अशी माझी नम्र विनंती आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, निवेदनाच्या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न विचारला असता तर अधिक चांगले झाले असते. या ठिकाणी मी दोन विषय नमूद करतो. आपण म्हटले आहे की, 421 प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्यात आलेली नाही. परंतु यासंदर्भात आपण जर माहिती उपलब्ध करुन दिली तर संबंधित अधिका-याची चौकशी करुन कठोरात कठोर कारवाई केली जाईल हे मी येथे आवर्जून सांगू इच्छितो. या ठिकाणी सुरुवातीला सांगण्यात आले होते की, येथील मुलांना नांगराला जुंपण्यात आलेले आहे. परंतु या मुलांना नांगराला जुंपले असे म्हणणे योग्य होणार नाही. यासंदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एका वर्तमानपत्राचा उल्लेख केला असून फोटोचा आधार सुध्दा दिलेला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 14 जुलै, 2007 च्या ॲग्रोवन डेली या वर्तमानपत्राचा दाखला दिलेला आहे. या वर्तमानपत्रात मुले कोळपणी करतांनाचा फोटो आहे. या ठिकाणी ही जी मुले काम करीत आहे ती एक मानव चलित यंत्राचा वापर करीत आहेत. हे यंत्र हलके असून अवजड नाही. कोळपणी करण्यासाठी या यंत्राचा वापर शेतकरी करीत असतात. परंतु कृषी क्षेत्राची डीग्री घेतलेले, पीएचडी असलेले, एमएससी असलेल्या मुलांकडून अशा प्रकारचे काम करवून घेणे योग्य नाही. तसेच सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्या प्रमाणे या ठिकाणच्या 421 प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याच्या संदर्भात चौकशी करण्यात येईल. तसेच या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याच्या संदर्भात सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल. आता या ठिकाणी भरतीची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली असून प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याच्या संदर्भात निश्चित प्रयत्न करण्यात येईल.

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मुले कुळव ओढत असतांनाचे फोटो सभागृहाला दाखविलेले आहेत. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, एखाद्या सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली तर ती सत्य समजून त्याची चौकशी केली पाहिजे. यासंदर्भात काल चर्चा देखील झालेली आहे. त्यामुळे यासंदर्भातील चौकशी त्वरीत करुन त्याचा तपशील सोमवारी सभागृहात सादर करावा तसेच यामध्ये जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. अधिकारी दोषी नसतील तर त्यासंदर्भात सभागृहात स्पष्ट करावे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती सत्य समजून पुढील कारवाई करावी एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

---------------------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध न करणे .

**मु. शी.** : अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध न करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे यांनी "अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...

...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील मागासवर्गातील अप्रशिक्षित शिक्षकांचा प्रश्न मी मांडलेला आहे. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष प्रवर्गामध्ये प्रशिक्षित शिक्षक न मिळाल्यास त्याच वर्गातील अप्रशिक्षित उमेदवाराची नेमणूक करता येईल अशी तरतूद आहे. अशा अप्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाची असताना गेल्या तीन वर्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे मागासवर्गातील अप्रशिक्षित उमेदवार शिक्षकांच्या सेवेपासून वंचित राहिले आहेत. प्रशिक्षण न घेतल्यामुळे आतापर्यंत हजारो शिक्षकांची सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत. शासनाने मान्य केलेले आहे की, प्रशिक्षण योजना बंद असल्यामुळे प्रशिक्षण देता आले नाही. सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, ज्या शिक्षकांची तीन वर्षांची सेवा झ ाालेली आहे आणि ज्यांची प्रशिक्षण घेण्याची इच्छा आहे परंतु शासनाने प्रशिक्षण देणे बंद केले असल्यामुळे त्यांना प्रशिक्षण घेता आले नाही. अशा सर्व शिक्षकांना शासन संरक्षण देणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, एस.सी.,एस.टी., एस.बी.सी, या वर्गातून अर्हताप्राप्त उमेदवार मिळत नाहीत म्हणून हा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एस.टी, डी.टी., एस.बी.सी. या संवर्गातील शिक्षण सेवकांची स्वतंत्र प्रशिक्षणाची व्यवस्था शासनाकडून केली जाईल. दुसरी बाब अशी की, आपण प्रशिक्षणासाठी तीन वर्षाचा कालावधी दिला असला तरी या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण होतेच असे नाही. तेव्हा शासनाने आणखी एक वर्षाचा कालावधी वाढवून एकूण चार वर्षाच्या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण करावे असा निर्णय घेतलेला आहे. या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण झाले नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येते.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, प्रशिक्षण न झाल्यामुळे हजारो शिक्षकांच्या नोकऱ्या गेलेल्या आहेत, त्यांच्या सेवा समाप्त करण्यात आलेल्या आहेत. तेव्हा शिक्षकांना प्रशिक्षण घेण्यासाठी आणखी दोन वर्षाचा कालावधी वाढविण्यात येणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी मघाशी उत्तरात सांगितले की, तीन वर्षाचा कालावधी होता, त्यामध्ये आणखी एक वर्षाचा कालावधी वाढवून एकूण चार वर्षाचा कालावधी केलेला आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण शिक्षक राहिलेले आहात, आपण विद्यार्थ्यांना शिस्त लावता. परंतु आपण याठिकाणी सर्वजण एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत आहात. मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांना प्रश्न विचारण्याची संधी देत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ज्या शिक्षकांची तीन-चार वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे परंतु शासनाने प्रशिक्षण देणे बंद केल्यामुळे त्यांचे प्रशिक्षण होऊ शकलेले नाही. त्यामुळे त्यांची सेवा समाप्त करण्याचा निर्णय संस्थाचालकांनी घेतलेला आहे. तेव्हा अशा शिक्षकांना सेवेत ठेवण्याचे आदेश मंत्रिमहोदय देणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, तीन वर्षाचा कालावधी संपल्यानंतरही एक वर्षाचा कालावधी वाढवून दिलेला आहे. अशा शिक्षकांना संस्थानी कामावरुन कमी करु नये यासाठी प्रशिक्षणाचा कालावधी चार वर्षाचा करण्यात आलेला आहे. अप्रशिक्षित शिक्षकांना डी.एड.चे प्रशिक्षण देण्याची स्वतंत्र व्यवस्था शासनाने केलेली आहे.

-------------

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन 2007 चे वि.स.वि.क्र.42-महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधयकासंबंधी.**

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या व उपस्थित सर्व पक्षाच्या गटनेत्यांच्या परवानगीने प्रथम पुरवणी विनियोजन विधेयक मंजूर करुन घेऊ. मी यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी यांच्याशी बोललो आहे. त्यांच्या परवानगीने आपण पुरवणी विनियोजन विधेयक प्रथम घेऊ. माननीय मंत्रिमहोदयांनी विधेयक मांडावे.

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 42 महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक मांडते.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्हाला अजूनपर्यंत विधेयकाच्या प्रतीच मिळालेल्या नाहीत, त्या मिळणे आवश्यक आहे. आपण विधेयक जरुर मंजूर करा. आम्ही या विधेयकावर बोलणार नाही. परंतु सदर विधेयकाच्या प्रती आम्हाला मिळणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : विधेयकाच्या प्रती देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आमच्यासमोर विनियोजन विधेयकाच्या प्रती आलेल्या नाहीत. आपण जर हे विधेयक असेच पास करुन घेतले तर ते अनपार्लमेंटरी होईल. विधेयकाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना मिळण्याच्या दृष्टीने आपण संबंधितांना सूचना द्याव्यात.

**उपसभापती** : ठीक आहे. 10 मिनिटात आपल्याला विधेयकाच्या प्रती देण्याची व्यवस्था करण्यात येईल. आता सभागृहामध्ये माननीय आदिवासी विकास मंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे आता आपण मघाशी जे नियम 93 अन्वयेचे निवेदन राखून ठेवले होते, ते चर्चेस घेऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील आदिवासी विभागातील निकषपात्र तुकड्यांना अनुदान न मिळणे.

**मु. शी.** : राज्यातील आदिवासी विभागातील निकषपात्र तुकड्यांना अनुदान न मिळणे याबाबत श्री. व्ही. यू. डायगव्हाणे व इतर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

(चर्चा पुढे सुरु......

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आदिवासी विभागातील शाळांच्या संदर्भातील हा प्रश्न असल्यामुळे त्याचे उत्तर आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांनी द्यावे, असे माननीय शालेय शिक्षण विभागाच्या मंत्र्यांनी सांगितले. याठिकाणी अनुदान उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सूचना करण्यात आलेली आहे परंतु नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. यासंदर्भात दिनांक 30 जून, 2006 रोजी शासन निर्णय काढला. त्यामध्ये 439 शाळा बिगर आदिवासी विभागाच्या शाळा आणि 51 आदिवासी विभागाच्या शाळा अनुदान पात्र ठरविण्यात आल्या. बिगर आदिवासी 439 शाळांना आपण जून, 2006 पासून अनुदान लागूही केले, परंतु या आदिवासी विभागाच्या शाळांचा प्रश्न तसाच आहे. या शाळा आता निकषपात्र ठरल्या असून त्यांना अनुदानसुध्दा मंजूर झाले आहे. परंतु आता आपण असे म्हणत आहात की, त्या शाळांमध्ये आदिवासींच्या शाळा 50 टक्क्यांपेक्षा कमी आहेत, हे बरोबर नाही. मघाशी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेबांनी मागणी केल्याप्रमाणे, यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी बदमाशपणा केलेला आहे, त्यांना आपण सस्पेंड करावे. कारण, या शाळा अनेक वर्षापासून अनुदानापासून वंचित आहेत. त्यामुळे याबाबतीत पूर्वीची जी 50 टक्क्यांची अनुदानाची अट होती, ती अट पात्र ठरवून आपण अनुदान देणार का ?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक झालेली असून याबाबतीत आदिवासी विकास विभागाने असे धोरण ठरविले आहे की, शालेय शिक्षण विभागाला किंवा उच्च शिक्षण विभगाला जर त्याठिकाणी शाळा सुरु करावयाच्या असतील तर आदिवासी विकास विभागाची परवानगी घ्यावी लागेल व जर त्यांनी तशी परवानगी घेतली नाही तर त्या शाळांना अनुदान मिळणार नाही.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...........

आदिवासी भागामध्ये ज्या शाळा काढल्या जातील त्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची पटसंख्या कमीतकमी 50 टक्के असेल तरच आदिवासी विकास विभागाकडून अनुदान देऊ, अशा पद्धतीचा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाने काढला आहे. ज्या शाळांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला 44 + 7 त्या 51 शाळांबाबत असे घडले की, ज्या शाळा चालू आहेत त्यामधील आदिवासी विद्यार्थ्यांची पटसंख्या किती आहे, याबाबत आम्ही वारंवार शिक्षण विभागाकडे मागितली माहिती मागितली आहे, परंतु अद्याप ती त्या विभागाने दिलेली नाही. त्यामुळे जोपर्यन्त ही माहिती तो विभाग देत नाही तोपर्यन्त आम्ही निधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही, असे वारंवार शिक्षण विभागाला लिहिले आहे. त्या विभागाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आम्ही निधी उपलब्ध करुन देऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मघाशी कौतुक सांगितले, ते सभागृहात येण्याचे कारण नाही. हे जे कौतुक आहे ते सभागृहाच्या दारात येण्यापूर्वी पार पडले पाहिजे. माणुस आहे, मतभेद होणार, हे आम्ही मान्य करतो. तुमचा विभाग आहे, तुम्ही निकष ठरविले, कायद्याने जे अधिकार आहेत, ते वापरा. ग्रॅंट देण्यासाठी निकषपात्र शाळा म्हणून तुम्ही शासन निर्णय काढला. दोन्ही विभागांचे अधिकारी मंत्रालयातच बसतात, वेगवेगळे, समुद्राच्या अंतरावर बसत नाहीत. त्यांनी दोघांच्या नेतृत्वाखाली निर्णय घ्यावयास पाहिजे, येथे भांडण घेऊन येण्याची गरज नाही. त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी न करता जर दुसरा शासन निर्णय काढला असेल तर संबंधित अधिका-याला पहिल्यांदा निलंबित करा, अन्यथा ग्रॅंट द्या. जे काही करायचे आहे ते तुम्ही दोघेही ठरवून या. सभापतींनी आदेश द्यावयाचे नाहीत, असे म्हटले तर मग असा खेळ चालू द्यावयाचा का ? आता भांडण कुठे गेले ? निकषावर नाही, तुम्ही का दिले ? यावर भांडण आहे. हे कौतुक येथे येण्याचे कारण नाही. हे संसदीय पद्धतीत बसत नाही. तुम्ही शासन निर्णय काढला, शासनाने काढला, मग त्या सर्वांना अनुदान द्या. निकषपात्र नसतांना दिले असेल तर पहिल्यांदा संबंधित अधिका-याला निलंबित करा. हे तुम्ही दोघे ठरवा की कोणाला द्यायचे, कोणाला द्यायचे नाही. शासन निर्णय बाजारात आणि ग्रॅंट मात्र नाही, ही गोष्ट लाजिरवाणी दिसते, चांगली दिसत नाही, तुम्हाला सांगण्यास बरे वाटणार नाही आणि

..2..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख..........

आम्हालाही येथे काम करतो हे सांगतांना संकोच वाटेल. सभापती महोदय, माझा आपल्यामार्फत पॉईंटेड प्रश्न आहे की, हा शासन निर्णय निर्गमित केला, हा नियमाप्रमाणे निर्गमित केला नसेल तर संबंधितावर काय कारवाई केली जाईल आणि नियमाप्रमाणे केला असेल तर अनुदान केव्हा दिले जाईल ? यांचे भांडण ऐकण्यासाठी आम्ही येथे बसलो आहोत काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अनुदानास पात्र असणा-यांसाठी ठराविक निकष आहेत. या निकषानुसार त्या शाळा पात्र आहेत. आदिवासी विकास विभागाचेही निकष आहेत. या शाळा परमनंट नॉनग्रँट शाळा आहेत. ट्रायबल ॲडव्हायझरी कौन्सिलने हे ठरविले आहे की, त्या शाळेत 50 टक्के आदिवासी विद्यार्थी शिकत असले पाहिजेत. ही ग्रँट आदिवासी विकास विभागाकडून दिली जाते. एक महिन्याच्या आत ही सर्व माहिती पुरविण्यात येईल व ज्या शाळेत 50 टक्के आदिवासी विद्यार्थी शिकत असतील त्यांना अनुदान दिले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी जे सांगितले ते आपल्या लक्षात आले का ? आपण हे लक्षात घ्या. शासन निर्णय यांनी काढला आणि त्यातील काही शाळांना ते अनुदान देत नाहीत, असे म्हणत असतील तर संबंधित अधिका-यावर कारवाई करा. ही कारवाई करणार का ? याचे उत्तर द्या.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, शिक्षण विभागाने माहिती पुरविल्याबरोबर ज्या शाळांमध्ये 50 टक्के आदिवासी विद्यार्थी शिकतात त्या सर्व शाळांना अनुदान उपलब्ध करुन देऊ.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, हे सर्व एक वर्षापासून सुरु आहे. 30 जून पासून शिक्षण विभागाकडून यादी दिली जात नाही.

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत अनुदान देण्यात येईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : एक वर्षापासून अनुदान देत नाही तर आम्ही काय करावे याचे मार्गदर्शन आता माननीय सभापतींनी आम्हाला करावे. आपण आता आम्हाला संरक्षण द्या व योग्य ते आदेश द्या.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : पीठासीन अधिका-यांनी निर्देश दिले तर ते सत्ताधारी पक्षाला आवडत नाहीत आणि निर्देश दिले नाहीत तर विरोधी पक्षाता आवडत नाही. अशा परिस्थितीमध्ये सभापतींची भूमिका काय आहे, हे जोपर्यंत सभागृहात ठरत नाही ......

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभापतींनी त्या खुर्चीमध्ये बसून दोन मंत्र्यांचे भांडण ऐकावे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आमचे भांडण वगैरे काही नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय भांडण नाही, असे म्हणत आहेत. मग शासन निर्णय कसा निघाला ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी आपली भूमिका मांडलेली आहे. त्यासंदर्भात आदिवासी विकास मंत्री महोदयांनी शासनाची भूमिका मांडलेली आहे. त्यानंतर माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी देखील शासनाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. ज्या शाळेमध्ये 50 टक्के आदिवासी मुले शिक्षण घेत आहेत याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली तर ताबडतोब अनुदान देण्याचा निर्णय आदिवासी मंत्र्यांनी जाहीर केलेला आहे.

प्रा.वसत पुरके : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत यादी तपासून घेतली जाईल.

**उपसभापती** : आता मी निर्देश देत आहे. या खुर्चीमध्ये बसून लोकांच्या हिताकरिता मला जे करावे लागेल ते मी करीन. मला माहिती आहे की, आपला मला पहिल्यापासून भक्कम पाठिंबा आहे. दुसरी गोष्ट अशी की, हा प्रश्न महत्वाचा आहे. आदिवासी विकास मंत्री आणि शिक्षण मंत्री या दोन्ही मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये वस्तुस्थिती सांगितलेली आहे. आदिवासी विकास विभागाच्या मंत्र्यांनी सांगितले की, ती माहिती शिक्षण विभागाकडून आलेली नाही. आदिवासी विकास विभागाकडे निधी उपलब्ध आहे. परंतु जोपर्यंत शिक्षण विभागाकडून माहिती येत नाही तोपर्यंत आम्ही निधी उपलब्ध करुन देऊ शकत नाही. आज बुधवार आहे. आपण आपल्या विभागाच्या संबंधित सचिवांना सांगून येत्या सोमवारच्या आत माहिती उपलब्ध करुन घ्यावी आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला अवगत करावे, अशी मी दोन्ही मंत्री महोदयांना विनंती करतो. मी आदेश देत नाही.

..2...

25-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3I-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, होय.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन्हा भरेल.

( दुपारी 3.19 ते 3.45 पर्यंत मध्यंतर )

---------

यानंतर श्री.गागरे .......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना घेण्यापूर्वी विनियोजन विधेयक घेण्यात यावे.

**उपसभापती** : वित्त मंत्री येथे उपस्थित नाहीत. दुस-या मंत्र्यांनी विनियोजन विधेयक मांडलेले चालेल काय ?

श्री दिवाकर रावते : होय.

**उपसभापती** : ठीक आहे. माननीय मंत्री श्री गणेश नाईक विनियोजन विधेयक मांडतील.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक.

**L. A. BILL NO. XLII OF 2007.**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2008.)**

श्री. गणेश नाईक ( कामगार मंत्री ): सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 42 महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक 2007 विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्याठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास संदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3 अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही. )

**उपसभापती** : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

.....

यानंतर श्री सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : तारापूर (जि.ठाणे) या औद्योगिक वसाहतीतील 'विराज ग्रुप'च्या कारखान्यात ओव्हर हेड क्रेन्स कोसळून झालेला अपघात.

**मु.शी.** : तारापूर (जि.ठाणे) या औद्योगिक वसाहतीतील 'विराज ग्रुप'च्या कारखान्यात ओव्हर हेड क्रेन्स कोसळून झालेल्या अपघातात 4 कामगार मृत्यूमुखी पडणे याबाबत ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

---

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. --

"कोकणपट्टीतील तारापूर (जि.ठाणे) औद्योगिक वसाहतीतील "विराज ग्रुप" या कारखान्यामध्ये दि.१९ जून, २००७ रोजी ओव्हर हेड क्रेन्स कोसळल्यामुळे झालेल्या अपघातात चार कामगार मृत्युमूखी पडणे, यापूर्वीही सन २००५-०६ मध्ये कोकणपट्टीतील अनेक कारखान्यात वायुगळती, रासायनिक स्फोट व अन्य अपघातात मोठ्या प्रमाणात कामगार जखमी होणे, मृत्यूपावणे असे प्रकार घडलेले असणे, कामगारांच्या सुरक्षेबाबत कारखानदार तसेच शासनाच्या औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाची उदासिनता प्रामुख्याने कारणीभूत असणे, जवळपास सर्वच कारखान्यात सुरक्षेच्या फारशा उपाययोजना नसणे, उक्त प्रकरणी नियंत्रण ठेवणेसाठी असलेल्या आपत्कालिन समित्यांच्या संचालनालयाने फारशा बैठका आयोजित न करणे, परिणामी कोकण पट्टीतील कामगारांचे जीवन असुरक्षित असणे, कामगारांचे नाहक बळी जाणे, यामुळे लाखो कामगारात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, याकडे शासनाचे होत असलेले जाणिवपूर्वक दुर्लक्ष, अपघातांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उक्त सर्व कारखान्यात कामगार संरक्षणाच्या आवश्यक त्या सर्व उपाययोजना करणेबाबत तसेच यासाठी उक्त संचालनालयाने नेहमी सतर्क राहणेची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने प्राथम्याने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : महोदय, या लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. ) ...... ३के इ २ ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवर मा. कामगार मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, कोकणपट्टीतील या औद्योगिक वसाहतीतील कामगारांच्या सुरक्षिततेचा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. लागोपाठ घटना घडताहेत त्यात कामगार मृत पावतात. व्यवस्थापनाच्या चुकांमुळे, किंबहुना फॅक्टरी इन्स्पेक्टरने व्यवस्थित पाहणी न केल्यामुळे त्याच्या तपासात राहिलेल्या त्रुटी किंवा स्टॅबिलिटी सर्टिफिकेट देणाऱ्या अधिकाऱ्यांनी कोठलीही पाहणी न करता दिलेली प्रमाणपत्रे अशा वेगवेगळ्या कारणांस्तव हे अपघात घडत आहेत. दुसरे असे की, मालक वर्गाला त्या संबंधात कोठल्याही प्रकारे कायद्याचा धाक राहिलेला नाही. म्हणून माझा नेमका प्रश्न असा आहे की, या विराज ग्रुपमध्ये जो अपघात घडला त्याला कारखानदार जबाबदार होते अशा कारखानदारांवर आपण अद्याप कारवाई केलेली नाही. ती कारवाई आपण करणार आहात का ? दुसरा प्रश्न असा आहे की, या अपघातामध्ये जे कामगार मृत झाले आहेत त्यांच्या वारसांना आपण नोकरी देणार आहात का ? तसेच या अपघातांना जी सरकारी यंत्रणा दोषी आहे, म्हणजे व्यवस्थित तपासणी न करता प्रमाणपत्र देणारे फॅक्टरी इन्स्पेक्टर्स असतील वा स्टॅबिलिटी सर्टिफिकेट देणारे अधिकारी असतील, त्यांनी आपल्या कामात कसूर केली असेल त्यांच्यावर आपण कठोर कारवाई करणार का ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. परब यांनी प्रश्न विचारला आहे की, त्या अपघातात मृत पावलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना कामावर ठेवणार काय ? तर याबाबत मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, निश्चितपणे याबाबतीत संबंधितांकडून हमीच घेतली जाणार आहे. तसेच त्या मृत कामगारांच्या नातेवाईकांना प्रत्येकी एक लाख रूपयांचे लगेचच वाटप करण्यात आलेले आहे आणि जे 4 कामगार मृत झाले आहेत त्यांना प्रत्येकाच्या नातेवाईकांना अनुक्रमे 2,43,560 रूपये, 2,41,945 रूपये, 2,36,680 रूपये, 2,24,235 रूपये अशा प्रकारे नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. सभापती महोदय, ज्या मालक वर्गाने, सुरूवातीस असे व्हायचे की, एखादा मॅनेजर नेमावयाचा आणि त्या केसेस मग जनरल मॅनेजर किंवा फॅक्टरी मॅनेजर हाताळावयाचा आणि त्यांच्यावरच त्याबाबतची जबाबदारी टाकली जायची आणि मालक वर्ग मात्र मोकळा राहायचा. म्हणून शासनाने यामध्ये सुधारणा केलेली आहे. ज्या संचालकांचे नाव बोर्ड ऑफ डायरेक्टरवर आहे त्यांच्यावरच अशा प्रकरणामध्ये सरळ फौजदारी खटला भरण्यास सुरूवात केलेली आहे. प्रस्थापित कायद्यानुसार अपघातासाठी जबाबदार म्हणून जी कारवाई करावयाची आहे

...... 3के 3 ....



KBS/ MAP/ SBT/ श्री. गागरे नंतर --- 15:25

ती त्या मालकालाच जबाबदार धरून आपण करणार आहोत. म्हणजे जे भोगवटादार आहेत, एम.डी., चेअरमन वगैरे जे कोणी असतील त्यांच्यावर आपण अशा अपघातांबद्दल जबाबदार धरून खटले भरतो आहोत. थोडक्यात यामध्ये अशा प्रकारे सुधारणा होत चालली आहे. आणखी हेही खरे आहे की, काही ठिकाणी अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे आणि तेथे औद्योगिकीकरणाचा विस्तार त्या मानाने जास्त आहे त्यामुळे तेथे अधिक संख्येने अधिकारी वर्गाची नेमणूक करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे. भविष्य काळामध्ये आपण सांगितल्याप्रमाणे तेथे जी संयंत्रे आहेत ती निश्चितपणे स्टॅण्डर्ड आहेत की नाही हे निश्चितपणे बघितले जाईल आणि जे अधिकारी त्यात कुचराई करतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, अशाच प्रकारे कोकण कोकण किनारपट्टीवर एबीएन टाटा मेटॅलिक कंपनीमध्ये भट्टीमध्ये स्फोट होऊन अपघात झालेले आहे पण सुदैवाने त्यात कोणत्याही प्रकारे मनुष्यहानी न होता हे प्रकार घडत असले तरी त्या रेडीजच्या उषा इस्पात कंपनीने ही टाटा मेटॅलिक कंपनी घेतलेली आहे आणि तेथे गेल्या 12 वर्षांपासून असलेली झोत भट्टी कोणत्याही रिपेअरींगशिवाय, आपला फॅक्टरी इन्स्पेक्टर तेथे जाऊन पाहणी न करता, त्या भट्टीबाबत कोणतेही सुधारणा करण्याचे आदेश दिलेले नाहीत. असे असताना तेथे स्फोट घडला. तेव्हा त्या स्फोटासंबंधातील गुन्हा दाखल करणार आहात का ? त्याचप्रमाणे या कंपनीमध्ये जे कामगार आहेत ते सातत्याने त्या भट्टीवर काम करणारे आहेत पण ते गेली 12 वर्षे तेथे रोजंदारीवर काम करीत आहेत त्यांना तेथे कायम करण्यासाठी मंत्री महोदय काही उपाय योजना करणार काय ?

( यानंतर श्री.सरफरे .... 3एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उल्लेख केलेली फॅक्टरी बरीच वर्षे बंद होती. त्यामुळे त्या कंपनीची दुरुस्ती करणे आवश्यक होते...

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सदर कंपनी बंद नव्हती. ही कंपनी उषा इस्पात ही कंपनी चालवीत होती. चालू स्थितीत असलेल्या या कंपनीला टाटा मेटॅलिक कंपनीने हँडओव्हर केले आहे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्य जी माहिती सांगत आहेत ती खरी आहे असे समजून त्याप्रमाणे जर ती कंपनी चालू असेल तर त्या कंपनीमध्ये असलेली विविध संयंत्रे, वजन काटे, क्रेन बॉयलर यांची तपासणी दरवर्षी होत असते. तशाप्रकारची तपासणी केली आहे काय? याची चौकशी करुन जे जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या कंपनीमध्ये गेली 12 वर्षे कामगार रोजंदारीवर आपला जीव धोक्यामध्ये घालून काम करीत आहेत. या कामगारांना परमनंट करण्यासाठी आपण कायदा करणार आहात काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी यासंबंधीची माहिती माझ्याकडे आणून दिल्यास त्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई करण्याचे निदेश दिल जातील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये "स्थानिक अरिष्ट समूह" असे म्हटले आहे. त्याऐवजी याठिकाणी "अरिष्ट निर्मूलन किंवा अरिष्ट प्रतिबंध" असे पाहिजे. कदाचित इंग्रजी भाषेचे मराठी भाषेमध्ये रुपांतर करीत असतांना ही चूक झाली असावी. तेव्हा ही झ ाालेली चूक दुरुस्त करण्यात येईल काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सदर वाक्य रचनेमध्ये "अरिष्ट निर्मूलन किंवा अरिष्ट प्रतिबंध" अशा अर्थाचा शब्दप्रयोग अभिप्रेत असेल तर तशाप्रकारची सुधारणा निवेदनामध्ये केली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, दुर्दैवाने या सदनामध्ये मराठीचा वापर होत असतांना सुध्दा त्यामध्ये अनेक चुका होत असतात. या सार्वभौम सदनामध्ये मराठी भाषेचे भाषांतर करीत असतांना एवढया चुका होत असतील तर सदना बाहेर मराठीची काय परिस्थिती होत असेल याचा आपण विचार करावा. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये म्हटले "कारवाई करण्यात येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

आहे" असे म्हटले आहे, त्याऐवजी "कारवाई केली आहे" असे असावयास पाहिजे. हा अपघात जून महिन्यामध्ये घडला असून आता जुलै महिना संपत आला आहे. आजच्या स्थितीत या भोगवटाधारकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे? ते सांगणे आवश्यक आहे. आता अधिवेशन चालू असल्यामुळे आपण हे उत्तर देत आहात. उद्या अधिवेशन संपल्यानंतर आपण कारवाई करणार नाही.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यामुळे माननीय सदस्यांच्या मनामध्ये आलेली शंका चुकीची नाही. हा अपघात घडल्यानंतर तेथील संपूर्ण यंत्रणेचा तपास केला पाहिजे. त्याठिकाणी असलेल्या विविध कनेक्टेड लेबरची साक्ष घ्यावी लागते, त्यांनी वापरलेल्या मालाचा दर्जा तपासून घ्यावा लागतो, त्यांनी कोणते संयंत्र घेतले आहे याची तपासणी करावी लागते. ते संयंत्र आय.एस.आय. दर्जाचे रजिस्टर्ड आहे की नाही हे सर्व तपासल्यानंतर पुढील कारवाई निश्चितपणे होणार आहे. पुढील अधिवेशनामध्ये या भोगवटाधारकाविरुध्द अमूक सेक्शनखाली खटला भरल्याचे आपल्याला दिसेल. फक्त आता त्याची प्रोसेस चालू आहे. सकाळी ब्रिफिंग चालू असतांना मी माझ्या अधिकाऱ्यांना या कारवाईकरिता एक महिन्याचा कालखंड कां लागला? त्यांच्यावर अजून कारवाई कां होत नाही ? असा प्रश्न विचारला होता. त्यामुळे ही कारवाई इनटाईम केली पाहिजे या आपल्या मताशी मी देखील सहमत असून ती कारवाई करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इ.धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांवर मोफत उपचार न होणे

**मु.शी.**: मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इ.धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांवर मोफत उपचार न होणे यासंबंधी सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ४१ अअ,चे मुंबईतील लिलावती, हिंदुजा व जसलोक इत्यादी धर्मादाय रुग्णालयांनी पालन न करणे, कलम ४१अअ, मधील अटीनुसार गरीब व आर्थिक दृष्टीने दुर्बल घटकातील रुग्णांवर मोफत उपचार न करणे, दिनांक ११ जुलै,२००६ रोजी रेल्वेतील बॉम्ब स्फोटात जखमी झालेल्या रुग्णांना मोफत उपचार करण्यास नकार देणे, लिलावती, हिंदूजा, जसलोक व इतर २१ खाजगी रुग्णालयांमध्ये जखमी झालेल्या ५२५ व्यक्तिना खाजगी धर्मादाय इस्पितळांमध्ये दाखल करण्यात येणे, या खाजगी रुग्णालयांमध्ये कलम ४१अअ नुसार १० टक्के खाटा मोफत उपलब्ध करुन देण्याचे कायदेशीर बंधन असताना सुध्दा ११ जुलै, २००६ रोजी रेल्वेत झालेल्या बॉम्बस्फोटातील जखमींवर केलेल्या उपचारांचे सुमारे ३.१६ कोटी रुपये रेल्वे कडून वसूल करणे, ज्या जखमींचे पैसे रेल्वेने भरले नाहीत अशा प्रत्येक रुग्णांकडून जसलोक रुग्णालयाने ६०० रुपये, लिलावती रुग्णालयाने ७५० रुपये तर हिंदुजा रुग्णालयाने ८०० रुपये त्याच बरोबर या इस्पितळातील इंटर्न व एम.आर.ओ. ने प्रत्येकी एका व्हिजीटचे २०० रुपये व ६०० रुपये प्रत्येक जखमींमागे आकारणे, प्रत्येक जखमीला त्यांच्या व्हिजीट पोटी दररोज २४०० रुपये द्यावे लागणे व हे सर्व पैसे सक्तीने वसूल करणे, याशिवाय बॉम्बस्फोटातील ज्या जखमींनी अज्ञानामुळे मदतीसाठी अर्ज केला नाही अथवा ज्यांचे अर्ज मंजूर झालेले नाहीत अशा दुर्देवी रुग्णांकडून धर्मदाय रुग्णालयांनी सर्व खर्च वसूल करणे, यामुळे बॉम्बस्फोटातील जखमींच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या मनात निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनांसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : मंत्री महोदयांना निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी सन 2004 पासून धर्मादाय रुग्णालयांच्या संदर्भात चर्चा उपस्थित करत आहे. या निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 मधील कलम 41 अ अ अन्वये 10 टक्के रुग्णांवर मोफत उपचार करण्याची अट आहे." या कलमांन्वये 10 टक्के गरीब रुग्णांना मोफत आंतर रुग्ण आणि बाह्य रुग्ण सेवा दिली, असेही म्हटलेले आहे. त्यावेळेला काही मंडळी हायकोर्टामध्ये गेली. हायकोर्टाने यासंबंधी दखल घेण्याचे आदेश दिले. ही रुग्णालये किती निर्दयी आहेत ,हेच दिसून येते, असे असताना आपण त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करत आहात. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब नेहमी म्हणतात, की जे आय.ओ.एस. अधिकारी आहेत ते मोठ्या रुग्णालयामध्ये दाखल होतात, गरीब लोक दाखल होत नाहीत. गेल्यावर्षी रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाले. सभापती महोदय, मी दोन मिनिटांचा वेळ घेतो आणि पॉईन्टेड प्रश्न विचारतो. 21 रुग्णालयामध्ये बॉम्बस्फोटामध्ये सापडलेले 550 रुग्ण उपचारासाठी गेले असता, एकाही रुग्णावर मोफत उपचार या निर्दयी रुग्णालयांनी केले नाहीत. मी "निर्लज्ज" असा शब्द वापरतो. तो अनपार्लमेंटरी शब्द असेल तर तो रेकॉर्डवरून काढून टाकावा, नाही तर तसाच ठेवावा. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "दिनांक 13 जुलै 2006 रोजी खाजगी रुग्णलयांना पत्र पाठवून सदर रुग्णांकडून कोणतीही फी किंवा अनामत रक्कम न घेण्याबद्दल तसेच संबंधित रेल्वे प्रशासनाबरोबर सहकार्य करून सदर बिले प्रमाणित करून त्यांच्या प्रतिपूर्तीसाठी रेल्वेकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या." आपल्याकडे 100 रुग्ण आले असतील तर त्यातील 10 रुग्णांना मोफत सेवा द्या आणि उरलेल्या 90 रुग्णालयांची बिले रेल्वेकडे पाठवा, असे आपण त्यांना सांगितले नाही. आपण काय मेहरबानी केली ? पुढे म्हटलेले असे की, " 29 जुलै 2006 रोजी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी सर्व खाजगी रुग्णालयांची सभा घेऊन... " जशी काही जाहीर सभा घेतली. "वरील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याबद्दल सांगितले ".. म्हणजे रेल्वेकडून पैसे घ्या, असे सांगितले म्हणजे........

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

SKK/ SBT/ KGS/ MAP/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण : मी प्रश्नच विचारत आहे. या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे ते थातूरमातूर दिलेले आहे, असा माझा आरोप आहे. मागे हा प्रश्न उपस्थित केला होता, तेव्हा माननीय मंत्री महोदय दोन मिनिटामध्ये उत्तर देऊन निघून गेले. त्याबाबत काही निर्णय घेतला नाही. निवेदनाच्या पानवरीलअ तिसऱ्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "रुग्णांच्या तक्रारी त्या खाजगी रुग्णालयांच्या निदर्शनास आणण्यात आल्या.".. आणि पुढच्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "कोणतीही तक्रार शासनाकडे प्राप्त झाली नाही.", हे विसंगत उत्तर दिलेले आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी त्याच दिवशी म्हणजे 12 जुलै रोजी येथे निवेदन केले की, "मी काल सायन हॉस्पिटलला जाऊन भेट दिली, पहाणी केली. त्या ठिकाणी कोणाचे हात तुटलेले आहेत.." ते भावनाप्रदान भाषण करण्यामध्ये लोकप्रिय आहेत.... "कोणाचे पाय तुटलेले आहेत, ते वर लटकवून ठेवलेले आहेत, त्यातून भळाभळा रक्त वहात आहे., लटकून का ठेवले असे डॉक्टांना विचारले असता, डॉक्टरांनी सांगितले की, या ठिकाणचे ऑपरेशन थिअटर पूर्ण भरलेले आहे, काही ऑपरेशन्स झाल्यानंतर त्यांना आतमध्ये घेऊ. आपल्याकडे ऑपरेशन्स थिअटर कमी आहेत म्हणून दहा मिनिटांनी निर्णय घेतला की, ज्या रुग्णालयामध्ये ऑपरेशन थिअटर नाहीत, त्या ठिकाणच्या लोकांच्या म्हणण्यानुसार लोकांना ज्या खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावयाचे असतील, ते घ्यावेत, त्याचा खर्च राज्य सरकारमार्फत केला जाईल." त्यानंतर आपण एक दमडीसुध्दा त्यांना दिलेली नाही. श्री.किरीट सोमय्या, हे आज सकाळी 11-00 वाजता सगळया रुग्णांना घेऊन मानवाधिकार आयोगाकडे तक्रार घेऊन गेलेले आहेत. त्यांचे हाल झालेले आहेत. त्यांना कानांनी ऐकायला येत नाही, त्यांना 100-150 रुपयाचे श्रवणयंत्र दिले नाही. येथे आपण खोपरापासून ढोपरापर्यन्त वल्गना करता की, हे करू ते करू, राज्य कसे चांगले चाललेले आहे..वगैरे.. आम्ही सकाळी उपमुख्यमंत्र्यांचे भजन ऐकले. घोषणा केल्यानंतर त्यांनी या रुग्णांना एकही पैसा दिलेला नाही. त्या ठिकाणी आपल्याकडील प्रतिनिधीही उपस्थित राहिलेले नाहीत. त्या ठिकाणी सगळ्यांकडून पैसे घेतले.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

ज्या काही रुग्णांकडून पैसे घेतले त्यांची वानगीदाखल नावे वाचून दाखवितो. बाबुकुमार रे यांच्याकडून 2 लाख 40 हजार रुपये नानावटी हॉस्पिटलने घेतले. मनिष मुनानी यांच्याकडून 1 लाख 46 हजार रुपये नानावटी हॉस्पिटलने घेतले. जयदीप संपत याच्याकडून 4 लाख 55 हजार रुपये शुश्रूषा हॉस्पिटलने घेतले. मौलीन सोमय्या यांच्याकडून होली फॅमिली रुग्णालयाने 3 लाख 25 हजार रुपये घेतले. अन्सुल स्थापक यांच्याकडून 3 लाख 94 हजार रुपये व्होकार्ट हॉस्पिटलने घेतले. विराज पांचाळ यांच्याकडून 5 लाख रुपये भाटिया हॉस्पिटलने घेतले. अश्फाक खान यांच्याकडून 19 लाख 38 हजार रुपये जसलोक हॉस्पिटलने घेतले. अशोक तिवारी यांच्याकडून 3 लाख 78 हजार रुपये बॉम्बे हॉस्पिटलने घेतले. बी. श्रीराम यांच्याकडून 10 लाख 81 हजार रुपये लीलावती हॉस्पिटलने घेतले. या बॉम्बस्फोटातील दोन जखमी रुग्ण कोमात असून अजून इस्पितळात उपचार घेत आहेत. त्यापैकी अमित सिंग यांच्या उपचारावर 20 लाख 30 हजार रुपये तर पराग सावंत यांच्या उपचारावर 16 लाख 57 हजार रुपये आतापर्यंत खर्च झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे काय असा माझा पहिला प्रश्न आहे. संतोषकुमार कोहलिया यांच्याकडून करुणा हॉस्पिटलने पैसे घेतले. त्यानंतर मनुभाई भट यांच्याकडून आर. के. हॉस्पिटलने 14,538 रुपये घेतले आणि हिअरींग एड देण्यासाठी 36 हजार रुपये घेतले. हिंदुजा हॉस्पिटलमधून रामनिवास पन्नालाल लढ्ढा यांच्याकडून पैसे घेतले. लक्ष्मण बळवंत सावंत यांच्याकडून पैसे घेतले. त्यानंतर दशरथ पटेल यांची भाटिया हॉस्पिटलमध्ये ट्रिटमेंट झाली. तो म्हणाला की, मी गरीब आहे. ते म्हणाले की, तू गरीब असलास तरी तू तसे लिहून दे. त्याचे पैसे रेल्वेकडून घेतले गेले. पालम राणे यांच्याकडून हिंदुजा हॉस्पिटलने 1 हजार रुपये घेतले. त्यांना फक्त 15 टक्के कन्सेशन दिले. असे असताना आपण या ठिकाणी असे लिहिले आहे की, त्या ठिकाणी पैसे घेतलेले नाहीत. त्यानंतर कमल खोमाका यांच्याकडून अमेय ऑर्थोपेडीक हॉस्पिटल जे करुणा हॉस्पिटलच्या बाजूला आहे त्यांनी 75 हजार रुपये घेतले. माझा पहिला प्रश्न असा आहे की, हे पैसे घेतले हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, ज्यांनी आपल्याला या लक्षवेधीबद्दल असत्य माहिती दिली त्या अधिकाऱ्यांना आजच्या आज सस्पेंड करणार काय ? तिसरा प्रश्न असा की, धर्मादाय ॲक्टच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

अंतर्गत येणाऱ्या या रुग्णालयामध्ये रेल्वेच्या बॉम्बस्फोटानंतर किती रुग्ण ॲडमिट झाले ? किती लोकांचे पैसे रेल्वेने दिले आणि किती लोकांचे पैसे कलम 41(अ)(अ) प्रमाणे त्या ठिकाणी हॉस्पिटलने माफ केले याची चौकशी करुन सोमवारी किंवा मंगळवारी अहवाल ठेवणार काय ? ज्यांनी या गरिबांकडून पैसे घेतले त्यांचे पैसे हॉस्पिटलकडून परत घेणार काय ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, यामध्ये दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे ज्या विश्वस्त संस्था आहेत त्यांनी बी.पी.टी. ॲक्टच्या सेक्शन 41 (अ) प्रमाणे, ज्यांचे उत्पन्न 25 हजार रुपयांपेक्षा कमी आहे त्यांच्यासाठी 10 टक्के बेड्सचे रिझर्वेशन ठेवणे, मोफत रुग्णसेवा देणे आणि जे विकर सेक्शनमधील पेशन्ट्स आहेत त्यांना 50 टक्के सवलतीच्या दरामध्ये सेवा देणे हा आपल्या बी.पी.टी. ॲक्टप्रमाणे एक मुद्दा आहे. 11 जुलैला दुर्देवाने जे बॉम्बस्फोट घडलेले होते त्यावेळी या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभाग असेल किंवा महापालिकांचे हॉस्पिटल्स असतील त्या त्या ठिकाणी 11 ते 13 जुलै या कालावधीत काही पेशन्ट्स शासकीय रुग्णालयांमध्ये ॲडमिट होते आणि काही पेशन्ट्स खाजगी रुग्णालयांमध्ये गेलेले होते. त्यांची आकडेवारी माझ्याकडे आहे. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये किंवा शासकीय रुग्णालयामध्ये ट्रिटमेंट घेतलेल्या पेशन्ट्सची संख्या 260 आहे आणि खाजगी रुग्णालयांमध्ये ट्रिटमेंट घेणाऱ्यांची संख्या 612 आहे. आपण सांगितले होते की, जी काही बिले असतील ती प्रमाणित करुन त्यांच्या प्रतिपूर्तीसाठी रल्वे प्रशासनाकडे सादर करावीत तसेच त्यांची फ्री ऑफ कॉस्ट ट्रिटमेंट केली पाहिजे म्हणून आपण ज्या काही सूचना दिल्या होत्या किंवा जी काही मार्गदर्शक तत्वे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून सुचविलेली आहेत त्याबाबत आपण सांगितलेले आहे. ती घटना दुर्देवी होती आणि मानवतेच्या दृष्टीकोनातून जे करावयास पाहिजे होते त्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण सांगितलेल्या ज्या तक्रारी आपल्याकडे दिलेल्या आहेत त्याबाबतच्या तक्रारी आमच्याकडे प्राप्त झालेल्या नाहीत. परंतु रेल्वे विभागाला रिएम्बर्समेंटच्या बाबतीत जे काही सांगितले आहे त्यामध्ये ज्या खाजगी हॉस्पिटल्समध्ये ॲडमिटपासून डिस्चार्जपर्यंत ट्रिटमेंट दिलेली आहे अशा जवळपास 73 हॉस्पिटल्सची यादी माझ याकडे आहे. त्या हॉस्टिपल्समध्ये जे पेशन्ट्स होते त्यांच्या बाबतीत

...3...

RDB/ KGS/ MAP

डॉ. विमल मुंदडा ....

भाटिया हॉस्पिटलला 11 लाख रुपयांपर्यंत रिएम्बर्समेंट दिलेली आहे. बॉम्बे हॉस्पिटलला 14 लाख रुपयांपर्यंत रिएम्बर्समेंट दिलेली आहे. होली हॉस्पिटलला 11 लाख रुपयांपर्यंत रिएम्बर्समेंट दिलेली आहे. अशा प्रकारे रेल्वे विभागाने जवळपास 3 कोटी 21 लाख 96 हजार 112 रुपयांची रिएम्बर्समेंट दिलेली आहे. या 73 हॉस्पिटल्सची पूर्णपणे माहिती माझ्याकडे आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. रेल्वेने पैसे दिले नाहीत असे मी म्हणालो नाही. सेक्शन 41(अे) प्रमाणे जे रुग्ण ॲडमिट झाले त्यांना 10 टक्के मोफत सेवा दिली गेली नाही. निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, "यापैकी कोणेत्याही रुग्णांकडून संबंधित रुग्णालयाने कोणत्याही प्रकारची फी आकारलेली नाही. तथापि, यातून बोध होत नाही की सदर रुग्णांपैकी किती रुग्ण मोफत उपचारासाठी पात्र होते याची यादी धर्मादाय आयुक्त यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात येईल." ...

डॉ विमल मुंदडा : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न रिइम्बर्समेंटबाबतचा आहे. हॉस्पीटलने ज्यांच्याकडून पैसे घेतलेले आहेत, पेशण्ट ॲडमिट झाल्यानंतर त्याला डिस्चार्ज मिळेपर्यन्त जो खर्च पेशण्टसनी केलेला होता त्याच्या रिइम्बर्समेंटच्या संबंधीचा प्रश्न आहे. त्याबाबतीत रिइम्बर्समेंट झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आमच्याकडे तक्रारी आलेल्या नाहीत. हॉस्पीटल्सच्या अधिका-यांबरोबर, संबंधित अधिका-यां बरोबर चर्चा झालेली असून सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहीत ग्राह्य धरुन...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये गोंधळ निर्माण होतोय. माननीय मंत्री महोदय वेगळे उत्तर देत आहेत. या सदनामध्ये एक गंभीर विषय उपस्थित केल्या बद्दल सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना मी धन्यवाद देतो. प्रश्न असा आहे की, जे बॉम्ब स्फोट झाले ते राज्य शासनाच्या पोलीस खात्याच्या हलगर्जीपणामुळे झाले. त्यामुळे त्याची जबाबदारी सरकारची आहे. या बाबतीतील सर्व जबाबदारी आम्ही स्वीकारतो, असे शासनाच्या वतीने उत्तर सुध्दा दिले गेले आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, ह्या मोठ्या रुग्णालयांनी 10 टक्के रुग्णांना मोफत सेवा दिली पाहिजे. याबाबतीत माननीय मंत्री महोदय वेगळेच उत्तर देत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जी माहिती दिली ती शासनाच्या विभागाकडे का नाही ? तुमचे अधिकारी काय करतात ? जेव्हा बॉम्ब स्फोट झाले त्यासंबंधी तुमच्या विभागाने मॉनिटरिंग केले आहे की नाही ? उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदय गफलत करीत आहेत...

डॉ. विमल मुंदडा : मी उत्तरामध्ये गफलत करीत नाही. सेक्शन 41(अे)चे व्हायोलेशन झाले की नाही यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली तो वेगळा मुद्दा आहे आणि बॉम्ब

==2=

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 16:10

(डॉ. विमल मुंदडा...)

स्फोटामध्ये जखमी झालेल्या लोकांनी घेतलेल्या उपचाराच्या बिलांच्या रिएम्बर्समेंटसंबंधीचा वेगळा मुद्दा आहे. 1 सप्टेंबर पासून आतापर्यन्त सेक्शन 41(अे) प्रमाणे चॅरिटेबल हॉस्पिटल्सनी 100 रुग्णांना ट्रिटमेंट दिलेली आहे. त्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ज्यांचे उत्पन्न 25 हजार रु. पेक्षा कमी आहे, जे दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांना मोफत ट्रीटमेंट देणे हा एक भाग आहे. आणि ज्याचे उत्पन्न 50 हजार रु. पेक्षा कमी आहे, जे विकर सेक्शनमध्ये मोडतात त्यांना ट्रीटमेंट देणे हा दुसरा भाग आहे. धर्मादाय आयुक्तांनी या संदर्भात इण्डिव्हिज्युअल पेशण्टस्ची यादी तयार केलेली आहे. त्यांनी एक समिती देखील नेमलेली आहे. त्यामध्ये जॉईण्ट डायरेक्टर, पब्लिक हेल्थ, महापालिकेचे अधिकारी...

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. रेल्वेने पैसे दिले नाहीत असे मी म्हटले नाही. सेक्शन 41(अे)चे पालन केले नाही. जे ॲडमिट झाले त्यांच्या पैकी 10 टक्के लोकांना मोफत औषधोपचार का केला नाही. ॲडमिट झालेल्या पैकी 90 टक्के लोकांना त्या रुग्णालयांनी बिले का पाठविली नाही ? 100 टक्के लोकांना बिले का पाठविली ?

श्री. रणजित कांबळे : यामध्ये दोन वेगवेगळे विषय आहेत. कोणत्याही धर्मादाय रुग्णालयामध्ये 10 टक्के बेडस् हे बीपीएल किंवा विकर सेक्शनसाठी राखून ठेवले पाहिजेत हा एक विषय आहे. दुसरा विषय असा आहे की, जेव्हा बॉम्ब स्फोट झाले त्यातील जवळपास 800 रुग्णांपैकी 10 टक्के रुग्णांना मोफत औषधोपचार देणे आवश्यक आहे का ? हे वर्कमध्ये बसते की नाही हा प्रश्न आहे. फर्स्टक्लास कम्पार्टमेण्टमध्ये बॉम्ब ब्लास्ट झाला होता. ......

...नंतर कु. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : मंत्रिमहोदय, बॉम्ब ब्लास्ट जरी फर्स्टक्लास कंपार्टमेंटमध्ये झाला असला तरी तेथील आजुबाजूचे व प्लॅटफॉर्मवर असलेले इतर लोक पण जखमी झालेले आहेत.

गोंधळ

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, प्रथम मला माझे स्पष्टीकरण पूर्ण करु द्यावे, अशी माझी विनंती आहे.

गोंधळ

श्री.नितीन गडकरी : मंत्रिमहोदय, हे हॉस्पीटलवाले अतिशय चालू असतात ते गरीब माणसाला मदत करीत नाहीत.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, एक मिनिट मला पूर्ण बोलू द्या. आपली तक्रार वेगळी आहे आणि हा जो प्रश्न आहे तो वेगळा आहे. हा प्रश्न असा आहे की, हा बॉम्ब ब्लास्ट झाला त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचा मुद्दा असा होता की, 10 टक्के बेड हे वीकर सेक्शनसाठी राखून ठेवावयाला पाहिजेत परंतु तसे ठेवण्यात आले नाही किंवा त्यांचा लाभ या वीकर सेक्शन्सच्या लोकांना मिळाला नाही. यासंदर्भात मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, दरवर्षी 10 टक्के बेड्स हे वीकर्स सेक्शनसाठी वेगळे ठेवणे हे नियमामध्येच आहे आणि जेव्हा राज्य शासनाने सांगितले की, यासाठी जो काही खर्च आहे तो पूर्ण करण्यासाठी आम्ही त्याची जबाबदारी घेणार त्याच्या नंतर केंद्रशासन किंवा रेल्वेमंत्री श्री.लालूप्रसाद यादव यांनी सांगितले की, बॉम्ब ब्लास्टमध्ये जखमी झालेले जे पेशंट्स आहेत त्यांचा पूर्ण खर्च हे रेल्वे डिपार्टमेंट देणार आहे. त्यामुळे स्वाभाविक आहे की, प्रायव्हेट हॉस्पिटल्सची संपूर्ण बिले त्यांनी रेल्वे डिपार्टमेंटला दिलेली आहेत. त्यामुळे 800 पेशंट्सचे कन्फ्युजन येथे निर्माण झालेले आहे. म्हणून शासनाच्या नियमानुसार दरवर्षी जितके पेशंट्स येतात त्याच्या 10 टक्के बेड्स हे वीकर्स सेक्शनमधील पेशंट्सकरिता राखून ठेवणे बंधनकारक आहे.

**तालिका सभापती** : यासंदर्भात विधी व न्याय विभागाचे काय म्हणणे आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना दोन वेळा सभागृहामध्ये चर्चेला येऊन गेलेली आहे. मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील कलम 41 (अ) प्रमाणे मुंबईमध्ये जी मोठी हॉस्पीटल्स आहेत त्यांनी 10 टक्के बेड राखीव ठेवून त्यामाध्यमातून गरिबांवर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .....

उपचार केले पाहिजेत, म्हणजे शस्त्रक्रिया वगैरे ज्या काही असतात त्या केल्या पाहिजेत यासाठी मुंबईच्या हाय कोर्टामध्ये एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती आणि त्या जनहित याचिकाकर्त्याने त्या याचिकेमध्ये म्हटलेले आहे की, हे हॉस्पीटल्स ठरवून दिल्यानुसार गरिबांना सवलती देत नाहीत. शासन जरी आपण त्या हॉस्पीटल्सला मुंबईतील जमिनी स्वस्त दरामध्ये देत असले तसेच पाण्याचे बिल, विजेचे बिल यामध्येही सवलती देते, वाढीव एफ.एस.आय देखील दिला जातो. त्याचबरोबर या हॉस्पीटलमध्ये शस्त्रक्रियेकरिता येणा-या उपकरणांवर कस्टम डयूटी माफ केली जाते आणि या सर्वांच्या बदली फक्त 10 टक्के बेड गरीबांच्या उपचारासाठी राखून ठेवावेत, अशी अट ठेवली जाते. अनेक दिवस ही केस उच्च न्यायालयामध्ये चालली. त्यानंतर मग हॉस्पीटल्सच्या वतीने येऊन सविस्तर चर्चा केली व चर्चेअंती डिसीजन झाला की, दोन टक्के जी ट्रस्ट फी भरतो त्याच्यामधील जेवढे 10 टक्के गरीब पेशंट्स येतील त्यांचे उपचार करावयाचे असे ठरले. गेल्यावर्षी हे मॉनिटरिंग करतांना धर्मादाय आयुक्त, मुंबई, संचालक सार्वजनिक आरोग्य आणि महानगरपालिकेचे अधिकारी हे यामध्ये मॉडिफिकेशन करीत आहेत. त्यानुसार सध्याची जी ट्रस्ट फी आहे ती दोन टक्के आहे ती पाच टक्केपर्यंत करावी, असा मुंबई सेवा विश्वस्त मंडळाचा प्रस्ताव आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी स्पष्ट करु इच्छितो की, रेल्वेत झालेल्या स्फोटांच्या संदर्भात शासनाने सांगितले होते की, बॉंब ब्लास्टमध्ये जखमी झालेल्या पेशंट्सवरील उपचारांचा खर्च जो होईल तो आम्ही करु. परंतु तो खर्च माननीय रेल्वे मंत्री श्री. लालू प्रसाद यादव यांनी, केंद्रसरकार रेल्वे अपघातातील जखमींवर होणाऱ्या उपचाराचा खर्च करणार, असे सांगितल्यावर त्यात शासनाच्या नियमानुसार 10 टक्क्यांप्रमाणे विचार केला तर बॉम्ब ब्लास्टमध्ये जखमी झालेल्या लोकांमध्ये नेमका वीकर सेक्शनमधील जखमी कोण तसेच बी.पी.एल.कार्डधारक कोण हे कसे ठरविणार ? तसेच ग्रामीण भागातील बी.पी.एल.कार्ड धारकाला 15 हजार आणि शहरी भागातील बी.पी.एल.कार्ड धारकाला 25 हजार रुपये हे बघण्याची गरज आहे. परंतु रेल्वेमंत्री श्री.लालूप्रसाद यादव यांनी केंद्रसरकार बॉम्ब ब्लास्टमध्ये जखमी झालेल्या पेशंट्सचा खर्च करणार असे म्हटल्यानंतर याची गरज कोणाला भासली नाही.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पहिली गोष्ट अशी आहे की, जे जखमी झालेले आहेत त्यांच्याबाबतीत राज्यमंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर आहे. विधी व न्याय खात्याच्या राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर देखील बरोबर आहे. खरा प्रश्न आहे तो या रुग्णालयांवर चॅरिटी कमिशनर यांचे जे नियंत्रण असते त्याबाबतचा आहे. 10 टक्के सवलत देण्याच्या प्रश्नावर तीव्र असंतोष आहे. मागे याबाबतीत मी प्रश्न विचारला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होत `की, एखाद्या संचालकाच्या पातळीवर या 10 टक्के सवलतदेण्याबाबतच्या धोरणाचे मॉनिटरींग करण्याची गरज आहे. याबाबतीत सदनाच्या भावना तीव्र आहेत हे मला मान्य आहे. या रुग्णालयांना शासन स्वस्त दरात जमीन देते, पाण्याची सवलत देते, एफएसआय वाढवून देते आणि इतके सगळे दिल्यानंतर सुध्दा 10 टक्के सवलत देण्याच्या बाबतीत सर्वच पक्षाच्या लोकांची तक्रार आहे. चॅरिटी कमिशनरचे यावर नियंत्रण रहात नाही. केवळ कागदोपत्री रुग्णांना सेवा दिल्याचे दाखविले जाते. या रुग्णालयांतून गरीब माणसाला काय ट्रीटमेंट दिली जाते याचे अनेक पुरावे माझ्याकडे आहेत. फक्त कागदोपत्री माहिती दाखविली जाते. यासंबंधात मॉनिटरींग करणारी जी यंत्रणा आहे ती कुचकामी झालेली आहे. सरकारला खरोखरच गरीब रुग्णांना या 10 टक्के योजनेचा फायदा द्यावयाचा असेल तर याबाबत निश्चित धोरण ठरविणे आवश्यकआहे. जीवनदायी योजना आहे ही चांगली योजना आहे. या योजनेमध्ये खर्चाची मर्यादा 1 लाख रुपये होती ती आता दीड लाख रुपये करण्यात आलेली आहे. मी याबाबत शासनाचे अभिनंदन करतो. नागपूर,भंडार येथील जवळजवळ 750 रुग्णांना मी या योजनेचा फायदा मिळवून दिलेला आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचा तीव्र आक्षेप एवढाच आहे की, या योजनेची अंमलबजावणी होत नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की धर्मादाय आयुक्त यांचे यावर नियंत्रण आहे. परंतु त्यांच्या भरवंशावर शासनाने राहू नये. त्यांचे रिपोर्ट बोगस असतात. गरीब माणसाला या बडया हॉस्पीटलमध्ये दरवाजात देखील उभे केले जात नाही. फक्त कागदावर रेकॉर्ड दाखविले जाते. म्हणून माझी विनंती आहे की, मॉनिटरींग करण्याकरिता शासनाने विधिमंडळाची एखादी समिती नियुक्त करावी.

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, दोन्ही सदनातील सदस्यांची एक समिती नेमली जाईल आणि वर्षभरात या रुग्णालयांनी या योजनेबाबत काय केले याची तपासणी केली जाईल.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, ही सर्व बडी रुग्णालये सर्व प्रकारच्या सुविधा शासनाकडून घेतात परंतु 10 टक्के रुग्णांना मोफत औषधोपचार करण्याच्या वेळी आपली असमर्थता व्यक्त करतात. मुंबईमध्ये जे बॉम्बस्फोट झाले त्यातील अपघातग्रस्तांना या रुग्णालयांनी उपचार केले नाहीत हा गुन्हा आहे असे मला वाटते. अशा बडया रुग्णालयांवर बंधन आणण्याकरिता आणि नियमांचे पालन करण्याकरिता तसेच रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी व यातून मार्ग काढण्यासाठी शासनाच्या सार्वजनिक आरोग्य, विधी व न्याय, नगरविकास विकास या खात्याचे सचिव तसेच महापालिका आयुक्त आणि धर्मादाय आयुक्त यांची कायम स्वरुपी समिती शासन नेमणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हायकोर्टाने मॉनिटरींग समिती नेमलेली आहे. सहआयुक्त, आरोग्य सेवा, महापालिकेचे आरोग्य अधिकारी आणि धर्मादाय सहआयुक्त यांची एक समिती आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1........... श्री.रणजित कांबळे.........

सभापती महोदय, ही धर्मादाय रुग्णालये सहआयुक्त, धर्मादाय यांच्या अधिपत्याखाली येतात. त्यांच्यावर शासनातर्फे आरोग्य विभागाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. त्यामुळे विधी व न्याय विभाग आणि आरोग्य विभागाच्या सहमतीने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेऊन एक वेगळी समिती या संदर्भात मॉनिटरिंग करण्यासाठी स्थापन करणे गरजेचे आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय विधी व न्याय राज्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले ते बदलण्यात येऊ नये. या ठिकाणी आरोग्यमंत्री आणि विधी व न्याय राज्यमंत्री यांनी दिलेली माहिती लॉजिकली बरोबर आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी व सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांची आणि माझीही भावना एकच आहे, बॉम्बस्फोटामध्ये जखमी झालेल्या रुग्णांना नि:शुल्क उपचार दिले जावेत, ही एकच अपेक्षा आहे. कायद्यानुसार ज्यांचे वार्षिक उत्पन्न 25 हजार रुपयांच्या आत आहे अशांना 10 टक्के सवलतीच्या दरात उपचार दिले जावेत हे आम्हाला मान्य आहे. असेच रुग्ण सवलतीकरिता पात्र आहेत हे आम्हाला मान्य आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांच्याकडे ज्या 950 रुग्णांची यादी आहे त्यातील एकही रुग्ण 25 हजार रुपयांच्या आत उत्पन्न असलेल्यापैकी नाही. सन्माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी समिती नियुक्त करणार असल्याचे सांगितले आहे. परंतु बॉम्बे हॉस्पिटल व जसलोक रुग्णालय यांच्याबाबत माझा आक्षेप आहे. तेथे गरीब माणसाला दरवाजामध्ये सुध्दा उभे केले जात नाही. तुम्ही स्वत: अनुभव घेऊ शकता. पहिले पैसे भरा म्हणून सांगितले जाते. चॅरिटी कमिशनरच्या अहवालावर शासनाने विश्वास ठेवू नये. लोकप्रतिनिधींची समिती निर्माण करावी. प्रोसीजर ठरवून द्यावी आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री किंवा मंत्री यांना रिपोर्टिंग करावे. ज्यांचे उत्पन्न 25 हजार रुपयांच्या आत आहे त्यांना चांगली ट्रिटमेंट दिलीच पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशी सांगितल्याप्रमाणे उच्च न्यायालयाने एक मॉनिटरिंग समिती नेमली आहे. अशी समिती नियुक्त करुनही गरीब रुग्णांना उपचार दिले जात नाहीत. अशा रुग्णांना रुग्णालयाच्या दारात उभे केले जात नाही अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. उच्च न्यायालयाने मॉनिटरिंग करणारी समिती नेमली आहे. मी देखील सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांची समिती नियुक्त करण्याचे सुतोवाच केले आहे. आपण जी समिती नेमू, त्या समितीकडून उच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीच्या कामामध्ये हस्तक्षेप केला जाणार नाही. परंतु

..2..

लक्षवेधी सूचना क्र.1.......... श्री.हसन मुश्रीफ........

ही समिती 10 टक्के रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार दिले जातात की नाही याची पाहणी करील. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सदस्यांची समिती गठीत करण्याची विधी व न्याय विभागाची तयारी आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हायकोर्टामध्ये केस प्रलंबित आहे. त्या केसचा निर्णय आल्यानंतर जे आदेश येतील त्याप्रमाणे निर्णय घ्यावाच लागेल. सन्माननीय विधी व न्याय राज्यमंत्र्यांनी जी समिती गठीत करण्याचे सांगितले, त्या समितीकडून एकवेळ तपासणी केली जाईल. परंतु या संदर्भात कायमस्वरुपी नियंत्रण करणारी समिती असणे आवश्यक आहे. ही समिती लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांची असू शकते. परंतु ही समिती कायमस्वरुपी असणे आवश्यक आहे. या विषयाचा संबंध आरोग्य विभागाशी येतो. त्यामुळे समिती तयार करताना संबंधित विभागाचे कॉम्बिनेशन असणे आवश्यक आहे. हायकोर्टाचा निर्णय आल्यानंतर या समितीचे गठन करु, इतकेच मला म्हणावयाचे आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उपस्थित केलेला प्रश्न अतिशय भावनिक आहे. सन्माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी टी.व्ही. वर सांगितले होते की, रेल्वे बॉम्ब स्फोटातील ज्या लोकांना खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावयाचे असतील त्यांनी खाजगी दवाखान्यात उपचार घ्यावेत. ज्यावेळी अशी घोषणा टी.व्ही. वर झाली त्यावेळी सर्व सरकारी रुग्णालये ओस पडली. घोषणा झाल्यामुळे रेल्वे बॉम्ब स्फोटातील जखमीनी खाजगी रुग्णालयात उपचार सुरु केले. यामध्ये रेल्वे बॉम्ब स्फोटातील लोकांची काही सुध्दा चूक नाही. खाजगी दवाखान्यात ट्रिटमेंट घेऊन लोकांनी काहीही चूक केलेली नाही. परंतु जेव्हा डीसचार्ज घेण्याची वेळ आली त्यावेळेस रुग्णांना स्वत:च्या खिशातून पैसे भरावे लागले ही वस्तुस्थिती आहे. रेल्वे खात्याने रेल्वे बॉम्ब स्फोटातील काही जखमींचे पैसे दिले असतील परंतु अजून काही लोकांना पैसे मिळणे बाकी आहे ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. त्यामुळे रेल्वे बॉम्ब स्फोटातील किती लोकांना अद्यापपावेता पैसे मिळाले नाहीत याचा आपण शोध घ्यावा व त्यांना पैसे उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती आहे. सकाळ या वर्तमानपत्रात सुध्दा रेल्वे बॉम्ब स्फोटातील जखमींना पैसे मिळालेले नसल्याबाबत लोकांच्या मुलाखती छापून आल्या होत्या. त्यामुळे ज्या जखमींना पैसे मिळालेले नाहीत त्यांना शासन रिएम्बर्समेंट देणार आहे काय? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, हॉस्पीटलमध्ये गरीब रुग्णांना 10 टक्के जागा दिल्या जात नाहीत हे माननीय मंत्रीमहोदय सुध्दा मान्य करतील कारण ती वस्तुस्थिती आहे. गरीब लोकांना हॉस्पीटलमध्ये 10 टक्के जागा मिळाव्यात यासाठी हॉस्पीटल आणि डायरेक्टर ऑफ हेल्थ यांच्याकडून ऑनलाईन सर्व्हीस सुरु केली जाईल का? ऑन लाईन व्यवस्था झाली तर रुग्णांना त्याचा फायदा होईल व कोठे कोठे जागा खाली आहेत याची माहितीही शासनाला मिळेल त्यामुळे ही सुविधा ऑनलाईन केली जाणार आहे काय, तसेच ज्या रुग्णांना पैसे मिळालेले नाहीत अशा रुग्णांना रिएम्बर्समेंट मिळणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : महोदय, हॉस्पीटलमध्ये गरीबांना 10 टक्के जागा देण्याच्या संदर्भात जजमेंट डयू आहे. अशी व्यवस्था झाली तर कोणत्या हॉस्पीटलमध्ये किती बेड रिक्त आहे याची माहिती आरोग्य विभागाला तसेच शासनाला मिळेल. तसेच गरीब पेशंटला सुध्दा त्याचा फायदा होईल. दुस-या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आमच्या माहिती प्रमाणे काही प्रमाणात

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

पैसे दिले गेले आहेत. या प्रकरणामध्ये रुग्णोचे पैसे रेल्वे विभाग 100 टक्के भरणार होते. परंतु....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, रेल्वे बॉम्ब स्फोटातील 900 जखमींच्या उपचाराचा खर्च महाराष्ट्र शासन सोसणार आहे असे माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यावेळी सांगितले होते. काही जखमींना पैसे मिळालेले आहेत परंतु सर्वच जखमींना पैसे मिळाले अशी परिस्थिती नाही. बॉम्ब स्फोटातील अनेक जखमिंना हॉस्पीटलमध्ये पैसे भरावे लागलेले आहेत. त्यामुळे ज्या जखमीनी पैसे भरलेले आहेत अशा बॉम्ब स्फोटातील जखमी व्यक्तिंना रिएम्बर्समेंट दिली जाणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, असे प्रकरण आढळले तर ते तपासून घेण्यात येईल व ज्यांना पैसे मिळालेले नाहीत अशा जखमींना रेल्वेकडून पैसे मिळण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, जेव्हा सन्माननीय सदस्य सभागृहात माहिती देतात तेव्हा माननीय मंत्रीमहोदयांनी त्याला सत्य समजून उत्तर दिले पाहिजे. सन्माननीय मंत्रीमहोदय मधाशी असे म्हणाले की, "माझ्याकडे माहिती नाही." सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी पैसे न मिळणा-या व्यक्तींची नावे इतर सर्व माहिती या ठिकाणी दिलेली आहे. काही लोकांना तर 20 -20 लाख रुपयांची बिले भरावी लागलेली आहेत अशी सुध्दा उदाहरणे आहेत. बॉम्ब स्फोटातील जखमींकडून हॉस्पीटलने सक्तीने बिले वसूल केलेली आहेत. जो पर्यंत बील भरत नाही तोपर्यंत हॉस्पीटलने त्यांना डिसचार्ज सुध्दा दिला नाही. रेल्वे बॉम्ब स्फोटातील जखमींनी स्वत: हॉस्पीटलमध्ये बिले भरलेली आहेत त्यामुळे आपण रेल्वेविभागाकडून रिएम्बर्समेंट मिळवून देणार आहात काय ?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, अशी केस आढळल्यास त्याची तपासणी करण्यात येईल. सन्माननीय सदस्य जी माहिती देतात ती सत्य आहे असे आपण गृहीत धरतो. रेल्वे विभागाने जवळपास 3 कोटी 25 लाख रुपये वेगवेगळ्या पेशंटच्या नावाने दिलेले आहेत अशी आमच्याकडे माहिती आहे. एक पेशंट कोमामध्ये आहे,त्याच्यावर ट्रीटमेंट चालू आहे याची आम्हाला माहिती आहे.

श्री.नितीन गडकरी : ज्या पेशंटनी स्वत:चे पैसे भरले असतील त्यांना रिएम्बर्समेंट करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ही बाब तपासल्यानंतर जे काही पेमेंट असेल त्याबाबत आम्ही रेल्वे विभागाबरोबर चर्चा करुन रिएम्बर्समेंटची व्यवस्था करु.

श्री.प्रकाश शेडगे : सभापती महोदय, धर्मादाय रुग्णालयामध्ये गरिबांसाठी 10 टक्के बेडस् ठेवण्याचे कम्पलसरी केलेले आहे. ज्या दिवशी धर्मादाय आयुक्त रुग्णालयास भेट देणार असेल त्यादिवशी फुटपाथवरील, झोपडपट्टीतील लोकांना रुग्णालयात ॲडमिट केले जाते आणि आम्ही गरिबांसाठी बेडस् आरक्षित ठेवतो असे भासविले जाते. धर्मादाय आयुक्त रुग्णालयास भेट देणार याची माहिती संबंधित रुग्णालयांना आधीच कळते. आता आपण प्रत्यक्ष भेट दिली तर आपणास एक टक्का देखील गरीब रुग्ण तेथे दिसणार नाहीत आणि हे वास्तव आहे. सभापती महोदय, या संदर्भात उच्च न्यायालयात एक पी.एल.आय.दाखल करण्यात आली होती. त्यावेळी उच्च न्यायालयाने सरकारला निर्देश दिले की अशा रुग्णालयामध्ये शासनाने अधिकारी नेमावा. त्याबाबत शासनाने कार्यवाही केलेली नाही. शासनाने जर वेळीच अधिकारी नेमला असता तर ही अडचण आली नसती. तेव्हा उच्च न्यायालयाने निर्देश दिल्यानुसार अशा रुग्णालयांमध्ये शासन अधिकारी नेमणार काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, उच्च न्यायालयाचा निर्णय यावयाचा आहे. उच्च न्यायालय जो काही निर्णय देईल त्याचे शासन पालन करील.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, उच्च न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर त्याचे पालन करण्यात येईल असे मंत्रिमहोयांनी सांगितले. हे कोणते उत्तर आहे ? ......

..2..

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माझ्या उत्तराचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. पुढच्या महिन्यात उच्च न्यायलयाचा निर्णय होणार आहे. उच्च न्यायालय कोणते आदेश देणार आहेत ते लक्षात घेऊन शासन पुढील कार्यवाही करणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या सभागृहाच्या पॉवर्स डेलिगेटस् करणार आहात काय ? लेजिस्लेचर पॉवर्स मोठ्या की ज्युडिशिअरी पॉवर्स मोठ्या यावर एक डिबेट घ्यावे लागेल. आपण संवेदनशील महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी आहात. उच्च न्यालयाचा निर्णय झाल्यानंतर किती बेडस् ठेवावेत, त्यासाठी कोणती कार्यवाह करावी हे सांगणार आहात काय ? या विषयावर गेल्या वर्षभरात तीन-चारवेळा वेगवेगळ्या आयुधांच्या मार्फत हा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. गरिबांना न्याय मिळत नसेल तर अशा रुग्णालयांना टाळी लावली पाहिजेत. त्यांच्या सर्व सवलती काढून घेतल्या पाहिजेत. प्रत्येकवेळी अशातऱ्हेचे उत्तर देऊन गरिबांना त्यांच्या अधिकारापासून वंचित का ठेवत आहात ? तेव्हा कायद्याच्या कक्षेत राहून हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

कौशल्य मेडिकल फॉऊंडेशन हॉस्पीटलच्या बाबतीत फारच कहर झालेला आहे. महापालिकेला मॅनेज करुन त्याठिकाणी गरिबांसाठी बेडस् ठेवण्याची अटच रद्द केलेली आहे. त्यामुळे याबाबतीत आपण निर्णय कधी घेणार ? व अधिवेशन संपण्याच्या आत आपण बेडस् देण्याचे अधिकार किंवा सवलती देण्याचे निर्देश आपण संबंधितांना देण्यासंबंधीची भूमिका शासन घेणार का ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, त्या सभागृहाच्या भावना आहेत. The matter is sub-judice in the High Court. म्हणून तो निर्णय येईपर्यंत लोककल्याणाचे आदेश देता येत नाहीत असे काही नाही. हायकोर्ट काय निर्णय करणार आहे तो करेल. परंतु आपण शासनाचे मंत्री आहात. राज्य शासन चालवण्याची आपली जबाबदारी आहे. जनतेच्या कल्याणाची आपण शपथ घेतलेली आहे. त्यामुळे याठिकाणी सन्माननीय सदस्यांच्या भावना अशा आहेत की, हे मॅटर सब-ज्यूडिस असल्यामुळे यासंबंधी वाट पाहण्याची गरज नाही. आपण सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता, चॅरिटेबल कमिशनवर आमचा विश्वास नाही, त्यांचे रिपोर्ट बोगस आहेत. त्यामुळे चॅरिटेबलचे जे हॉस्पीटल आहेत, त्याबाबतीत आरोग्य विभागाने आढावा घेण्याच्या दृष्टीने आमदारांची कमिटी करुन ट्रान्सपरन्सी असावयास पाहिजे किंवा आपण नवीन वेबसाईड तयार करुन 10 टक्के बेड गरीब लोकांसाठी फ्री असल्याची माहिती लोकांना दिली पाहिजे. तेव्हा अशाप्रकारच्या सिस्टीम तयार करुन आपण लोकांना माहिती देणार का ? या हॉस्पीटलमध्ये गरिबांना 10 टक्केप्रमाणे सवलत देण्याच्यादृष्टीने आपण त्यांना व्यवस्थितरित्या ट्रीट करा. त्यामुळे याबाबतीत आपण सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सभागृहाला सांगितले की, याबाबतीत सिस्टीम तयार करण्याची आवश्यकता आहे. परंतु याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी प्रत्येक हॉस्पीटलमध्ये एक माणूस नेमण्यासंबंधीची सूचना केली, ती मान्य करता येणे शक्य नाही. कारण, आज मुंबईमध्ये चॅरिटेबल ट्रस्टचे 100 च्या वर हॉस्पीटल्स् असून पूर्ण राज्यामध्ये अशी हॉस्पीटल्स् बरेच आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांची ही सजेशन मान्य करता येणार नाही. परंतु याबाबतीत सिस्टीम होणे अत्यंत आवश्यक आहे. याठिकाणी माझी एवढीच विनंती आहे की,

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.....

यासंबंधी पुढच्या महिन्यात रिपोर्ट येण्याची शक्यता असून याबाबतची शेवटची हेअरिंग झालेली आहे. याबाबतीतील सजेशन्स लक्षात घेतल्या जातील व त्यांच्या व आपल्या सजेशन्स इन-कोऑपरेट करुन याबाबतीत निर्णय घेण्यात येईल.

-------

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी क्रमांक 2 व 3 बाबत.**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेतील लक्षवेधी क्रमांक 2 व 3 पुढे ढकलण्यात आल्या आहेत. आता आपण लक्षवेधी क्रमांक 5 चर्चेस घेऊ.

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** :वस्तीशाळेचे रुपांतर तेथील शिक्षकासह नियमित शाळेत करणे

**मु.शी.** :वस्तीशाळेचे रुपांतर तेथील शिक्षकासह नियमित शाळेत करणे यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, जयंत प्र. पाटील, शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील ( मुंबई शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वस्तीशाळेचे रुपांतर तेथील शिक्षकांसह नियमित शाळेत करण्यासाठी नेमण्यात आलेल्या वस्तीशाळा अभ्यासगटाचा अहवाल येऊनही अद्यापपर्यंत याबाबत शासनाने कोणताही निर्णय न घेणे, त्यामुळे सुमारे 9000 वस्तीशाळांच्या भवितव्याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण होणे, डोंगरदऱ्या आणि तांडया, पाडयावरील वंचित विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर टांगती तलवार राहणे, सुमारे 9000 शिक्षकांचे भवितव्य अनिश्चित होणे, यामुळे ग्रामीण भागात निर्माण झालेला असंतोष व संताप याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया" "

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, वस्तीशाळांचे रुपांतर नियमित शाळात करण्याच्या दृष्टीने जो अभ्यासगट नेमण्यात आला, त्यांच्या शिफारशी काय ? व त्या अभ्यासगटाने ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी शासन नेमक्या किती दिवसात करणार आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना अभ्यासगटाच्या शिफारशी हव्या असतील तर त्या पटलावर ठेवण्यात येतील. सर्वांना सामावून घेण्याच्या दृष्टीनेच अभ्यासगटाने शिफारशी केलेल्या आहेत, त्यामुळे याबाबतीत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असून तसा प्रस्ताव तयार करुन तो वित्त व नियोजन विभागाकडे मुव्ह केला जाईल व लवकरात लवकर यावर कार्यवाही केली जाईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, वस्तीशाळांच्या संदर्भात येथे अनेकवेळा चर्चा झालेली असून शासनाने आता अभ्यासगट स्थापन केलेला आहे. सभापती महोदय,....

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी याठिकाणी माहिती देऊ इच्छितो की, अभ्यासगट केव्हाच स्थापन झाला होता, त्याचा अहवालही आलेला आहे व त्यासंबंधी आपण पुढची कार्यवाहीही सुरु केलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा प्रश्न तोच आहे. समिती होईपर्यन्तच्या काळामध्ये मुले शिक्षणापासून वंचित राहिली. अजून किती वस्तीशाळांची महाराष्ट्रात आवश्यकता आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, नवीन शाळांची आवश्यकता नाही. ज्या शाळा आहेत त्या बंद होणार नाहीत, याची दखल शासनाने घेतली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ज्यांना एक वर्ष पूर्ण झाले आहे अशा सर्व वस्तीशाळा, ज्यांच्यामध्ये पूर्ण क्षमता आहे, अशा सर्व शाळा नियमित करणार काय ? यापुढच्या काळात शिक्षकांचे शोषण करणारी आणि विद्यार्थ्यांना दुय्यम शिक्षण देणारी कोणतीही व्यवस्था निर्माण होणार नाही, याची दखल शासनाने घेतली आहे काय ?

प्रा.वसंत पुरके :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी यापूर्वी ज्यावेळी प्रश्न विचारला त्यावेळी त्यांनी मान्य केले होते की, अनौपचारिक शिक्षण न देता औपचारिक शिक्षण देणे आवश्यक आहे. ही योजना बंधनकारक नव्हती. काही तात्कालिक कालावधीसाठी ही योजना सुरु करण्यात आली होती. ज्या शिक्षकांनी प्रामाणिकपणे काम केले, मुलांच्या अपलिफ्टमेंटसाठी, प्रगतीसाठी काम केले त्या शिक्षकांचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या शिक्षकांना सेवेत कायम करावे, असा मानवतावादी दृष्टीकोन या सभागृहाने व्यक्त केला. त्यादृष्टीनेच शासनाने अभ्यासगट स्थापन केला आणि या अभ्यासगटाने केलेल्या शिफारशींवर शासन सहानुभूतिपुर्वक विचार करीत आहे. राज्यातील कोणताही मुलगा शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दखल शासनाने घेतली आहे. सर्व मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे, हा शासनाचा दृष्टीकोन आहे. त्याचप्रमाणे वसतीशाळांमध्ये ज्या स्वयंसेवकांनी काम केले त्यांना कायम स्वरुपी शासनाने कायम स्वरुपी सेवेत सामावून घ्यावे, अशा प्रकारचा मुद्दा आहे. अभ्यासगटाने अशी शिफारस केली आहे की, ज्या स्वयंसेवकांनी कमीतकमी दोन वर्षे काम केले आहे आणि 30 एप्रिल 2006 पर्यन्त कार्यरत होते अशा स्वयंसेवकांची ज्येष्ठता यादी तयार करण्यात यावी. अशा अनेक शिफारशी या अभ्यास गटाने केलेल्या आहेत. या सर्व शिफारशी सभागृहात वाचून दाखविणे शक्य होणार नसल्यामुळे मी त्या पटलावर ठेवतो.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहाला माहीत आहे की, डोंगरपट्टयामध्ये, दूरगामी भागामध्ये ज्या वसतीशाळा चालविल्या गेल्या तेथील शिक्षकांनी अत्यंत अल्प मानधनावर चांगले रिझल्टस् दिले आहेत. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये वस्तीशाळांमधील मुलगा पहिला आला आहे व त्याला तीनशे पैकी तीनशे गुण मिळालेले आहेत. त्यामुळे या शिक्षकांना डी.एड.ची अट न ठेवता त्यांचा कार्यानुभव समकक्ष मानून पुढच्या तीन वर्षात डी.एड.करण्याची मुभा त्यांना देण्यात येईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अभ्यासगटाने केलेल्या सर्व शिफारशी वाचणे गरजेचे आहे. मी आता वाचून दाखविली ती पहिली शिफारस आहे. जे शिक्षक डी.एड.झालेले आहेत त्यांना काहीही अडचण नाही. तसेच शिक्षकांनी मुलांच्या प्रगतीसाठी डिव्होशनने काम केले आहे, ही बाब लक्षात घेऊनच निकष ठरविले आहेत. त्यांच्या बाबतीत लिबरल राहून शिक्षक न्यायापासून वंचित राहू नये, असेच हे निकष आहेत. ज्या शिक्षकांची सेवा केवळ 2/3 महिने झाली आहे असेच शिक्षक या फायद्यापासून वंचित राहतील. इतर सर्वांना सामावून घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

-----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे जिल्हयात असलेला पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष

**मु. शी.**: "ठाणे जिल्हयात असलेला पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष" यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, पाशा पटेल, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे जिल्हयात पशुवैद्यकीय दवाखान्याचा अनुशेष असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, शासनाच्या नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापनेबाबतच्या निकषानुसार 5000 पशुधनामागे एक दवाखाना आवश्यक असताना ठाणे जिल्हयात दिनांक 30 जून 2007 पर्यन्त पशुधनाची गणनाच न होणे, त्यामुळे ग्रामीण भागात नवीन पशू दवाखाने सुरु न केल्यामुळे या भागात जनावरांची होत असलेली आबाळ व औषधांच्या सोयी सुविधांअभावी जनावरांचे होत असलेले मृत्यू, त्यामुळे शेतक-यांचे होत असलेले नुकसान, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शेतक-यांमध्ये पसरलेली तीव्र संतापाची भावना, यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. हसन मुश्रीफ ( पशुसंवर्धन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..........

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. पशुवैद्यकीय दवाखान्याऐवजी ठाणे जिल्हयातील जनावरे मेली. मोखाडा येथे सोळा जनावरे विशिष्ट अज्ञात रोगामुळे मेली. त्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना नव्हता, त्यामुळे त्यांच्यावर उपचार होऊ शकले नाहीत. पाच हजार पशुधनामागे एक पशुवैद्यकीय दवाखाना, असे जे शासनाचे निकष आहेत, त्या निकषानुसार दवाखाना त्या ठिकाणी निर्माण करणार काय ? पशुवैद्यकीय दवाखाना नसल्यामुळे व औषधोपचारापासून वंचित राहिल्यामुळे जी जनावरे मरण पावली त्यांच्यासंदर्भात नुकसान भरपाई देणार काय ? दोन पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष बाकी आहे, असे निवेदनात म्हटले आहे. तो अनुशेष केंव्हा पूर्ण करण्यात येईल ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पाच हजार जनावरांमागे एक पशुवैद्यकीय दवाखाना काढावा, असे शासनाचे निर्देश आहेत. ठाणे जिल्हयामध्ये 154 पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर .......... 16:50

श्री.हसन मुश्रीफ .........

निर्देशांक व अनुशेष समितीने ठाणे जिल्हयात 6 पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष निश्चित केला होता. दिनांक 31.03.2005 अखेर 4 पशुवैद्यकीय दवाखाने सुरु झालेले आहेत आणि 2 पशुवैद्यकीय दवाखाने सुरु व्हावयाचे आहेत. सन 2007-08 मध्ये डी.पी.डी.सी.ने यासाठी निधी प्राप्त करुन दिलेला आहे. 2 पशुधन विकास अधिकारी, 2 व्रणोपचारक आणि 2 परिचर अशी एकूण 6 पदे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी समितीची मान्यता घ्यावी लागेल, ती प्रलंबित आहे. लवकरात लवकर या 6 पदांची निर्मिती करुन दोन्ही पशुवैद्यकीय दवाखाने सुरु करण्यात येतील. मोखाडा तालुक्यामध्ये जनावरे अज्ञात रोगामुळे मरतात. त्याचे कारण असे आहे की, दरवर्षी भाताचे पीक काढल्यानंतर त्या शेतामध्ये जनावरांना मोकाट सोडले जाते. जनावरे भाताच्या पिकाचा भुसा खातात, त्यामुळे त्यांना विषबाधा होते व जनावरे मरतात. जनावरांना लस देण्याचे आणि औषधे देण्याचे काम पशुवैद्यकीय अधिकारी करीत असतात. मेलेल्या जनावरांची नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था आज तरी नाही. ठाणे जिल्हयातील 2 पशुवैद्यकीय दवाखान्यांची निर्मिती केली जाईल आणि औषधाविना जनावरे मरणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. 2 पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष केव्हा भरला जाईल ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, निधी प्राप्त झालेला असून पदांची निर्मिती करावयाची आहे. पदांची निर्मिती लवकरात लवकर केली जाईल.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, सभागृहामध्ये आजच माणसांच्या आरोग्याविषयी चर्चा झाली. जनावरांना विचार करता येत नाही, बोलता येत नाही. मग जनावरांचे आजार ओळखावयाचे कसे ? शेतकरी परिस्थितीला कंटाळून आत्महत्या करीत आहेत. माणसाला ताप आला तर 10 रुपयांचे इंजेक्शन घेता येते. परंतु जनावराला ताप आला तर 70-80 रुपयांचे इंजेक्शन द्यावे लागते. दुर्लक्षित शेतक-यांची जनावरे वाचावीत असे जर शासनाला वाटत असेल तर शासन जनावरांच्या औषधांच्या किंमती कमी करेल काय आणि त्यासाठी तरतूद वाढविणार काय ?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा लक्षवेधी सूचनेचा विषय नाही. मागच्या दोन वर्षापासून सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये जनावरांची औषधे कमीत कमी किंमतीमध्ये दिली जातात. शासनाने जनावरांच्या औषधांसाठी कमीत कमी पैसे घेण्याची व्यवस्था केलेली आहे. जनावरे औषधाविना मरण पावली, असे आपल्या राज्यात आज पर्यंत झालेले नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेला जे लेखी उत्तर दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "...दिनांक 31.03.2005 अखेर 2 पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष शिल्लक राहिलेला आहे." आज सव्वादोन वर्षे झालेली आहेत. सव्वादोन वर्षामध्ये पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष का भरण्यात आला नाही ? लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "सदर 2 दवाखान्यांसाठी 2 पशुधन विकास अधिकारी, 2 व्रणोपचारक व 2 परिचर अशी एकूण 6 पदे निर्माण करण्याची आवश्यकता आहे." आज सव्वादोन वर्षे झालेली आहेत. जनावरे मरत आहेत. आदिवासी भाग आहे. शासनाला पदांची निर्मिती करण्यासाठी किती वर्षे लागणार आहेत ? शासन 2 पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष केव्हा भरणार आहे ? यासाठी शासनाने कालबद्ध कार्यक्रम निचित करावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये उत्तर दिलेले आहे. दिनांक 31.03.2005 अखेर 2 पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष शिल्लक राहिलेला आहे. सन 2007-08 मध्ये निधी प्राप्त झालेला आहे. मी स्वत: यामध्ये लक्ष घालीन आणि तीन महिन्यांच्या आत ही पदे निर्माण करण्याचा शासन प्रयत्न करेल.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.केळकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय राज्यमंत्री उत्तर देत आहेत. पण काल त्यांच्या खात्यासंबंधात अनेक मुद्दे होते परंतु पुरवणी मागण्यांवर उत्तर देण्यासाठी मात्र ते या ठिकाणी अनुपस्थित होते. असो. मला या विषयासंबंधात असे विचारावयाचे आहे की, यामध्ये किती पदे रिक्त आहेत आणि या पदांना उच्च स्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरू आहे असे जे आपण निवेदनामध्ये म्हटले आहे तर ही कार्यवाही केव्हापासून सुरू आहे आणि ती केव्हा पूर्ण होणार व ही पदे केव्हा भरली जाणार आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, जिल्ह्यात एकूण किती पदे रिक्त आहेत याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती मी नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवीन. ही पदे रिक्त असण्याचे मुख्य कारण म्हणजे एमपीएससी कडून ही पदे भरली गेलेली नाहीत. त्यामुळे एमपीएससी कडून ही पदे भरावीत म्हणून आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहात आणि लवकरात लवकर ही पदे भरली जातील असा आमचा प्रयत्न राहील.

***

....... 3एक्स 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई, पुणे व इतर भागात दूध भेसळीचे होत असलेले प्रकार.

**मु.शी.** : मुंबई, पुणे व इतर भागात दूध भेसळीचे होत असलेले प्रकार या बाबत सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, सुधाकर गणगणे, चंद्रकांत रघुवंशी, एम.ए.अझिज, शरद रणपिसे, प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्रीमती सुधा जोशी, कर्नल सुधीर सावंत, श्री.रमेश निकोसे, श्रीमती फौजिया खान, सर्वश्री धोंडीराम राठोड, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वसंतराव चव्हाण, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, गुरूनाथ कुलकर्णी, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.सागर मेघे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषधे प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करते. ...

"पाण्यामध्ये रासायनिक पदार्थ मिसळून या पांढऱ्या विषारी पाण्याची दूध म्हणून विक्री करण्याचे प्रकार मुंबई, पुणे तसेच राज्याच्या इतर भागात अनेक ठिकाणी सुरु असल्याचे दि.7 जून, 2007 च्या सुमारास निदर्शनास येणे, याबाबत एकूण दूधापैकी सुमारे 25 टक्के दूध हे भेसळयुक्त असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाने जाहीर करणे, मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाने दूध भेसळ प्रकरणास आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे आश्वासन देऊनही दूध भेसळीचे प्रकार अद्यापही मोठया प्रमाणात सुरु असणे, भेसळयुक्त दूध अत्यंत गंभीर व धोकादायक असून त्याचा सर्व सामान्य नागरिक व लहान मुलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याने दूध भेसळीला आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करुन भेसळ करताना कोणी आढळून आल्यास त्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व औषधे प्रशासन राज्यमंत्री) : महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... 3एक्स 3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, या निवेदनामध्ये विषारी दूध असल्याचेच नाकारण्यात आलेले आहे. मग मध्यंतरी विषबाधेचा जो एवढा मोठा गदारोळ झाला तो का झाला ? हेही शासनाने येथे सांगणे आवश्यक आहे. तसेच या उत्तरात म्हटले आहे की, संपूर्ण राज्यातून दुधाचे 546 नमुने तपासण्यासाठी पाठविण्यात आले असून त्यांचा अहवाल प्रलंबित आहे. तर हे नमुने तपासणीसाठी केव्हा पाठविले ? आणि दुधासारख्या पदार्थाचे नमुन्यांची तातडीने तपासणी करून त्याचा अहवाल घेतला गेला पाहिजे असे असताना या तपासणीचे अहवाल प्रलंबित का आहेत? या तपासणीचे अहवाल येणे केव्हा अपेक्षित आहे ? तसेच या निवेदनात पुढे असेही आपण म्हटले आहे की, 4353 लीटर दूध नष्ट करण्यात आले व 19738 लीटर दूध मानदापेक्षा कमी असल्याने सदर वाहनांना मुंबईत प्रवेश नाकारण्यात आला. तर त्या नष्ट करण्यात आलेल्या दुधामध्ये काय काय आढळून आले ? म्हणजे त्यात काही आक्षेपार्ह काय होते ते सांगण्यात यावे. तसेच मानदापेक्षा कमी म्हणजे नेमके त्यात काय आढळून आले तेही आपण सांगितल्यास बरे होईल.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी के पहले प्रश्न का उत्तर यह है कि जो नमूने लिए गए थे, उसमें से 67 नमूने स्टेन्डर्ड पाए गए हैं और 32 नमूने सब-स्टेन्डर्ड पाए गए हैं. 4 लोगों को प्रोसीक्यूट किया गया है और उनका लाइसेंस रद्द किया गया है. उनका दूसरा प्रश्न यह है कि रिपोर्ट प्रलंबित क्यों होती है. इसका उत्तर यह है कि 40 दिन के अन्दर टेस्ट रिपोर्ट आनी चाहिए, ऐसा नियम है. ड्रग की जांच के लिए हमारे पास अपनी लॅब है. फूड की जांच के लिए 11 जिलों के लिए एक लॅब है और दूसरी लॅब मुम्बई महानगरपालिका की है. शासन ने इस बात की गंभीरता को ध्यान में रखते हुए खुद की फूड की लॅब स्थापित करने का निर्णय लिया है. इस लॅब को पूर्ण होने में तो 2-3 साल लग जाएंगे, लेकिन उसमें काम की शुरुआत 3-4 महीनों में हो जाएगी. यह लॅब स्थापित होने के बाद रिपोर्ट प्रलंबित नहीं होगी. दूध की जांच में कोई केमीकल नहीं पाया गया है. दूध की जाँच मुख्य रुप से फॅट की परसेंटेज के बारे में होती है. इसके अतिरिक्त एक-दो टेस्ट और भी किए जाते हैं. इस टेस्ट के दौरान अगर दूध फेल हो जाता है तो वह नष्ट किया जाता है और यह चेकिंग नाका पर करते हैं.

( यानंतर श्री. सरफरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये दूधामध्ये भेसळ इतकी मोठया प्रमाणात होते की, ती नैसर्गिक आहे असे वाटायला लागले आहे. आपण ज्या ठिकाणी जाल त्या ठिकाणी शुध्द दूध मिळणे कठीण झाले आहे. आपण निवेदनामध्ये दूध नष्ट केल्याचे सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, मुंबईमध्ये व शहरी भागामध्ये जाणाऱ्या दूधाची तपासणी करण्यासाठी आपल्याकडे यंत्रणा आहे काय? तसेच, 19 हजार 738 लिटर दूध मानदापेक्षा कमी आढळल्यानंतर त्या लोकांविरुध्द आपण काय कारवाई केली? किती लोकांना अटक केली /

श्री. बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, कितने लोगों के खिलाफ कार्रवाई की गई है, इसकी जानकारी मैं पटल पर रखूंगा. कितने लोगों के खिलाफ मुकदमा दायर किया गया है, उसके आंकडे मेरे पास है. 2006-07 में 78 लोगों के खिलाफ मुकदमा दायर किया गया है. 64 लोगों के खिलाफ प्रशासनिक कार्रवाई की गई है. फुड इंसपेक्टर नाके पर दूध की जांच करते हैं. हाल ही में नेशनल डेअरी डेवेलपमेंट कमिश्नर द्वारा मिल्क किट मंगाई गई है. मिल्क किट के उपयोग से यह फायदा होगा कि उसके द्वारा स्पाट टेस्टिंग कर सकेंगे. इस प्रकार की यंत्रणा है.

श्री. शिवाजीराव शेंडगे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये 151 नमुन्यांपैकी 127 नमुन्यांमध्ये स्निग्धांश कमी असल्याचे व 24 नमुन्यामध्ये साखर, स्किम मिल्क पावडर, स्टार्च,ग्लुकोज, माल्टोडेक्स्ट्रीन पावडर इ. आढळून आल्याचे म्हटले आहे. दूधामध्ये बेकायदेशीररित्या या घटकांची भेसळ करण्यात आली असेल तर ही भेसळ करणारे महाभाग कोणत्या डेअरीचे आहेत? या 24 डेअऱ्यांमध्ये खाजगी किती व सरकारी किती आहेत? त्यांची नावे आपण सांगणार काय?

श्री. बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, 24 डेअरी में 19 प्राईवेट डेअरी हैं और 5 सहकारी सोसायटी की डेअरी हैं.प्राईवेट डेअरी के नाम इस प्रकार से है. (1) लक्ष्मी डेअरी, घुले (2) सरस्वती डेअरी, जलगांव (3) न्यू सुदर्शन डेअरी, चालीसगांव (4) ममता डेअरी, चालीसगांव-जलगांव (5) चेतना दुग्धालय, चालीसगांव-जलगांव (6) साखरे दूध डेअरी, पिंजवाडी-मुलशी (7) रामेश्वर लक्ष्मी नारायण एंड कंपनी, पुणे (8) श्री राम मूर्ति नरसिंह यादव मिल्क वेंडर, उंदरी, हवेली (9) दिन्शॉ डेअरी मिल्क कलेक्टिंग सेंटर, सिल्ली, भंडारा. (10) युवराज जयचंद मंडनकर

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी ....

मिल्क वेंडर, सिरसी, भंडारा. (11) सिम्पल फुड प्रॉडक्टस, गुमछाला,कामठी-नागपुर (12) सिमला मिल्क प्राईवेट लिमिटेड, वसई, ठाणे. (13) अनबंद दूध प्राईवेट लिमिटेड, पनवेल, रायगड़ (14) सिसोदिया दूध डेअरी, अकोला (15) महक रेस्टॉरंट सिविल लाईन चौक, अकोला.

सहकारी सोसायटी की डेअरी के नाम इस प्रकार है. (1) महालक्ष्मी को-आपरेटिव्ह मिल्क संघ, कोल्हापूर (2) वारणा सहकारी दूध उत्पादक संघ, कोल्हापूर (3) हनुमान सहकारी दुग्ध व्यवसायिक एंड कृषि पूरक सेवा संघ, कोल्हापूर (4) रुक्मिणी महिला सहकारी दूध उत्पादक संस्था लिमिटेड, इंदापूर, पुणे. (5) नंदलाल सहकारी दूध उत्पादक संघ, जळगांव.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर विषयावरील लक्षवेधी सूचना आहे. दूधामध्ये भेसळ करुन लोकांच्या जीवनाशी खेळणारे हे लोक आहेत. खारघर आणि नवी मुंबई येथील झोपडपट्टयांमध्ये अशाप्रकारे भेसळ करणाऱ्या लोकांना पकडण्यात आले होते. दूधामध्ये भेसळ करतांना घाणेरडया पाण्याचा वापर करण्यात येतो असे वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. निवेदनामध्ये "पावडर इत्यादी आढळून आले" असे म्हटले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, "इत्यादी" म्हणजे काय?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, कुछ नमूनों में साखर, कुछ नमूनों में स्कीम मिल्क पावडर, कुछ नमूनों में स्टार्च,कुछ नमूनों में ग्लुकोज और कुछ नमूनों में माल्टोडेक्स्ट्रीन पावडर पाया गया है. इसलिए " इत्यादि " शब्द का प्रयोग किया गया है.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझे दोन प्रश्न आहेत. झोपडपट्टीमध्ये भेसळ चाललेली आहे असे, एखाद्या ग्राहकाला जाता जाता कळले तर याबाबत त्या लोकांना खबर होण्याच्या आत त्याठिकाणी छापा टाकला पाहिजे. तर ते कळविण्यासाठी आपल्याकडे कोणती यंत्रणा आहे ? कुलाबा परिसरातील दुकानामध्ये खास करून दुधामध्ये मिलावट असणारे दूध देण्यात येत होते, तसेच मनोरा येथील आमदार निवासमधील कॅन्टीनमध्ये भेसळ दूध मिळाल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, कुलाबा परिसर में दूध में मिलावट का मामला हमारी नजर में नहीं आया है. आपके पास कोई स्पष्ट शिकायत होगी तो वह आप हमें दें, हम उसके खिलाफ कार्रवाई करेंगे. दूध मिलावट के संबंध में हम अवेअरनैस का कार्यक्रम चला रहे हैं. हेल्प लाईन शुरु कर रहे हैं.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, निवेदनाच्या पान 2 वर म्हटलेले आहे की, "सदर नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले असून त्यांचे अहवाल प्रलंबित आहेत." प्रलंबित अहवाल किती कालावधीमध्ये मिळणार आहेत आणि ते अहवाल सभागृहाच्या माहितीसाठी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार आहे काय ?

श्री. बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, कुछ अहवाल प्राप्त चुके हैं. अहवाल जल्द से जल्द आने चाहिए, इस बात से मैं सहमत हूं. 40 दिन के अन्दर अहवाल देना पड़ता है. दो-चार दिन देरी हो जाती है. वे अहवाल सभागृह के पटल पर रखे जाएंगे.

.......

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ. शी.** : लांजा,जि.रत्नागिरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अपुऱ्या असलेल्या सोयी-सुविधा

**मु. शी.** : लांजा,जि.रत्नागिरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अपुऱ्या असलेल्या सोयी-सुविधा याबाबत मेजर सुधीर सावंत वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : मा□□य सदस्य मेजर सुधीर सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो :-

"लांजा जिल्हा रत्नागिरी हे गाव मुंबई गोवा महामार्गावर दोन्ही बाजूला वसलेले आहे. या महामार्गावर अनेकदा अपघात होत असतात. लांजा ग्रामपंचायत हद्दीतील प्राथमिक केंद्रामध्ये अनेक प्रकारच्या सोयी सुविधा व वैद्यकीय उपकरणे नसणे, या भ्ंागात पूर्ण सोयी सुविधा असलेले एकही रुग्णालय नसणे, त्यामुळे तेथील रुग्णांना सिव्हील रुग्णालय, रत्नागिरी येथे जावे लागत असणे, त्यामुळे अपघात झाल्यावर बहुमोल वेळ प्रवासात जाणे, त्यामुळे रुग्णाच्या जीविताला धोका निर्माण होणे, परिणामी स्थानिक रहिवाशांत व आम जनतेत पसरत असलेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना निर्माण होणे, अशा या सार्वजनिक दृष्टया अत्यंत महत्त्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा शहर हे मुंबई-गोवा महामार्गावर आहे. या महामार्गावर अनेक अपघात होतात. लांजा शहराच्या हद्दीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, परंतु त्या आरोग्य केंद्रामध्ये अपघातातील रग्णांवर कोणत्याही प्रकारचे उपचार करण्याची सुविधा नाही. अपघात झाल्यानंतर ट्रोमाकेममध्ये परिवर्तन झाल्यामुळे अपघातातील व्यक्ती दगावते, जखमी होते. माझी विनंती आहे की, त्या जखमींवर उपचार करण्यासाठी अद्यावत यंत्रणा पुरविण्यात यावी, अशी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नवी मुंबईमध्ये वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ध्वनी प्रदूषण,वायुप्रदूषणाचे वाढलेले प्रमाण

**मु. शी.** : नवी मुंबईमध्ये वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ध्वनी प्रदूषण,वायुप्रदूषणाचे वाढलेले प्रमाण, याबाबत श्री.अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री.अरविंद सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"नवी मुंबईतील वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे ध्वनी प्रदूषण आणि वायू प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. तलाव आणि विहिरी, मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्याने नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागल्याने गेल्या वर्षात विविध आजाराने 395 नागरिक त्रस्त झाले. औद्योगिक परिसरातील रासायनिक कंपन्यातून सोडलेले पाणी खाडीही दुषित करीत असल्याने मासे खाणेही तेथील नागरिकांनी सोडले आहे. नवी मुंबई महापालिकेने केलेल्या सन 2006-07 च्या पर्यावरण अहवालात नवी मुंबईतील पर्यावरणाच्या ढासळलेल्या समतोलाची धक्कादायक माहिती उघड केली आहे. वाहतूक बेटांवर हवेचे प्रदूषण जास्त असून यात धुळीकरण, सल्फरडाय ऑक्साईड, कार्बन व मोनॉक्साईड, नायट्रोजन यांचे प्रमाण जास्त आढळले आहे. त्यामुळे श्वसनविकार आणि फुफ्फुसाचे आजार बळावलेले आहेत. याबाबत शासनाने दुसऱ्या मुंबईला वाचविण्याकरिता प्रयत्न करण्याची आवश्यकता व ठोस पावले उचलण्याबाबतची नितांत गरज, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, वाढते शहरीकरण, औद्योगिकरण आणि वाहनांच्या वाढत्या संख्येमुळें नवी मुंबईत ध्वनी आणि वायू प्रदूषणाचे प्रमाण वाढले आहे. तलाव आणि विहिरी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्याने नागरिकांना दूषित पाणी प्यावे लागत आहे. औद्योगिक परिसरातील रासायनिक कंपन्यांतून सोडलेले पाणी खाडीही दूषित करत असल्याने लोकांनी मासे खाणे देखील बंद केलेले

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

आहे. एकंदर नवी मुंबईतील पर्यावरणाचा दर्जा ढासळलेला असून नवी मुंबईकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. समुद्राच्या काठावर आणि डोंगराच्या पायथ्याशी वसलेले नवी मुंबई शहर एकेकाळी प्रदूषण विरहीत होते. परंतु वाढत्या शहरीकरणाबरोबर हे चक्र वेगाने बदलेले आहे. नवी मुंबई महापालिकेने केलेल्या सन 2006-07 च्या पर्यावरणस अहवालात नवी मुंबईतील पर्यावरणाच्या ढासळलेल्या समतोलाची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. वाहतूक बेटांवर हवेचे प्रदूषण जास्त असून यात धूळीकरण, सल्फरडाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन यांचे प्रमाण जास्त आढळले आहे. त्यामुळे श्वसनविकार आणि फुफ्फुसांचे आजार बळावले आहेत. ऐरोली, रबाले, कोपरखैरणे, महापे, तुर्भेगाव, तुर्भेनाका, इंदिरानगर, नेरूळ या भागात ध्वनी आणि वायू प्रदूषण जास्त आहे. तुर्भे परिसरातील जनता रोज शंभर ग्रॅम धूळ खाते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. पालिका क्षेत्रातील 35 तलाव आणि 169 विहिरी मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाल्या असून तेथील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा निष्कर्ष पर्यावरण अहवालात काढण्यात आला आहे. कपडे धुणे, भांडी घसणे, आंघोळ करणे, गुरे तसेच वाहने धुणे त्याचबरोबर आसपासच्या कारखान्यातील प्रदूषित पाणी आणि घनकचऱ्यामुळे नवी मुंबईतील तलाव प्रदूषित झाले आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

बेलापूर आणि शिरवणे गावातील विहिरींच्या पाण्यात रासायनिक प्रक्रिया झाल्याचे आढळून आले आहे. 6.23 टक्के पाणी पिण्यास अयोग्य असून त्यामुळे गेल्या वर्षात 395 जणांना आजार जडले होते. 158 जणांना गॅस्ट्रो, 94 जणांना हगवण, 5 जणांना हेपेटाईटीस तर 41 जणांना टायफाईडची लागण झाली होती. नवी मुंबईतील वाढते शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता शासनाने याकडे खरोखरच गंभीरपणे लक्ष द्यावे यासाठी हा विशेष उल्लेख मी आपल्या अनुमतीने मांडत आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मे. नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनी लि. गडचिरोली या कंपनीच्या संचालकांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन कोट्यवधी रुपयांचा केलेला भ्रष्टाचार.

**मु. शी.** : मे. नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनी लि. गडचिरोली या कंपनीच्या संचालकांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन कोट्यवधी रुपयांचा केलेला भ्रष्टाचार याबाबत श्री. पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्री. रामनाथ मोते )** : माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मे. नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनी लि. गडचिरोली यांना दरवर्षी 10,000 मे.टन बांबू पुरवठा करण्यासाठी दिनांक 25 मे, 2004 रोजी शासन व कंपनी दरम्यान करारनामा करण्यात आला. या करारनाम्यातील अट क्र. 3 प्रमाणे सदर बांबूचा उपयोग बांबू चटया, बांबू बोर्ड व इतर बांबूच्या वस्तू तयार करण्याकरिता करावयाचा होता. तथापि या कंपनीचा असा उद्योग अस्तित्वात आहे काय याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी खातरजमा केली असता त्यांना जून, 2006 मध्ये असे आढळून आले की, गडचिरोली येथे विसापूर रोडला कंपनीचा प्लॉट असून तेथे फक्त कंपनीच्या नावाचा बोर्ड लागलेला आहे, जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम नाही अथवा उद्योग नाही.

करारनाम्यातील अट क्र. 28 नुसार बांबूचा उपयोग केल्यानंतर शिल्लक राहिलेला अनुपयोग बांबू उपवनसंरक्षक, सिरोंचा यांचे परवानगी शिवाय विकण्यास परवानगी नव्हती. त्या अनुषंगाने कंपनीने दिनांक 29 मार्च, 2004 रोजी शपथपत्र दिले असून त्यात बांबूची विक्री खुल्या बाजारात करणार नसल्याची हमी दिली आहे. तसेच बांबूचे निष्कासन न केल्यामुळे शासनाच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

झालेल्या नुकसान भरपाईबाबत शासन स्तरावर जो निर्णय होईल तो कंपनीस मान्य असून कंपनीस बंधनकारक असेल असे दुसरे हमीपत्रही कंपनीने शासनास दिले आहे. तथापि, अशी हमीपत्रे कंपनीने शासनास दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र काय झाले हे प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजी प्रधान सचिव (वने) यांना पाठविलेल्या पत्रातून आपणास दिसून येते. सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे मे. नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनी लि. कडून शासनास खालीलप्रमाणे रक्कम येणे बाकी होते.

| पुरवठा वर्ष | निष्कासनाचे उद्दिष्ट (मे.टन) | थकित स्वामित्व शुल्क करासह | व्याज (रु.) | एकूण शासनास येणे असलेली थकीत रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|
| सन 2003-04 | 2000 | 10,05,304 | 356 | 10,05,660 |
| सन 2004-05 | 10,000 | 75,39,795 | 14,53,932 | 89,93,727 |
| सन 2005-06 (माहे मार्च 2006 च्या 6 व्या किस्तीसहित ) | 10,000 | 56,54,844 | 11,69,123 | 68,23,967 |
| एकूण | | 1,41,99,943 | 26,23,411 | 1,68,23,354 |

खरे तर खुल्या बाजारात ज्या बांबूची किंमत रुपये 3500/- ते 4000/- प्रति मे.टन आहे असा उच्च प्रतिचा बांबू या कंपनीला रुपये 600/- प्रति मे.टन देण्यात आला होता. त्यामुळे शासनाचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यातच 600/- रुपये मे.टन या दराने देण्यात आलेल्या बांबूचे पैसे देखील शासनास परत करण्यात आलेले नाहीत. तोड झालेल्या बांबूपैकी 99 टक्के बांबू खुल्या बाजारात विकला गेला आहे. करारनाम्यानुसार कुपातील बांबूची वाहतूक कुपापासून कंपनीच्या उद्योगापर्यंत व्हावयास पाहिजे होती परंतु कंपनीचा स्वत:चा असा उद्योगच नसल्यामुळे बांबू कुपातून कमलापूर येथील अस्थायी डेपोपर्यंत वाहतूक झाल्यानंतर पुढे मध्य प्रदेशातील व्यापाऱ्यांच्या मदतीने बाहेरच्या राज्यात रवाना करण्यात येत होता. त्यासाठी

....4....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

दिनांक 12 फेब्रुवारी, 2007 ते दिनांक 5 मे, 2007 या कालावधीत 129 वाहतूक परवाने जारी करण्यात आले आहेत.

या विशेष उल्लेखाचे विशेष हे की, ज्या नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनीबरोबर करारनामा झाला आहे त्या कंपनीचे संचालक या मंत्रिमंडळातील एक सदस्य आहेत. त्यांनी बांबू कोटा मिळावा यासाठी सचिव, वन यांना दिनांक 10 ऑक्टोबर, 2003 रोजी पत्र पाठविले होते. इतकेच नव्हे तर दिनांक 29 मार्च, 2004 रोजी 100/- रुपयांचे जे हमीपत्र दिले होते त्यावरही संचालक, नवदुर्गा बांबू क्राफ्ट कंपनी लि. म्हणून त्यांचीच स्वाक्षरी आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर......)

आदिवासी बुरुड लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या नावाखाली राज्य मंत्रिमंडळातील एक सदस्यच आपल्या पदाचा गैरवापर करुन शासनाचे कोट्यवधी रुपयांचे जंगल कापून विकत असेल तर यापेक्षा सर्वात मोठा भ्रष्टाचार तो कोणता ?

मी या विशेष उल्लेखाद्वारे आपल्या मार्फत माननीय मुख्यमंत्र्यांचे, माननीय वन मंत्र्यांचे व सन्माननीय सदस्यांचे लक्ष वेधून या प्रकरणी सी.आय.डी. चौकशीची मागणी करतो."

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नवी मुंबईतील वाशी येथील खाडीमधून अनधिकृतपणे रेती काढण्याचे काम सुरु असणे

**मु.शी.**: नवी मुंबईतील वाशी येथील खाडीमधून अनिधकृतपणे रेती काढण्याचे काम सुरु असणे यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्रीमती मंदा म्हात्रे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"महाराष्ट्रील सर्वांत मोठा पूल (ब्रीज) नवी मुंबईत वाशी खाडीवर असून ह्या खाडीमधून गेले अनेक महिने मोठ्या प्रमाणात रेती काढण्याचे काम सुरु आहे. सदर रेती काढण्याचे काम अधिकृत आहे किंवा अनधिकृत आहे याची चौकशी संबंधित जिल्हाधिकारीही करीत नसून चौकशीला समाधानकारक उत्तरही दिले जात नाही. सतत रेती काढल्यामुळे हा पूल ढासळून पुलाला केव्हाही धोका निर्माण होऊ शकतो. सदर पुलावरुन नियमित शेकडो वाहनांची ये-जा होत असते. महाराष्ट्राला दळणवळणाने जोडणारा हा एकमेव मार्ग असून रेती काढल्यामुळे पुलाला केव्हाही धोका होण्याची शक्यता आहे. जर रेती काढण्यास शासनाने परवानगी दिली असेल तर सदर रेती काढण्याचे काम इतरत्र देण्यात यावे जेणेकरुन पुलाचा धोका टळेल. या प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधित ठेकेदाराविरुध्द तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

मी अतिशय महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मांडलेली आहे. महाराष्ट्राच्या दळवणवळणामध्ये प्रमुख असणारा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा पूल वाशी खाडीवर आहे. गेले कित्येक दिवस वाशी खाडीमधून रेती उपसण्याचे काम चालू आहे. हे रेती काढण्याचे काम अधिकृत आहे की अनधिकृत आहे या संबंधी मी जिल्हाधिकारी श्री. झेंडे यांना फोन वरुन विचारणा केली होती. त्यांनी मला असे उत्तर दिले की, हे काम जर अधिकृत असेल तर ते थांबवून त्यांना दुसरीकडे रेती काढण्यास परवानगी दिली जाईल. त्यांनी असेही सांगितले की, काही ठेकेदार

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे...)

दुस-या ठिकाणची परवानगी घेऊन या ठिकाणी रेती काढतात. सभापती महोदय, या ठिकाणी सातत्याने रेती काढली जात असल्यामुळे पुलाला धोका निर्माण होऊन तो केव्हाव्ही ढासळू शकतो. या पुलावरुन रोज हजारो वाहनांची ये-जा होत असते. महाराष्ट्राच्या दळणवळणातील हा मुख्य पूल असून महाराष्ट्राला मुंबईशी जोडणारा हा पूल आहे. सततच्या रेती काढण्याने या पुलाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. तेव्हा हे रेती काढण्याचे काम त्वरित थांबविण्यात यावे जेणे करुन या पुलाचा धोका टळू शकेल. या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित ठेकेदाराविरुध्द तातडीने कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करते.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: ठाणे शहर व जिल्हयामध्ये विद्यार्थ्यांना खुल्या व आरक्षण प्रवर्गात महाविद्यालयातून प्रवेश देण्याबाबत निर्माण झालेला संभ्रम

**मु.शी.**: ठाणे शहर व जिल्ह्यामध्ये विद्यार्थ्यांना खुल्या व आरक्षण प्रवर्गात महाविद्यालयातून प्रवेश देण्याबाबत निर्माण झालेला संभ्रम याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देण्याबाबत निश्चित धोरणानुसार प्रवेश पध्दती निर्देशित केलेली असताना ठाणे शहरात व जिल्ह्यात खुल्या वर्गात व आरक्षणानुसार प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत शिक्षण विभागाचे अधिकारी संस्थाचालक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे आढळून आले आहे. प्रवेश अर्जात "एस.सी." कॅटॅगरीमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गात प्रवेश देणे, त्यांना आरक्षणाच्या सवलती नाकारणे, याबाबतीत चौकशी केली असता मागासवर्गीयांचे फी माफीचे अनुदान वेळेवर न मिळाल्याने संस्थाचालक, मागासवर्गीयांना प्रवेश देण्याबाबत टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे पात्र असूनही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहाणे, शासनाच्या "जी.आर."चा चुकीचा अर्थ लावून शिक्षण विभागाच्या अधिका-यांनी चुकीचा तोंडी आदेश देणे, त्यामुळे असंख्य विद्यार्थ्यांवर अन्याय होऊन पात्र असूनही असे विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहाणे, त्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्यात असंतोष निर्माण होणे, त्यामुळे शासनाने मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या कॉलेज प्रवेशाबाबत सुस्पष्ट निर्देश देण्याबाबत तसेच जे प्रवेश झालेले आहेत त्याची शासनाने तपासणी करण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक

**L.C.BILL NO V OF 2007**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965)**

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007चे वि.प.वि. क्रमांक 5 मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात काकोडकर समिती नेमली होती....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना फ्युनेरलसाठी जावयाचे असल्यामुळे विनियोजन विधेयक लवकर घ्यावे अशी त्यांनी आपणास विनंती केली होती आणि ते विनियोजन विधेयक मांडण्यासाठी जेव्हा मंत्री महोदय उभे राहिले त्यावेळी ते विधेयक विधानसभेतून संमत होऊन विधानपरिषदेमध्ये आले नसल्याचे समजल्यानंतर माननीय मंत्री महोदय ते विधेयक मांडण्याचे थांबले. सभापती महोदय, जेव्हा कामाकाजाचा आठवडयातील शेवटचा दिवस असतो त्यावेळी नियमाप्रमाणे सभागृहाचे कामकाज 4.00 वाजता संपते. माननीय राज्य मंत्री महोदय जे विधेयक विचारार्थ मांडत आहेत त्यावर आम्हाला बोलायचे आहे.

...नंतर कु. खर्चे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

सदर विधेयक आज घेतले तरी माझी काहीच हरकत नाही, परंतु मला या विधेयकावर तास ते दीड तास चर्चा करावयाची आहे आणि उद्या सार्वजनिक सुट्टी आहे. आपल्या सभागृहाच्या प्रथा व परंपरानुसार जर दुस-या दिवशी सार्वजनिक सुट्टी असेल तर आधीच्या दिवशी आपण सभागृहाची बैठक लवकर स्थगित करतो म्हणून सदर विधेयक पुढे ढकलण्यात यावे. सोमवारी या विधेयकावर विधायक चर्चा घडेल आणि आता यासंदर्भात काहीतरी तांत्रिक गोंधळ देखील आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे विधेयक आपण सोमवारी प्राधान्याने चर्चेस घेऊ.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहाची जर इच्छा असेल तर सदर विधेयक पुढे ढकलण्यासाठी माझी काहीही हरकत नाही.

**तालिका सभापती ( श्री.रामनाथ मोते )** : माननीय मंत्रिमहोदय, सदर विधेयक सोमवारी चर्चेला घेण्यास काही हरकत आहे का ?

श्री.राजेश टोपे : ठीक आहे.

**तालिका सभापती** : सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 5 मुंबई प्रांतिक महानगरपालिका,नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी ( सुधारणा ) विधेयक,2007 हे सोमवार, दिनांक 30 जुलै,2007 रोजी चर्चेला घेण्यात येईल.

-------

4C इ 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझी एक विनंती अशी आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेवर अनेक गोष्टी अशा आहेत की, ज्याच्यामध्ये ब-याच सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत गिरणी कामगार या विषयावर तारांकित प्रश्न आणि नियम 93 अन्वये एक सूचना देखील आजच आलेली आहे तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा असतांनादेखील सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांची "दिनांक 11जुलै, 2006 रोजी झालेले बॉम्बस्फोट "या विषयावर एक अर्धा तास चर्चा चर्चेची सूचना आज दिलेली आहे. अशा प्रकारे एकाच विषयाची किंवा एकाच आशयाची पुनरावृत्ती आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये होत आहे. माझी अशी विनंती आहे की, एकाच आशयाच्या अनेक सूचना किंवा प्रश्न असल्यास ते क्लब करण्यात यावेत व त्यावर एकत्रित चर्चा घडविण्यात यावी, म्हणजेच सभागृहाचा वेळ वाचेल.

श्री.सुरेश शेट्टी : अर्धा - तास चर्चेची सूचना सन्माननीय सदस्यांनी देऊनही ते जर आता सभागृहामध्ये उपस्थित नसतील तर त्यासाठी सभागृहाचा पुन्हा वेळ घेण्यात येऊ नयेत. कारण सदस्यांनी दिलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचनेला उत्तर देण्यासाठी आम्ही सभागृहामध्ये उपस्थित राहावयाचे आणि सन्माननीय सदस्यांनी अनुपस्थित राहावयाचे हे योग्य नाही. कृपया यासंदर्भात संबंधित सन्माननीय सदस्यांच्या लक्षात ही बाब आणून द्यावी.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4C इ 3

## अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत.

**पृ.शी.**: "ठाणे जिल्हयाच्या विभाजनाची आवश्यकता."

**मु.शी.**: "ठाणे जिल्हयाच्या विभाजनाची आवश्यकता" यासंबंधी श्री.संजय दत्त, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा - तास चर्चा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सदर अर्धा -तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत माननीय सभापतींकडे पत्र दिलेले आहे.

----------

**पृ.शी.**: "राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत."

**मु.शी.**: "राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत" श्री.संजय दत्त,वि.प.स.यांनी उपस्थित केलेलली अर्धा - तास चर्चा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सदर अर्धा -तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत माननीय सभापतींकडे पत्र दिलेले आहे.

--------

**पृ.शी.**: "मराठवाडयातील मेडिकलच्या जागांबात."

**मु.शी.**: "मराठवाडयातील मेडिकलच्या जागांबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 29447 ला दिनांक 17 जुलै,2007 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.श्रीकांत जोशी यांनी उपस्थित केलेली अर्धा - तास चर्चा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सदर अर्धा -तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत माननीय सभापतींकडे पत्र दिलेले आहे.

-------

**पृ.शी.**: "नाबार्ड कडून जिल्हा भूविकास बँका आणि शिखर बँकांना कर्ज मिळणार नसल्याने या बँका बंद करण्याच्या केलेली शिफारस."

**मु.शी.**: "नाबार्ड कडून जिल्हा भूविकास बँका आणि शिखर बँकांना कर्ज मिळणार नसल्याने या बँका बंद करण्याच्या केलेली शिफारस" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 9612 ला दिनांक 06 डिसेंबर,2005 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. जयंत पाटील,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा - तास चर्चा.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित. ) ......4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: "केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी अत्यंत धीम्या गतीने होत असलेली अंमलबजावणी."

**मु.शी.**: "केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण विकास रोजगार हमी योजनेची अत्यंत धीम्या गतीने होत असलेली अंमलबजावणी" यासबंधी डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी उपस्थित केले अर्धा - तास चर्चा.

डॉ.नीलम गो-हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) :सभापती महोदय, सदर अर्धा - तास चर्चेची सूचना संबंधित माननीय मंत्रिमहोदय आज येथे नसल्यामुळे त्यांनी ती पुढे ढकलण्यासाठी माननीय सभापतींकडे पत्र दिलेले आहे व मलाही तशी विनंती केली आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

------

**पृ.शी.**: "बीड जिल्हयामध्ये ल.पा.विभाग,अंबाजोगाई मार्फत सुरु असलेल्या बंधा-याच्या कामामध्ये राजरोसपणे बालकामगार वापरले जात असणे."

**मु.शी.**: "बीड जिल्हयामध्ये ल.पा.विभाग,अंबाजोगाई मार्फत सुरु असलेल्या बंधा-याच्या कामामध्ये राजरोसपणे बालकामगार वापरले जात असणे" यासंबंधी श्रीमती उषाताई दराडे,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा - तास चर्चा.

( सन्माननीय सदस्या अनुपस्थित. )

-----

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ज्या माननीय सदस्यांनी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे परंतु सभागृहात ती चर्चा मांडण्यासाठी उपस्थित नाहीत त्यांच्या अर्धा-तास चर्चा आपण परत चर्चेसाठी घेणार आहात किंवा त्या लॅप्स् होणार आहेत ?

**तालिका सभापती** : याबाबतचा निर्णय माननीय सभापती घेतील.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, जे माननीय सदस्य सभापतींना पत्र देऊन आपले कामकाज पुढे ढकलण्याची विनंती करतात त्यांनी किमान संबंधित खात्याच्या मंत्रीमहोदयांना तरी कळविले पाहिजे. कारण अर्धा-तास चर्चा आहे म्हणून संबंधित मंत्री येथे उपस्थित राहतात आणि सदस्य मात्र पत्र देऊन निघून जातात. याबाबतची नोंद घ्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माझी आपणांस विनंती आहे की, एखाद्या विषयाच्या संदर्भात चर्चा झाल्यानंतर तो विषय पुन्हा अधिवेशन संपेपर्यंत तरी सभागृहात येऊ नये. कारण सर्वच माननीय सदस्य प्रत्येक विषयावर मनापासून चर्चा करतात. शेवटच्या दिवशी सुध्दा सर्व विषय एकत्र करुन चर्चा होते. म्हणून एखाद्या विषयाला न्याय मिळाल्यानंतर त्या विषयावर पुन्हा चर्चा होऊ नये अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 30 जुलै, 2007 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 5 वाजून 26 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 30 जुलै,2007 च्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही